ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - III JULY - SEPTEMBER - 2020

MARATHI PART - I

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **“AJANTA”**.
Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)
Cell No. : 9579260877, 9822620877, 7030308239 Ph. No. : (0240) 2400877
E-mail : ajanta5050@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 6.399** **(www.sjifactor.com)**

# EDITORIAL BOARD


**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. Vitthal**
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.

# EDITORIAL BOARD

**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Sadique Razaque**
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Prof. Ram Nandan Singh**
Dept. of Buddhist Studies University of Jammu.

**Dr. Safiqur Rahman**
Assistant Professor, Dept. of Geography,
Guwahati College Bamunimaidam, Guwahati,
Assam.

PUBLISHED BY

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | शोधनिबंध आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | पेशवेकालीन वाहतुक व वाहतुकीची साधने - खानदेशच्या विशेष संदर्भात<br>**प्रा. डॉ. शिवाजी वाघमोडे** | १-६ |
| २ | छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील आज्ञापत्रे<br>**प्रा. डॉ. रमेश धनराज जाधव** | ७-१० |
| ३ | मध्ययुगीन काळातील एक अनोखे शस्त्र :विटा<br>**श्री. मृण्मय दीपक अरबुणे** | ११-१६ |
| ४ | छत्रपती शिवाजी महाराजांची पर्यावरण नीती<br>**डॉ. शर्मिला अशोक साबळे** | १७-२१ |
| ५ | छत्रपती शिवाजी महाराजांचे आर्थिक व शेती सुधारणा विषयक धोरण<br>**डॉ. विश्वनाथ काशिनाथ सोनवणे** | २२-२५ |
| ६ | स्थानिक इतिहासाच्या अभ्यासासाठी उपयुक्त असणाऱ्या काही मराठी साधनांची सूची : विशेष संदर्भ कोकण<br>**प्रा. डॉ. गणेश दत्तात्रय राऊत** | २६-३१ |
| ७ | आंबेगाव तालुक्यातील (जि. पुणे) ब्रिटीशांचे सनद भाषांतर धोरण<br>**डॉ. संतोष हनुमंत जाधव** | ३२-३५ |
| ८ | ग्राम स्वराज्य आणि महात्मा गांधीजींचे विचार : चिकित्सा<br>**डॉ. अजितकुमार दादासो जाधव** | ३६-४० |
| ९ | स्त्री-मुक्तीच्या विचारांचा आढावा<br>**श्री. मनोहर सुभाष निकम** | ४१-४५ |
| १० | कोयना प्रकल्पाचा पूर्व इतिहास<br>**प्रा. डॉ. विश्वनाथ पवार** | ४६-५२ |
| ११ | स्थानिक इतिहास<br>**Ms. Sunanda Madhavrao Kangane** | ५३-५७ |
| १२ | भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात मराठी वृत्तपत्रांची भूमिका<br>**डॉ. प्रगती बी. मारकवार** | ५८-६० |

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | शोधनिबंध आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | ढोर समाजाचा इतिहास : एक चिकित्सक अभ्यास<br>**डॉ. सौ. वंदना राजेश शिंदे** | ६१-७० |
| १४ | रत्नाप्पाण्णा कुंभार यांचे शैक्षणिक कार्य<br>**Dr. Madhuri Rajaram Khot** | ७१-७४ |
| १५ | सहकारी संस्थांचा संस्थापक : देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार<br>**प्रा. डॉ. पाटील संगीता संपत** | ७५-८१ |
| १६ | नव्या पिढीची प्रेरणा : श्रीमती शांताबाई यादव<br>**डॉ. सुरेश मारूती चव्हाण** | ८२-८४ |
| १७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार<br>**प्रा. डॉ. लता दिगंबर आंदे** | ८५-८८ |
| १८ | बोरगाव तालुका वाळवे येथील अस्पृश्यांची शेतकरी परिषद<br>**डॉ. चंपाताई श्रीरंग बोधले** | ८९-९१ |
| १९ | चांदी व्यवसायातील कारागीर स्त्रिया : विशेष संदर्भ हुपरी<br>**डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले** | ९२-९६ |
| २० | भारतीय राष्ट्रवादाचे व राष्ट्रीय एकात्मतेचे जनक : लोकमान्य टिळक<br>**डॉ. लोखंडे चारुशिला उत्तम** | ९७-१०१ |
| २१ | अष्टपैलू व्यक्तीमत्व लोकमान्य बाळगंगाधर टिळक<br>**प्रा. डॉ. सौ. मंजिरी म. कुलकर्णी** | १०२-१०५ |
| २२ | मानव मुक्तीचा शिलेदार - अणाभाऊ साठे<br>**डॉ. श्री. निळकंठ रामचंद्र व्यापारी** | १०६-१०८ |
| २३ | समाजसेविका - हिराबाई भापकर<br>**प्रा. डॉ. उज्वला विजय नलावडे** | १०९-११३ |
| २४ | आधुनिक महाराष्ट्राच्या शैक्षणिक जडणघडणीतील मा. यशवंतराव चव्हाण यांचे योगदान<br>**प्रा. राजेंद्र गायकवाड** | ११४-११८ |
| २५ | महात्मा गांधी आणि खादी : एक विचार<br>**सागर भानुदास जाधव** | ११९-१२२ |

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | शोधनिबंध आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २६ | भारतीय राष्ट्रवादाचा उदय आणि लोकमान्य टिळक यांचे महाराष्ट्रातील कार्य<br>**डॉ. सुवर्णा प्रकाश पाटील** | १२३-१२७ |
| २७ | भारतीय राष्ट्रवादाच्या उदयातील लोकमान्य टिळकांचे योगदान<br>**राहसे दिनेश टेट्या** | १२८-१३८ |
| २८ | लोकमान्य टिळक आणि 'केसरी'<br>**प्रा. डॉ. हमीद उमरअली काझी** | १३९-१४७ |
| २९ | अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास<br>**डॉ. मधुकर विठोबा जाधव** | १४८-१५१ |

# १. पेशवेकालीन वाहतुक व वाहतुकीची साधने - खानदेशच्या विशेष संदर्भात

**प्रा. डॉ. शिवाजी वाघमोडे**
इतिहास विभाग प्रमुख, भारत महाविद्यालय, जेऊर, ता. करमाळा, जि. सोलापूर.

राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने वाहतुक किंवा दळणवळण हा अत्यंत महत्वाचा घटक मानावा लागतो. मानवी शरीरात रक्तवाहीन्यांना जेवढे महत्व आहे तेवढेच राज्याच्या दुष्टीकोनातून त्या राज्यातील दळणवळण व्यवस्थेला महत्व असते. इ.स.१९ व्या शतकाच्या मध्यानकाळापर्यंत भारतात दळणवळणाच्या कोणत्याही अत्याधुनिक सोयीसुविधा निर्माण झालेल्या नव्हत्या. वाहतुकीचे मार्ग व वाहतुकीची साधने परंपरागत होती. अशा काळात मध्यवर्ती ठिकाणी असणाऱ्या प्रदेशाला दळणवळण विषयक महत्व प्राप्त होणे सहाजिक आहे. खानदेशचे भौगोलिक स्थान अत्यंत मोक्याच्या ठिकाणी आहे. मध्ययुगीन काळात उत्तर भारत आणि दक्षिण भारत तसेच उत्तर व पूर्व भारताला पश्चिम किनारपट्टीशी जोडणारे महत्वाचे मार्ग खानदेशमधून जात होते.

**खानदेशातील वाहतुकीचे मार्ग**

इ.स.१६०१ पासून ते १७५२ पर्यंत खानदेशवर मोगलांची सत्ता होती.मोगलकाळात खानदेशमधून ज्या महामार्गांनी वाहतुक चालत होती त्याच मार्गांचा वापर मराठा अधिपत्यकाळातही वाहतुकीसाठी केला जात होता. शिंदे, होळकर, पवार,बुंदेले आदि सरदारांना माळवा व उत्तरेकडील प्रदेशात कायमस्वरुपी प्रदेश वाटून दिलेला असल्याने आणि पेशवे, मराठे सरदार यांनी कर्नाटकापासून अटकेपर्यंत मराठा साम्राज्य विस्तारीत केल्यामुळे भारताच्या सर्व भागांतून पुणे या केंद्रीय कार्यालयाशी मोठया प्रमाणात संपर्क वाढला होता. परिणामी खानदेश व माळवा या दोन मध्यवर्ती सुभ्यांमध्ये काही नवीन मार्ग मराठाकाळात निर्माण झाले होते.

मोगल काळात सुरत- बऱ्हाणपूर - आग्रा हा खानदेशमधून जाणारा सर्वाधिक महत्वाचा मार्ग होता. या मार्गाने खानदेश, माळवा व उत्तरेकडील प्रदेशाचा सुरत बंदरातून आयात-निर्यात व्यापार चालत असे. सुरत- बरोली - किरका- दतिया- नंदुरबार- टेकावडे- थाळनेर- चोपडा- आडावद -यावल-बहादरपूर बऱ्हाणपूर. या मार्गाने सुरत ते बऱ्हाणपूर हे आंतर सुमारे १६९ कोस एवढे होते. या मार्गास बऱ्हाणपूरपासून पुढे हरदा - टिमरनी - हुशंगाबाद - भोपाळ - भिलसा - सिरोंज - शिवपुरी - ग्वाल्हेर मार्गे आग्रा आणि हरदा-हांडिया - सिहोर - सिरोंज - ग्वाल्हेर मार्गे आग्रा असे आग्र्याकडे जाणारे दोन मार्ग फुटत असत.[२]

बऱ्हाणपूरहून एलिचपूर मार्गे नागपूर असा एक मार्ग होता. त्यामुळे उपरोक्त मार्गाने आपोआपच नागपूर-बऱ्हाणपूर-सुरत हा मार्ग तयार होऊन विदर्भ सुरत बंदराशी जोडला गेला होता. या मार्गांचा मराठा अधिपत्यकाळात मोठया प्रमाणात वापर केला जात असल्याचे दिसून येते.

उत्तर भारताला सुरतेशी जोडणारा आणखी एक महामार्ग मध्ययुगीन काळात होता. सुरत - नंदुरबार - सुलतानपुर - मांडू - धार - उज्जैन व तेथून पुढे एक मार्ग आग्र्याकडे तर दुसरा मार्ग राजस्थानकडे जात असे. खानदेशच्या दृष्टीने हा मार्ग फारसा महत्वाचा नसला तरी होळकरांच्या अधिपत्याखालील नंदुरबार,सुलतानपूर या परगण्यांशी त्याचा विशेष संबंध येत होता.[३] उत्तर व पूर्व भारतातुन सुरतेकडे जाणा-या मार्गावर नंदुरबार हे सर्वाधिक मोक्याचे ठिकाण होते.सर्व बाजुंनी येणारे मार्ग नंदुरबार येथे मिळत असत. खानदेशला सुरतेशी जोडणारा आणखी एक मार्ग मराठेकाळात होता.तो साक्री-नवापूर-सोनगड मार्गे-सुरत असा होता.हा मार्ग खानदेशातुन जाणाऱ्या बऱ्हाणपूर-नंदुरबारमार्गे -सुरत या मार्गास समांतर होता. इ.स.१७७९ मध्ये रघुनाथरावाने केसोपंत या सरदारास मोठया फौजेनीशी या मार्गाने खानदेशात पाठविले होते. त्याने नवापूर लुटले आणि यामार्गावरील कोंडाई घाटात तीन पलटणी ठेवून हा मार्ग बंद केला होता.[४] रघुनाथराव इंग्रज यांच्याशी उदभवलेल्या संघर्षावेळी इ.स.१७८० मध्ये तुकोजी होळकर याच मार्गाने गुजरातमध्ये गेले होते.[५] होळकर सैन्यातील कवायती पलटणीचा अधिकारी मिस्टर बॉईड हा इ.स.१७९३ मध्ये बंदुका खरेदीसाठी सोनगडमार्गेच खानदेशातून सुरतेस गेला होता.[६]

पुणे आणि मुंबई या महाराष्ट्रातील महत्वाच्या ठिकाणांना उत्तर भारताशी जोडणारे सर्व मार्ग खानदेशमधूनच जात होते. पुण्याहून खानदेशमध्ये उतरण्यासाठी बरेच मार्ग वापरले जात असल्याचे संदर्भ मिळतात. त्यावरुन पुणे - मंचर - ओतुर - भांबरडाघाट मार्गे - पारोळा, पुणे - मंचर - आळे - संगमनेर-नाशिक-चांदवडघाट मार्गे - मालेगाव - चाळीसगाव, पुणे - घोडनदी - अहमदनगर - संगमनेर - सिन्नर-मनमाड - मालेगाव असे पुण्याकडून खानदेशमध्ये येण्याजाण्याचे मार्ग होते असे दिसून येते. म्हणजेच पुण्यावरुन खानदेशमध्ये उतरण्यासाठी एक मार्ग भांबडर्याच्या घाटातून बागलाणकडे तर दुसरा मार्ग चांदवड घाटातुन मालेगावकडे जात असे. मुंबईकडून खानदेशमध्ये येण्यासाठी जो मार्ग होता तो आजच्या काळातील मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग क्र.३प्रमाणेच मराठा काळातही होता. थोडक्यात पुणे व मुंबईकडून खानदेशात प्रवेश करण्यासाठी कोणत्याही मार्गाने आले तरी नाशिक जवळ हे सर्व मार्ग मिळत होते. त्यापुढे पिंपळगाव बसवंत जवळ खानदेशकडे जाणारे दोन मार्ग फुटत असत. भांबरडा घाटातून जाणाऱ्या मार्गास बागलाणमध्ये दोन मार्ग फुटत एक साक्री-नंदुरबारकडे तर दुसरा धुळे-थाळनेर-सेंधवा घाटमार्गे माळव्यात जाणाऱ्या मार्गास जोडला जात असे. या दोन्ही मार्गांनी खानदेशमध्ये प्रवेश केला तरी उत्तरेत जाण्यासाठी सेंधवा घाट मार्गे किंवा बऱ्हाणपूरमार्गे जावे लागत होते. थाळनेर जवळ खानदेशातुन उत्तर, दक्षिण, पूर्व दिशांना जाणाऱ्या बहुतांशी मार्गांची जोडणी होत असल्याचे दिसून येते. पुणे ते उज्जैन हा सेंधवा घाटातून जाणारा मार्ग मोगल काळात अस्तीत्वात नव्हता. खानदेशवर मराठा अधिपत्य निर्माण झाल्यानंतर हा मार्ग नव्याने सुरु झाला. उत्तरेत जाण्यासाठी पूर्वीचा ब-हाणपूर मार्ग वापरात असला तरी थाळनेर-सांगवी-सेंधवाघाट-खरगोण-बरवाह-इंदौरमार्गे-उज्जैन हा शॉर्टकट असल्याने इ.स.१८ व्या शतकाच्या उत्तरार्धात खानदेशातील इतर मार्गांपेक्षा या मार्गाचा वाहतुकीसाठी अधिक वापर होत होता. या मार्गाच्या माध्यमातून होळकरांची इंदौर व महेश्वर ही मुख्य ठिकाणे सर्व प्रदेशांशी जोडली गेली होती. बऱ्हाणपूर-औरंगाबाद या शहरांना जोडणारा मार्ग मोगल काळापासून वापरात होता. मोगल राजवटीत दक्षिण भारतात जाण्या येण्यासाठी सर्वाधिक वापर या मार्गाचा झालेला दिसून येतो. अंजिठा डोंगरातील फर्दापूर घाटातून हा मार्ग खानदेशमध्ये उतरत असे. मराठा अधिपत्य काळातही या मार्गाने मोठया प्रमाणात दळणवळण चालू होते.[७]

उपरोक्त मार्गाशिवाय इ.स.१७०० ते १८१८ या कालखंडात व त्यांनतरही खानदेशमध्ये, बऱ्हाणपूर-भिकनगाव-खरगोण-धरमपूरी, खरगोण-कसरावद-महेश्वर, चोपडा- धरणगाव- पारोळा- धुळे यांसारखे अनेक मार्ग खानदेशातील महत्वाच्या ठिकाणांना परस्परांशी तसेच महामार्गांशी जोडत होते.

खानदेशमध्ये तापी, गिरणा, पांजरा या मोठया नदया असल्याने तसेच खानदेश व माळवा या दोन सुभ्यांच्या सीमेवरुन नर्मदा नदी वाहत असल्याने नदया ओलांडण्यासाठी काही ठिकाणी जलवाहतुकही चालत होती. नर्मदेला बरवाह, मंडलेश्वर कसरावद, मर्दाना, धर्मपूरी, हांडिया या ठिकाणांजवळ उतार असल्याने मध्ययुगीन काळात अशा उतारांच्या ठिकाणांजवळुन वाहतुकीचे मार्ग निर्माण झाले होते. मराठा काळात उपरोक्त ठिकाणी नदीला घाट बांधण्यात आले होते. तेथे नवा व होडयांच्या सहाय्याने जलवाहतुक केली जात असे. तापी नदीवर बऱ्हाणपूर, भुसावळ, थाळनेर, सारंगखेडा, प्रकाशे या महत्वाच्या ठिकाणी जलवाहतुक केली जात असे. तापीनदीवर एकुण ४८ ठिकाणी हंगामी व कायमस्वरुपी जलवाहतुक चालत असल्याची माहिती मिळते. गिरणा नदीवर मेहुणबारे येथे जलवाहातुक केली जात होती.[८] तसेच इतर लहान मोठया नदयांवरही कित्येक ठिकाणी गावागावांतील संपर्कासाठी, वाहतुकीसाठी नदीमार्गाचा वापर केला होता.

**वाहतुकीची साधने**

मराठा साम्राज्यात इतरत्र वापरली जाणारी वाहतुकीची साधने खानदेशमध्येही आढळतात. वाहतुकीसाठी बैल, घोडे, ऊंट, तटटू, खेचर, गाढव, रेडा या प्राण्यांचा वापर केला जात असे. बैलगाडी, गाडा, पालखी डोली इ.प्राणी व मानवांच्या मदतीने वाहून नेली जाणारी साधने आणि जलवाहतुकीसाठी नावा, होडया वापरात होत्या.तसेच स्त्री-पुरुष डोक्यावरुनही ओझे वाहून नेत असत.

मराठा राज्यात सर्वत्र बैल हे वाहतुकीचे प्रमुख साधन होते. बैलांच्या पाठीवर ओझे लादुन मालाची वाहतुक केली जात होती. मध्ययुगीन काळात बैलांच्या सहाय्याने माल वाहतुकीचा व्यवसाय करण्यात लमाण जमातीचे लोक प्रसिघ्द होते. मराठा सत्तेच्या ऱ्हासाच्या सुमारास विदर्भ-खानदेश प्रदेशातील कापूस सुरत बंदरापर्यंत वाहून नेण्यासाठी सुमारे एक लाख ऐंशी हजार बैल गुंतले असल्याबददलचे निरिक्षण इंग्रजांनी नोंदविले आहे.[९] यावरुन खानदेशमध्ये वाहतुकीसाठी बैलांचा वापर मोठया प्रमाणात होत होता हे स्पष्ट होते. फक्त व्यापारी मालाच्या वाहतुकीसाठीच बैल वापरले जात असे नव्हे तर सैन्यामध्येही बैलांचा मोठा वापर होत होता. लष्करी साहित्याची वाहतुक, तोफा ओढणे, लुटीमध्ये मिळालेले सामान व मालाची वाहतुक यासाठी बैलांचा वापर केला जाई.

सावकार, व्यापारी व इतर काही लोक बैल वाहतुकीच्या व्यवसायात गुंतलेले असत. त्यांना हुंडाभांडे करणारे लोक किंवा हुंडेकरी म्हटले जाई. हे लोक आपले वैयक्तिक बैल पाळत आणि वाहतुक भाडे घेऊन माल वाहतुकीचे कार्य करीत. मोठे हुंडेकरी दूरदूरच्या प्रदेशामध्ये माल पोहचविण्याचे काम घेत असत. हुंडाभांडे करण्यासाठी मराठा सरकारला काही रक्कम नजर स्वरुपात भरुन व्यवसाय परवाना घेण्याची पध्दत होती. इ.स.१७५२-५३ मध्ये श्रीधर जीवाजी नावाच्या हुंडेकऱ्याने सुरत, रनाळे, औरंगाबाद, बऱ्हाणपूर, शहागड, वऱ्हाड इ.भागात हुंडाभांडे व्यवसाय करण्यासाठी पेशव्यांकडून परवाना मिळवला होता.

त्यासाठी २००१ रुपये त्यास सरकारात भरावे लागले होते.[१०] बैल वाहतुकीचा व्यवसाय करणाऱ्यांवर बैल संख्येप्रमाणे कर आकारणी केली जात असे.काही स्थानिक लोकही किरकोळ स्वरुपात बैलांच्या सहाय्याने वाहतुकीचा व्यवसाय करत होते.

बैलांच्या सहाय्याने ओढण्यात येणाऱ्या बैलगाडया, गाडे यांचाही वाहतुकीच्या कामात मोठया प्रमाणात वापर केला जात होता. खानदेशात अनेक ठिकाणी बैलगाडया व चाकजोड तयार करण्याचा व्यवसाय प्रसिध्दीस आला होता. बैलगाडया भाडयाने मिळत असत. पावसाळयाच्या दिवसात मात्र बैलगाडयांची वाहतुक कमी चालत असे. खरगोण येथील जमादार खुशालबेग याने जुलै १७५१ च्या सुमारास पाठविलेल्या दोन पत्रांमध्ये, पावसाळयाचे दिवस असल्यामुळे खरगोण भागात भाडयाने बैलगाडया मिळत नसल्याने आज्ञे प्रमाणे लाकडे पोहचविण्यास उशीर होत आहे. तरी महाराजांनी तेथून बैलगाडया भाडयाने करुन पाठवाव्यात म्हणजे लाकडे ताताडीने पोहच केली जातील. अशा स्वरुपाचा मजकुर आहे. [११]

प्राचीन काळापासून घोडा हे वाहतुकीचे महत्वाचे साधन होते. घोडयांचा वापर ओझी वाहण्यापेक्षा प्रवासाठीच अधिक प्रमाणात केला जात होता. मराठा काळात खानदेशमध्ये प्रवासासाठी प्रामुख्याने घोडयांचाच उपयोग होत होता. घोडा हे प्रवासाचे सर्वाधिक जलद साधन होते. लष्करी व्यवसायांमध्ये असणाऱ्यांजवळ तर घोडा असेच पण सर्वसामान्यांपासून ते श्रीमंतापर्यंत समाजातील बहुतांशी लोक घोडे सांभाळत असत. हल्लीच्या काळात ज्या प्रमाणे मोटारसायकल किंवा अन्य वाहने लोक बाळगतात, त्याप्रमाणे मराठेकाळात घोडे पाळले जात असत. घोडया प्रमाणेच तट्टू व खेचर या प्राण्यांचाही प्रवासासाठी व माल वाहतुकीसाठी वापर केला जात होता. उंट, हत्ती यांचेही खानदेशसंबंधीच्या कागदपत्रांमध्ये उल्लेख मिळतात पण त्यांचा वाहतुकीसाठी फारसा उपयोग केला जात नव्हता.

पालखी व डोली हे प्रवासाचे प्रतिष्ठीत साधन होते. श्रीमंत लोक, सरदार, सरंजामदार आणि त्यांचे कुटुंबीय प्रवासासाठी पालखीचा वापर करीत असत. पालखी वाहून नेण्याचे काम करणाऱ्या लोकांना भोई म्हटले जात होते. काही सरकारी अधिकारी व वतनदारांनाही बहुमान म्हणून पालखी वापरण्याची सुविधा पुरविली जात असे. सुलतानपूर परगण्याच्या मामलेदाराला पालखीसाठी १०००रु.तरतुद सरकारी खर्चाने केली होती.[१२] नंदुरबार परगण्याच्या कानुनगोस पालखी खर्च म्हणून दरवर्षी ४०० रुपयांचा भत्ता होळकर सरकारकडून दिला जात होता.[१३] खानदेशमध्ये नदया पार करण्यासाठी नावा व होडयांचा वापर केला जात असे. त्यांचा आकार व क्षमता यामध्ये निश्चित प्रमाण नसले तरी नावांचे स्वरूप साधारणपणे लहानच असे.

**वाहतुकीच्या सुरक्षिततेसाठी उपाय योजना**

मराठा अधिपत्यकाळात पेशवे व खानदेशशी संबंधीत असणाऱ्या मराठा सरदारांनी रस्त्यांच्या बांधणीसाठी व दुरुस्तीसाठी नेमके काय प्रयत्न केले. याबद्दल विश्वासार्ह माहिती उपलब्ध होत नाही. या काळात रस्त्यांचे स्वरुप हे कच्च्या रस्त्यांप्रमाणे होते. सेंधवा घाटातुन जाणारा मार्ग हा पुर्णपणे मराठाकाळात नव्याने निर्माण झालेला मार्ग होता. हा मार्ग मोठया प्रमाणात वापरात होता असे दिसून येते. त्यावरुन या मार्गाच्या उभारणीसाठी मराठाकाळात बराच खर्च झाला असावा असे वाटते. रस्त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी स्थानिक अधिकाऱ्यांवर टाकली जात होती. सरकारच्या वतीने महामार्गावर ठिकठिकाणी ठाणी व चौक्या स्थापन केल्या जात असत व तेथे ठाणेदाराच्या मदतीला शिंबदी ठेवली जात असे. खानदेशमधून जाणारे बहुतांशी मार्ग

हे घाटमार्ग होते. पर्वत दऱ्या खोऱ्यांच्या आधाराने भिल्ल व इतर लुटारु प्रवाशांची लुट करीत असत. त्यामुळे रस्त्यांची सुरक्षितता राखणे हे नित्त्याचेच काम बनले होते. सेंधवा घाटातून जाणारा मार्ग होळकरांच्या प्रदेशातून जात असल्याने या मार्गाच्या सुरक्षिततेसाठी होळकरांनी वेळोवेळी उपाययोजना केल्याचे अनेक संदर्भ मिळतात. या मार्गात उपद्रव देणाऱ्या लोकांचा बंदोबस्त व्हावा, त्यांच्यावर कायम वचक रहावा म्हणून होळकरांनी सेंधव्यास मोठा भक्कम किल्ला बांधला. इ.स.१७८२ मध्ये या मार्गावर भिल्लांनी खूपच अतंक माजविला होता म्हणून अहिल्याबाईंनी सुरक्षिततेसाठी तीन चार पागा पाठविल्या होत्या या संदर्भात २३ डिसेंबर १७८२ रोजी विठ्ठल शामराज पुण्यास कळवितो की,`..भिल्लांच्या पारपत्यास तीन चार पागा पाठविल्या होत्या. काही भिल्ल धरले, काही चोपले. सेंदव्याचा घाट सुरळीत चालविला आहे. परंतु भिल्ल जागा जागा डोंगरात जमाव करुन आहेत. पागा तेथून उठल्या म्हणजे फिरुन भिल्ल गडबड करतील.[१४]

मातब्बर व्यक्ती प्रवासास निघाली म्हणजे मार्गात तीला कोणता त्रास होऊ नये. तीच्या सुरक्षिततेची काळजी घेण्यात यावी म्हणून मार्गावरील संबंधीत अधिकाऱ्यांना तशा प्रकारच्या सुचना देण्याची पध्दत मराठेकाळात होती. अशा संदर्भातील कित्येक आज्ञापत्रे खानदेश व होळकरांसंबधीच्या कागदपत्रांत उपलब्ध होतात.[१५] खानदेशातून उत्तरेत जाण्यासाठी सेंधवा मार्ग शॉर्टकट असल्याने प्रवाशी व वाहतुकदार त्यास प्रथम पसंती देत असत पण या मार्गात सुरक्षेविषयी आडथळे आल्यास बऱ्हाणपूर मार्गाने जाणे पसंत करीत असत. दि.२ ऑगस्ट १७६६ रोजी दादाजी यांस बाजी विठ्ठल याने पाठविलेल्या पत्रात,`...सेदंव्याचे घाटे जावे तरी सटवाजी गायकवाड व मकाजी गिते वगैरे पांच सातसे राऊत व हजार पाचशे बरकंदाज भीलाचे पारिपत्यास आले आहेत. भीलांचे यांचे झुंज मातबर जाले. घोडी माणसे जाया जाली परंतु भीलांचे पारपत्य चांगले जाले नाही. प्रस्तुत आणखी जमाव करितच आहेत. डोंगर माजून राहिला आहे. यांज करिता सर्वांचे मते दोन मजला अधिक पडतात परंतु बराणपुरचा मार्ग सुगम. त्याजवरुन त्या मार्गे जावयाचा करार करुन काल रावजी प्रस्थानास बागांत आणिले..`[१६] असा मजकुर आहे. यावरुन सेंधवा मार्गाच्या संरक्षणासाठी होळकरांचे सातत्याने प्रयत्न चालू असत हे स्पष्ट होते.

वाहतुकीचा व्यवसाय करणाऱ्यांचे जर काही नुकसान झाले तर त्यांना नुकसान भरपाई दिली जात असे. होळकर सरकारचे गवत वाहून आणण्यासाठी बिज्जागड भागातील गाडे आणले होते. त्यावेळी पेशव्यांची स्वारी खानदेशातून अकबरपूर मार्गे गेली असताना पेशव्यांच्या फौजेने दोन गाडयाचे आठ बैल लुटून नेले. तेंव्हा अहिल्याबाई होळकर यांनी बिज्जागडच्या कमाविदारास दि.१० मार्च १७७५ रोजी पत्र पाठवून बैलांच्या मालकास दर बैल आठ रुपये प्रमाणे एकुण ६४ रुपये नुकसान भरपाई दयावी. हा खर्च होळकर सरकारकडून देण्यात येईल असे कळविले होते.[१७]

**निष्कर्ष**

दळणवळणाच्या दृष्टीकोनातून पाहता खानदेशला अनन्यसाधारण महत्व होते. उत्तर व दक्षिण भारत यांना जोडणारे तसेच पश्चिम किनारपट्टीशी भारताच्या बहुतांशी भागाला जोडणारे अनेक मार्ग खानदेशमधून जात असल्याने दळणवळणासाठी खानदेश संयोगभूमी होता.

**संदर्भ**

१. रघुवीरसिंह , मालवा में यूगांतर, इंदौर १९३८ या ग्रंथाच्या प्रारंभी दिलेल्या नकाशाच्या आधारे

२. तत्रैव.

३. पारसनिस द.ब.संपा.म.द.बा.भाग १ पृ.८

४. तत्रैव.पृ.९

५. ठाकूर वा.वा.संपा,हो.इ.साधने खंड -१ पृ .४१०

६. आपटे द.वि.संपा.चंद्रचूड दप्तर भाग १, पुणे १९२० पृ.१४३

ठाकूर वा.वा.संपा,हो.इ.साधने खंड -१ पृ .४१२

भागवत अ.ना.संपा.हो.इ.साधने खंड १ पृ १९

खरे य.वा.संपा.ऐतिहासिक लेख संग्रह खंड १४ पृ ७४०९

खोबरेकर वि.गो.मराठयांच्या स्वाऱ्यांचे मुक्काम पृ .४६७

७. अप्रकाशित कागदपत्रे, Deccan Commissioners. File -171. Let No. 80 9 June. 1818 पुराभिलेखागार, पुणे. Khandesh Gazetteer P. 221

8. Choksey R.D.Ed.Economic History of the Bombay, Deccan & Karnataka, Pune1945. P.197

९. वाड ग.चि. पे.रो.खंड-३ , बा. बाजीराव भाग १ पृ.३०४

१०. रघुवीरसिंह संपा.पेशवे दप्तरातील ऐतिहासिक कागदपत्रे ग्रथमाला (न्यु सिरीज) हिंदी साधने, मुंबई १९७९. पृ.८३-८४

११. राजवाडे वि.का.म.इ.साधने खंड २३ पृ.६७

१२. देशपांडे विजया, नेहते उज्ज्वला, संपा. नंदुरबार दप्तर खंड-२ पत्र-२२-२६

१३. पारसनिस द.ब.संपा.म.द.बा.भाग १ पृ.१६९

१४. ठाकूर वा.वा.संपा,हो.इ.साधने खंड -१ पृ .१९७

पारसनिस द.ब.संपा. उपरोक्त. पृ.२६४

राजवाडे वि.का.म.इ.साधने खंड १२ ले.२७८,२७९

देशपांडे विजया, नेहते उज्ज्वला, संपा. नंदुरबार दप्तर खंड-१. पत्र.४८,खंड-२ पत्र ३३

भागवत अ.ना.संपा.हो.इ.साधने खंड १२(ऐ.स्त्रि.प) पृ.३८,३९,५१

१५. आपटे द.वि.संपा.चंद्रचूड दप्तर भाग १, पुणे १९२० पृ.१५५

१६. ठाकूर वा.वा.संपा,हो.इ.साधने खंड -१ पृ .१९६

VOLUME - IX, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# २. छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील आज्ञापत्रे

**प्रा. डॉ. रमेश धनराज जाधव**
इतिहास विभाग प्रमुख, आर.सी.पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर, जि. धुळे.

**प्रस्तावना**

मोघल बादशाह औरंगजेबाने नोव्हेंबर १६८९ मध्ये महाराष्ट्राची राजधानी रायगड ताब्यात घेतल्या नंतर शाहू राज्यासह मातोश्री व परिवारास कैद केले होते परंतु छत्रपती शाहु महाराजांची ८ मे १७०७ मोगलांच्या कैदेतून सुटका झाली स्वराज्यात आल्यामुळे महाराणी ताराबाई-शाहू महाराज यांच्यामध्ये सत्तेसाठी संघर्ष निर्माण झाला आणि त्यातूनच १७०८ साली खेडची लढाई झाली त्यात महाराणी ताराबाईंचा पराभव झाला. त्यामुळे शाहू महाराजांनी आपला मोर्चा साताऱ्याकडे वळविला. शाहूंची बाजू भक्कम झालेली पाहून सातारा लढविण्याची कामगिरी प्रतिनिधींकडे सोपवून महाराणी ताराबाई पन्हाळ्याकडे निघून गेल्या आणि त्यामुळे छत्रपती शाहूमहाराजांनी सातारा राजधानी आपल्या ताब्यात घेवून १२ जानेवारी १७०८ रोजी स्वतःस राज्याभिषेक करुन मराठा साम्राज्याचा वारस घोषित केले.[१]

छत्रपती राजारामाच्या काळात तत्कालीन राजकीय परिस्थितीनुसार राजकीय व लष्करी अनुषंगाने वतने देण्यास सुरुवात केली. छत्रपती शाहू महाराजांनी सत्ता प्राप्तीनंतर (१७०८) मराठा राज्यातील विविध ठिकाणी असलेले सरदार, सरंजामदार, दिमतीस असलेले कारभारी यांना मोकासे, इनामे, वर्षासने आणि आज्ञापत्रे देण्यास सुरुवात केली.

**उद्देश**

१. छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील आज्ञापत्रे यांची माहिती मिळविणे.

२. आज्ञापत्रे देण्याच्या उद्देशाची माहिती मिळविणे.

३. आज्ञापत्रे कोणकोणत्या व्यक्तीस दिली होती यांची माहिती मिळविणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला असून उपलब्ध असणारी संदर्भग्रंथे त्यांत प्रामुख्याने मराठी रियासत, वैद्य दप्तरातून निवडलेले कागद- खंड-२, विधार्भातील लेख संग्रह खंड १, पेशवेदप्तरातील सनदा पत्रातील माहिती या संदर्भग्रंथाचा उपयोग करुन प्रस्तुत शोधनिबंध मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**विषय विवेचन**

सनद याचा अर्थ अधिकारपत्र किंवा देणगीपत्र असा होत असला तरी त्यापेक्षाही व्यापक असल्याने त्याचे स्पष्टीकरण करणे जरुरीचे असून योग्यही आहे.[३] छत्रपती शिवाजी महाराजांना अष्टप्रधान मंडळाची नेमणूक का करावी लागली. याचे

महत्वाचे कारण म्हणजे राज्यकारभार चालविण्यास लागणाऱ्या मनुष्यबलाची व ज्ञानबलाची योग्य ती तजवीज केलेली दिसते. कोणाला लढाईचे तर कोणाला न्यायाचे, कोणाला फडणविशीचे तर कोणास चिटणिसीचे व मुजूमदारीचे वैगेरे कामे करता येतील हे पाहून योग्य व्यक्तीची निवड केली व अंगी असलेल्या बुद्धी चातुर्य दाखविण्यासाठी आणि राष्ट्रहिताचे कामे करण्यास संधी देवून त्या त्या कामाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली.[४] त्या कामाच्या बदल्यात एखाद्यास गावाचे उत्पन्न इनाम करुन दिले तर, एखाद्यास खजिन्यातून नगद नेमणूक करुन दिली. काही बाबतीत धार्मिक वृत्तीनेही देवस्थानास किंवा ब्राह्मणास काही गावे व जमिनी इनाम करुन दिल्या. यासंबंधीची जी पत्रे त्यांनी करुन दिली त्यासच 'इनामपत्र' असे म्हणतात.[५]

छत्रपतींनी सनदांची अंमलबजावणी करण्याकरिता काढलेली पत्रे ही आज्ञापत्रे म्हणून ओळखली जातात. 'आज्ञापत्र' ही खरी सनद नव्हे. तर सनद म्हणजे ज्यास इनाम देणगी द्यावयाची त्याच्या नावे छत्रपतींनी लिहून दिलेले जे पत्र ती मूळ सनद होय.[६] सनदेची व आज्ञापत्राची भाषा थोडी वेगळी असते. ज्या व्यक्तिस इनामपत्र द्यावयाचे त्याच्या मूळ सनदेत 'मोकासा इनाम दिला असे' आणि या वाक्यापुढे 'तरी तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरेपरेने अनभऊन सुखरुप राहणे' असा मजकूर असतो व शेवटी पाा हूजूर मोर्तबअसे ही वाक्ये असतात.[७]

आज्ञापत्रात अंमलबजावणीसाठी गावचे पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे किंवा कामकामगर यांना लिहलेला असतो. तर तुम्ही मौजे मजकुरास ताकीद करु यास व याच्या पुत्रपौत्रादि वंशपरपरेने इनाम चालविणे.----------[८]

**छत्रपती शाहूमहाराजांच्या काळातील आज्ञापत्रे**

छत्रपती शाहू राज्यांनी सत्ता संपादन केल्यानंतर स्वामीनिष्ठ सेवक व सरदारांना मोकासा करून दिलेला दिसतो. छत्रपती शाहूमहाराजांनी आपल्या अधिकार्यांना आज्ञापत्रे दिलेली दिसतात. छत्रपती शाहूमहाराजांनी धर्माजी देवकाते यास छ. राजाराम महाराजंनी ज्या आठ महालांचे सरगौडळीचे वतन दिले होते. त्या गावाचे वतन सुरु ठेवावे त्यात पडेगाव१, नगर हवेली १, चांकार गोंडे १, कडे १ मांडव गडा १, रासीन १, अठरी १, ग्रामखेड १ ही गावे स्वामीस विनंती केल्यामुळे वंशपरंपराने छ. शाहु महाराजांनी दि. ३१ जानेवारी १७२३ रोजी दिलेले दिसते.[९]

धर्माजी देवकाने यांचे माहुर सरकारात महाल मोकासे होते. त्यास कान्होजी भोसले याजकडून उपसर्ग पोहचत होता. कान्होजीनी तो उपसर्ग पोहचवू नये म्हणून शाहू महाराजांनी कान्होजीस १७२८ पत्राद्वारे आज्ञा केलेली दिसते.[१०]

जान्हवी रामाबाई भोसले हिला मौजे उडतूर समंत कोरगाव प्रांत वाई हा गाव मोकासा करुन दिला आहे. याबद्दल छ. शाहू महाराजांनी ता.१७ आक्टोबर १७१७ रोजी कोरगावच्या मोकदमास तुम्ही रुजू होवून वसूल द्या असे आज्ञापत्र दिलेले होते. अश्विन शुद्ध एकादशीस श्री राजा शाहू छत्रपती क्षत्रीय कुलवंत स्वामी यांनी राजश्री राणोजी बिन बापूजी भोसले यास इनाम पत्र दिलेले तेसाजे तुम्ही स्वामीच्या राज्यातील पुरातन सेवक तुमचे चालवणे आवश्यक जाणोन स्वामी तुम्हावर कृपाळू होवून तुमहास इनाम मौजे उमरावती परगणे वडनेर वि.वि. याहागाव तुम्हास तुमचे पुत्र पौत्रदी वंशपरंपरेने इनाम करुन दिले असे. बापूजीला तिन मुलगे होती. बिंबाजी, संताजी व राणोजी आद्य रघुजी हा बिंबाजी मुलगा संताजी हा दिल्ली येथे शौर्याने लढता

लढता गतप्राण झाला. राणोजी हीत तसेच पराक्रमी होते. बापूजी भोसले यास मौजे गवलीसेवर ता. वळूज हा गाव मोकासा करुन दिला आहे. अशी आज्ञा छत्रपती स्वामी यांनी मोकादमास मौजे गवलीसेवर ता. वळूज यासी आज्ञा पत्राद्वारे केलेली दिसते २२.१२.१७१७ च्या याप्रमाणेच आणखी ४ गावे दिल्याबद्दल छ. शाहू ची त्याच तारखेची त्या त्या गावाच्या मोकदमांना आज्ञापत्रे आहेत ती गावे.[११] मौजे मुडे ता. हवेली प्रांत कऱ्हाड

१. मौजे कुमरे समंत कोरेगाव प्रांत वाई

२. मौजे भिकारवडोली ता. उंबरज प्रांत सातारा

३. मौजे चरेगाव ता. हवेली प्रांत कऱ्हाड

ज्या दिवशी बापूजीस वरील गाव दिले त्याच दिवशी आणखी २ गावे देवून मोका दमास शाहूने आज्ञापत्रे लिहिली ती गावे. [१२]

१. मौजे गोरगाव वाळूज आणि

२. मौजे दिलसी प्रांत वऱ्हाड

स्वस्ती राज्यभिषेक शके ५४ श्रावण शुद्ध पंचमी सौम्यवासरे क्षत्रिय कुलवंत श्री राजा शाहू छात्रपती स्वामी यांनी परगण् आरवी सरकार गावेल प्रांत वऱ्हाड देशमुख व देशपांडे यांना आज्ञा केली राजेश्री राणोजी भोसले यास फौजेच्या बेगमी करीता मोकीसा दिला अशा प्रकारची आज्ञा १७२८ मध्ये स्वामींनी केलेली दिसते.

मौजे किन्ही गावचा वसूल उदोबा गोसावी याज कडे देनेबद्दल आज्ञापत्र

समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री चिमणाजी पंडित प्रधान ताहा मोकादमानी मौजे किन्ही कर्यात मावळ मौजे मजकूर हा गाव राजश्री उदोभा गोसावी यांच्यकडे इनाम चालत आहे. त्याप्रमाणे करार केला आहे. तरी मौजे मजकुराचा वसूल चालत आल्या प्रमाणे मशार निल्हे कडे सुरळीत देत जाने अश्या प्रकार चे आज्ञापत्र १७२७-२८ मध्ये दिलेले दिसते.[१३]

मौजे देहू व किन्ही या दोन इनाम गावांचा वसूल उदोबा गोसावी यास देण्या बद्दल चे पत्र.

राजश्री तावजी थोरात व संताजी थोरात गोसावी यांना राजमान्य स्नेहाकिंत चिमणाजी पंडित प्रधान यांनी इ.स. १७२७-२८ मध्ये हे पत्र पाठवलेले दिसते त्यात राजश्री उधोबा गोसावी हे राजश्री तुकोबा गोसावी बाबा यांचे नातू असून हे भले भगवत भक्त आहेत यांना मौजे देहू, तर्फ हवेली, प्रांत पुणे हा गाव इनाम चालत आहे त्या प्रमाणे व किन्ही कर्यात मावळ ऐसे दोन गाव चालत आहेत त्या प्रमाणे त्यांचे त्याकडे करार केलेले आहे तेथील ऐवज जो आवक होईल त्याप्रमाणे उधोबा बाबांकडे पावेल. तुम्ही त्यांच्या गावास कोणत्याही प्रकारचा उपसर्ग देऊ नये , अश्या प्रकारची आज्ञा पत्रात केलेली दिसते. [१४]

अश्या प्रकारे छत्रपती शाहू महाराजांच्या काळात आज्ञा पत्रे दिलेली दिसून येतात.

**संदर्भ**

१. गर्गे स.मा. (संपादक)- मराठी रियासत खंड-३, मुंबई, १९८९, पृष्ठ क्रं. ६९.

२. सिरसाठ अर्जून- छत्रपती शाहूकालीन प्रांत पुणे मधील इनामे व मोकाक्षे- अखिल महाराष्ट्र इतिहास परिष्द- संशोधन पत्रिका- २०१६, पृष्ठ क्रं. ११०.

३. वैद्य शंकर लक्ष्मण- वैद्य दप्तरातून निवडलेले कागद, खंड-२, पुणे, १७४०, पृष्ठ -३.

४. उपरोक्त

५. उपरोक्त

६. उपरोक्त

७. उपरोक्त, पृष्ठ क्रं. ४

८. जाधव रमेश -छत्रपती शाहू माराजांची इनामे एक दृष्टीक्षेप -Review of Research Vom. VIII, Issue IX, June 2019

९. देशपांडे यशवंत (संपादक) विदर्भातील ऐतिहासिक लेखसंग्रह खंड-१, नागपूर, १९५४, लेखांक इ ४५

१०. उपरोक्त, लेखांक, ६

११. उपरोक्त ,लेखांक ६१

१२. जाधव रमेश- सातारयाच्याछत्रपतींच्या राजदरबारातील सांस्कृतिक जीवन एक दृष्टीक्षेप (minor project UGG WRO, Pune -२०१५) पृ. क्र. २४

१३. वाड गणेश चिमणाजी - पेशवे दप्तरातील सनदा पत्रातील माहिती (श्री शाहू राजे व त्यांची पुढील कारकीर्द) मुंबई- १९१७ पृ. क्र. १३०, १३१

१४. उपरोक्त, पृ. क्र. १३१

VOLUME - IX, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# ३. मध्ययुगीन काळातील एक अनोखे शस्त्र :विटा

**श्री. मृण्मय दीपक अरबुणे**
संशोधक विद्यार्थी, स. गा. म. महाविद्यालय कराड.

**प्रस्तावना**

ज्वालामुखीच्या उद्रेकातून निर्माण झाला तो सह्याद्री. या सह्याद्रीच्या अंगा-खांद्यावर मोठा झाला अति दणकट, अति राकट, काळाकभिन्न पण मानाने दिलदार असा महाराष्ट्र. महाराष्ट्र म्हणजे मूर्तिमंत पराक्रम आणि बलदंड मनगट. याच बलदंड मनगटांनी मध्यकाळामध्ये शस्त्रे धारण केली आणि याच शस्त्रांच्या खणखणाटातून निर्माण झाल्या नव्या राजसत्ता. मध्ययुगीन इतिहास म्हणजे राजसत्तांचा इतिहास. या काळामध्ये अनेक राजसत्ता निर्माण झाल्या आणि अस्ताला गेल्या. या राजसत्तांमध्ये शूर-पराक्रमी असे अनेक योध्ये होते आणि या योध्यांचा पराक्रम गणला जायचा तो त्यांच्या अंगी असणार्या शस्त्रविद्येवर.

शस्त्रविद्या हि संकल्पना मानवी इतिहासाइतकीच पुरातन आहे. मानवी उत्क्रांती होत असताना मानवासोबतउत्क्रांत होत असणारी गोष्ट म्हणजे शस्त्रविद्या. प्रागैतिहासिक काळामध्ये मानवाच्या प्रमुख गरजांमध्ये स्व-संरक्षण आणि अन्नग्रहण या दोन गरजा होत्या. जंगलातील हिंस्त्र प्राण्यांपासून स्व-संरक्षण करणे अथवा त्यांना भक्ष्य बनवणे या दोन्हीही गोष्टींकरता मानवी शरीर सक्षम नव्हते. त्यामुळे याच जंगली प्राण्यांपासून प्रेरणा घेऊन मानवाने काही शस्त्रे बनविली. या शस्त्रांचा वापर करून मानव या प्राण्यांची शिकार करू लागला आणि पुढे याच शस्त्रांच्या बळावर मानव 'जंगलाचा राजा' बनला.

पुढील काळामध्ये या शस्त्रांचा वापर आणि यांची गरज बदलत गेली. मानव स्वसंरक्षणासोबतच शस्त्रांच्या जोरावर समूहातील इतर मानवांवर धाक निर्माण करू लागला. जो मनुष्य शस्त्रविद्येमध्ये पारंगत असेल त्यास सर्व समूहाची जबाबदारी बहाल करून समुहाचे प्रमुखपद दिले जात असे. दिवसेंदिवस शस्त्रांचे आणि त्यांच्या वापराचे महत्व वाढत गेले. मानवाने सभोवतालच्या अनेक गोष्टींचा वापर करून शस्त्र बनविण्याचे कौशल्य आत्मसात केले. जशी शस्त्रे विकसित होऊ लागली तसे त्यांमध्ये प्रकार पडू लागले; विशिष्ट आकार मिळू लागले आणि वैशिष्ट्यपूर्ण शस्त्रांची निर्मिती होऊ लागली. अश्मयुगामध्ये दगडांपासून शस्त्रांची निर्मिती केली जात असे; जसजसा ताम्रयुगाचा काळ पुढे सरकत गेला तसतसा शस्त्रांमध्ये नेमकेपणा येत गेला आणि लोहयुगानंतर शस्त्रांनी पूर्णपणे विकसीत रूप धारण केले.

भारतीय उपखंडातही अनेक शस्त्रांचा विकास झाला. भारतामध्ये अनेक प्रकारच्या शस्त्रास्त्रांचा शोध लागला. लागला. अनेक परदेशी शास्त्रांसोबत मिलाफ करून नव्या धाटणीची शस्त्रे निर्माण झाली, त्यामुळे भारतामध्ये शस्त्रांमध्येही विविधता पाहायला मिळते. या शस्त्र निर्मितीमध्ये मध्यकाळाचा वाटा मोठा आहे. याच मध्यकाळाचा इतिहास म्हणजे रक्तरंजित इतिहास, भारतामध्ये शस्त्रांच्या जोरावरच या इतिहासाचे लेखन केले गेले. या

कालखंडातील शस्त्रांचे अनेक प्रकार पडलेले दिसून येतात. मुघल शस्त्रे, राजपूत शस्त्रे, मराठा शस्त्रे, दक्षिण भारतीय शस्त्रे, विजयनगरमधील शस्त्रे, असे प्रकार पडतात. या काळामध्ये तलवार, भले, धनुष्य-बाण, कुऱ्हाडी, माडु, गुर्ज, दांडपट्टा, ठासनीच्याबंदुका, तोफा, जम्बुरे इत्यादी शस्त्रांचा वापर केला गेला. ही शस्त्रे मध्ययुगीन इतिहासाचे खरे साक्षीदार आहेत. या शस्त्रांमुळे तत्कालीन समाजातील राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक परिस्थितीचा अभ्यास करता येतो. त्याचबरोबर युद्धकला आणि धातुशास्त्राचा अभ्यास करता येतो.

याह मध्ययुगीन कालखंडामध्ये अनेक शस्त्रांची नव्याने रचना करण्यात आली तसेच अनेक शस्त्रांमध्ये मुलभूत बदल करण्यात आले. अश्याच प्रकारचे एक वैशिष्ट्यपूर्ण शस्त्र म्हणजे विटा किंवा इटा. मध्यकालीन भारतातील अत्यंत आधुनिक बनावटीचे परंतु तितकेच अभ्यासाच्या दृष्टीने मागासलेले असे हे शस्त्र होय. मराठ्यांच्या इतिहासामध्ये तत्कालीन संदर्भग्रंथांमध्ये या शस्त्राचे उल्लेख आढळतात. परंतु कालौघात कुशल प्रशिक्षक आणि सोप्प्या आधुनिक यांत्रिक शस्त्रांमुळे या शस्त्राचा वापर मांडवात गेलेला दिसून येतो. पुढील काळामध्ये मराठा सैन्यातून हे शस्त्र अचानकच निवृत्त झाले. या शस्त्राबद्दल जनजागृती आणि माहितीही कमी होत आहे. अस्सल मराठी मातीतील या शस्त्राला मराठी माणसानीच आज मूठमाती दिलेली आहे. त्यामुळे या शस्त्राबरोबरच इतर शास्त्रांच्याही शास्त्रशुद्ध अभ्यासप्रणालीची गरज आहे. शस्त्रशास्त्र अशी एक वेगळी अभ्यासपूर्ण शाखा उभी राहिली तर अश्या ऐतिहासिक शस्त्रांच्या अभ्यासासाठी चालना मिळेल.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये याच गोष्टीला चालना मिळण्यासाठी विटा या शस्त्राच्या इतिहासाची चर्चा केलेली आहे.

**शस्त्रांचे प्रकार**

मनुष्य समूहवृत्तीने राहायला लागल्यापासून राष्ट्र आणि स्वसंरक्षणासाठी तसेच स्वतःच्या समूहाला वरचढ सिद्ध करण्यासाठी अनेक विद्या आत्मसात केल्या. त्यांपैकीच खालील विद्या आहेत

| | |
|---|---|
| १. शस्त्र | ३. शाप |
| २. अस्त्र | ४. मल्ल |

या सर्व विद्यांचा वापर मानव स्वतःच्या आणि समूहाच्या उन्नतीसाठी करीत असे.[१] आपल्या शोधनिबंधाचा विषय शस्त्रविद्येशी निगडीत असल्याने आपण फक्त शस्त्रविद्येतील प्रकारांवर सविस्तर चर्चा करू, शस्त्रांचे ढोबळमानाने खालीलप्रमाणे वर्गीकरण करता येते.

१. **हत्यारे:** हा शस्त्रांचा प्रकार प्राथमिक स्वरूपाचा आहे. साधी सोपी कामे पार पडणारी शस्त्रे यामध्ये गणली जातात. घरगुती आणि दैनंदिन कामांमध्ये या शस्त्रांचा वापर केला जातो. उदा., सुरी, कात्री, विळी, इत्यादी

२. **अवजारे:** शेती, बांधकामासारख्या कामांमध्ये वापरली जाणारी शस्त्रे अवजारे म्हणून ओळखली जातात. उदा., कोयता, कुदळ, कुऱ्हाड, खोरे, इत्यादी

३. **आयुधे:** दैविशक्तीतून उत्पन्न झालेली किंवा देवांच्या वापरातील शस्त्राना आयुधे म्हटले जाते. उदा., गदा, सुदर्शन चक्र, त्रिशूळ, इत्यादी.

४. **शस्त्रे:** युद्धप्रसंगी, स्वसंरक्षणासाठी आणि वैयक्तिक उपयोगासाठी वापरण्यात येणाऱ्या उपकरणांना शस्त्र असे म्हटले जाते. हि शस्त्रे वैशिष्ट्यपूर्ण असतात. उदा., तलवार, भाला, इत्यादी.

अंदाजे इ.स. पूर्व ५वे शतक ते २रे शतक या कालावधीत वशिष्ठ ऋषींनी 'धनुर्वेद' हा ग्रंथ लिहिला. धनुर्विद्या आणि शस्त्रविद्या यांबद्दल असणाऱ्या लिखित संदर्भांपैकी हा एक विश्वसनीय संदर्भ आहे. यामध्ये शस्त्रांचे ४ भागांमध्ये वर्गीकरण केलेले आहे.

**चतुर्विधमायुधम् । मुक्तममुक्तंमुक्तामुक्तंयन्त्रमुक्तयेती ॥**

१. **मुक्त:** अशी शस्त्रे जी फेकून मारली जातात. उदा., भाला, बाण, त्रिशूळ, इत्यादी

२. **अमुक्त:** अशी शस्त्रे जी हातातुनच वापरली जातात. उदा., तलवार, गदा, गुर्ज, इत्यादी

३. **मुक्तामुक्त:** मुक्त आणि अमुक्त अश्या दोन्ही प्रकारांमधील वैशिष्ट्ये असणारी शस्त्रे म्हणजेच जी फेकुनही मारता येतात अथवा हातानेच चालवली जातात अशी शस्त्रे होय. उदा., भाला

४. **यंत्रमुक्त:** अशी शस्त्रे ज्यांवर एखाद्या यंत्राच्या सहाय्याने किंवा एखाद्या बाह्य वस्तूने नियंत्रण केले जाते. उदा., गोफण, विटा, शतघ्नी, इत्यादी.

अग्नीपुराणामध्ये शस्त्र विभाजानाबद्दल एक पुराणकथा प्रचलित आहे. दक्ष्यप्रजापातीच्या 'जया' या मुलीपासून शस्त्रांची निर्मिती झाली. ब्रम्हदेवाला दिलेल्या वाचनाचे पालन म्हणून जया हि शस्त्रांची जननी बनली. या पुरणकथेमध्ये शस्त्रांचे विभाजन केलेले आहे ते खालीलप्रमाणे:

१. **पाणिमुक्त:**हाताने चालविता येणारी शस्त्रे.

२. **अमुक्त:** फेकून मारता न येणारी शस्त्रे.

३. **मुक्तामुक्त:** मुक्त आणि अमुक्त अश्या दोन्ही प्रकारांमधील वैशिष्ट्ये असणारी शस्त्रे म्हणजेच जी फेकुनही मारता येतात अथवा हातानेच चालवली जातात अशी शस्त्रे होय.

४. **मुक्तसंधारिता:** फेकून मारल्यानंतर परत माघारी येणारी शस्त्रे.

५. **बाहुयुद्ध:** मल्लयुद्ध, कुस्ती.

याचप्रमाणे अर्थशास्त्र, शुक्रकांती, युक्तीकाल्पतरू, बृहसंहिता अशा अनेक प्राचीन ग्रंथांमध्ये शास्त्राच्या विभाजनावर चर्चा केलेली आहे.[२]


**भाला**

विटा हे शस्त्र समजून घेण्याआधी आपणाला भला हे शस्त्र समजून घेणे गरजेचे आहे. अश्मयुगापासून भाला भाला या शस्त्रावर मानवाची पकड मजबूत आहे. या शस्त्राची रचना म्हणजे साधारण ४ ते ७ फूट लांबीच्या काठीवर एका बाजूस धातूचे टोकदार पाते बसविलेले असते. हे शस्त्र उपरोक्त शस्त्रप्रकारांपैकी मुक्तामुक्त या शस्त्र प्रकारात मोडते. कारण हे शस्त्र हातातूनही वापरता येते तसेच दूरवर फेकून लक्ष वेधता येते. हे शस्त्र पायदळ, घोडदल, हत्तीदल,

हत्तीदल, उंटदल अश्या सर्व दलांमध्ये लोकप्रिय होते. तसेच राजकीय समारंभांमध्ये आणि राजदरबारा मध्ये मनाचे प्रतिक म्हणूनही हे शस्त्र मिरविले जायचे.[३]

**विटा**

**विट्याचे भाग**




१. **शीर्ष:** विट्याचे शीर्ष हे लांबट, निमुळते होत जाणारे टोकदार असे असते. एखाद्या सुई प्रमाणे या शीर्षाचा आकार असतो. शिर्षाच्या लांबीवरून विट्याचे साधारणतः तीन प्रकार पडतात असे काही शस्त्रअभ्यासकांचे मत आहे.

   I. **पहिला प्रकार:** १८ ते २४ इंच लांबीचे शीर्ष असणारा विटा

   II. **दुसरा प्रकार:** २८ ते ३० इंच लांबीचे शीर्ष असणारा विटा

   III. **तिसरा प्रकार:** ३४ ते ४८ इंच लांबीचे शीर्ष असणारा विटा

२. **गोंडा:** गोंडा हा या शस्त्राचा वैशिष्ट्यपूर्ण भाग आहे. हा गोंडा मुख्यत्वे प्राण्यांच्या केसापासून (गाई, बैल, घोडे, अस्वल, इत्यादी ) किंवा लोकरीचा बनविला जात असे. या गोंड्यामुळे विट्याला अक्राळविक्राळ स्वरूप येते. हा गोंडा विट्याचा समतोल राखण्याचे काम करीत असे तसेच हे शस्त्र घुपसण्यासाठी बनविले असल्याने व शस्त्राचे पाते निमुळते असल्याने शत्रूच्या रक्ताची धार पात्यावरून खाली म्हणजेच दंडाकडे ओघळणे स्वाभाविक आहे. त्या ओघळणाऱ्या रक्ताने योद्ध्याची पकड ढिली होऊ नये म्हणून दंडाच्या आणि शिर्षाच्या मध्ये हा गोंडा लावला जात असे. जेणेकरून ते रक्त गोंड्यापासून पुढे येऊ नये. गोंडा केसांचा असल्याने त्यावरील रक्त झाडल्यावरही निघून जात असे.

३. **दंड:** दंड म्हणजे काठी ज्यावर विट्याचे शीर्ष किंवा पाते बसविले जाते. याचा आकार दंडगोलाकार असतो. मुख्यत्वे दंड हा लाकूड, बांबू, वेत यांपासून बनविलेला असतो. दंडाचा आकार, लांबी आणि परीघ बदलत असतात. विट्याचा दंड साधरणतः 4 ते 7 फुटाचे असतात.

४. **दोरी:** विट्याचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे त्याला लावलेली दोरी होय. या दोरीमुळे विट्याला इतर शस्त्रांपेक्षा वेगळेपणा प्राप्त होतो. ही दोरी विट्याच्या दंडाच्या खालच्या बाजूला चावर फास या प्रकारच्या गाठीने बांधली जाते. ही दोरी 8 ते 10 फूट लांबीची असते.

**विटा शस्त्राचा वापर**

हे शस्त्र प्रक्षेपण करण्यासाठी तसेच हातातूनच शत्रूच्या शरीरामध्ये भोसकण्यासाठी वापरले जात असे. हे शस्त्र हातामध्ये धरल्यानंतर याला बांधलेली दोरी एका हाताला गुंडाळली जाते. या दोरीच्या गोल कड्याला मुदान असे म्हटले जाते. प्रक्षेपण करीत असताना विटा सरळ समोरच्या शत्रूवर फेकला जातो. समोरचे शीर्षाचे तीक्ष्ण टोक शत्रूच्या शरीराला भेदून गेल्यानंतर मागील दोरीच्या साहाय्याने ते पुन्हा खेचून घेतले जाते. त्यामुळे प्रक्षेपणानंतर शस्त्र पुन्हा प्रक्षेपणकर्त्याच्या हातामध्ये येते. यासाठी कमालीचा सराव आणि चपळता आवश्यक आहे. उपरोक्त दिलेल्या शस्त्रप्रकारांनुसार हे शस्त्र यंत्रमुक्त (दोरी हा शस्त्राच्या मूळ अंगाशी निगडीत नसलेला भाग आहे. त्यामुळे यंत्रमुक्त) किंवा मुक्तसंधारीत (फेकून मारल्यानंतर परत घेता येते) या प्रकारांमध्ये मोडते.

**विटा शस्त्राचे ऐतिहासिक संदर्भ**

विटा हे शस्त्र मध्यकालीन भारतामध्ये वापरले गेले. मराठा सैन्यामध्ये विशेष स्थान होते. शिबछत्रपतींनी आपल्या पदरी असे निष्णातविटा चालवणारे योद्धे होते . यांना विटेकरी किंवा इटेकरी असे म्हटले जात असे . अफजलखानाच्या वधादरम्यान प्रतापगडावर अशी विटेकऱ्यांची तुकडी तैनात होती[५].

त्याचप्रमाणे मुघल बखरींमध्ये या शास्त्राचा उल्लेख 'गनीम-इ-ताम ' म्हणजेच शापग्रस्त शस्त्र असा केला जाई ; तर विटेकऱ्यांना 'नैजबाझ' म्हणजे निष्णात भलाधारी असे संबोधले जात असे.[६]

साताऱ्याच्या छत्रपती शाहू महाराजांना या शस्त्राची विशेष आवड होती असे काही बाबींवरून ध्यानात येते. शाहू महाराजांनी साताऱ्यामध्ये विटेकऱ्यांची एक प्रशिक्षित तुकडी तैनात केली होती. तसेच वाडी रत्नागिरी, कोल्हापूर येथे जोतिबा देवाची यात्रा मोठ्या प्रमाणात भरते . या यात्रेसाठी अनेक गावांतून मानाच्या सासन काठ्या येतात. यांमध्ये निनाम पाडळी गावची सासनकाठी मानाची पहिली सासनकाठी होय तर विहे गावची सासनकाठी मानाच्या दुसऱ्या क्रमांकावर आहे. छत्रपती शाहू महाराजांनी निनाम पाडळीकरांना दोन विटे दिले होते. हे विटे सासनकाठीबरोबर जोतीबाला घेऊन जातात.[७]

अशाप्रकारे विटा या शस्त्राचे आपणाला संदर्भ मिळतात .

**निष्कर्ष**

विटा हे भारतीय मध्यकालीन इतिहासातील अत्यंत आधुनिक असे शस्त्र होते. या शस्त्राच्या वापारासाठी अत्यंत निष्णात आणि कुशल विटेकरी तैनात केले जात असत.मराठ्यांच्या इतिहासामध्ये तत्कालीन संदर्भग्रंथामध्ये या शस्त्राचे उल्लेख आढळतात.

सध्या अनेक मर्दानी खेळ खेळणाऱ्या संस्थांमधून विटा या शस्त्राच्या वापराची प्रात्यक्षिके दाखवली जातात. त्यामुळे या शस्त्रांचा अभ्यास करणे आणि या शस्त्रांचे जतन आणि संवर्धन करणे गरजेचे आहे.

**संदर्भ सूची**

१. राजरत्न प्रो. माणिकराव, श्री प्रतापशस्त्रागार, प्रकाशक मी.रा.रा. दामाजीराव विठ्ठलराव गायकवाड, ०९/०१/१९४२, पृ.क्र. ११

२. दुधाट गिरीजा, शस्त्रवेध, कॉन्टीनेंटल प्रकाशन, १५/०८/२०१९, पृ.क्र. १३,१४,१५

३. Dr. Pant G.N., catalogue of edged Arms and Armour in the Salarjung museum Hydrabad, 1989, page no. 168

४. मुलाखत: श्री बनकर प्रसाद (शस्त्र संग्रहक आणि अभ्यासक ), २५/०९/२०२० वेळ : ११:०० AM

५. कृष्णाजी अनंत सभासद, सभासदांची बखर, पुणे मॅजेस्टीक बुक स्टॉल, १९६२, पृ. क्र. २१

६. दुधाट गिरीजा, शस्त्रवेध, कॉन्टीनेंटल प्रकाशन, १५/०८/२०१९, पृ.क्र.३६

७. दै. तरुण भारत, १०/०४/२०१७

VOLUME - IX, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# ४. छत्रपती शिवाजी महाराजांची पर्यावरण नीती

**डॉ. शर्मिला अशोक साबळे**
सहा. प्राध्यापक, इतिहास विभाग, राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय, रूकडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

**प्रस्तावना**

**छ. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. यासाठी उपलब्ध सर्व गोष्टींचा फायदा त्यांनी स्वराज्य स्थापनेत केला. त्यामध्ये त्यांना प्रामाणिक व निष्ठावान मावळे यांचे सहकार्य लाभले. महाराष्ट्राची भौगोलिक रचना व पर्यावरणीय घटक यांचा पुरेपूर उपयोग त्यांनी करून घेतला. स्वराज्य स्थापनेपासून स्वराज्य विस्तारा पर्यंत त्यांचे स्वतःचे असे एक धोरण होते. ते त्यांचे धोरण अधिकाऱ्यांना पाठविलेल्या पत्रांमधून व्यक्त होते. त्यांचे स्वराज्य विषयक धोरण, मुलकी प्रशासन, न्याय विषयक धोरण, उद्योग धंदे व व्यापार नीति आणि पर्यावरण नीती, वेळोवेळी त्यांनी दिलेल्या आज्ञा, आदेश आपल्याला त्यांच्या अज्ञापत्रात दिसतात. छत्रपती शिवरायांचे जीवन म्हणजे रयत व स्वराज्य होते. राजा कसा असावा त्यांच्या असामान्य व्यक्तिमत्वावरून दिसून येते. त्यांचा एक एक पैलूंचा अभ्यास केला तरी एक मोठा ग्रंथ होऊ शकेल. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये त्यांच्या पर्यावरण विषयक भूमिकेचा, पर्यावरण नीतीचा अभ्यास केलेला आहे. यासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे.**

**छत्रपती शिवाजी व त्यांचे विचार पाहता त्यांच्या पर्यावरण विषयक भूमिकेचा अभ्यास करता हा राजा काळाच्या किती पुढे होता याचे महत्त्व पटते. त्यांच्या पर्यावरण नीती मध्ये गडकोट किल्ल्यावर केलेले काटेकोर जलव्यवस्थापन, गनिमी कावा, आरमार उभारणी, वनसंपत्ती संवर्धन या सर्व गोष्टींचा विचार केला, अभ्यास केला तर खऱ्या अर्थाने हा राजा पर्यावरणाचा प्रणेता होता हे सिद्ध होते. आज जागतिक तापमान वाढीने संपूर्ण जग त्रस्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारात व धोरणात आपल्याला नवीन दिशा मिळेल.**

**वनसंवर्धन**

**प्राचीन काळापासून निसर्ग हा मानवाचा अविभाज्य भाग आहे. प्राचीन मानव निसर्गाचा ऋणी होता. पूजक होता. आज मात्र मानव निसर्गावर मात करून त्याचा विध्वंस करत आहे. त्यामुळे आज एकविसाव्या शतकात 'झाडे लावा झाडे जगवा' हे आवश्यक झाले आहे. परंतु यापूर्वी सतराव्या शतकात झाडांचे महत्त्व जाणणारे शिवाजी महाराज यांनी वनराई भरमसाट असतानाही त्याचा ह्रास कधीच होऊ दिला नाही. उलट निसर्ग संवर्धनाबाबत ते किती जागृत होते हे अज्ञापत्रातून स्पष्ट होते. 'रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावू नये1' हे त्यांचे तत्त्व होते. पर्यावरण व रयतेच्या बाबतीतले स्पष्ट विचार पाहून राजे जनतेचा किती विचार करत होते हे लक्षात येते. शिवाजी महाराज रयतेला सांगतात, "आपल्या लेकराप्रमाणे झाडांना सांभाळा, त्यांची लागवड करा". लढाई करणारे व रणांगण गाजवणारे शिवाजी महाराज सर्वांनाच माहीत आहेत, परंतु स्वराज्यातील आणि परराज्यातील झाडाचे रक्षण झाले**

पाहिजे ही स्पष्ट भूमिका घेणारे शिवाजी महाराज किती लोकांना माहीत आहेत? आज विकासाच्या नावाखाली जैवविविधतेला धोका निर्माण झाला आहे. पर्यावरण संपले तर मानवजात संपेल. कारण मानव हा पर्यावरणाचा घटक आहे .सुमारे चारशे वर्षापुर्वी याचे भान व पर्यावरणाचे विचार राजांच्या डोक्यात होते.

शिवाजी महाराज आज्ञापत्रात म्हणतात, "आरमारास तक्ते, सोट, ढोलाच्या काठ्या आधी करून थोर लाकूड असावी लागते. आपले राज्यात, अरण्यात  सागवानादि वृक्ष आहेत. त्यांचे जे अनुकूल पडेल ते हुजूराचे परवानगीने तोडून न्यावे. याविरहित जे लागेल ते परमुलखातून खरेदी करून आणवित जावे. स्वराज्यातील आंबे फणस आदी करून हे ही लाकडे आरमाराच्या प्रयोजनाची परंतु त्यास हात लावू देऊ नये. काय म्हणोनी की ही झाडे वर्षा दोन वर्षांनी होतात असे नाही. रयतांनी ही झाडे लावून लेकरासाठी बहुत

काळ जतन करून वाढवली. ती झाडे तोडल्यावर त्यांच्या दुःखास पारावार नाही काय? एकासे दुःख देऊन जे कार्य करीन म्हणेल ते कार्य करणारा सहित स्वल्प काळाचे बुडोनी नाहीसेच होते. किंबहुना धन्याचे पदरी प्रजा पिडणाचा दोष पडतो. या वृक्षांच्या अभावे हानीही होते. याकरता या गोष्टी सर्वत्रै होऊ न द्यावी. कदाचित एखादेचे झाड बहुत जीर्ण होऊन कामातून गेले असले तरी त्याचे धन्यास राजे करून घेऊन द्रव्य देऊन त्याचे संतोषे तोडून यावे." अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या आहेत. यापुढे जाऊन ते सांगतात, 'गडावरची झाडे आहेत त्याचे रक्षण करावे. फणस, चिंच, वड, पिंपळ असे थोर वृक्ष, निंबे, नारिंगे इत्यादी लहान वृक्ष व पुष्पवृक्ष वल्ली गडावर लावावे. उपयोगी, निरुपयोगी असा विचार न करता सर्व प्रकारच्या झाडांची लागवड करा. केवळ लागवड करून थांबू नका तर त्या झाडांचे रक्षण करा. या झाडांचा उपयोग गडाच्या रक्षणासाठी, औषधासाठी होतो. त्यापासून आपणास फळे, फुले, भाजीपाला मिळतो2." यावरून शिवाजीराजे केवळ आज्ञाच करत नव्हते तर ते पर्यावरणाचे रक्षण ही करत होते हे स्पष्ट होते.

रामचंद्रपंत अमात्य यांनी लिहून ठेवलेल्या आज्ञापत्रात शिवाजीराजे सांगतात, "गडाची राखण म्हणजे कलारग्याची झाडी आणि ती झाडी प्रयत्ने वाढवावी. त्यामध्ये एक काहीही तोडून न द्यावी."3 गडाची राखण करण्यासाठी सैन्य जेवढे महत्त्वाचे असते त्याप्रमाणे पर्वतरांगांमध्ये असणारी दाट झाडी गडांचे रक्षण करते. ही झाडे प्रयत्नपूर्वक वाढवावी, अशी ते आज्ञा देतात. त्यांनी जाणीवपूर्वक गडावर आंबा, नारळ, वड, साग व शिसव यांची झाडे लावली. रायगडाच्या पायथ्याला शिवाजींची मोठी अमराई असल्याचा उल्लेख मिळतो. तुकाराम महाराजांच्या 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' या वचनाचा प्रत्यक्ष जीवनात राजाने अवलंब केल्याचे दिसते.

**गनिमी कावा युद्धतंत्र, भौगोलिक रचना व निसर्गाचा पुरेपूर वापर**

शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करताना अनेक प्रकारच्या तंत्राचा कौशल्याने वापर केला. शिवाय एका ठिकाणी वापरलेले तंत्र दुसऱ्या ठिकाणी वापरले नाही. त्यामधील एक तंत्र गनिमी कावा होय.त्यांनी सैन्यबळ कमी असल्यामुळे उघड्या मैदानावरील लढाया टाळल्या. आणि डोंगरदऱ्या, जंगला मधील लढायांवर भर दिला. त्यांनी चढ-उतार, गुहा,अवघड वाटा, चकवे, जंगलातील झाडी, चोरवाटा, पाणथळ ठिकाणे व डोंगर माथ्यावरील विविध प्रकारचे किल्ले, खंदक यांचा अगदी चाणाक्षपणे उपयोग केला.4 हे त्यांच्या पर्यावरण नीतीचे उत्तम उदाहरण

आहे. त्यांनी इतिहासाच्या जडणघडणीत निसर्गाचा व भौगोलिक परिस्थितीचा पुरेपूर उपयोग केला. त्यांचे गनिमी कावा युद्धतंत्र हे त्यांनी उपलब्ध पर्यावरणाचा वापर करूनच विकसित केले होते.

याचे उत्तम उदाहरण म्हणजे प्रचंड फौज घेऊन आलेला आदिलशाहीचा बलाढ्य सरदार अफझलखान याचा 10 नोव्हेंबर,1659 रोजी प्रतापगडाच्या पायथ्याशी असलेल्या घनदाट जंगलात केलेला पराभव होय.5 तसेच, '2 फेब्रुवारी 1661 रोजी मोगल अधिकारी कारतलब खान याच्या 30 हजार फौजेचा उंबरखिंड येथे केलेला पराभव' हे सांगता येतात.6 एवढेच नव्हे तर दगडधोंड्याचा वापर करूनही शत्रूला नामोहरण केले जात होते.

**जलव्यवस्थापन**

शिवाजीराजांनी केलेली जलव्यवस्थापन आजही अनुकरणीय आहे. किंबहुना आजच्या आधुनिक काळात सुद्धा फारच उपयोगी आहे.त्यांच्या स्वराज्य निर्मितीच्या काळात गड-किल्ल्यांना महत्त्व होते. त्यामुळे त्यांनी अनेक किल्ले बांधले. त्यावेळी त्यांनी गडावर उत्तम प्रकारचे जल व्यवस्थापन केले. गडांची निर्मिती करताना शिवाजीराजे आज्ञा करतात, "गडावर आधी उदक पाहून किल्ला बांधावा, पाणी नाही आणि ते स्थळ आवश्यक बांधणे प्राप्त झाले, तरी आधी खडक फोडून तळी, टाकी मजबूत बांधावी. गडाचे पाणी बहुत जतन राखावे"7. यावरून पाणी बचतीचा संदेश ही ते देतात. किल्ल्यांच्या संरक्षणाच्या दृष्टिकोनातून सर्वात प्रथम पाण्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. गडावर कायमस्वरूपी पाण्याचा साठा राहावा, याची योग्य ती काळजी त्यांनी घेतलेली दिसते. त्यांनी पाथरवटांच्या साहयाने किल्ल्यांमध्ये खणी, हौद, दगडांच्या उतरणीवर खोल खड्डे निर्माण करून पाणी सतत पाझरत राहील याकडे लक्ष दिले. रायगडावर गंगा तलाव, हत्ती तलाव, हिरकणी तलाव, काळा हौद, कुशावती, चांभार टाके, हनुमान टाके तर सज्जनगडावर सोनाळे तलाव, प्रतापगडावर रहाटाचे तळे, भवानी तलाव अशी अनेक उदाहरणे आपणास देता येतील. सपाट व नागरी वस्तीच्या ठिकाणी विहीरी, तलाव, पाणवठे खोदून घेतले होते. त्यांनी हवामानाचा लहरीपणा लक्षात घेऊन जल व्यवस्थापनावर भर दिला. पाण्याची मुबलकता उपलब्ध करून दिली. या सगळ्यांवर मात्र त्यांचे नियोजन काटेकोर होते.

**पाणी आडवा पाणी जिरवा**

आज आधुनिक काळात 'पाणी आडवा पाणी जिरवा' या तंत्राचा पाण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सरकार अवलंब करताना दिसते. मात्र शिवाजीराजे सरकारांनी सतराव्या शतकात या तंत्राचा अवलंब केला. त्यांच्या प्रत्येक कृती वरून राजे काळाच्या किती पुढे होते हे दिसून येते. शिवकालीन शेती ही पर्जन्यवृष्टी वर अवलंबून होती. आजच्या सारखी मोठी धरणे, कालवे व पाणीपुरवठ्याची साधने त्याकाळी अस्तित्वात नव्हती. शिवाजीराजांनी मात्र शेतीसाठी पाटबंधाऱ्यास उत्तेजन दिले. पावसाचे पाणी अडवून त्याचा शेतीसाठी उपयोग करण्यास सांगितले. त्यांनी ओढयांवर व नद्यांवर लहान बंधारे टाकून पाटाची व्यवस्था करून जिराईत शेती बागायती करण्याचे प्रयत्न केले. अशा जमिनीस 'पाटस्थल' असे म्हणत तर काही ठिकाणी विहिरी मार्फत बागायत केली जायची त्या जमिनीस 'मोटस्थल' असे म्हटले जाई.8 त्याचे एक उदाहरण शिवकालीन कागदपत्रांत सापडते. हे शिवापुर येथील एका धरणाचे पाणी एका भल्या मोठ्या खडकामुळे अडून राहिले होते. तो खडक फोडून पाण्यास वाट करून देण्याची कामगिरी

**महाराजांनी एस. पाटील-कोंडेवेकर यांच्यावर सोपवली. ती जबाबदारी एस.पाटलाने मोठ्या हिरीरीने पार पडली. त्याचे बक्षीस शिवाजी महाराजांनी त्यास सिंहगडाच्या पायथ्याशी पाटीलकी बक्षिस दिली.**9 **शिवकाळात फ्रेंच प्रवासी ॲबे कॅरे हा पश्चिम किनारपट्टीत येऊन गेला. त्याच्या प्रवासवर्णनात, शिवकाळात पाणी अडवून त्याचा उपयोग शेतीला केल्याचे वर्णन आहे. वरील सर्व गोष्टींवरून चारशे वर्षांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांनी राबवलेले जलव्यवस्थापन किती उच्च दर्जाचे होते व पर्यावरण राखणारे होते हे दिसून येते.**

**स्वच्छता व्यवस्थापन**

**आज आपले सरकार कोट्यावधी रुपये खर्च करून ग्राम स्वच्छता अभियान, हागणदारीमुक्त गाव या मोहिमा राबवताना दिसते.** 17 **व्या शतकात शिवाजीराजांनी कोणताही गाजावाजा न करता स्वच्छता अभियान राबवलयाचे दिसते. त्यांनी गडांवर केलेली शौचकूपाची व्यवस्था आजच्या काळातही आवर्जून बघावे अशीच आहेत. त्या काळातील मलमूत्र विसर्जनाची अनोखी शौचकुपांची व्यवस्था आपल्याला थक्क करते. आजही राजगड, रायगड, प्रतागड व पुरंदर या गडांवर शौचकूपे पाहता येतात. सैनिकांनी पहारा सोडून कोठेही लांब नैसर्गिक विधीसाठी जाऊ नये याची काळजी त्यांनी घेतलेली दिसते. एवढेच नव्हे तर मलमूत्र खोल तटबंदी बाहेर दरीत पडण्याची व्यवस्था पाहून शिवाजीराजे काळाच्या किती पुढे होते याची साक्ष पटते. गडाच्या वस्तीवर व गडावर कोठेही कचरा साठला तर तो तटाखाली न टाकता तो जाळून त्याची राख घरोघरी परसात टाकुन त्यावर भाज्या पिकवण्यात याव्यात.**10

**इतक्या सूक्ष्म नजरेने या सूचना दिल्या गेल्या आहेत याचे नवल वाटते. विहिरी, पाणवठे स्वच्छ ठेवावेत, सांडपाण्याची विल्हेवाट, शोष खड्ड्यांची व्यवस्था या सर्व गोष्टी पाहता त्यांच्या स्वच्छता व्यवस्थापनाची प्रचिती येते.**

**आरमार उभारणी**

**'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग, दुर्ग नसता मोकळा देश, परचक्र येताच देश उध्वस्त होतो' हे फार प्राचीन काळापासून धोरण असल्याचे दिसते. शिवाजींनी तर गडावरूनच राज्य केले. त्यांनी सह्याद्रीच्या रांगांवर, कोकण किनारपट्टीवर अभेद्य असे किल्ले बांधले. दुर्ग, जलदुर्गाची निर्मिती केली. सिंधुदुर्ग या जलदुर्गाचे बांधकाम पाहिल्यावर शिवाजी श्रेष्ठ दर्जाचे पर्यावरण तज्ञ होते हे सिद्ध होते. इ.स.**1664 **मध्ये कुरटे बेटावर शिवाजीने सिंधुदुर्ग किल्ला बांधला. हया किल्ल्याचे बांधकाम पूर्ण होण्यास तीन वर्षे लागली. किल्ल्यावर पाण्याचा मारा होऊ नये म्हणून मोठा बुरुज बांधून त्याचे दर्या बुरुज नाव ठेवले.**11

**या गडावर खारे पाणी असताना तेथे तीन गोड्या पाण्याच्या विहिरी आहेत. पर्यावरण पूरक शौचालय बांधण्याचा आग्रह आज सरकार करत आहे आहे शिवाजीराजांनी** 40 **शौचकुपे जलदुर्गावर बांधलेलली आहेत. कोकणातील विजयदुर्ग जिंकून घेतल्यावर तेथे सुद्धा शिवाजीने दुर्गविज्ञान वापरले. 'ज्यांचे आरमार त्यांचा समुद्र**12**' या तत्त्वाप्रमाणे शिवाजींनी सिंधुदुर्ग, विजयदुर्ग व रत्नागिरी येथील बंदरात जहाज बांधणीचे कारखाने व गोदामे उभारली. सागरा मार्गे शत्रूच्या घुसखोरीस प्रतिबंध करून किनारपट्टीवरील जनतेला सुरक्षित ठेवले. पर्यावरणाचे व भूगोलाचे पुरेपूर ज्ञान असल्याशिवाय हे सर्व करणे शक्य नव्हते.**

**समारोप**

**शिवाजी महाराज विज्ञानवादी व दूरदर्शी होते. त्यांचे स्वराज्य लोककल्याणकारी होते. त्यांनी जसे प्रजेचे हित जोपासले तसे त्यांनी पिके, वृक्षांचे सुद्धा हित जोपासले. वनसंवर्धन केले. अरण्याचा व दाट झाडीचा योजनापुर्वक उपयोग लष्करी डावपेचांसाठी केला. झाडीमय प्रदेश राखून ठेवला. गिरीदुर्गाच्या परिसरात घनदाट झाडी हेतुपुरस्सर वाढविले. रामचंद्रपंत अमात्यांच्या आरमार प्रकरणांमध्ये वृक्षसंवर्धनाचे महत्त्व व वृक्षा बद्दल भावना व्यक्त केल्या आहेत. भौगोलिक रचना व निसर्गाचा उत्तम वापर केला. अवकाळी पर्जन्यवृष्टी असतानाही उत्तम जलव्यवस्थापन केले. उत्तम ग्रामस्वच्छता राबविली व स्वच्छता व्यवस्थापन तर अफलातून केले.या सर्व बाबीतून त्यांची पर्यावरण नीती दिसून येते.**

**संदर्भ ग्रंथ**

1. **डॉ. पवार जयसिंगराव, शिवाजी व शिवकाल, फडके प्रकाशन,कोल्हापूर,** 1992, **पृष्ठ क्र.** 250.
2. **खरे ग.ह.आणि भिडे श्रीराम,( संपादित) आज्ञापत्र, सिटी बुक स्टॉल, पुणे,** 1960 **पृ.क़.** 172.
3. **खोले विलास (संपादित) आज्ञापत्र, लोकवा:मय गृह ,मुंबई,पृष्ठ क्र** 81.
4. **सरदेसाई गो. स.(संपादित) मराठी रियासत, खंड**-1, **पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृष्ठ क्र.**-368.
5. **कित्ता, उपरोक्त पृष्ठ क्रमांक**-193.
6. **कित्ता, उपरोक्त पृष्ठ क्रमांक**-204.
7. **डॉ. पवार जयसिंगराव, (संपादीत) हुकुमतपनहा, रामचंद्र पंत अमात्य स्मृतिग्रंथ, भारतीय मुद्रणालय, कोल्हापूर, पृष्ठ क्रमांक**-125.
8. **डॉ. पवार जयसिंगराव, मराठी सत्तेचा उदय, फडके प्रकाशन, कोल्हापूर. पृष्ठ क्रमांक**-152.
9. **कित्ता उपरोक्त, पृष्ठ क्रमांक**-156.
10. **उपरोक्त हुकूमतपनाह, पृष्ठ क्रमांक**-126.
11. **केळुसकर कृ.अ., छत्रपती शिवाजी महाराज, डिसेंबर** 1906, **दादर, मुंबई, पृष्ठ क्रमांक**-229.
12. **हुकूमतपनाह, उपरोक्त, पृष्ठ क्रमांक**-195.

VOLUME - IX, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# ५. छत्रपती शिवाजी महाराजांचे आर्थिक व शेती सुधारणा विषयक धोरण

**डॉ. विश्वनाथ काशिनाथ सोनवणे**
कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु. (शिवनगर) ता. कराड, जि. सातारा.

सतरावे शतक हे दख्खन देशाच्या इतिहासात विशेष कांतीकारक ठरले याशतकात दक्षिणेत राजकीय बदल मोठ्या प्रमाणात झाले . दख्खनच्या राजकारणावरमराठ्यांचा प्रभाव मालोजी शहाजीच्या काळापासून पडत होता. त्याची परिणीती पुढेशिवछत्रपतींच्या काळात मराठी सत्तेच्या स्थापनेत झाली. राजकीय बदलाबरोबरच त्यांचेपरिणामस्थानिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, जीवनावर पडणे स्वाभाविक होते.सतराव्या शतकात धार्मिक जीवनावर पडणे स्वीपरविक होते. सतराव्या शतकात आणित्यापूर्वीच्याही काळात सामाजिक आणि आर्थिक-व्यवहाराचा केंद्र बिंदू म्हणजे खेडे होते.शेती व्यवसाय हाच जीवनाचा प्रमुख मार्ग असल्याने बहुतांशी लोक प्रामुख्याने शेतीवरअवलंबून असत काही साहसी लोकांनी स्वयंभू पणे अथवा राजाज्ञेवरून जंगले तोडून,साफसफाई करून तेथील जमीन लागवडीस आणली असावी. आणि त्यातूनच खेड्याचीवसाहत झाली असावी. असे स्थूल पणाने म्हणता येईल.

**१. शिवाजी महाराजांचे कार्य**

वतनदार, मिरासदार, बलुतेदार आणि उपरी या सर्वांचा मिळून हा शिवकालीनगावगाडा तयार झाला होता. आणि या गावगाड्यातील प्रत्येक घटक समाजाच्याविकासासाठी झटत होता. या परंपरागत समाज स्वतंत्र शिवकालात काही बदल झाला.सतराव्या शतकात शिवाजी महाराजांनी मराठी सत्ता प्रस्थापित करून अनेकप्रशासकीय व आर्थिक सुधारणा प्रस्तुत केल्या. परंतू शिवकालीन गावगाड्याचे चित्रशिवपुर्व काळाहुन फारसे भिन्न नव्हते. या जुन्या समाज रचनेत बदल करणे कठीण होते.शिवाय शिवाजी राजा हा प्रामुख्याने राज्यकांती घडवून आणण्याच्या कार्यात दंग होता.त्यांची भूमिका समाज सुधारकाची नव्हती. शिवपुर्वकाळात गावाची वतनदार मंडळीपरीकीयांच्या चाकरीत होती, आणि त्या राजवटीत त्यांना बरेच स्वतंत्र होते. करणे शक्य असे.

**२. शिवकालीन शेती व्यवसाय व शेतकरी:-जमीनीचे विभाजन**

सर्व जमीनीची मालकी ही राजाची असली तरी तीकसण्याचे काम करू राजा शकत नसे, त्यासाठी जमीनीचे मालकी हक्क गावकऱ्यांना देई वत्यांच्या मोबदल्यात त्यांच्याकडून खंड घेई वतनदार, मिरासदार, बलुतेदार असेजमीनीचे मालक वतनाची, इनामाची विक्री आजच्या प्रमाणे त्याकाळातही होत असे.जमिनी अथवा वतनावरील हक्क, गहान, टाकून त्यावर कर्ज काढल्याचेही अनेकउदाहरणे आढळतात. जमीनीला त्याकाळात फार मोठी मागणी असली तरी तीविकणे इतके सोपे नव्हते. सतराव्या शतकात महाराष्ट्राचे आर्थिक जीवनशेतीव्यवसायाशी संपुर्णपणे निगडीत झाले होते. उद्योग धंदे, व्यापार, आणि इतरव्यवसाय यांना आर्थिक व्यवस्थेत दुय्यम दर्जाचे स्थान होते,उत्तम शेती, मध्यमव्यापार आणिकनिष्ठ नोकरी हे सुभाषित प्रसिध्दच आहे.शेती व्यवसाय हाच जीवनाचाएकमेव मार्गअसल्याने महाराष्ट्रात जमिनीला काळी आई असे म्हणत असतशेतीच्या उत्पादनावरच गावाचे आधिकारी, मिरासदार, बलुतेदार, उपरे यांचे जीवनअवलंबून असे. शेती व्यावसाय हा कालांतराने फलदायी होणाया व्यावसाय आहे. आज पेरलेआणि उद्या उगवले

असे या व्यवहारात घडत नाही. त्यामुळे बराच काळ वाटपहावीलागते. शेती व्यावसाय सूरळीत चालू ठेवण्यासाठी त्यांचा उदरनिर्वाह योज्य रितीने व्हावा.याकरीता शिवाजी महाराजांनी अशा गरजू शेतकऱ्यांना सरकारी खजिन्यातून धान्यदेण्याची व्यवस्था केली होती. पोटास दाणे नाही... तरी पोटास खांडे दो खांडे दाणे द्यावेअसे म्हटले आहे.शेती व्यवसाय वाढीस लागला पाहिजे शेतकरी सूखी तर राजा सूखी राजा गरीबतर राज्य गरीब तर राज्य गरीब ही त्याकाळाची अर्थनीती होती. आणि त्यालाअनुसरूनच महारांजांनी शेतकऱ्याला आर्थिक सहाय्य देण्याचे धोरण आखले होते.रयतेचे रक्षण करून शेती व्यावसायाच्या विकासाला उपयूक्त अशी परिस्थितीनिर्माण करणे हे त्यांचे कर्तव्य होते. आणि त्यांना वतन हे या कार्यासाठीच देण्यात आलेहोते.

**३. भारत :- कृषीप्रधान देश**

भारत आजही शेतीप्रधान देश आहे. शेती हा जिवनाचा व्यक्तीच्या आणि राष्ट्राच्यादेखील एकमेव प्रमूख मार्ग होता. राजाचे हित प्रजेच्या हिताशीनिगडितअसते.गरीबराजाम्हणजे गरीब प्रजा, राजसत्तेला न जूमानणारी, रयतेला सतत उपद्रव देणारी व पैसाउकळणारी अशी ही बंडखोर वतनदार मंडळी होती. गावावर त्यांची सत्ता चालतअसल्याने सरकारला प्रसंगी त्यांच्यापूढे नमते द्यावे लागे. अशा या लोकांना ठिकठाककेल्याखेरीज आपल्या स्वराज्याचे प्रशासन कल्याणकारी होणार नाही. तेव्हा तेथीलवतनदारांना त्यांच्या कर्तव्याची जाणिव करून देणे आवश्यक होते. आणि शिवाजीमहाराजांना शेती विषयक व शेतकऱ्याविषयी तळमळ होती. तसेच ओढयावर नदयावरलहान सहन बंधारे बांधुन व पाटाची व्यवस्था करून जिरायती जमीन बागायत करण्याचेस्वराज्यातहीचालू होते अशा कामी खुद्द महाराजांनीही रयतेंना ,पाटील देशमूखादीवतनदारांना प्रोत्साहन देत असत. शिवापूर येशील एका धरणाचे पाणी एका भल्या मोठ्याखडकामुळे अडून राहिले होते तो खडक फोडून पाण्यास वाट करण्याची कामगिरी महाराजांनी येसपाटील कोंडवेकर यावर सोपवली.शिवाजी महाराजांची स्वराज्यातील गरीब रयतेच्या कल्याणाविषयीची तळमळअनेक उदाहरणावरुन स्पष्ट होते. आपण स्थापन केलेले स्वराज्य हे बहूसंख्य रयतेच्याकल्याणासाठी आहे. याची जाणीवसातत्याने महाराजांनी आपल्या नजरेसमोर ठेवलीहोती. एवढेच नव्हे तर या जानिवेनेच स्वराज्यातील अधिकाऱ्यांनी व सैनिकांनी रयतेशीकसे वर्तन करावे हा त्यांचा राज्यकारभारातील कटाक्ष होता. शिवाजी महाराज रयतेशीआईच्या मायेने वागत असत सुभ्यातील देशमुख देशपांडे शेटे-महाजन आगरी व रयतमंडळी त्याला न भेटता बेपवाईने वागत असल्यांचे महाराजांना समजले की महाराजत्यांना सक्त ताकीद देत असत. सर्वांना समानतेची वागणूक देवून रयत कशी सूखीराहील असे ते विचार करीत असत.

**४. शिवाजी महाराजांचे व्यापार/आर्थिक धोरण**

न्यायमूर्ती रानडे यांच्या मते शिवाजी राजाची सर्वश्रेष्ठ कामगीरी म्हणजे स्वराज्यअथवा मराठा राष्ट्र निर्मिती होय. ही नवजात मराठी सत्ता आर्थिकदृष्टया सबलकरण्याचा आटोकाट प्रयत्न केला यासाठी शेती व्यवसाय कसा सूधारता येईल. उद्योगाचाविकास कसा करता येईल राज्याच्या उत्पन्नात कशी वाढ करता येईल याचा सतत विचारनी नवे धोरण आखले. महाराष्ट्राची पश्चिम किनारपट्टी ७१० कि.मी.जवळपास आहे. त्या भागात बरीच व्यापारी केंद्रे होती. त्यात दाभोळ, भिवंडी वेंगूर्ले,पेण, तारापूर, केळवे-माहिम, वसई, नागठाणे आणि दाभोळ व्यापाराच्या दृष्टीने सूरत वगोव्यासारखी गजबजलेली असत. सुरत ही त्या वेळची मोगलांच्या मूलखात असलेलीएक फार मोठी बाजारपेठ होती

तेथे आयात-निर्यात माल मोठ्या प्रमाणावर होत असे.त्यामुळे मराठी राज्याच्या बंदरातून वस्तू अधिकप्रमाणात निर्यात होत असल्यामुळे मराठीसत्तेच्या काळात आर्थिक सुधारणेला अधिक वाव मिळत होता. आर्थिक बाजू बळकटहोण्याच्या दृष्टीकोणातून शिवाजी महाराजांनी अनेक उपाय योजना घडवून आणूनमराठीसत्ता अधिक बळकट करण्याचा प्रयत्न केला.

**५. शिवरायाचे अर्थकारण**

आजच्या सरकारी धोरणामुळे गरीब अधिक गरीब आणि श्रीमंत अधिक श्रीमंतबनत आहे. उलट शिवरायांच्या आर्थिक धोरणामुळे गरीबांची संपत्ती वाढली आणिशोषण करणाऱ्या श्रीमतांना योग्य शासन झाले.श्रीमतांची छाटणी आणि गरीबांना वाटणी हे शिवरायाचे धोरण होते. आजगरीबांना लुटणे आणि श्रीमंतांना वाटणे सुरु आहे. स्वराज्यासाठी पैसा उभारतांना शिवाजींनी गरीबांना कधीच हात लावीत नव्हते.गरीबांचे रक्त शोषण करून गब्बर बनलेल्यावर त्याची करडी नजर असे.शिवरायांनी शेतकऱ्याच्या कर्तबगार मूलांना सैन्यात व शासनात सहभागी केलेहोते. मंडल आयोगाला अभिप्रेत अशी बहुजनांची शासनातील भागीदारी शिवरायानेकेव्हाच आमलात आणली होती. मंडल आयोगाने समाविष्ट केलेला बहूतेक सर्व जातीचेलोक शिवसैन्यात व शिवशाहीत सामील होते. आज मात्र अधिकारांच्या जागा उच्चवर्गाच्याच हातात आहे. शेतकऱ्यांना छळू नये त्यांच्या पिकांची नासाडी करू नये. अशासुचना सैन्याना व अधिकाऱ्यांना दिल्या होत्या.लुट करतांना गरीब, साधू, फकीर वगैरेना लुट नये, तांबे, पितळ वगैरे हलक्यावस्तूंना हात लावू नये, हिरे, मोती, सोने, चांदी, वगैरे मौल्यवान वस्तू लुटाव्यात अशाशिवरायांच्या आज्ञा असत. अणि सर्वात महत्त्वाची सुचना म्हणजे ही सर्व लूट सरकारातजमा करावी दोन लाखापेक्षा जास्त असलेली संपत्ती ही सरकारच्या मालकीची समजावीजे शासक आपल्या देशातील लोकांच्या गुणांचा, धर्माचा आणि वेळेचा योग्य उपयोग करूशकत नाहीत. ते शासक देशद्रोही ठरतात. शिवरायलोकहितदक्ष, मानवतावादी शासकहोते. शेतकऱ्याच्या मूलांना सक्तीचे मोफत शिक्षण, शेतकऱ्यांना जीवनवेतण, पेन्शनवगैरे सरकरी नोकरवर्गासारख्या सोयीसवलती शेतकरी-कष्टकरी समाजाला मिळाल्यापाहिजेत.

**६. सतरावे शतकचलन व्यवस्था/व्यवहार**

१७ व्या शतकात आजच्यासारखी लाक्षणिक अथवा प्रतिकात्मक नाण्याची प्रथारूढ नव्हती प्रत्येक नाण्याची किंमत ते ज्या धातूचे बनविले असेल त्यांच्या वजनावरअवलंबून असे. तत्कालीन समाजात सोने, चांदी, तांबे, पितळ आणि लोखंड या धातूपासून विविध प्रकारच्या नित्योपयोगी वस्तू तयार केल्या जात या धातूचा वापरटाकसाळीत नाणी पाडण्यासाठीही केला जाई लोखंडाचा वापर लढाईतील आयुधे, तोफासाखळदंड यांच्या उत्पादनासाठी होई. शिवकाळात किनारपट्टीवर अनेक ठिकाणीमिठाचा उद्योग व मच्छीमारीचा उदयोग भरभराटीस आला होता. कोकणात तयारझालेले मीठ देशावर व अन्यत्र पाठविले जाई. तसेच इथे सूकवलेली विविध प्रकारचीमासळी तयार होत असे, ती प्रामुख्याने देशावर विकीसाठी पाठवली जाई त्याचबरोबरकोणकणातील महत्त्वाचा उदयोग लाकूडकाम व जहाजबांधणी शिवकाळात, कल्याण,भिवंडी, पनवेल, राजपूर, देवगड, मालवण अशा अनेक बंदराच्या ठिकणी जहाजबांधणीव दुरूस्तीचा मोठा उदयोग चालत असे आणि याच्या माध्यमातून आर्थिक लाभ रयतेसहोत असे.

**७. शिवकालीन दळणवळणाची व वाहतूकीची साधणे**

कोणत्याही देशाचा आर्थिक वा औदयोगिक विकास हात्या देशातीलदेळणवळणाच्या साधणांच्या प्रगतीवर अवलंबून असतो. त्याकाळी त्यासराजमार्ग असेम्हणत. देशावर पावसाळयात नद्यांना पूर आलेले असत. अशावेळी

गावातील लोकनौकानयनाचा वापर करून मालांची व माणसांची वाहतूक केली जाई. अशा नोकांच्यासहाय्याने संगमेशवरासारख्या अंतर्गत प्रदेशातील बाजारपेठाही सागरी मार्गाशीजोडलेल्या असत. बाणकोट, हर्णे, देवगड, दाभोळ, मालवण, वेंगुर्ला इ. अनेक बंदरेसागरी वाहुतकीसाठी प्रसिध्दीस आली होती, स्वदेशी मालाचे संरक्षण करण्याची व्यापारीनिती आधूनिक काळात जगात सर्वत्र अमलात आणली जाते. या आधुनिक आर्थिकनितीचा उदय औद्योगिक कांतीच्या प्रसारानंतर एकोणिसाव्या शतकात प्रथमजर्मनीमध्ये करण्यात आला.प्रशासनाच्या प्रत्येक क्षेत्रात शिवाजी महारांजांनी आपली दूरदृष्टी दाखवली होती.पण आर्थिक प्रशासनामध्ये सतराव्या शतकात एवढा मूलगामी विचार तेकरीत होते, हे पाहून त्यांच्या एकूण कामगिरीविषयी अचंबा वाटल्याशिवाय राहत नाही.

**संदर्भ ग्रंथ सुची**

१. पवार जयसिंगराव भाऊसाहेब , मराठा सत्तेचा उदय, पृथ्वी पब्लेकेशन, कोल्हापूर - १९८२
२. कुलकर्णी अ.रा., शिवकालीन महाराष्ट्र,राजहंस प्रकाशन - पुणे
३. पदेशमुख मा.म. , शिवशाही,शिवभारती प्रकाशन, नागपुर,१९९१.
४. कुलकर्णी अ.रा. ,अशी होती शिवशाही, राजहंस प्रकाशन १८ मार्च १९९९.
५. डॉ. पवार जयसिंगराव , मराठी सत्तेचा उदय, फडके प्रकाशन, कोल्हापुर, ऑक्टो २०१३
६. भावे वा. कृ., शिवकालन महाराष्ट्र, वरद प्रकाशन प्रा.लि. २ ९७/१ सेनापती बापट मार्ग पुणे.
७. बेंद्रे वा.सी., छत्रपती शिवाजी महाराज पूर्वाध , पार्श्व पब्लिकेशन्स,कोल्हापूर८.छत्रपती
८. शिवाजी महाराज उत्तरार्ध-बेंद्रे वा.सी. पार्श्व- पब्लिकेशन्स, कोल्हापूर
९. सावंत उत्तम (संपादक) रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराज, निर्मल प्रकाशन,नांदेड जुन-२०१४
१०. चिटणीस कृ. ना., मध्ययुगीन भार्तीय संकल्पना व संस्था भाग- २, विशाल प्रिंटर्स, पुणे. १९८७.

# ६. स्थानिक इतिहासाच्या अभ्यासासाठी उपयुक्त असणाऱ्या काही मराठी साधनांची सूची : विशेष संदर्भ कोकण

**प्रा. डॉ. गणेश दत्तात्रय राऊत**
उपप्राचार्य आणि इतिहास विभाग प्रमुख, एच. व्ही. देसाई महाविद्यालय, ५९६ बुधवार पेठ, पुणे-०२.

प्रस्तुत शोधनिबंधात संशोधनाचा पहिला टप्पा म्हणून साधनांचे संकलन केलेले आहे. साधने गोळा करून संशोधकांसमोर मांडणे एवढाच मर्यादित उद्देश आहे. सूची तयार करणे महत्वाचे असल्यामुळे साधनांची वर्गवारी, महत्व, विश्लेषण यांवर भर दिलेला नाही. तो संशोधनाचा पुढचा टप्पा आहे. अर्थात प्रस्तुत शोधनिबंधातून संशोधनाच्या अनेक नव्या दिशा सूचित केलेल्या आहेत.

स्थानिक इतिहास लेखन ही शाखा नव्याने उदयाला आलेली आहे, असे डॉ. अरुण टिकेकर यांनी 'शहर पुणे' या खंडात म्हटले आहे. पारंपरिक इतिहास लेखनाचा पुनर्विचार होऊ लागला तेव्हा आर्थिक इतिहास, सामाजिक इतिहास आणि सांस्कृतिक इतिहास असेही इतिहास लेखनाचं वर्गीकरण होऊ लागलं. याच बरोबर वैचारिक इतिहास (Intellectual History, History Of Ideas) ही संकल्पनाही रुजली. या नव्या वर्गीकरणामध्ये सर्वांगीण इतिहासाचा (History In Totality) आग्रह आहे हे लगेच ध्यानात येतं. राष्ट्रपुरुषांची चरित्र आणि सनावळ्या म्हणजेच इतिहास नव्हे, असं इटालियन राजकीय कार्यकर्ता व विचारवंत अन्तोनिओ ग्रामची यानं म्हटलं मात्र, त्याच्या विधानातील सत्यार्थ जगभरच्या इतिहासकारांच्या ध्यानी चटकन आला आणि त्यांनी इतिहास लेखन प्रक्रियेचाच पुनर्विचार सुरु केला. या पुनर्विचारातून 'तळागाळाचा इतिहास' (History From Below) ही नवी संकल्पना रूढ झाली. 'स्थानीय इतिहास' ही देखील ग्रामचीच्याच औधत्यपूर्ण आव्हानातून उमललेली आणि इतिहास–लेखनाच्या पुनर्विचारातून प्रकटलेली संकल्पना असल्याचं मानता येतं. सांस्कृतिक केंद्र असलेल्या नगराचे भौगोलिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, वैचारिक असे आलेख काढले गेले आणि अशा अनेक सांस्कृतिक केंद्रांच्या व्यापक व सर्वांगीण इतिहासाच्या सहायाने सर्व देशाचा इतिहास लिहिला गेला तर तो निश्चितच अधिक समृद्ध व सर्व समाजघटकांना न्याय देणारा असणार, ही कल्पना पुढे आली आणि त्यातूनच सर्वांगीण स्थानीय इतिहासाची संकल्पना दृढ झाली.

स्थानीय इतिहासकाराला कोणताही विषय वर्ज्य नाही.... आपल्या शहराबद्दल असलेली आत्मीयता हा तर स्थानीय इतिहासाचा आत्मा आहे. ...शहराच्या इतिहासाची आठवण शहरात वसणाऱ्या कुटुंबांच्या नव्या नव्या पिढ्यांना करून देणे हा स्थानीय इतिहास लेखनाचा आद्य हेतू असतो.[३]

या पार्श्वभूमीवरकोकण संदर्भात अभ्यास करीत असताना पुढील साधने विचारार्थ घेणे आवश्यक आहे.

**कोकण आणि वृत्तपत्रे**[४]

कोकणातील वृत्तपत्रांची माहिती देताना साधने गोळा करणे हा मर्यादित उद्देश असल्याने वृत्तपत्रांची नावे, वृत्तपत्र सुरु झाले ते वर्ष व दिनांक, वृत्तपत्राचे संपादक, वृत्तपत्र प्रसिद्धी ठिकाण (जिल्हा/ तालुका/ गाव) अशी माहिती दिलेली आहे. यात कुलाबा, रत्नागिरी, चिपळूण, वेंगुर्ले, मालवण, अलिबाग, पेण येथील वृत्तपत्रे दिलेली आहेत. वानगीदाखल कोकणातील काही पत्रांची नोंद येथे घेतलेली आहे.

**कुलाबा**:- जिल्ह्यातील 'शरभ' साप्ताहिक अलिबागमधून प्रसिद्ध होई. मे १८८१मध्ये ते प्रसिद्ध झाले. याचे इंग्रजी नाव 'ग्रास हॉपर' म्हणजे गवती टोळ होते. ते १८८५ पर्यंत चालू होते.

कुलाबा जिल्ह्यातील लोकसेवक व टाईम्स ऑफ इंडियात शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लेखन करणारे रामजी लक्ष्मण घरत यांचे समग्र आत्मवृत्त ३ जानेवारी १९२७ मध्ये निघालेल्या 'कोंकण' साप्ताहिकात प्रसिद्ध झाले. अलिबागचे समाजसेवक व स्वातंत्र्यसैनिक ग. भा. पंडित व ग. रा. साखळकर यांनी अस्पृश्योद्धारासाठी 'विधायक' पाक्षिक काढले होते. १९३५ मध्ये काँग्रेसच्या प्रसारासाठी राष्ट्रमत प्रसारक मंडळी स्थापून 'राष्ट्रतेज' साप्ताहिक सुरु झाले.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात 'कुलाबा' जिल्हा युद्ध समिती वृत्तपत्रिका' पत्र १९४० मध्ये निघाले.

**रत्नागिरी**:- मार्च १८८२ मध्ये 'विचारशील' हे साप्ताहिक सुरु झाले. याच वर्षी 'तरुणमित्र' मासिक, वेंगुर्ले वृत्त. नारायणराव मंडलिक यांचे 'सुधारक' पत्र सुरु झाले. 'सुधारक' पत्र १८८८ ते १९१० पर्यंत चालू होते. सशस्त्र क्रांतिकारकांच्या नाशिककटाच्या संदर्भात या पत्राला गोवण्यात आले. यामुळेहे पत्र बंद पडले. रत्नागिरीत १९२८ मध्ये 'यंग मुस्लिम' पत्र निघाले. नव प्रभा ( The New Light) हे बाबासाहेब रामचंद्र घोरपडे यांच्या संपादकत्वाखाली सुरु झालेले पत्र महत्वाचे होय.'भारत प्रकाश'पत्र १९३०, 'सिंधुदुर्ग' १९३१, 'अरुण'ही पत्रे महत्वाची आहेत.

**चिपळूण**:- येथून ७ जानेवारी १८९१ रोजी'चंद्रोदय' साप्ताहिक सुरु झाले.'मदतनीस' हे पत्र आणि निशिकांत माधव जोशी यांनी 'सागर' पत्र सुरु केले.

**वेंगुर्ले**:- येथून 'सत्यवक्ता' हे पत्र १८९७ मध्ये सुरु झाले.. विसाव्या शतकात नोंद घ्यावी अशी'धनंदा' आणि 'किरात' ही दोन पत्रे १९२३ मध्ये प्रकाशित होऊ लागली.

**मालवण**:- एकोणिसाव्या शतकात सुरु झालेले आणि विसाव्या शतकापर्यंत चाललेले 'बाल-सन्मित्र' पाक्षिक(इ.स. १८३५ ते १९५५) केवळ लहान मुलांसाठी पारुजी नारायण मिसाळ यांनी सुरु केले. या पत्राचे संपादन, प्रकाशन, वितरण सारे मिसाळ एकटेच करीत. हातभार लांब, वितभर रुंदीचा ४-६ पृष्ठांचा अंक असे त्याचे स्वरूप होते. पुढे १९०२ ला मालवण येथे 'वार्तादर्श' पत्र सुरु झाले. सावंतवाडी येथे १९०५ मध्ये 'श्रीसरदेसाई विजय' हे पत्र, मालवण येथे १९२४ मध्ये 'शाहू प्रकाश' व 'मालवण समाचार' ही पत्रे निघाली. श्री. स. खांडाळेकर यांच्या संपादकत्वाखाली 'जनयुग' साप्ताहिक मालवणला १९५४ मध्ये सुरु झाले. मालवण येथे 'शिवसंदेश' साप्ताहिक

१९५९ मध्ये विठ्ठलराव पै यांनी सुरु केले. कणकवली येथे १९६८ मध्ये भाऊसाहेब कदम यांनी 'लोकगंगा' साप्ताहिक सुरु केले.

**अलिबाग**:- १९२५ मध्ये येथे दा. पां. आगाशे यांनी 'कुलाबा सद्वृत्त' हे पत्र सुरु केले. नागू पाटील यांचे कृषीवल अलिबाग मधून सुरु झाले. अलिबाग येथे रावजी आठवले यांनी 'सत्यसदन' पत्र सुरु केले. १९२० मध्ये त्यांनी 'खरे स्वराज्य' हे साप्ताहिक काढले. १९६० साली अलिबाग मधून 'निर्धार' हे साप्ताहिक संपादक नरेंद्र कृ. खानविलकर यांच्या नेतृत्वाखाली सुरु झाले.

**पेण**- 'पेण समाचार' (१८९४) हे पत्र पेणचे विनायक नारायण उर्फ काकासाहेब मनोहर यांनी सुरु केले

**कोकण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर**[१]

डॉ. भीमराव रामजी उर्फ बाबासाहेब आंबेडकरांचे घराणे मुळचे कोकणातील होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पत्रकारिता हे शस्त्र मानून ते आपल्या बांधवांच्या हितासाठी चालविले. 'बहिष्कृत भारत', 'मूकनायक', 'जनता' या पत्रांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनेक सामाजिक प्रश्न मांडले. 'बहिष्कृत भारत' मधून कोकणातील सामाजिक प्रश्नांचे यथार्थ दर्शन घडते. या वृत्तपत्रात आंबेडकरांनी अनेक महत्वाचे अग्रलेख लिहिले. 'महाड येथील धर्मसंगर व वरिष्ठ हिंदूंची जबाबदारी', 'महाड येथील धर्मसंगर व इंग्रज सरकारची जबाबदारी', 'महाड येथील धर्मसंगर व अस्पृश्य वर्गाचे कर्तव्य', 'खोती उर्फ शेतकरी वर्गाची जबाबदारी' या प्रमुख अग्रलेखांमधून कोकणातील सामाजिक व आर्थिक प्रश्न पुढे येतात. याच वृत्तपत्रातील 'आजकालचे प्रश्न' या सदरात 'महाडची परिषद व भालाकारांचा मानभावीपणा','महाडचा खटला व अस्पृश्यांचा जय', 'महाड म्युनिसिपालिटीची कारवाई', 'अस्पृश्यांचा सत्याग्रह आणि महाडच्या चवदार तळ्याची रक्षा', 'महाडचा सत्याग्रह आणि ब्राह्मणेतर पुढाऱ्यांचे कर्तव्य', 'महाड परिषदेवरील आक्षेप' या लेखांमधून महाड कैंद्रित राजकारण-समाजकारण आपणांस पहायला मिळते. या लेखांमधून समकालिन महाराष्ट्राचे सामाजिक दर्शन घडते. वृत्तपत्रांना समाजव्यवस्थेचा आरसा असे का म्हटले जाते ते आपणांस हे लेख वाचल्यावर समजते.

याच वृत्तपत्रांमध्येकोकणातील संस्थांचा आणि परिषदांचा उल्लेख झालेला आहे. त्याचा स्वतंत्र अभ्यास होणे आवश्यक आहे. १९-२० जुलै १९२९ च्या कोंकण प्रांतिक पूर्वास्पृश्य शिक्षण परिषद, मालवण येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर गैरहजर राहिल्याने स्वातंत्रवीर सावरकर अध्यक्ष झाले. हा गमतीदार योगायोग होय. याच्याच जोडीला 'कोंकण प्रांतिक बहिष्कृत शिक्षण परिषद', 'बहिष्कृत परिषद रत्नागिरी जिल्हा', 'भारतीय बहिष्कृत समाजसेवक संघ चिपळूण', 'रत्नागिरी जिल्हा शेतकी परिषद' या संस्थांचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

याच पत्रात बातम्या, वाचकांचे विचार व पत्रव्यवहार या शीर्षकाखाली कोकणसंदर्भात पुढील मजकूर आहे. 'कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद', 'महाड अत्याचार निषेध प्रदर्शन सभा', 'महाड सत्याग्रहाची पूर्वतयारी', 'महाडचे बातमीपत्र', 'महाड सत्याग्रहाच्या मदतीसाठी सभा', 'महाडची सत्याग्रह परिषद', 'चवदार तळ्याचा दावा', 'महाड सत्याग्रह परिषद व डॉ. आंबेडकरांचे अध्यक्षीय भाषण', 'महाड चवदार तळ्याचा खटला', 'महाड नंतर', 'महाड येथील बहिष्कृत परिषदेचा इष्ट परिणाम', 'महाड येथे सत्याग्रहाला सुरुवात होणार', 'महाड म्युनिसिपालिटीची

पुच्छ प्रगती', 'महाडचा वृतांत', 'चिपळूण येथील सहभोजन', 'कुलाबा समाचार'चा चावटपणा, वेंगुर्ल्याचा सत्यनारायण असे विषय आहेत. या विषयांवरून कोकणातील लोकमानस, स्थानिक इतिहास समजण्यास मदत होते.

**लोकसत्ता व कोकण[६]**

डॉ. अरुण टिकेकर यांनी लोकसत्ताच्या संपादकपदी असताना रविवारच्या लोकसत्तामध्ये 'स्थलकाल' सदर चालविले होते. यांत महाराष्ट्रातील स्थानिक इतिहास आणि त्यांच्या अभ्यासाची साधने यांवरभर होता. यात ३० जून २००२ रोजी 'वेंगुर्लेकर-मालवणकर शेजारी शेजारी मग स्वभावात फरक का?' असा लेख प्रकाशित झाला आहे. २१ जुलै २००२ रोजी 'दिल्लीची शाहजादी चिपळूणचा पंडित अन् दाभोळचा पीर' तर सप्टेंबर २००२ मध्ये 'चौल ऊर्जितावस्थेची साक्ष प्रार्थनास्थळांमध्ये' असे तीन लेख लिहिले आहेत. वेंगुर्लेकर-मालवणकरलेखात पेशवे दफ्तर, डचांची वखार, वेंगुर्ला बंदराचे प्राचीन व मध्ययुगीन महत्व, औरंगजेब, छत्रपती शिवाजी महाराज व वेंगुर्ला मालवणचे महत्व यांचे उल्लेख आहेत. 'दिल्लीची शाहजादी' लेखात दाभोळचे महत्व, रशियन प्रवासी अथनेशियस निकितन, थेवनॉट, छत्रपती शिवाजी महाराज, शिर्के, हबशी, तुळाजी आंग्रे, पेशवे, ब्रिटिश यांचे उल्लेख आहेत. चौलवरील लेखात चौलला भेट देणारे २४ परकीय प्रवासी, चौलमधील आत्मबलिदान, प्राचीन राजघराणी, कपड्यांची निर्यात यांचा अभ्यासपूर्ण आढावा आहे. या लेखांच्या संदर्भात Notes on the History and antiquaries of Chaul and Basin जे गर्सन डाकुन्हा यांचे पुस्तक (प्रका १८७६) महिकावतीची बखर-केशवाचार्य, लिजेंडस ऑफ ड कोंकण-ले आर्थर क्रॉफर्ड (१९०९) हे ग्रंथ महत्वाचे आहेत.

**कोकणच्या आर्थिक इतिहासाची साधने[७]**

कोकणच्या इतिहासाचा अभ्यास करताना आर्थिक गोष्टींवर प्रकाश टाकणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने वा. द. दिवेकरांच्या पुस्तकात पुढील माहिती आहे. यात खोती पीके व शब्दसंपत्ती यांचा विचार केला आहे. कोकणातील खोती आणि इनामदारीच्या संदर्भात 'सन १८८० साली झालेल्या खोतांच्या ठरावाचे मंडन' हा लेख पुणे सार्वजनिक सभेच्या मासिक पुस्तकातील आहे.

१८८८ च्या खोती सेटलमेंट कायद्यासंदर्भात खालील लेख महत्वाचे आहेत. आर. एस. टिपणीस यांच्या 'अंबाडोशी गावाचे खोती जजमेंट', या गावच्या गाजलेल्या खोती कज्ज्यातील हाय कोर्टाचे ठराव, एम. एस. चितळे यांचा 'खोतीसंबंधी विचार' (मुंबई १८९६) हा लेख लोकहितवादी उर्फ गोपाळ हरि देशमुख यांच्या 'खोती प्रश्नावरील टिपणे' (१८९१) या लेखावर आधारित आहे. जि. व्ही. जोशी यांचा 'कुलाबा व ठाणे या जिल्ह्यातील खोती सत्ता प्रकार' हा रत्नागिरी १९२९ च्या अंकातील महत्वाचा लेख होय. 'खोती वतनावर हल्ला' हा व्ही. व्ही. साठे यांचा तर व्ही. के. साठे यांचा 'खोती हक्कावर हल्ला अगर कोकणातील खोतांची दैन्यस्थिती' हा लेख महत्वाचा आहे. 'आपली शेती' या नियतकालिकात खोती वतनाचा इतिहास दिला आहे.

कोकणातील भात शेतीच्या संदर्भात पी. जी. जोशी यांचे 'अवना एवढ्या उत्पन्नाची कोकणची भातशेती' हे महत्वाचे पुस्तक होय. १९१४ साली 'शेतकी आणि शेतकरी' च्या अंकात के. व्ही. जोशी कोकणातील भातशेतीत

सुधारणा सुचवितात. पी. के. गोडे यांचा 'नवभारत' च्या अंकात अंजीर, बदाम, कलमी आंबे यांची माहिती देणारा संक्षिप्त लेख आहे.कोकणच्या आर्थिक इतिहासासाठी 'ध. रा. गाडगीळ लेखसंग्रह'[८] महत्वाचे आहेत. या दोन्ही खंडात खंडात विभाग १ ते ६ मध्ये कोकणचा आर्थिक अंगाने विचार केलेला आहे.

विभाग १- 'संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न' यात महाराष्ट्राचा आर्थिक विचार करताना गाडगीळ यांनी कोकणचा खास उल्लेख केला आहे. 'महाविदर्भाची कल्पनाच कृत्रिम', 'सहकारी अर्थव्यवहार' यात त्यांनी अर्थविषयक प्रश्नांचा उहापोह केला आहे.

विभाग २- 'महाराष्ट्राचे आर्थिक प्रश्न' यात महाराष्ट्रातील शेतकी समितीची कामगिरी या संदर्भातील कोकणातील खोती पद्धतीचा विचार केला आहे. प्रादेशिक समाज व प्रादेशिक अर्थव्यवस्था यात कोकणच्या सर्वंकष आर्थिक पहाणीचा विचार मांडला आहे. कोकणच्या आर्थिक नियोजनाचा विचार त्यांनी 'संयुक्त महाराष्ट्र, लोकशाही समाजवाद आणि आर्थिक नियोजन' या अंतर्गत मांडला आहे.

विभाग ३- आर्थिक नियोजन यात 'कोकणचा आर्थिक विकास' या शीर्षकाखाली मुंबईत भरलेल्या (३०-११-१९६९) कोकण परिषदेच्या उद्घाटक पदावरून केलेल्या भाषणात त्यांनी कोकणच्या आर्थिक वैशिष्ट्यांचा विचार केलेला आहे.

**ऐतिहासिक साधने**[९]

शिवचरित्र साहित्य खंड ९ व १० हे कोकणच्या इतिहासावर प्रकाश टाकण्यास उपयुक्त आहेत. अलिबागचे संशोधक शां. वि. आवळसकर यांनी दोन्ही खंड संपादित केलेले आहेत. ९ व्या खंडात अधिकारी घराण्यातील निवडक १०० कागद आहेत. यात इ.स. १५२५ ते १७०० पर्यंतच्या कालखंडावर प्रकाश टाकण्यात आला आहे. या दफ्तरात खासगी पत्रव्यवहार, दानपत्रे, युरोपशी आयात-निर्यात, पोर्तुगीज, आदिलशाही, छत्रपती शिवाजी महाराज, औरंगजेब, २३ विविध कर आणि वेठबिगार या संदर्भातील माहिती मिळते. या खंडात स्वतंत्र विषयसूची व व्यक्तीसूची आहे. खंड १० मध्ये रायाजी सत्तक प्रभू व त्याची वंशावळ असून छत्रपती संभाजी महाराज व छत्रपती राजाराम महाराज यांच्या कारकीर्दीपर्यंतचा आढावा आहे. कान्होजी आंग्रे यांचा दिवाण रघुनाथ प्रभू यांची वंशावळ दिलेली आहे. मध्ययुगीन कोकणातील व्यापार, शिवकालातील ५७ वस्तूंवरील कर, वतनदारांचे हक्क, विविध कर, इंग्रज, सुलतान बहादूरशहाचा अंमल याविषयी माहिती मिळते. या खंडात विषयसूची, व्यक्तीसूची व स्थलसूची आहे.

'कोकणच्या इतिहासाची साधने'या ग्रंथात छत्रपती राजाराम महाराज व कोल्हापूरच्या राजांनी इ.स. १६९२ ते १८२८ या कालखंडात वेळोवेळी जारी केलेली आज्ञापत्रे, सनदा समाविष्ट केलेल्या आहेत. वतन पद्धत, डाक पद्धत, कोल्हापूर-सावंतवाडीकर यांचे संबंध, संस्थानचे प्रशासन यावर या पुस्तकातून प्रकाश पडतो.

'अर्वाचीन महाराष्ट्रेतिहासकालांतील राज्यकारभाराचा इतिहास' या ग्रंथात लेखक शंकर नारायण जोशी यांनी कोकणातील आर्थिक प्रश्नांच्या संदर्भातील पत्रव्यवहार, तक्रारी, उपाययोजना, जमिनीचे प्रश्न या संदर्भात माहिती दिली आहे. या पद्धतीने साधने संकलित करून इतिहास लेखन करता येणे शक्य आहे.

**संदर्भ**

१. पहा अधिक माहितीसाठी- वांबूरकर जास्वंदी (संपा)-'इतिहासातील नवे प्रवाह', डायमंड प्रकाशन, पुणे, २०१४, (लेख १, गायकवाड लहू, 'स्थानिक इतिहास लेखन', पृष्ठ १ ते १२ ) (लेख २, दीक्षित राजा, 'प्रादेशिक इतिहास', पृष्ठ १३ ते २३ )

२. भालेराव कविता, 'मराठ्यांचा इतिहास ग्रंथसूची', मौज प्रकाशन मुंबई, २०१७ (दु.आ) या ग्रंथसूचीमध्ये लेखिकेने सूची संपादनाविषयी काही विचार या भागात सविस्तर चर्चा केलेली आहे.

३. स्थानीय इतिहास या विषयाच्या अधिक माहितीसाठी पहा टिकेकर अरुण ( संपा.), शहर पुणे, खंड १ व २, प्रका- निळूभाऊ लिमये फौंडेशन, पुणे २०००. प्रस्तावना पृष्ठ दहा ते अठरा

४. कोकण आणि वृत्तपत्रे हा भाग लेले रा.के., मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, continental publication पुणे प्रथम आवृत्ती १९८४ आणि लेले रा.के., जोशी वि.कृ., वृत्तपत्रांचा इतिहास, वरदा प्रकाशन, पुणे २०१३ प्र. आ. यांवर आधारित आहे.

५. कोकण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा भाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, संपादन वसंत मून, शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन (प्रका. १९९०) यांवर आधारित आहे. येथे आवृत्ती कितवी हे नमूद केलेले नाही.

६. डॉ. अरुण टिकेकर हे दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्राचे संपादक म्हणून ख्यातकीर्त होते. याच्याच जोडीला संशोधक म्हणूनही त्यांनी ठसा उमटविलेला आहे.

७. कोकणच्या आर्थिक इतिहासाची साधने हा भाग survey of material in Marathi on the Economic and Social History of India- V.D. Divekar 1981. Pub- Bharata Itihasa Samshodhaka Mandala, Pune-30 या मूळ इंग्रजी ग्रंथावर आधारित आहे.

८. ब्रह्मे सुलभा (सं.पा), ध. रा. गाडगीळ लेखसंग्रह, खंड १,२, प्रका. गोखले अर्थशास्त्र संस्था,

९. पुणे,१९७३ V.D. Divekar पूर्वोक्त

VOLUME - IX, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# ७. आंबेगाव तालुक्यातील (जि. पुणे) ब्रिटीशांचे सनद भाषांतर धोरण

**डॉ. संतोष हनुमंत जाधव**
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा, जि. पालघर.

**प्रस्तावना**

आंबेगाव तालुक्यात म्हणजे ब्रिटिशकालीन आंबेगाव पेट्यात इंग्रजांनी जमीन महसूल वसूल करताना शेतकऱ्यांवर अन्याय करत होते. सावकार शेतकऱ्यांकडून अतिरिक्त व्याज आकारणी करत होते. सावकारांना ब्रिटिश शासन सहकार्य करत होते. त्यामुळे शेतकरी वर्ग त्रासून गेला होता. त्याचवेळी ब्रिटिश सरकारने राजकीय, सामाजिक व धार्मिक धोरण थोडसं मवाळ वसहानुभूतीपूर्ण ठेवले. सर्वसामान्य जनतेला ब्रिटिश राजवटीबद्दल चीड निर्माण होऊ नये याची खबरदारी घेतली. त्यामध्ये ब्रिटिशांचा स्वार्थ दडला होता. या धोरणानुसार त्यांनी आंबेगाव तालुक्यातील मौजे कळंब येथील विठ्ठल मंदिर व वडगाव काशिंबेग येथील गणपती मंदिर येथे दिलेली सनद याचे ब्रिटिश सरकारने इंग्रजी भाषेत भाषांतर केले. आणि ब्रिटिश शासनाचे राजकीय व सामाजिक धोरण राबविले. सदर सनदांविषयी ब्रिटिशांची असणारी भूमिकेची मांडणी सदर शोध निबंधातून केली आहे.

**ब्रिटिशांचे राजकीय व सामाजिक धोरण**

इ.स. १८०३ साली दुसऱ्या बाजीराव पेशव्याने इंग्रजांबरोबर वसईचा तह केला. तेव्हापासून मराठी सत्तेला अखेरची घरघर लागली. दिनांक १७ नोव्हेंबर १८१७ रोजी माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनच्या नेतृत्वाखाली शनिवारवाड्यावर इंग्रजी फौजांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले.[१] अशा प्रकारे शनिवारवाड्यावर इंग्रजांचा युनियन जॅक ध्वज फडकू लागला. मराठी राज्याची अखेर होऊन इंग्रजांनी पेशव्यांकडून ५०,००० चौरस मैलांचा व ४०,००,००० लोकवस्तीचा प्रदेश ताब्यात घेतला. माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनला डेक्कन कमिशनर या पदावर नेमून त्याच्याकडे पुणे व आसपासच्या प्रदेशाचा कारभार दिला. पेशव्यांकडून जिंकलेल्या प्रदेशावर हुकूमत गाजविताना इंग्रजांनी प्रचलित व्यवस्थेमध्ये फारसा क्रांतीकारक बदल करावयाचा नाही असा त्याने विचार केला होता. जेम्स कॅनिंग ग्रॅट डफला तसे त्याने पत्राद्वारे कळविलेही होते.इ. स. १८१८ मध्ये पेशवाईच्या पाडावानंतर महाराष्ट्रात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता सुरू झाली. या राजकीय बदलांबरोबरच प्रशासकीय आणि त्याच्या अनुषंगाने सांस्कृतिक बदलाची महाराष्ट्रात सुरूवात झाली. महाराष्ट्रात इंग्रजी सत्तेची स्थापना करण्यात माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनची अर्थपूर्ण भूमिका होती. नव्या ब्रिटिश सत्तेला मजबूत करण्यासाठी एल्फिन्स्टनने आपले कार्यकर्तृत्व पणाला लावले. इंग्रजांनी सैन्यबळावर मराठ्यांचा पाडाव करून सत्ता मिळविली तरी आता सत्ता टिकविण्यासाठी शक्तीपेक्षा एल्फिन्स्टनला संमतीचा मार्ग अधिक योग्य वाटला. एल्फिन्स्टनची डेक्कन कमिशनरपदी नियुक्ती झाली. तेव्हापासून त्याने वर उल्लेख केल्याप्रमाणे ध्येयधोरणे

आखली. एल्फिन्स्टनने भावी सुव्यवस्थित इंग्रजी राज्याचे चित्र महाराष्ट्रातील जनतेसमोर उभे केले. भारतीयांना ही बाब पटवून देण्यासाठी एल्फिन्स्टनने ११ फेब्रु. १८१८ रोजी एक जाहिरनामा प्रसिध्द केला.[२] आपण भारतीयांच्या धार्मिक बाबींमध्ये हस्तक्षेप करणार नाही असे आश्वासन दिले. माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनने पुणे प्रांताचा कारभार लेफ्टनंट हेन्री रॉबर्टसन याच्याकडे सोपविला. त्यावेळी पुणे जिल्ह्याची लोकसंख्या ५,००,००० होती. सरकारे लोकांसाठी असतात लोक सरकारसाठी नसतात ही भावना डोक्यात ठेवून रॉबर्टसनने कारभार केला. राज्यकारभार करताना आदिवासी जमातींना दुखवायचे नाही. त्यांनी आपणाविरूध्द बंड करू नये म्हणून त्यांच्या धार्मिक भावनांना कोणीही हात घालावयाचा नाही. त्याचप्रमाणे त्यांच्याकडे असणाऱ्या प्रचलित मंदिरांमध्ये पूजा — अर्चाही बंद करावयाची नाही. हा आपला हेतू त्याने स्पष्ट केला. आंबेगाव तालुक्यातील दुर्गम भागातील मंदिरांची पूजा आदिवासी, भिल्ल, ठाकर यांच्याकडे होती. इ. स. १८३० साली इंग्रजांनी त्यांच्या जीवनपध्द्तीला धक्का लावताच त्यांनी इंग्रजांविरूध्द बंड केले. जुन्नर आंबेगाव परिसरातील या बंडाचे नेतृत्व रामचंद्र गोरे यांनी केले. ब्रिटिशांनी त्यांना पकडून फासावर दिले. त्यांच्या ५४ सहकाऱ्यांना आजन्म कारावासाची शिक्षा केली. म्हणूनच काही काळ तरी या लोकांच्या जीवनपध्दतीला धक्का लागणार नाही याची ब्रिटिशांनी काळजी घेतली. इंग्रजांनी क्रांतीकारक बदलाची प्रक्रिया थांबविली. महसूल व इनाम जमीनींच्या बाबतीतही मोठा धोरणात्मक बदल केला नाही.[३] आंबेगाव तालुक्यातील घोड नदीच्या काठी कळंब या गावी असलेल्या विठ्ठल मंदिराचे पुजारीपण गुरव समाजाकडे होते. ब्रिटिशांनी ते त्याच समाजाकडे ठेवले. ते पुजारीपण त्यांच्याकडे परंपरेने शिवकाळापासून होते. विठ्ठल मंदिरास इनाम जमिन होती. इंग्रजांनी ती जमिन गुरव समाजाचे पुजारी यांना जोपर्यंत ते मंदिराची पूजा करत आहेत तोपर्यंत त्यांना ती प्रदान केली. या आशयाची मोडी व इंग्रजी अशी द्वैभाषिक सनद त्या कुटूंबाला दिली ती सनद पुढीलप्रमाणे

**कळंबची विठ्ठलमंदिर सनद**

मौजे कळंब (ता. आंबेगाव) गावच्या विठ्ठल मंदिरास इनाम कमिशनने सनद दिली. सदर सनद मोडी व इंग्रजी भाषेत आहे. तिचा इंग्रजी मजकूर पुढे देत असून नंतर मराठी अनुवाद केला आहे.[४]

**SANNAD**

This sannad is issud on the part of Her Most Gracious Majesty Victoria Queen of great Britain and Ireland, and of the colnies and Dependencies there of, by command, and under the signature of His Excellency sir Gorge Russell clerk, Kioight Commander of the most honorable order of the…..Her Majesty Governer of the presidency of Bombay in council to the effect………

……….WHEREAS in mouje kalamb of Taluka padwal in the…..Poonas collectroate, certain land claimed as Inam is entered in the village accounts of the year 1860-1861 as follows

| Name of the Holder | Field Number | Full Assement | Of which is paid to Gov. |
|---|---|---|---|
| Shri Maruti Moru Gurav. Kalamb. Tal. Padwal; Poona | Inam No. Class1345, H.61R.[6] | Yes | 14/- |

It is hereby declared that the said land shall be concored ever by British pay of 14/- Rupees. On the following conditions;

That is to say, that Managers there of shall continue faithful subjects of the British Government and shall render to the same, sellted and consolidated land tax, the sum of Rupees R. 14/- Yearly. In concideration of the fulfeelment of which condition, the said land shall be continued for ever as endowment. Inam whithout increase of land tax over the said fixed amount. Dated at Bombay, this twenty eight day of November in the year one Thousand eight hundred and sixty one.

**मराठी अनुवादाचा सारांश**

ग्रेट व आयर्लंड, त्याचप्रमाणे ब्रिटिशांच्या अंकीत साम्राज्याची राणी व्हिक्टोरीया हिने व तिच्यातर्फे मा. सर जॉर्ज रसेल क्लार्क (ब्रिटनच्या राणीच्या उच्च घराण्यातील कमांडर) यांनी राणीच्या आदेशावरून व मुंबई इलाख्यामार्फत मौजे कळंब, ता. पडवळ (आताचे महाळुंगे पडवळ) पुणे जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकाराखाली श्री. मारूती मोरू गुरव यांना १८६० – १८६१ मध्ये मंदिराच्या पुजारीपणार्थ पाच हेक्टर एकसष्ट आर, सर्व्हे इनाम असून ती पुढील अटींवर दिली आहे.

१. जमिनीवर वार्षिक १४/– रूपये कर भरावा लागेल.
२. जमीन मालक जोपर्यंत ब्रिटिश सरकारशी इमाने इतबारे वागतील तोपर्यंतच जमीन त्यांच्याकडे राहिल.
३. इनाम जमिनीवरील कर कायमस्वरूपी १४/– रूपये राहिल. त्यात वाढ करू नये.
४. दि. २८ नोव्हेंबर १८६१ पासून सनद अंमलात आली आहे.

शिक्का घेणाराची सही पुणे कलेक्टर शिक्का

या सनदेतील दुसऱ्या क्रमांकाच्या अटींमधून इंग्रजांची साम्राज्यवादी वृत्ती लगेच दिसते.

सारांश, ब्रिटिशांनी ऐतदेशीयांना इनाम देताना त्यांना आपल्या सत्तेशी प्रामाणिक राहण्यास बांधून घेतले होते. ब्रिटिशांनी कोणताही बदल लगेच न करता जनतेची मानसिकता हळूहळू बदलविली. पेशव्यांच्या राजवटीत जी दक्षिणा देण्याची पध्दत चालू होती ती क्रमश: चालू ठेवली. उदा. ब्राह्मणांना दक्षिणावाटप करण्याच्या पध्द्तीचे समूळ उच्चाटन करण्याऐवजी एल्फिन्स्टनने या पध्द्तीला दोन लाख रूपयांच्या निधीचे स्वरूप दिले. ब्राह्मणांना दिली जाणारी दक्षिणा आता राजाश्रयाखालील खिरापत न राहता ती ज्ञानप्रसाराची संस्थात्मक तरतुद बनली.[५]

**वडगाव काशिंबेगगणपती मंदिरसनद**

पेशवेकाळात दिलेली इनामे व सनदा तपासण्यासाठी इंग्रजांनी वडगाव काशिंबेग गावच्या (ता. आंबेगाव) गणपती मंदिरास दरवर्षी एक रूपया इंग्रजी खजिन्यातून देण्याची तरतुद केली. त्याविषयीची सनद पुढीलप्रमाणे —

**मराठी अनुवाद, लिप्यंतर**

दि सेक्रेटरी ऑफ स्टेट इन कौन्सिल याजला कारणी श्री गणपती देव कसबे वडगाव तर्फ म्हाळुंगे ता. खेड जि.पुणे या देवस्थानाचे वहिवाटदार यास.

माजी राजयाचे वेळेपासून सालिना नक्त नेमणूक श्री गणपती देव कसबे वडगाव तर्फ म्हाळुंगे ता. खेड जि.पुणे या देवस्थाबद्दल पावत आहे. ऐशियास असे ठरले की, सरकारी एक (१) रूपयाची नेमणूक सदर देवस्थानाचे तहसिलदार जोपर्यंत इंग्रज सरकारशी इमाने इतबारे वागतील तोपर्यंत त्यांचीयाकडे सरकारी खजिन्यातून निरंतर चालून अदा करण्यात येईल.ही सनद दि सेक्रेटरी ऑफ स्टेट इन कौन्सिल यांचे वतीने मुंबईचे गव्हर्नर इन कौन्सिल यांचे हुकूमावरून कर्नल एथिज साहेबाशी असे ॲक्टिंग सेटलमेंट ऑफिसर दक्षिण भाग यांचे श्री शिक्कयानिशी ता. १५ एप्रिल १८७२ रोजी तयार करण्यात आली[६]

**सही. शिक्का.**

प्रस्तुत सनदेमध्ये माजी राजाच्या वेळेपासून सालिना नक्त नेमणूक म्हणजेच कसबा वडगाव येथील गणपती मंदिरास पेशवेकाळापासून आर्थिक मदत दिली जात होती. ब्रिटिश दि सेक्रेटरी ऑफ इन कौन्सिल यांनी लिहून घेतले की, आर्थिक मदत घेताना ब्रिटिशांशी इमाने इतबारे राहावे लागेल. ही बाब ब्रिटिशांच्या दृष्टीने महत्त्वाची होती. आता ब्रिटिशांची महाराष्ट्रातील सत्ता स्थिरावत होती तर त्याचवेळी भारतभर राष्ट्रवादाची निर्मिती होऊ लागली होती. १८८५ साली भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाली. येथूनच खऱ्या अर्थाने भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा प्रारंभ झाला. त्याला पुणे जिल्हा व आंबेगाव तालुका अपवाद नव्हता.

**संदर्भ व तळटीपा**


१. अ. रा. कुलकर्णी,**'जेम्स कॅनिंगहॅम ग्रॅंट डफ',**(मराठयांचा इतिहासकार व प्रशासक) पुणे विद्यापीठ, पुणे, १९६९. पृ. ६२.

२. चंद्रकांत अभंग, **'जौहिरनामे : ब्रिटिश राजवटीतील सामाजिक परिवर्तनाचे एक महत्त्वाचे साधन',** त्रैमासिक भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे. त्रै. जुलै २०००, पृ. ५९—६०.

३. कुमार केतकर, **'कथा स्वातंत्र्याची',** पुणे २००३ (आवृत्ती) पृ. १०.

४. मारूती मोरू गुरव, कळंब यांच्याकडील मोडी व इंग्रजी लिपीतील सनद

५. राजा दीक्षित, **'पुणे विद्यापीठाचा इतिहास',** पुणे,२०००, पृ. १५.

६. **'दि सेक्रेटरी ऑफ स्टेट इन कौन्सिल यांनी दिलेली मोडी सनद',** अप्रकाशित दि. १५ एप्रिल १८७२. सदर सनदेचा मराठीत अनुवाद केला आहे.

# ८. ग्राम स्वराज्य आणि महात्मा गांधीजींचे विचार : चिकित्सा

**डॉ. अजितकुमार दादासो जाधव**
सहाय्यक प्राध्यापक व विभागप्रमुख, इतिहास विभाग, आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, नागठाणे, ता. जि. सातारा (शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर संलग्नित)

**की वर्ड्स -** ग्राम, स्वराज्य, समाज, इंडिपेंडन्स,

**प्रस्तावना**

प्राचीन कालखंडापासून आधुनिक कालखंडापर्यंत भारताची अर्थव्यवस्था ही कृषिप्रधान राहिली आहे. भारताची बहुसंख्य लोकसंख्या खेड्यात राहते. जगातील अनेक प्राचीन संस्कृतींपैकी भारतीय संस्कृतीची एक वेगळी ओळख आहे आणि ही ओळख खेड्यांमधील जीवनपद्धती मधून दिसून येते. वेदांमध्ये म्हटले आहे की, ' विश्व पुष्टे ग्रामे अस्मिन अनातुरम' याचा अर्थ माझ्या गावात संपूर्ण विश्वाचे दर्शन झाले पाहिजे. आधुनिक कालखंडात ब्रिटिशांनी ग्रामीण विकासाकडे दुर्लक्ष केले होते हे पाहून महात्मा गांधींनी ग्राम स्वराज्याची संकल्पना मांडली. राष्ट्राचा विकास व्हावयाचा असेल तर प्रथम खेड्यांचा विकास झाला पाहिजे हे महात्मा गांधीजींनी जाणले होते. तत्कालीन कालखंडामध्ये शहरांपेक्षा खेड्यांना खूप मोठ्या प्रमाणात महत्त्व होते. म्हणून गांधीजींनी 'खेड्याकडे चला' असा संदेश दिला होता.

**महात्मा गांधीजींचा परिचय**

2 ऑक्टोबर, 1869 रोजी गुजरात मधील पोरबंदर येथे जन्मलेले मोहनदास करमचंद गांधी परदेशात उच्च शिक्षण घेऊन बॅरिस्टर बनले. दक्षिण आफ्रिकेला जाऊन वकिली व्यवसायास सुरुवात केली. तेथे त्यांना काळ्या-गोऱ्या लोकांबद्दल असलेल्या भेदभावाला सामोरे जावे लागले. या विरुद्ध त्यांनी आवाज उठविला व तेथील कृष्णवर्णीय लोकांचे संघटन करून सरकार विरोधी शांततामय मार्गाने आंदोलन सुरू केले. सरकारने हे आंदोलन चिरडल्यामुळे जनप्रक्षोभ निर्माण झाला. दरम्यानच्या काळात गांधीजींच्या सत्याग्रह आणि अहिंसा या संकल्पना दृढ होत गेल्या. दक्षिण अफ्रिकेत असताना त्यांनी 'फिनिक्स' या आश्रमाची स्थापना केली. 'इंडियन ओपिनियन' हे वृत्तपत्र सुरू केले.[1] सन 1915 साली ते भारतात आले. गोपाळ कृष्ण गोखले यांच्याकडून भारताचे राजकारण व समस्या याविषयी जाणून घेऊन राष्ट्र कार्यास सुरुवात केली. चंपारण्य, खेडा सत्याग्रह, असहकार आंदोलन, सविनय कायदेभंग चळवळ, 1942 चे चले-जाव आंदोलन अशा विविध आंदोलनामधून भारताच्या स्वातंत्र्यासाठी झगडत राहिले व त्याचे मूर्तस्वरूप म्हणजे 15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. गांधीजींनी 'हरिजन' हे वृत्तपत्र सुरू करण्याबरोबरच अनेक ग्रंथाचे लेखन केले. त्यांनी अस्पृश्यता, जातीयवाद, बहुविवाह पद्धती, पडदा प्रथा, विधवांची दुर्दशा,

नशाखोरी, धार्मिक भेदभाव असे अनेक सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी रचनात्मक संघर्ष केला.[2] हे सर्व चालू चालू असतानाच गांधीजीनी 'ग्रामस्वराज्य' ची संकल्पना साकार व्हावी यासाठी आपले विचार मांडले.

**ग्राम स्वराज्य संकल्पना**

ग्रामस्वराज्याची मूलभूत संकल्पना अशी आहे की प्रत्येक गावात स्वतःचे प्रजासत्ताक असले पाहिजे. महात्मा गांधीजींच्या विचारसरणीतील ग्रामस्वराज्य ही निर्णायक संकल्पना होती. ग्रामस्वराज्य हीच भारतातील आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू आहे असे त्यांना वाटत होते. गांधीजींचे ग्रामस्वराज्य हे जुन्या खेड्यांची पुनर्बांधणी नव्हती तर स्वयंपूर्ण अर्थव्यवस्था असलेली खेड्यांची नवीन आणि स्वतंत्र अशी व्यवस्था होती. खेड्यांमधील लोकांच्यामध्ये आत्मनिर्भरता निर्माण झाली पाहिजे. अन्न वस्त्र आणि इतर मूलभूत गरजा गावातच तयार झाल्या पाहिजेत. त्यामुळे जास्तीत जास्त रोजगार निर्मिती होईल आणि ग्रामीण भागातून शहरी भागाकडे होणारे स्थलांतर हे रोखले जाऊन चांगल्या संधी निर्माण होतील अशी खात्री गांधीजींना वाटत होती. म्हणूनच त्यांनी ग्रामस्वराज्य यावर भर दिला. ग्रामस्वराज्याची संकल्पना स्पष्ट करताना गांधीजींनी म्हटले आहे, "राज्य नसलेला वर्ग विहीन समाज स्वराज्य व स्वावलंबी ग्रामीण समुदायात विभागला जाईल. प्रत्येक ग्राम समुदायाचे प्रशासन चालविण्यासाठी पाच जणांची पंचायत असेल व ती ग्रामस्थांच्याद्वारे निवडली जाईल. ग्रामपंचायतींना वैधानिक, कार्यकारी आणि न्यायालयीन अधिकार असतील. ग्रामपंचायतीवर मंडळे जिल्हा आणि जिल्हा पेक्षा जास्त प्रांत असतील. सर्वात महत्वाचे म्हणजे संपूर्ण राष्ट्रासाठी एक केंद्रीय पंचायत असेल. प्रत्येक गाव त्याच्या गरजा व सुरक्षेच्या दृष्टीने स्वयंपूर्ण असेल. सैन्यशक्ती आणि पोलीस त्या ठिकाणी असणार नाहीत. सत्तेचे विकेंद्रीकरण होईल. प्रत्येक गाव आपल्या इच्छेनुसार युनियनला संलग्नित असेल."[3] अशाप्रकारे स्वराज्याची संकल्पना स्पष्ट केली आहे. सारांशत गांधीजींना स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण खेड्याची संकल्पना निर्माण करावयाची होती. जागतिक बँकेने ग्राम विकासाची संकल्पना स्पष्ट करताना म्हटले आहे की, "ग्रामीण विकास हा लोकांच्या एका विशिष्ट समूहाच्या आर्थिक किंवा सामाजिक सुधारणा करण्यासाठी स्वीकारलेली व्यूहरचना आहे. या व्यूहरचनेत छोटे शेतकरी, कास्तकर किंवा भूमिहीन समूहाला सहभागी केले जाते."[4] जागतिक बँकेने ग्रामीण विकासामध्ये सामान्य लोकांच्या विकासासाठी पायाभूत साधनांची अपेक्षा केली आहे.

**महात्मा गांधींची ग्रामराज्याविषयी वैचारिक भूमिका**

'खरा भारत खेड्यात राहतो' असे गांधीजी मानत असत. खेड्यातील शेती समृद्ध व्हावी. तसेच खेड्याची रचना नियोजनबद्ध असावी. उत्पादन, वितरण आणि उपभोग ही सर्व प्रक्रिया खेड्यातच घडून यावी. खेड्यात ग्रामोद्योगांना महत्त्वाचे स्थान मिळावे यासाठी ग्राम स्तरावर प्रयत्न केले पाहिजेत असे त्यांचे त्यांचे मत होते. महात्मा गांधीनी सन 1941 मध्ये आपल्या 'रचनात्मक कार्यक्रम त्याचे रहस्य व स्थान' या ग्रंथात आदर्श समाज निर्मितीसाठी 18 प्रकारची कार्ये सांगितली आहेत. त्यामध्ये धार्मिक एकता, अस्पृश्यता निवारण, नशाबंदी, खादी, ग्रामोद्योग, खेडयांची स्वच्छता, तरुण व प्रौढाना शिक्षण, स्त्रियांचे

अधिकार, आरोग्य विषयक नियमांची माहिती, प्रादेशिक भाषा, राष्ट्रभाषा, आर्थिक समानता, शेतकरी, मजूर, आदिवासी कुष्ठरोग, विद्यार्थी, या आधारे आदर्श समाजाची परिपूर्ण कल्पना आणि निर्माण प्रक्रिया दिली आहे. या कार्यक्रमामुळे व्यक्तीमध्ये परिवर्तन होऊन समाजामध्ये आपोआपच परिवर्तन घडेल असे गांधीजींना वाटत होते.[5] व्यक्ती आणि समाज हे परस्परपूरक घटक आहेत. त्यामुळे ग्रामस्वराज्यामध्ये या दोन्ही घटकांना महत्वाचे स्थान आहे.

ग्राम स्वराज्यामध्ये खेड्यांचा सहभाग व सक्रियता ही सर्वाधिक शक्तिशाली असते. स्वराज्य हा एक पवित्र आणि वैदिक शब्द आहे. ज्याचा अर्थ आत्मशासन व आत्मसंयम असा होतो. इंग्रजी 'इंडिपेंडन्स' या शब्दाचा अर्थ सर्व प्रकारची मर्यादा, मुक्त निरंकुश स्वातंत्र्य व स्वच्छंदता असा होतो. हा अर्थ 'स्वराज्य' या शब्दांमध्ये येत नाही.[6] गांधीजींच्या मते, ग्रामस्वराज याचा प्रमुख आधार ही गावातील एकता आहे. आज खेड्यातील समाज विभागला गेलेला आहे. समाजातील काही स्वार्थी लोकांनी या विभाजनाला गती देऊन स्वार्थ हाच महत्त्वाचा मानला होता. सामाजिक ऐक्यासाठी ग्रामसभेचे सर्व निर्णय एकमत आणि संमतीने झाले पाहिजेत. न्याय पंचायत सदस्यामार्फत ग्रामपंचायतीने स्थानिक पातळीवर न्यायदानाची व्यवस्था केली पाहिजे. जेणेकरून दुर्बलातील दुर्बल व्यक्तीला न्याय मिळेल असा गांधीजींचा विश्वास होता. प्रत्येक खेड आपल्या मूलभूत गरजा भागवू शकेल. यासाठी ग्राम स्वराज्याच्या नियोजनाबद्दल गांधीजींनी प्रमुख दोन गोष्टी सांगितल्या आहेत. पहिली म्हणजे खेड्यातील लोकांना संघटीत केले पाहिजे आणि दुसरी गावातील सर्व लोकांनी ग्रामपंचायतींना सर्वाधिकार देऊन त्या सक्षम बनविल्या पाहिजेत. यातूनच खेड्यात सदृढ प्रशासन निर्माण होऊन खेड्यांची सर्वंकश प्रगती होईल.[7] थोडक्यात गांधीजींचे हे विचार तत्कालीन कालखंडाचा बरोबरच पुढील काळातही खेड्यांचा विकास साधण्यासाठी किती उपयोगी होते याची प्रचिती येते.

ग्राम स्वराज्याचा एक मजबूत आधार म्हणून गांधीजींनी ग्रामोद्योगाकडे पाहिले होते. ग्रामीण उद्योग निर्मितीमागील हेतू सांगताना ते म्हणतात, 'गावातील लोक लहान लहान समूहाने एकत्र असले पाहिजेत. ज्यामुळे त्यांच्या जीवनातील मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी ते स्वयंपूर्ण व आत्मनिर्भर असतील.'[8] एकूणच खेडी ही स्वयंपूर्ण असली पाहिजेत व व खेड्यातील लोकांच्यामध्ये सुसंवाद निर्माण होऊन त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांना आवश्यक असणाऱ्या वस्तूची निर्मिती करता आली पाहिजे हे गांधीजींच्या वरील विधानावरून दिसून येते.

खेड्याच्या विकासाबाबत महात्मा गांधीं म्हणतात, 'खेड्याचा विकास होण्यासाठी प्रथम हिंदुस्थानातल्या प्रत्येक खेड्यात पायाभूत शिक्षण देणाऱ्या शाळा निर्माण केल्या पाहिजेत. दुसरे म्हणजे गावात ग्रामपंचायत असली पाहिजे. तिसरे गावात ग्रामीण सहकारी संघटना असावी आणि चौथे म्हणजे खेडे गावातील प्रत्येक व्यक्तीला काम करता येईल असा उद्योग असावा या चतु:सूत्री चा अवलंब खेडेगावांमधून केल्यास ग्रामीण विकास होऊन हिंदुस्थान समृद्ध होईल.' असा विश्वास गांधीजींना वाटत

होता. खेड्यांची लुट जेव्हा थांबेल, तेव्हा खेडी पुन्हा जिवंत होतील. मोठ्या प्रमाणावर वस्तूचे उत्पादन व्यवसायिक स्पर्धा यामुळे खेड्यातील लहान-मोठ्या व्यवसायिकांची लुबाडणूक होते म्हणून प्रत्येक गाव किंवा खेड हे स्वावलंबी व स्वयंपूर्ण बनवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी वस्तू तयार केल्या पाहिजेत. ग्रामीण उद्योगांना संरक्षण देऊन त्यांच्या उत्पादनाला प्रोत्साहन दिले पाहिजे तरच खेडी किंवा गावे स्वयंपूर्ण बनू शकतात आज शहरांचे वर्चस्व वाढत चालले आहे तर दुसरीकडे खेडी ओस पडू अथवा नष्ट होऊ लागली आहेत. खेड्यांचे संघटीतरीत्या शोषण चालू आहे, आपणाला अहिंसेच्या बळावर जर राज्य निर्माण करायचे असेल तर खेड्यांना योग्य स्थान दिले पाहिजे असे असे गांधीजींचे मत होते.[9] वरील सर्व विश्लेषणावरून ग्रामीण जीवनामध्ये ग्रामस्वराज्याची भूमिका किती महत्वपूर्ण व व्यावहारिक होती हे दिसून येते.

**मूल्यमापन**

गांधीजींचे ग्रामराज्य विषयीचे विचार आदर्शवादी होते. यामध्ये ग्रामविकास, आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण, पर्यावरण संरक्षण, समानता, सत्य, अहिंसा इत्यादींचा समावेश होता. समाजातील आर्थिक दुरावस्था दूर होऊन उपेक्षित, कारागीर, शेतकरी यांची उन्नती व्हावी यासाठी ग्रामविकास साधला पाहिजे यासाठी गांधीजींची तळमळ होती. त्यांनी ग्रामीण विकासाबाबत मांडलेले विचार आजही समाजाला मार्गदर्शक व प्रेरक ठरतात. आज खेड्यांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती खालावलेली आहे. खेड्यात उद्योगधंदे व पुरेसा रोजगार उपलब्ध नाही. अनिश्चित हवामान आणि पाऊस यामुळे शेतीचे उत्पादन घटले आहे. परिणामी शेतीत उत्पादन काढणे अवघड झाले आहे. या पार्श्वभूमीवर महात्मा गांधींचे ग्रामस्वराज्य विषयक विचार हे मौलिक ठरतात

गांधीजींच्या ग्राम स्वराज्याच्या कल्पनेमुळे खेड्यांमध्ये लोकशाही वातावरण निर्माण होऊन वाईट विचारांचा शेवट होईल. शेतकऱ्यांचे शोषण थांबवून बेकारी यांनी भूकबळीला आळा बसेल अशी विचारधारा गांधीजींनी मांडली होती. परंतु राज्यकर्त्यांनी जाणीवपूर्वक खेड्यांच्या विकासाकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. यामुळे गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना पूर्णपणे रुजली असे म्हणता येत नाही. असे असले तरी महात्मा गांधीजींचे ग्राम स्वराज्यविषयीचे विचार हे ग्रामीण विकासासाठी महत्त्वाचे ठरले आहेत. याच ग्राम स्वराज्य संकल्पनेवर पुढील काळात ग्रामीण विकासाच्या परियोजना पूर्ण करण्यासाठी एक नवी दिशा मिळाल्याचे दिसून येते. ग्रामीण भागातील सर्वसामान्य लोकांच्या जीवनामध्ये यामुळे काही अंशी का होईना महत्वपूर्ण बदल झालेला दिसून येतो.

**संदर्भ ग्रंथसूची**

1. गांधी मोहनदास करमचंद, पटवर्धन सी. पु. (अनुवाद), सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, 2013, पृष्ठ क्र. 301 ते 303.

2. शिखरे दा. न., अर्थकारण गांधी विचार दर्शन, गांधी वाङमय विचार समिती, पुणे, 1962, पृष्ठ क्र. 96.
3. गांधी एम.के., ग्राम स्वराज्य, प्रभात प्रकाशन, 2019. पृष्ठ क्र.25.
4. मोरे संग्राम, ग्रामीण विकासाचे राजकारण आणि काँग्रेस, अरुणा प्रकाशन, लातूर, प्रथम आवृत्ती, 2010. पृष्ठ क्र 72
5. यादव संदीप (संपादक), मध्यप्रदेश पंचायिका, पंचायत की मासिक पत्रिका, ऑक्टोबर 2019, पृष्ठ क्र.37 व 39, लेख - आदर्श समाज की कल्पना और निर्माण की प्रक्रिया, लेखक - रश्मी रंजन
6. गांधी मोहनदास करमचंद, यंग इंडिया, 19 मार्च 1931. पृष्ठ क्र.38
7. गांधी मोहनदास करमचंद, यंग इंडिया, 2 फेब्रुवारी 1946,पृष्ठ क्र. 236 ते 38
8. गांधी मोहनदास करमचंद, हरिजन सेवक, 1942, पृष्ठ क्र. 27
9. गांधी मोहनदास करमचंद, त्र्यं. वि. पर्वते (अनुवाद), पंचायत राज्य, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, 1959. पृष्ठ क्र.4

# ९. स्त्री-मुक्तीच्या विचारांचा आढावा

**श्री. मनोहर सुभाष निकम**
सहायक प्राध्यापक, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.

**प्रस्तावना**

भारतात प्राचीन काळातच स्त्री बंधनाची बीजे रोवली गेली व ही बंधनाच्या बिजांनी नंतर वटवृक्षाचे रूप धारण केले. ज्यास उखडून टाकणे हे महाकठीण होऊन बसले. वास्तविक पुरुषांच्या बरोबरीने किंबुहुना जास्तीचे अधिकार भोगणाऱ्या स्त्रियांचा एक सुवर्णकाळ होता. ज्या काळात स्त्रीराज्य, मातृसत्ताक पद्धती ही अस्तित्वात होती.

भारतावर ब्रिटीश राजवट स्थापन होईपर्यंत स्त्रिया शोषणाच्या अनेक बंधनात अडकल्या होत्या. सतीप्रथा, विधवा पुनर्विवाह बंदी, बालजरठ विवाह, स्त्रीभ्रूण हत्या या सारक्या कुप्रथा मजबूत झाल्या होत्या. स्त्रियांवर अशी गुलामगिरी लादली गेली असताना तिच्या सुटकेचे विचारही त्या काळात मांडले गेले.हे

**उद्देश**

स्त्रीमुक्ती विषयक विचार काय होते.त्यामागे प्रेरणा काय होती. याची चिकित्सा करणे हा या शोध निबंधाचा उद्देश आहे.

**मर्यादा**

स्त्री—मुक्ती विषयक विचारांची व्याप्ती फार मोठी आहे अगदी नव—मार्क्सवादी,स्त्रीवादी लेखनापर्यंत याची मांडणी विस्तृत झाली आहे. तरी या सर्वांचा आढावा न घेता यातील ठळक विचारांनाच समजून घेणे ही ह्या शोधनिबंधाची मर्यादा आहे.

डॉ. आ. ह. साळुंखे यांनी प्राचीन काळातील काळातील हिंदू स्त्रियांविषयी महत्वाची मांडणी केली आहे. त्यांनी केलेल्या विश्लेषणातून एक गोष्ट ध्यानात येते ती म्हणजे प्रत्येक प्रथा व बंधन हे ऐतिहासिक व चिकीत्सक दृष्टीने समजून घेतले तर त्यातला फोलपणा व खोटेपणा हा लक्षात येतो. सर्व सत्ता स्वहातात असण्याची पुरुषी मानसिकता व हेकेखोरपणा यामुळे उघड होतो. डॉ.आ.ह.साळुंखे यांनी स्पष्ट केलेल्या संकल्पना व स्पष्टीकरण यामुळे स्त्रियांवरची बंधने व कुप्रथा कुठल्याही ऐतिहासिक व संस्कृतीच्या नावाखाली टिकत नाही. स्त्रीमुक्तीचे एक मोठे द्वार ते आपल्या अभ्यासातून खुले करतात.[१]

शेतीच्या शोधामुळे व अपत्यनिर्मितीमुळे स्त्री प्राचीन काळी पृथ्वीच्या बरोबरीने स्थान मिळवत होती. याठिकाणी मातृसत्ताक पद्धती भक्कम होताना दिसते. अनार्य काळात स्त्रियांच्या शारीरिक गुणवत्ता व नैसर्गिक वेगळेपणा याबाबतीत स्त्रियांचा आदर पुरुष जातीकडून केला जात होता. पण आर्य अनार्य संघर्षात आर्य विजयी झाल्याने अनार्य अनेक बाबतीत तडजोड करताना दिसतात. तरी कुठेतरी मातृसत्ताक पद्धती तग धरून होती.अर्थात आर्यांनी हि पद्धत नष्ट करण्याचा प्रयत्न सोडला नाही. अर्थात मातृसत्ताक पद्धत नष्ट करून

पुरुषसत्ताक पद्धती प्रस्तापित करण्यात त्यांना बहुतांश यश आलेले दिसते.उरलेली किंवा कशीबशी मातृसत्ताक पद्धती आदिवाशी क्षेत्रात व केरळ सारख्या छोट्यशा प्रांतात तग धरून राहिली.[२]

विधवा स्त्रियांचा एक मोठा प्रश्न भारतात मध्ययुगीन काळात व घश्‍ व्या शतकात उभा राहिला होता. अर्थात ग्रंथशास्त्रीय मुक्ती आपल्याला नारदस्मृतीत आढळून येते, म्हणजे विधवांना पुर्विविहाचा अधिकार मिळावा असे यात सुचविले आहे. पण यात आलेल्या सरळ व साध्या शब्दांचा अर्थ पूर्णपणे बाजूला ठेऊन यास नकारार्थी दिशा नंतरच्या ग्रंथ व शास्त्रकारांनी दिली.[३]

स्त्रीमुक्तीच्या मार्गांना बंद कसे केले. याची ऐतिहासिक वाटचाल समजून घेतल्यावर त्यासाठीचे उपायही सांगणे शक्य होते. जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या संस्कारांमध्ये तर स्त्रियांना हीन लेखलेले आहेच त्याचबरोबर गर्भापुर्वीची अवस्था व मृत्युनंतरचे अंत्यसंस्कार यातही त्यांची दुर्दशा थांबत नाही. पुत्रच व्हावा म्हणून हट्ट ठेऊन विविध विधी व कर्मकांड उदयमान झाले. जन्मानंतर त्या पुत्राचे गुणगानावर तर पुस्तकांची असंख्य पाने भरलेली आहेत. स्त्रीजन्माच्या अगोदर पासून जो तिरस्कार तिच्या वाटेला येतो जो अनेक बंधनामध्ये जन्मानंतर रुपांतरीत होतो. अर्थात तिच्याबद्दल असलेली चीड व राग हा तिच्या मृत्युनेही तिची सुटका करत नाही. तिच्या आत्म्याला शांती लाभावी म्हणून कुठलीही मातृपंधरवड्यासारखी आजसारखी व्यवस्था नाही. याबरोबर तिने पुनर्जन्म घ्यावा म्हणून कोणाला फार आस्थाही नाही. हे फार मोठे दुर्दैव स्त्रिया सहन करत आल्या पण याबद्दल स्त्रियांकडून ही आवाज उठविला गेला नाही.[४]

स्त्रीला कोणत्याच अवस्थेमध्ये स्वातंत्र्य नाही असे धर्म शास्त्रकारांनी वारंवार नमूद केले आहे. डॉ.आ. ह.साळुंखे यांच्या चिकीत्सक अभ्यासाने व विश्लेषणाने स्पष्ट होते कि,आर्य पुरुषी मानसिकता हा टप्प्याटप्प्याने स्त्रियांच्या गळ्याभोवती काळाच्या ओघात घट्ट होत गेला. तिला असणारे थोलेबहुत अधिकारही हवेत विरले गेले.काही शास्त्राकारांकडून व ग्रंथामध्ये त्यांच्या मुलभूत अधिकाराच्या व स्वातंत्र्याच्या मागण्याही ग्राह्य मानल्या गेल्या नाहीत. याउलट सतीप्रथा, बालविवाह, बालजरठ विवाह, पुनर्विवाहबंदी, केशवपन, स्त्रीभ्रूणहत्त्या यासारख्या स्त्रियांना जिवंतपणी नरकयातना देणाऱ्या प्रथा या शरीरअवयव सारख्या घट्ट चिकटल्या गेल्या. ज्या नष्ट करणे महाकठीण होऊन बसले.उलट बहुतांश समाज हा संस्कृती रक्षणाच्या नावाने प्रतिगामी धोरणाच्या बाजूने ठामपणे उभा राहिला. हे जेवढे भयंकर तेवढेच वास्तववादी आहे.

वैचारिक क्रांतीच्या युगात चार्वाक या नास्तिक पंथाशी बांधिलकी ठेवणाऱ्या पंथांच्या विद्वानाने मांडलेले विचार हे परंपरावादी मागासली विचारसरणीला चिकटणाऱ्यांच्या डोळ्यात अंजन भरणारे आहे. स्त्री पुरुष समानतेचा ते स्पष्ट शब्दात आग्रह धरतात. मनात कपट ठेहून स्त्रियांवर बंधने लादणाऱ्या पुरुषांचा ते धिक्कार करतात. या बाबतीत ते कामभावना हया गोष्टीला स्त्री व पुरुष या दोन्हींच्या बाबतीत एकसमान पातळीवर मानतात. त्याचं मत आहे की फक्त स्त्रियांच्या व्यभिचारामुळे वर्णसंकर नाही तर पुरुषांमूळेही वर्णसंकर घडतो. पुरुषांनी स्त्रीमत्सर केल्यामुळे स्त्रियांवर बंधने आली धर्मामुळे नाही.स्त्रियांप्रमाणे पुरुषांवारही एकपत्नीव्रत लादायला हवे.[५]

स्त्रियांच्या बाबतीत वापरल्या जाणार्या घृणास्पद शब्दांवर साळुंखे आक्षेप घेतात. स्त्री देहाची वैदिक अनुयायांकडून केली जाणारी निंदा ते लक्षात आणून देतात.व पक्षपातीपानावरच बोट ठेवतात.बृहस्पतीची पत्नी सोमाने पळवून तिला गर्भवती केली.तिला त्याच्यापासून बुध नावाचा मुलगाही झाला. तरी बृहस्पतीने आपल्या

पत्नीचा उदार मनाने स्वीकार केला.या उदाहरणावरून एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे माणुसकीचे तत्व हे पातीवर्त्यापेक्षा महत्वाचे ठरते.अपघाताने इच्छा नसूनही वादळात सापळलेल्या स्त्रियांच्या मुक्तीचा मार्ग येथे मोकळा दिसतो.[६]

जातीप्रथा व स्त्रियांच्या गुलामगिरीला बळकट करण्याचे ग्रंथशास्त्रीय काम हे मनुस्मृतीसारख्या ग्रंथातून केले गेले.यावर डॉ.आ.ह. साळुंखे यांनी केलेले भाष्य व विश्लेषण मोठे महत्वाचे आहे. या ग्रंथात एका बाजूला पती पत्नीने आयुष्भर अव्यभिचारी राहण्याचे कौतुक केले जाते तर दुसर्या बाजूला कामवासना तृप्तीसाठी पुरुषांसाठी बहुपत्नीकत्व हा उपाय सुचविला जातो.अर्थात स्त्रियांसाठी या बाबतीत नोंद व काही व्यवस्था येथे नाही.अर्थात ही सोयही फक्त उच्च वर्णीय यांच्या साठी आहे. स्वर्णीय स्त्री ही प्रथम पत्नी म्हणून प्रशस्त पण इतर वर्णीय स्त्रिया या फक्त कामवासनेसाठी उत्तम असे पुढच्या ग्रंथनोंदीवरून स्पष्ट होते.अर्थात यात जातीच्या उतरंडीचा रुजलेला विचार स्त्रियांच्या शोषणातही वापरला गेला आहे. वर्ण जातप्राबल्य टिकविण्याच्या मानसिकतेतून झालेले लिखाण निमित्ताने उघड होतो. अर्थात या ग्रंथाच्या निमित्ताने समकालीन राज्यकर्त्यांवर निर्माण केलेला वैचारिक प्रभाव येथे लक्षात घ्यायला हवा.[७]

कॉ.शरद पाटील यांनी मार्क्सवाद–फुले–आंबेडकरवाद या माफुआ अन्वेषन पद्धत वापरून केलेली इतिहासाची मांडणी मोठी क्रांतिकारक आहे. त्यांनी घेतलेला स्त्रीसत्तेचा,मातृसत्तेचा शोध आखिल वैश्विक पातळीवर मान्य झाला आहे. जातीचे भारतीय इतिहासातील महत्वाचे स्थान लक्षात घेऊन कॉ.शरद पाटील या विद्वानाने जी इतिहासाची मांडणी केली त्यामुळे स्त्रीमुक्तीचा एक मोठा मार्ग खुला झाला आहे.

काही सण व उत्सव यामध्ये प्राचीन काळातील स्त्री मक्तेदारी दिसून येते. सीतायज्ञ या केवळ स्त्रियांचाच सण होता.भरघोस पिक मिळवण्यासाठीचा हा यज्ञ होता.अर्थात भरघोस हंगाम व सुपीकता ह्या स्त्रियांच्या प्रतीकांमुळे स्त्रियाच याच्या प्रमुख दिसतात.कौटिल्याच्या आदेशातही वैदिक देवता सीता हिचे स्तवन केल्यावरच पेरणीस प्रारंभ करण्याची नोंद दिसते.या वरून तिची कुलप्रमुख म्हणून महत्वपूर्ण भूमिका स्पष्ट होते.[८]

जमिनी खाजगी मालकी पूर्णपणे विकसित झाली नव्हती या काळात वज्जि या गणसंघात एक मोठे वन हे गणिकेच्या मालकीचे होते.ज्याचा विनियोग अम्बपालीने चंड व गणतंत्रवादी लीछविना न विचारता केला. या वरून स्त्री अधिकारांची व्यापक कार्यकक्षा ध्यानात येते. अर्थात अम्बपाली हे वेश्या नाहीतर वज्जीची गणमाता होती. अर्थात कॉ.शरद पाटील गणिकेचा अर्थ गणाची शासनकर्ती असा घेतात. बौद्ध व जैन धर्मात गण या शब्दाचे अर्थ वर्णातीत आहे.[१०]

महाभारतात नमूद केले गेले आहे की, स्त्री ही जेव्हा स्वतंत्र होती तेव्हा स्त्रीपुरुष संबंधाचे कायदेकानून वेगळे होते.कुंतीचे नियोगासाठी पांडु मन वळवताना प्राचीन नितीशास्त्राचा उपदेश दिलेला उपदेश महत्वपूर्ण आहे. म्हणजे त्या तेव्हा घरात कोंडलेल्या नसत.पती किव्हा इतर नातेवाईकांच्या नियंत्रणात नव्हत्या. अनिर्बंध होत्या.पतीची एकनिष्ठ नव्हत्या म्हणून त्यांना दुराचारी नाही म्हटले गेले.अशी समजूत पांडु काढतो.तेव्हा एक गोष्ट लक्षात येते.की स्त्रीच्या नैसर्गिक हक्कांवर मानवी आक्रमण झाले व मुळातच मुक्त असणाऱ्या स्त्री वर्गासाठी स्त्रीमुक्तीचा मार्ग व लढा उभारावा लागला.[११]

विटाळ वैगेरे स्त्रियांना मानले जाते. पण केरळ सारख्या मातृवंशक समाजात मुलीची ऋतुप्राप्ती ही शरमेची गोष्ट न मानता सणासारखी साजरी केली जाई. अब्राम्ह्री बहुतांश देवळे ही मातृदेवतेची आहेत. अर्थात त्याची पूजा अर्चा करणारेही अब्राहमन दिसतात. म्हणजे उदा.बंगालमधील दुर्गा, नाशिकची सप्तशृंगी, धुळे येथील एकविरा देवी, ठाण्याची महालक्ष्मी. या मातृदेवता पूजा व भक्ती क्षेत्रातील स्त्री महत्व प्रतिपादित करतात.घघ. ह्या स्त्रीप्रतिमा आणि देवता यांना पुजणारा आणि मानणारा पुरुषवर्ग हा मोठा असला तरी दैनदिन जीवन जगताना एवढा आदर आणि मान स्त्रियांच्या वाटेला येत नाही. तिच्या दैनदिन समस्या आणि ऋतूप्राप्ती सारख्या बाबी आजही लपवल्या जातात. तिच्या समस्या ह्या तिच्या वैयक्तिक म्हणून जबाबदारीही तिचीच समजली जाते. यामुळे अनंत काळ ती इच्छा असली तरी समाजभीती पोटी आपले खाजगी दुखः हे उदरातच सांभाडत आली आहे.

जमीन व उत्पादित वस्तूंच्या सामुहिक धनाच्या वाटपाचे काम स्त्री जेव्हा करायची तेव्हा तिला राष्ट्र, देवी,अंबा अथवा ‘मा’ असे संबोधले गेले.या काळात स्त्रिया या गण व त्याच्या घटकांचे राजकीय दृष्ट्य शासन करीत. विवाहही स्त्रीप्रधान होता. वारसा वंशपरंपरागात स्त्रियांकडे होता. यालाच मातृसत्ताकता म्हटले गेले[१२] मातृशासनाची व स्त्री राज्याची कल्पना ही आजच्या पुरुषसत्तेच्या काळात कितीही अशक्य वाटत असली तरी भूतकाळ या गोष्टी सत्य रुपात अस्तित्वात होत्या. मातेचा आदर आजही मनात जिवंत असला तरी व्यवहारात स्त्रियांना सर्व अधिकार देण्यास पुरुष वर्ग धजावत नाहीत. तिला काय कळते ? हा प्रश्न आणि तिच्या मर्यादेचा विचार तो सतत डोक्यात ठेऊन असतो. मातृसत्ताक पद्धतीचे विचार तर दूरच स्त्री—पुरुष समानतेचा तत्वावर मानसिकता आणि एकमत झाले तरी आधुनिक काळात मोठे यश म्हणावे लागेल. कायद्याने समता आली पण अंमलबजावणीची मानसिकता कधी येणार? हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो.

स्त्रियांच्या व गुलामगिरीचा व शूद्रांच्या शोषणाचा संबध महात्मा फुले यांनी जातीव्यवस्थेशी जोडून पहिला. पुरुषसत्ता व ब्राम्हणी धर्माच्या फसवणुकीच्या स्त्रिया या बळी आहेत असे सांगून जोतीबा स्त्रियांना सर्वच समान हक्क मिळाले पाहिजे असा आग्रह धरतात. व यावर शिकणे हा उपाय ते सुचवतात. डॉ.ऑम्व्हेट गेल या महात्मा फुले यांच्या स्त्री—प्रश्नांकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात झालेल्या बदलाची नोंद घेतात त्यांच्या मते, महात्मा फुले यांना एकूण सर्वच जातीतल्या स्त्रिया म्हणजे तळागाळातल्या पासून ते उच्च वर्णीय जातीत स्त्रियांची दडपणूक ही सारखीच केली जाते. स्त्रियांवर लादलेली पतिव्रतता व पुरुषांना स्वैर वागण्याची सवलत यावर ते जोरदार हल्ला चढवितात. जोतिबांनी कष्टकरी,शुद्र अतिशुद्रांसाठी दिलेली पर्यायी सत्यशोधकी विवाह पद्धती फार क्रांतिकारक आहे.[१३]

स्त्रियांच्या गुलामगिरीला महात्मा फुले पुरुषसत्तेला व पितृसत्ताक पद्धतीला जबाबदार धरतात.ज्यांचे जातीमुळेच स्वतःचे शोषण होते तेच शुद्र पुरुष हे घरात मात्र आपल्या पत्नीचे शोषण करतात. हे तेवढेच भेदक सत्य आहे. यावर स्त्रियांसाठी समता हा मुद्दा महत्वाचा आहे. [१४] स्त्रियांना परावलंबी समजणे ही भावना येथे काम करताना दिसून येते. शिक्षणाने पुढारलेल्या जातीत देखील अशा भावना काळ बदलला तरी मेल्या नाहीत. नोकरीस जाणाऱ्या स्त्रियांवर देखील या कमीपणाची नामुष्की लादली जाते. वर्तमानकाळात देखील पुरुषी मानसिकतेच्या गुलामीच्या बेड्या तिला जखडून आहेत. उलट असुरक्षित वातावरणात पुरुषांपेक्षा स्वतंत्र व्यक्तिमत्व आणि वेगळे जीवन जगण्याची तिला भीती आजही वाटते.

महात्मा फुले यांच्यानंतर स्त्रीमुक्ती बद्दल पूर्णपणे उपेक्षा झाली आहे, असे मत प्रभाकर वैद्य या विद्वाने मांडले आहे. स्त्रीविषयक शिक्षणाची झालेल्या उपेक्षेची ते तिखट भाषेत मांडणी करतात. महात्मा फुलेइतकी इमानदारी आणि तडफ नंतरच्या नेत्यांमध्ये किंवा कार्यकर्त्यामध्ये झाली नसल्याची खंत वैद्य नमूद करतात.[१५] अभ्यासातील बारकावा आणि आपल्या मांडणीशी आणि स्त्रियांच्या समस्यांशी एकजीव होऊन कार्य करण्याची तडफ खरोखरच महात्मा फुले इतकी निर्माण झाली नाही असेच खेदाने म्हणावे लागते.

यावरून एक निष्कर्ष निघतो की, स्त्रीमुक्तीचे मार्ग व उपाय मांडताना आधी स्त्री अधिकारांच्या र्‍हासामागील ऐतिहासिक पार्श्वभूमी व कारणे समजून घेणे ही महत्वाची अट आहे.त्याबरोबर भारतासारख्या देशात जेथे वर्ग व्यवस्था नाही तर जातीव्यवस्था समजून घेणे महत्वाचे ठरते. या जातीच्या उतरंडी नुसार स्त्री बंधनाचे स्वरूप बदलते.मात्र सर्व जातीत व वर्णातही पुरुषी मानसिकता तीच राहिली स्त्रीला ताब्यात ठेवण्याची तिच्या अधिकारांना नाकारण्याची. याच पुरुषी मानसिकतेला ग्रंथशास्त्रीय रूप दिल्याने त्यास कायद्यासारखे नियमांचे स्वरूप प्राप्त झाले.व संकृती रक्षणाचा व जात टिकविण्याचा मक्ता जणू स्त्री वर्गाचाच असा फुगवटा उभा केला गेला.या गुंतागुंतीच्या पण तेवढ्याच महत्वपूर्ण ऐतिहासिक परिस्थितीस समजल्याशिवाय स्त्रीमुक्तीचे विचार काळाच्या कसोटीवर खरे उतरणार नाही.

**संदर्भ**

1. डॉ साळुंखे आ.ह.,हिंदू संकृती आणि स्त्री,लोकवांग्मय गृह,मुंबई– २०१७.
2. कित्ता पृ.3 ते 5.
3. कित्ता पृ.७ ते १०.
4. डॉ साळुंखे आ.ह.,हिंदू संकृती आणि स्त्री,लोकवांग्मय गृह,मुंबई– २०१७.पृ.१२ ते ५०.
5. डॉ साळुंखे आ.ह.,चार्वाक दर्शन,लोकायत प्रकाशन,सातारा.पृ.२१,२२.
6. कित्ता. पृ.२० ते २४.
7. डॉ.साळुंखे आ.ह., मनुस्मृतीच्या समर्थकांची संस्कृती लोकवांग्मय गृह,मुंबई–२००८ पृ.११६ ते १४७.
8. पाटील शरद.,दास शुद्रांची गुलामगिरी,.मावळाई प्रकाशन,पुणे– पृ.२३ ते ५४.
9. कित्ता.पृ. ६२ ते ६४.
10. कित्ता.पृ. १११ ते ११६.
11. पाटील शरद.,दास शुद्रांची गुलामगिरी, लोकवांग्मय गृह,मुंबई–२००८. पृ.११६ ते १२२.
12. कित्ता. पृ.१४२ ते १४३.
13. डॉ.ऑम्व्हेट गेल,जोतीबा फुले आणि स्त्रीमुक्तीचा विचार, लोकवांग्मय गृह,मुंबई– आठवी आवृत्ती २०१४. पृ.१३
14. कित्ता . पृ.४२
15. वैद्य प्रभाकर, महात्मा फुले आणि स्त्री–मुक्ती आंदोलन, लोकवांग्मय गृह,मुंबई, तिसरी आवृत्ती– जून २०१२. पृ.१७,१८.

# १०. कोयना प्रकल्पाचा पूर्व इतिहास

**प्रा. डॉ. विश्वनाथ पवार**
इतिहास विभाग, स.गा.म. कॉलेज, कराड.

**प्रस्तावना**

समाज जीवनाला अनेक बाजूंनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्पर्श करणारे बांधकाम म्हणजे धरण होय . कोयना प्रकल्प हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा जलविद्युत प्रकल्प होय. महाराष्ट्रात दैन्य निवारण्यासाठी निर्मिलेला हा महाप्रकल्प अनेक दैन्याचा सामना करत पूर्णत्वास गेला. बील साहेब, टाटा यांनी कोयनेचे सर्व्हेक्षण केले पण प्रकल्प मार्गी लागला नाही. महाराष्ट्र आणि गुजरातच्या नेत्यांमध्ये कोयना की ऊकाई असा वाद निर्माण झाला. अखेर यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई, भाऊसाहेब हिरे, सी . डी . देशमुख, धनंजयराव गाडगीळ इत्यादी नेत्यांच्या प्रयत्नातून कोयना प्रकल्प मार्गी लागला . दि . १६ मे १ ९ ६२ रोजी यशवंतराव चव्हाण यांचे हस्ते व बाळासाहेब देसाई यांच्या उपस्थितीत कोयना प्रकल्पाचे उद्घाटन झाले.

ऐतिहासिक कोयना जलविद्युत प्रकल्प चार टप्प्यामध्ये विभागला गेला आहे. कोयना धरण निर्मितीनंतर नवजा येथून भूगर्भातून पाणी नेऊन पोफळी येथे टप्पा १ व २ अंतर्गत वीज निर्माण करण्यात आली. येथून बाहेर पडणारे पाणी अडवून कोळकेवाडी येथे तिसरा टप्पा अस्तित्वात आला. विजेची वाढती गरज लक्षात घेऊन टप्पा १ व २ ला समांतर असा टप्पा चार तांबटवाडी विद्युतगृहाच्या माध्यमातून पूर्णत्वास गेला. पूर्वेकडे सिंचन व उद्योग विकासासाठी सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या माध्यमातून पायथा विद्युतग्रहातही वीज निर्माण होऊ लागली. आज घडीला कोयना प्रकल्पातून १ ९ ६० मे. वॅट वीज निर्माण होते. सद्यस्थितीत डावा तीर विद्युतगृहाचे काम प्रगतीपथावर आहे. तर हुंबरळी उदंचन योजना नियोजित आहे.

कोयनेच्या विजेमुळे महाराष्ट्र प्रकाशमान झाला. महाराष्ट्राची कृषी व औद्योगिक प्रगती झाली. महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीत कोयना प्रकल्पाने मोठा हातभार लावला. हा महाप्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी शेकडो कामगार व अभियंत्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली आहे. कोयना प्रकल्पामुळे ९ ८ गावांमधील ९ १७१ कुटुंबे बाधीत झाली. त्यांनी आपल्या सर्वस्वाचा त्याग करून राष्ट्रीय विकासाला हातभार लावला. मात्र त्यांचे प्रश्न आजही सुटलेले नाहीत. पुनर्वसनाचा प्रश्न हा गांभीर्याने विचार करावयास लावणारा प्रश्न होय. इतिहास काळात सह्याद्रीच्या कडे - खांद्यावर उभे असणारे किल्ले हे सह्याद्रीचे भूषण होत. आता हा अत्याधुनिक तंत्रज्ञानातून सिद्ध झालेला कोयना प्रकल्प हा त्या प्राचीन पर्वताच भूषण ठरला आहे.

**कोयना प्रकल्पाचा पूर्व इतिहास**

**कोयना प्रकल्पाला आवश्यक भौगोलिक परिस्थिती**

कोयना परिसर हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाने पावन झालेला प्रदेश होय. या अगोचर तप शक्तीला या आनंदवनभूवनी गोचर करण्याची किमया कोयना जलविद्युत प्रकल्पाच्या उभारणीतून अभियंत्यांनी करून दाखविली आहे. कोयना नदी महाबळेश्वराच्या पश्चिमेस एल्फिन्स्टन पॉईंटजवळ उगम पावते. उगमापासून कोयना नदी सह्याद्री रांगेला समांतर अशी उत्तर - दक्षिण वाहते. तिचा हा खळाळता प्रवाह तब्बल ६५ कि. मी. चा आहे. येथे सरासरी ५००० मिलिमीटर पाऊस पडतो. पाटण तालुक्यातील हेळवाक या गावाजवळ कोयना एकदम पूर्ववाहिनी होते. कोयना नदी पूर्ववाहिनी होण्याअगोदर देशमुखवाडी येथील अर्धा कि. मी. रुंदीच्या डोंगर खिंडीतून वाहते. धरणासाठी ही उत्कृष्ठ जागा होती.

जगविख्यात अभियंता भारतरत्न सर विश्वेश्वरय्या यांनी कर्नाटकमधील गिरसप्पा धबधब्याला भेट दिली. तेथील डाक बंगल्यात एक रजिस्टर ठेवले होते. त्यामध्ये पर्यटक आपली प्रतिक्रिया नोंदवत असत. सर्वसाधारणपणे अभिप्राय पाहता' अहाहा !', 'डोळ्यांच पारण फेडणारा देखावा', 'निसर्गाचा अप्रतिम आविष्कार' असे शेरे होते. रजिस्टरमधील एक शेरा यांना छेद देणारा होता. आणि तो होता' what a waste.' हा शेरा होता सर विश्वेश्वरय्यांचा. २ इतक्या उंचावरून पडणारा हा प्रपात वाया का जावू द्यायचा ? हा त्यांचा प्रश्न होता. हा हाडाचा अभियंता निसर्ग सौंदर्याचं कौतुक करत बसला नाही. तर या प्रपातामधून वीज निर्माण करा असा त्यांनी कळकळीचा संदेश दिला आणि यामधूनच पुढे शरावती योजना आकारास आली.

कोयना नदीवरील हेळवाक जवळील निर्माण होणाऱ्या जलाशयाचा अशा विद्युतनिर्मिती साठी उपयोग होणार होता . येथे कोयनेचा प्रवाह ५८० मीटर उंचीवर तर दुसऱ्या बाजूला समुद्र किनाऱ्याच्या फक्त ५६ किलोमीटर दूर असलेले पोफळी गावामध्ये ४ ९ ० मीटर सरळ उताराचा कडा . या कड्यावरून पाणी उतरवले की त्या शक्तीवर वीज निर्माण करणे शक्य होते .

**कोयना प्रकल्पाचे सर्व्हेक्षण**

सन १८१८ मध्ये मराठा सत्तेची इतीश्री झाली आणि महाराष्ट्र भूमीवर इंग्रजांचा अंमल सुरू झाला . . प्रशासनात गतिमानता येण्यासाठी इंग्रजांनी देशात रेल्वे, पोस्ट, तारायंत्रे, रस्ते अशा भौतिक सुधारणा केल्या. शैक्षणिक सुधारणा केल्या. चलन व्यवस्थेत सुसूत्रता आणली. पुढील काळात दादाभाई नौरोजी, न्यायमूर्ती रानडे यांच्या अर्थशास्त्रीय विश्लेषणातून ब्रिटिशांच्या आर्थिक शोषणाचे विदारक चित्र भारतीयांच्या भारतीयांच्या लक्षात आले. सन १८ ९ ६ मध्ये मोठा दुष्काळ पडला. त्यानंतर चार वर्षात सन १ ९ ०० मध्ये भीषण दुष्काळ पडला. लक्षावधी लोकांवर उपासमारीची वेळ आली. दुष्काळाच्या परिस्थितीत, अत्यल्प उत्पन्नात शेतकऱ्यांना शेतसारा भरणे अवघड झाले. शेतसारा भरण्यासाठी कर्ज घ्यावे लागल्याने निरक्षर शेतकरी सावकारी पाशामध्ये अडकला. अखेर जमीन विकून आपल्याच जमिनीवर तो मजूरी करू

लागला. समाजात अस्वस्थता निर्माण झाली. सन १८५७ च्या उठावाचा दणका बसलेल्या ब्रिटिश सरकारला दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जनतेच्या असंतोषाची दखल घ्यावीच लागली.

दुष्काळावर मात करण्यासाठी जमीन सिंचनाखाली आणून महसूलात वाढ करण्यासाठी दख्खन पठारावरील अवर्षणग्रस्त प्रदेशाला दिलासा देण्यासाठी सिंचन प्रकल्प निर्मितीकामी ब्रिटीश सरकारने अधीक्षक अभियंता एच. एफ. बील यांचेकडे सर्वंकष पाहणीचे काम सोपविले. यापूर्वी ब्रिटीश सरकारने मुठा नदीवर खडकवासला धरण, कृष्णा नदीवर खोडशी येथे खोडशी बंधारा, नीरा नदीवर कालवा तसेच मुंबईसाठी विहार, पवई, तुळशी व तानसा हे प्रकल्प उभारले होते.

'सन १९०१ मध्ये बील साहेबांनी सर्व्हेक्षणाचे काम सुरू केले. सर्व्हेक्षणाची साधने अगदी तुटपुंजी असताना सह्याद्रीचे निबीड अरण्य पायाखाली घातले. येथे असणारा हिंस्त्र श्वापदांचा वावर, त्यातच असंतुष्ट स्थानिक जनता अशा वातावरणात सोबतचा फौजफाटा किती भरवशाचा ? अशा परिस्थितीत मोठ्या साहसाने सह्याद्रीचा प्रदेश पायाखाली घातला. कोठे धरण बांधता येईल याचा शोध महिनोन्महिने घेतला. अनेक प्रकल्पाचा त्यांनी अहवाल तयार केला. या पाठीमागे त्यांची भारतीयांबद्दलची कर्तव्यभावना नसेलही. मात्र ब्रिटीश प्रशासनाची शिस्त व आपल्या अभियांत्रिकी व्यवसाया प्रती असणारा अभिमान व सचोटी येथे दिसून येते.

बील साहेबांनी कोयनेबरोबरच भीमा, कुकडी, घोड, धोम, गिरणा, दारणा, भंडारदरा व भाटघर या योजनांचा अहवाल तयार केला. पैकी भंडारदरा, भाटघर, दारणा अशी मोठी धरणे उभी राहिली. बील साहेबांनी कोयना परिसराची पाहणी केली. कोयना नदी पूर्ववाहिनी होण्यापूर्वी देशमुखवाडी येथे केवळ अर्धा कि.मी. रुंदीच्या डोंगर खिंडीतून वाहते ती जागा धरणासाठी योग्य असल्याचा अहवाल बील साहेबांनी दिला. दरवर्षी सुमारे ५००० मिलीमीटर एवढा प्रचंड पाऊस पडणारा हा परिसर असूनही बील साहेबांचे सर्व्हेक्षण कारणी लागले नाही .

विसाव्या शतकाच्या सुरवातीस महाराष्ट्रात उद्योगधंद्यांच्या विकासात वाढ होऊ लागली . शेती सिंचनासाठी पाणी व विजेची आवश्यकता वाढू लागली . टाटा कंपनीने मुंबई - पुणे या औद्योगिक केंद्राच्या केंद्राच्या वीज पुरवठ्यासाठी भीरा, खोपोली, भिवपूरी या योजना हाती घेतल्या होत्या. सन १ ९ १० ते १ ९ १५ या काळात टाटा कंपनीने कोयना प्रकल्पाचे प्राथमिक सर्व्हेक्षण केले. टाटा कंपनीने योजलेले धरण कमी क्षमतेचे होते. तीन टप्प्यांमध्ये १८० मे. वॅट निर्मितीची त्यांची योजना होती. दरम्यान टाटा कंपनीचे मुळशी धरणाचे काम चालू होते. तेथील सत्याग्रहींनी सेनापती बापट यांचे नेतृत्वाखाली आंदोलन सुरू केले होते . सत्याग्रहींचा विरोध हा धरणास नसून शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायास होता. मात्र यामुळे प्रकल्प निर्मितीस अडथळे येत होते आणि पुनर्वसनाच्या कामी जी सरकारी मदत लागते ती ब्रिटीश सरकारकडून मिळत नव्हती. टाटा कंपनीने मीरा, खोपोली, भिवपूरी हे प्रकल्प मुंबई नजिक असल्याने त्यांना

प्राधान्यक्रम दिला. सन १ ९ १ ९ मध्ये पहिले महायुद्ध सुरू झाल्याने टाटा कंपनीने कोयना प्रकल्पाचा विचार सोडून दिला.

पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या कालखंडात कोयना प्रकल्पाचा विचार मागे पडला. मात्र दिवसेंदिवस विजेची मागणी वाढत राहिली. यामुळे सन १९४५ साली तत्कालीन मुंबई राज्याच्या इलेक्ट्रिक ग्रिड डिपार्टमेंटने कोयना प्रकल्पाच्या सर्व्हेक्षण व नियोजनाचे काम हाती घेतले. याबाबतची जबाबदारी एन. एस. गुपचूप यांचे अध्यक्षतेखालील समितीकडे डिसेंबर १९४६ मध्ये देण्यात आली. समितीने कोयना प्रकल्पाच्या माध्यमातून सिंचन व जलविद्युत निर्मितीबाबत आपला अहवाल १९४८ मध्ये सादर केला . समितीने काँक्रीटमध्ये धरण बांधकाम सुचविले होते. दि.१ एप्रिल १९५१ रोजी सरकारने कोयना प्रकल्पाच्या पूर्ततेसाठी कोयना धरण विभाग स्थापन केला.

**कोयना प्रकल्प की उकाई प्रकल्प राजकीय वाद**

मे १९४६ पासून मुंबई प्रांतात संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाने जोर धरला.' मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' ही मराठी माणसांची मागणी होती. तर मुंबई महाराष्ट्राला मिळू न देण्यावर गुजराती नेत्यांचा भर होता. कोयना प्रकल्पाला महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासात आगळे वेगळे स्थान आहे . कोयना आंदोलनापाठोपाठ संयुक्त महाराष्ट्रासाठी आंदोलन घडून आले. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाची रंगीत तालीम कोयना आंदोलनामुळे झाली.

ना. बाळासाहेब खेर मंत्रिमंडळ कारकिर्दीत बांधकाम खात्याकडून कोयना योजनेस पर्यायी योजना असू शकतात का ? यावर विचार सुरू झाला आणि यातूनच गुजरातला फायदेशीर ठरेल असा तापी नदीवरील उकाई प्रकल्प पुढे रेटण्यास सुरवात झाली. 'कोयना प्रकल्प की उकाई प्रकल्प' असा महाराष्ट्र व गुजरातच्या दृष्टीने अत्यंत प्रतिष्ठेचा प्रश्न निर्माण झाला. मुंबईला वीज पुरवठा करण्याकरीता कोयना योजना मागे टाकून तापी नदीवरील उकाई प्रकल्प हाती घेण्याच्या हालचाली सुरू झाल्या. कारण तो मुंबई शहराप्रमाणेच गुजरातला फायदेशीर होता. यामुळे महाराष्ट्रीयन नेत्यांची दारुण निराशा झाली.

**हेळवाकची कोयना परिषद**

स्वातंत्र्योत्तर काळात कृषी विकास व उद्योग विकासाला चालना मिळाली. पश्चिम महाराष्ट्रातील शेती शेती व कारखानदारीला वीज टंचाई तीव्रतेने जाणवू लागली म्हणून कोयना योजनेचा पाठपुरावा करण्यासाठी दक्षिण महाराष्ट्र कारखानदार संघाने (डेक्कन मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन) हेळवाक येथे प्रत्यक्ष कोयनेच्या काठावर ऐन जंगलात सर्वपक्षीय कोयना परिषदेचे आयोजन केले. परिषदेच्या अध्यक्षस्थानी असणाऱ्या भाऊसाहेब हिरे यांनी परिषदेपूर्वी दि. १३ मार्च १९५२ रोजी पुण्यामध्ये कोयना प्रकल्पाबाबत लोकांची मते जाणून घेतली. परिषदेच्या सुरवातीस जी. के. मनोळीकर या अभियंत्यांने नियोजित कोयना धरणाची माहिती दिली. या परिषदेत यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई, शंकरराव किर्लोस्कर, कर्मवीर भाऊराव पाटील, धनंजयराव गाडगीळ, नानासाहेब गोरे, आचार्य प्र. के. अत्रे यांनी कोयनाप्रकल्पाची

आवश्यकता प्रतिपादन केली. या परिषदेमध्ये महत्त्वपूर्ण ठराव पास झाले. त्यामध्ये कोयना योजनेचा पंचवार्षिक योजनेत त्वरीत समावेश व्हावा, मुंबई राज्यातील विधानसभा व लोकसभा सदस्यांनी ठरावाची अंमलबजावणी करणेबाबतची जबाबदारी घ्यावी व कोयना प्रकल्पाच्या पूर्ततेसाठी शिष्टमंडळाने नियोजन मंडळाची भेट घ्यावी. इत्यादी ठरावांचा समावेश होता. काँग्रेस पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, कम्युनिस्ट हिंदू महासभा या पक्षांनी ठरावांना पाठिंबा दिला.

मुंबईमधील ४००० कामगारांनी सह्या करून एक निवेदन पाठविले होते. त्यामध्ये त्यांनी म्हटले होते की, "आमच्या अंध : कारमय जीवनात 'कोयना योजना' हा एकच प्रकाश आहे. ही योजना झाली तर आमच्या शेतात धान्याच्या राशी लागतील."

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील कोयना परिषदेत म्हणाले, "कोयना धरणाला येथील लोकांचा मुळीच विरोध नाही. एकंदरीत कोयनेच्या खोऱ्यात १७,००० ते १८,००० वस्ती असून त्यापैकी १२,००० लोकांना या धरणासाठी हलावे लागणार आहे. सध्या येथील लोक मुंबई, अहमदाबाद येथील गिरण्या-कारखान्यांत जात आहेत. कोयना धरण झाले तर हेच लोक आपल्या भागातच आनंदाने पोट भरतील. "कर्मवीर आपल्या भाषणाच्या अखेरीस म्हणाले, "महाराष्ट्रातील माणसं केवळ एक वेळ जेवून कोयना धरण बांधण्यासाठी या खोयात येतील."

आचार्य प्र. के. अत्रे आपल्या खास शैलीत म्हणाले, "आपण खरोखरच एक 'कोयना दिन' पाळावा . कोयनेची जत्रा भरवावी. नव्यानं जन्मास येणाऱ्या मुलींना 'कोयना' हे नाव द्यावं. 'कोयना 'चप्पल,"कोयना' साड्या प्रचारात आल्या पाहिजे. 'कोयना ! कोयना !! कोयना !!!" हा निनाद महाराष्ट्रात सर्वत्र उठला पाहिजे !"

कोयना धरण होण्यासाठी शेतकरी, कामगार, विचारवंत, राजकीय नेते आणि कारखानदार अशी सर्वांची अभूतपूर्व एकजूट झाली. सर्वसाधारणपणे सरकार योजना आखते आणि संबंधित जनता त्या योजनेला विरोध करते. कायेनेच्या बाबतीतील चित्र अगदी उलट होत. 'कोयना धरण झालंच पाहिजे ' ही जनतेची मागणी होती आणि सरकार मात्र त्याकडे दुर्लक्ष करत होते.

कोयना की उकाई या प्रश्नाप्रमाणेच कृष्णा पाणी वाटपाचा प्रश्न होता. त्यातच काही तज्ज्ञांना असे वाटत होते की, प्रामुख्याने मुंबईतील गुजराती व्यापारी व कारखानदारांसाठी महाराष्ट्र दुष्काळी ठेऊन शासन अप्रत्यक्षपणे मराठी मजूर मुंबईला पुरविण्याचे धोरण अवलंबित आहे. या बाबी दुर्लक्षणीय नव्हत्या . या बाबींच्या प्रभावामुळे 'कोयना प्रकल्प' निर्मितीस विलंब झाला, हे कटू सत्य होय.

**कोयना प्रकल्पास प्रशासकीय मान्यता**

कोयना प्रकल्प मार्गी लागावा यासाठी मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँण्ड इंडस्ट्रीजने जानेवारी १ ९ ५१ पासून आंदोलन सुरू केले होते. पुढे कोयना परिषदेत घेतलेल्या निर्णयानुसार दि. २ एप्रिल १ ९ ५२

रोजी श्री . भाऊसाहेब हिरे यांचे नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने नियोजन मंडळाची भेट घेऊन कोयना प्रकल्प पहिल्या पंचवार्षिक योजनेत समाविष्ट करण्याची मागणी केली.

तापी विद्युत योजना तयार करणारे सेंट्रल पॉवर अॅण्ड वॉटर कमिशनचे चीफ इंजिनिअर सरदार मानसिंग यांनी तज्ज्ञ सल्लागारांसमवेत दि. १६ एप्रिल १ ९ ५२ रोजी 'कोयना धरण' योजनेची हेळवाकला जाऊन पाहणी केली व लगेचच १८ तारखेस मुंबईला सरदार मानसिंग यांच्याच अध्यक्षतेखाली सेंट्रल पॉवर अॅण्ड वॉटर कमिशनचे तज्ज्ञ अधिकारी व मुंबई सरकारच्या बांधकाम खात्याचे अधिकारी यांनी कोयना व तापी योजनांची तुलनात्मक चर्चा करून आपला अहवाल ना. जिवराज मेहता यांना सादर केला. या अहवालामध्ये बरीच संदिग्धता असली तरी कोयना धरणाची जागा 'उत्कृष्ट' असे वर्णन करून' कोयना प्रकल्प' कार्यान्वित करण्याची 'निश्चित शक्यता आहे असे सांगितले.

ना. बाळासाहेब खेर मंत्रिमंडळ कालखंडात कोयना योजनेला पर्यायी योजना असू शकतात का ? याचा विचार सुरू झाला, तो उकाई योजना मार्गी लावण्यासाठी. मुंबई सरकार कडून कोयना प्रकल्प लांबणीवर टाकण्याचे पद्धतशीर प्रयत्न केले जात असल्याने याबाबत पूर्णत : नापसंती व्यक्त करणारा ठराव प्रदेश कॉंग्रेस कार्यकारणीने मोठ्या धैर्याने केला. यांत तत्कालीन महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष भाऊसाहेब हिरे व यशवंतराव चव्हाण यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. पुढे यशवंतराव चव्हाण व भाऊसाहेब हिरे यांचा मुंबई राज्याच्या मंत्रिमंडळात समावेश झाला. त्यांनी पुढाकार घेऊन कोयना योजनेला पर्यायी म्हणून आलेल्या सर्व योजना मागे सारून मुंबई सरकारच्या माध्यमातून केंद्रास कोयना योजनेची नि:संदिग्ध शिफारस केली. तसेच केंद्रीय नियोजन मंडळास कोयना प्रकल्पाची आवश्यकता पटवून देण्याचे कार्य केले. यावेळी केंद्रीय मंत्रिमंडळात चिंतामणराव देशमुख व काकासाहेब गाडगीळ हे महाराष्ट्रीयन नेते होते.त्यांनी कोयना प्रकल्प मार्गी लावण्याचे काम केले. अखेर सन १९५३ मध्ये कोयना प्रकल्पास १३ प्रशासकीय मान्यता मिळाली. पहिल्या पंचवार्षिक योजनेत कोयना प्रकल्पाचा समावेश झाला.

अनेक अडथळे पार करत अखेरीस कोयना प्रकल्प मार्गी लागला. मराठी जनतेच्या आंदोलनाला यश मिळाले. कोयना आंदोलनाबद्दल मुकुंदराव किर्लोस्कर म्हणतात, "सर्व विरोधकांपेक्षा सामान्य मराठी जनतेची उत्कट इच्छा व तिनं छेडलेल आंदोलन हे अधिक प्रभावी ठरलं. म्हणून कोयनेच्या पाण्याएवढीच महाराष्ट्रातील जनशक्तीमधूनही कोयनेची वीज तयार झाली आहे. कोयना वीज प्रकल्पाला महाराष्ट्राच्या गौरवपूर्ण इतिहासात एक आगळवेगळं भावनिक स्थान आहे ते यामुळेच. कोयना आंदोलनामागोमाग संयुक्त महाराष्ट्रासाठीही आंदोलन झालं. पण या संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाची रंगीत तालीम कोयना आंदोलनामुळे एक प्रकारे झाली होती.

**संदर्भ सूची**

१. जोशी अनुजा, महाराष्ट्रातील नद्या, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पृ.८.

२. तांबे उषा, कहाणी कोयनेची , राजहंस प्रकाशन, पुणे, पृ. २५.

३. किता, पृ.२५.

४. किता, पृ. २४.

५. कोयना प्रकल्प : माहितीपट, यशोगाथा माहिती केंद्र, कोयनानगर, ता. पाटण.

६. किता.

७. भट श्री. आ., महाराष्ट्राचे अर्थकारण, रसिक साहित्य, पुणे, पृ. १२६ .

८. तांबे उषा, उपरोक्त, पृ.३१

९. किता , पृ . ३२ .

१०. किता , पृ . ३२ .

११. भट श्री . आ . , उपरोक्त , पृ . १२२ .

१२. किता, पृ . १२५.

१३. संक्षिप्त माहिती, कोयना जलविद्युत प्रकल्प, कोयना धरण व्यवस्थापन विभाग, कोयनानगर, ता. पाटण , पृ . १ .

१४. किर्लोस्कर मुकुंदराव, प्रस्तावना - कहाणी कोयनेची, राजहंस प्रकाशन, पुणे, पृ.७

१५. कोयना प्रकल्प : माहितीपट, यशोगाथा माहिती केंद्र, कोयनानगर.

# ११. स्थानिक इतिहास

**Ms. Sunanda Madhavrao Kangane**
Assistant Professor, SSR College of Arts, Commerce & Science, Silvassa Dadara and Nagar Haveli & Daman and Diu. (Affiliated by Savitribai Phule Pune University)

**Abstract**

'स्थानिक इतिहास 'मौखिल इतिहास' आणि सूक्ष्म इतिहास हे तीनही इतिहास लेखन प्रवाह स्थानिक क्षेत्राशी संबंधित आहे. वरील तीनही इतिहास लेखन प्रवाह छोटयातील छोट्या घटकाशी निगडीत असतात. या इतिहास लेखनात त्या भौगोलिक अथवा त्या जागेची विशेषता दर्शविली जाते. या मुळे याला इतिहास लेखन प्रवाहाला आपण केन्द्रित इतिहास ही म्हणू शकतो. कालौघात शहरीकरण, औद्योगीकरण, आणि त्यामुळे झालेले स्थानांतरण या मुळे त्याठिकाणाचा समुदाय हा अस्थिर होत असतो. परंतु स्थानिक इतिहास लेखनामुळे वर्षानुवर्षे आपण ज्या ठिकाणी राहतो, किंवा राहत होतो त्या क्षेत्राचे एक नवी ओळख आपल्याला स्थानिक इतिहासच्या माध्यमातून होते.

**Keywords-** स्थानिक इतिहास, भौगोलिक क्षेत्र, परंपरा, मौखिक इतिहास, सांस्कृतिक, ऐतिहासिक घटना, विचार प्रवाह,

**प्रस्तावना**

इतिहास म्हटले की सामान्यपणे आपल्या सर्वांच्या डोळ्यासमोर येते ते फक्त घडून गेलेला काळपरंतु आता इतिहासाची व्याप्ती फक्त या पुरताच मर्यादित न राहता यांच्याशाखा दिवसागणिक विस्तारत चालल्या आहेत.इतिहासामध्ये अनेक विचार प्रवाह असतात प्रत्येक विचार प्रवाहाचे आपले असे वेगळेपण आहे. उदाहरणार्थ मार्क्सवादी इतिहास साम्राराज्यवादी इत्यादि विचार प्रवाह इतिहासामध्ये सामान्यपणे गतकालीन राजकारण थोरामोठाची चरित्रे असे पैलू आपणास सुरवातिलादिसतात. परंतु आता इतिहास म्हणजे राजाची लढाई, त्याचे पराक्रम, स्वातंत्र्य लढायाचे वृतांत या पुरताच पर्यन्त मर्यादित राहिला नाही. तर इतिहासाचा विस्तार हा आता मानवी जीवनाचा सर्वांगीण आढावा या पर्यंत पोचला आहे. आता इतिहासात केवळ राजा, महान व्यक्ति यांच्या पुरता तो मर्यादित न राहता तो सामान्य माणूस हा सुद्धा त्याचा एक घटक बनला आहे. आणि यातुनच एक नवीन विचारप्रणाली आपणास पाहावयास मिळते ते म्हणजे स्थानिक इतिहासाच्या रूपाने.

**स्थानिक इतिहास**

'इतिहास' हा मुळ शब्द 'Historia' या ग्रीक शब्दा पासुन बनलेला आहे याचा अर्थ होतो 'असे असे घडले' अर्थात मानवाच्या भुतकाळात ज्या काही महत्वपूर्ण गोष्टी घडुन गेल्या आहेत त्याचा अभ्यास होय.

इतिहासाचा जनक ग्रीक इतिहासकार, हिरोडॉटस, याने सर्व प्रथम इतिहासाचे महत्व विषद केले आहे. हिरोडॉटस त्याने सर्व प्रथम ग्रीक-पर्शियन युद्धाचे वर्णन केले होते.

**'हिरोडॉटस'-"**In discovery of past entertaining and unforgettable event is called history**".**

**'इ.एच.कार'** यांच्या मता प्रमाणे इतिहास म्हणजे "वर्तमानकाळ व भुतकाळ यांच्या मध्ये सातत्याने चालणारा अर्थपूर्ण संवाद".

**J.B. Bury** हे म्हणतात की "इतिहास विज्ञाना पेक्षा कमी ही नाही आणि जास्त ही नाही." यावरून आपल्याला हे समजते की, इतिहास हा माणसाच्या फक्त भुतकाळाशी संबधित नसुन त्याचा आपल्या वर्तमानकाळ व भविष्यकाळ सोबत हित्याचा काही अंशी संबध आहे. म्हणून **'आर.जी. कालिंगवुड'** म्हणतात, कुठल्याही व्यक्तीच्या चांगल्या भविष्यासाठी इतिहास हा खुप महत्वपूर्ण आहे. त्यापासून आपण सर्वांनी शिकले पाहिजे. अशा अनेक व्याख्या आपलयाला इतिहासाच्या बघावयास मिळतात.

इतिहासामध्ये जर आपण प्राचीन व मध्ययुगीन इतिहासाचा आढावा जर घेतला तर आपणास दिसेल की प्राचीन व मध्ययुगीन किंबहुना आधुनिक इतिहासामध्ये ही महत्वाच्या व्यक्ति, स्थळे या विविध कला उदा. मधुरा चित्रशैली, गांधार कला इत्यादीचा अभ्यास केला गेला आहे. आपणास जर प्राचीन आणि मध्ययुगीन कालीन इतर काही गोष्टीचा आढावा घ्यावयाचा असल्यास आपल्याला पुरेशी साधने उपलब्ध होत नाही विशेषता: एका ठराविक समुदायाची, व्यक्तिंचीकिंवा त्या भागाची विशेषता ज्यात आहे त्याची स्वतंत्रपणे असा उल्लेख मिळत नाही, परंतु याचा अर्थ कदापि होत नाही की त्या गोष्टींना महत्व नाही. तत्कालीन काळात त्याकडे दुर्लक्ष झाले असावे किंवा त्यावेळीत्यांना महत्व दिले गेले नाही इतकेच. इतिहासाच्या लेखनाच्या शाखा दिवसागणिक विस्तारत चालल्या आहे. त्यात साम्राज्यवादी इतिहास, राष्ट्रवादी इतिहास,सामाजिक-संस्कृतिक इतिहास इत्यादिमधुन आपल्याला तत्कालीन समाजिक विचार सारणी सोबतच मानवी जीवनाच्या वेगवेगळे पैलुंची ओळख मिळते. इतिहासाची अजुन एका शाखा म्हणजे स्थानिक इतिहास, तसे पाहता स्थानिक इतिहास लेखनाची सुरवात पाश्चिमात्य देशात १८ व्या १९ व्या शतकात बघावयास मिळते. सुरवातीच्या काळात स्थानिक इतिहास लेखन हे फक्त स्थानाचा, समुदायाचा व एका व्यक्तीला गौरन्वित करण्यापुरता मर्यादित होता. परंतु नातरच्या काळात स्थानिक इतिहासाच्या रूपाने समाजातील सर्व पैलूंचा सामान्यपणे अभ्यास केला गेला. तो आर्थिक,सामाजिक सांस्कृतिक या अनुषंगाने त्याला अधिक समृद्धता देण्याचे काम देण्याचे काम हे स्थानिक इतिहासाच्या रूपाने होत गेले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. इतिहसचार्य 'वि.का.राजवाडे' इतिहासाबद्दल म्हणतात "विशिष्ट काळ, विशिष्ट स्थल व विशिष्ट व्यक्तीचे विशिष्ट आचरण या तीन घटकांचा संघात झाला असता प्रसंग ही वस्तु बनली जाते व अनेक प्रसंगाच्या व्यवस्थित संततीपासून इतिहास म्हणजे ज्या वस्तूस म्हणता येईल तिची निर्मिती. म्हणजेच इतिहासात फक्त राजकीय घटनाचा अभ्यास नव्हे तर त्यामुळे आधुनिक काळात इतिहासाच्या सूक्ष्म अभ्यासासाठी इतिहास लेखनाच्या या प्रवाहाला महत्व प्राप्त होते.

आधुनिक इतिहास प्रवाह लेखनात प्रादेशिक व स्थानिक इतिहास लेखनाला महत्व प्राप्त झाले आहे. इतिहास हा वैश्विक्ता आणि विशिष्टता या दोघांचा वेध असतो. त्यातील अनेकता दुर्लक्षित राहणारा विशिष्टतेचा पैलु प्रादेशिक इतिहासामुळे प्रकाशात येतो. प्रदेश इतिहासाचा पोट विभाग म्हणजे स्थानिक इतिहास होय. स्थानिक इतिहास लेखन करताना संशोधकांनी, अभ्यासकांने विशेष काळजी पूर्वक अभ्यास केल्यास नक्कीच स्थानिक इतिहास लेखनात किंबहुना राष्ट्रीच्या सामाजिक,सांस्कृतिक आणि राजकीय इतिहासा मध्ये सुद्धा मोलाची भर टाकू शकेल. स्थानिक इतिहासा मध्ये इतिहासा संबधी माहिती अंतर्भूत करताना काही मर्यादा येतात. परंतु तरी ही या विषयाचे महत्व कमी होत नाही. या इतिहास लेखांना मध्ये भौगोलिक मर्यादा येतात. कारण प्रदेश ही संकल्पना सापेक्ष आहे. स्थानिक इतिहास लेखांना मध्ये आपण एखाद्या प्रदेशचा ठराविक भागाविषयी अभ्यास करत असतो. मग एखादे गाव किंवा तालुका ही असू शकतो. अश्या प्रकारच्या इतिहास लेखनातून आपण त्या परिसराची इतिहास मांडणी करता येते. भारत हा विविधतेने नटलेला देश आहे यात अनेक धर्माचे विविध चाली रीती, सण-वार साजरे करणारे लोक राहतात त्यामुळे भारतामध्ये प्रादेशिक इतिहासाचे महत्व प्रखरतेने जाणवते कारण, राष्ट्रीय अस्मितेच्या पोटातच प्रादेशिक अस्मिता ही राहत असते. मी भारतीय आहे. सोबतच मी एक महाराष्ट्रीयन सुद्धा आहे. ही वेगळ्या प्रकारची अस्मिता असूनही ही राष्ट्रीय अस्मितेला पूरक अश्या स्वारूपाची आहे. व या दोन्हीचे सहकार्य स्थानिक इतिहसास कसे उपयुक्त आहे तेच दर्शीविते. स्थानिक इतिहास लिहताना इतिहासकार त्या ठिकाणी राहत असलेल्या लोकांच्या आपल्या जन्मभूमी विषयी ज्या स्वाभाविक भावना असतात. त्या भावना व ऐतिहासिक घटना आणि त्या घटनाशी संबधित असणाऱ्या व्यक्ति याच्या आधारे इतिहास लेखन केले जाते. सर्व साधारणपणे इतिहास लेखनात इतिहास लेखनाची साधने हे एका इतिहासाची सत्यता ठरवत असतात. परंतु स्थानीक इतिहास काही प्रमाणात याला अपवाद असू शकतो. स्थानिक इतिहासामध्ये प्राथमिक साधने मिळू शकतात परंतु लिखित साधनाचा काही प्रमाणात कमतरता जाणवते. कारण पूर्वीचे इतिहास लेखन हे मोठ्या राजकीय व्यक्ति, लढाया या संबधित जास्त प्रमाणात दिसते. अश्या वेळी इतिहासकाराला राजहंसाची भूमिका पार पडावी लागते. राष्ट्रीय, प्रादेशिक इतिहास लेखनातून त्याला स्थळ व व्यक्ति विषयी माहिती काढण्याचे काम अत्यंत जबाबदारीने पार पडावे लागते. स्थानिक इतिहासामध्ये अत्यंत महत्वाचे साधन म्हणजे मौखिक इतिहास. मौखिक इतिहास हा स्थानिक इतिहासाचा महत्व पूर्ण अविभाज्य असा घटक आहे. कधी स्वतच्या स्मरणातून तर कधी इतरांना बोलके करून त्याच्या कडून तो वदवून घेऊन तो मौखिक इतिहासच्या रूपात मांडला जातो.

१९ व्या शतकाच्या उत्तर्धात महाराष्ट्रात स्थानिक इतिहासाचा पाया घातला गेला. असे असले तरीही तरीही मराठा इतिहासाची महत्वपूर्ण साधन म्हणून आपण ज्याचा उललेखा करतो अशा 'बखर' या हि याचे उत्तम उदाहरण म्हणता येईल. गोविंद नारायण मडगावकरांचा १८६३ मध्ये प्रसिद्ध झालेला "मुंबई चे वर्णन" वर्णन" हा ग्रंथ होय. हा ग्रंध म्हणजे महाराष्ट्रातील स्थानिक इतिहास लेखनाचे पहिले पुष्प. २०व्या शतकात

शतकात स्थानिक इतिहास लेखनाची परंपरा ही वाढत राहिली. ना.गो.चाफेकर यांचा "बदलापूर" (आमचा गाव)१९३३, राजुरकरांचा "चंद्रपुरचा इतिहास १९५६", पु.प.गोखले यंचा "जागृत सातारा १९६२" या सारख्या लिखाणातून स्थानिक इतिहास लेखन हे समृद्ध बनले गेले. भारतामध्ये अनेक राज्याचा समावेश होतो. या सर्व राज्याची आपली स्वतंत्र अशी ओळख आहे त्याच प्रमाणे या सर्व राज्यामध्ये अनेक प्रदेश येतात.त्याची ही काही प्रमाणात स्वतंत्र अशी ओळख आहे. तसेच या प्रदेशामध्ये जे काही भूभाग येतात त्यातील व्यक्तीची, स्थानाची वेगळी अशी ओळख असते. राष्ट्र, राज्य पातळी वरील इतिहास लेखनात या सर्वाचे महत्व कर्तुत्व हे झाकले जाते, दुर्लक्षित राहते. परंतु कुठल्याही देशाचा, राज्याचा सर्वांगीण इतिहास लिहावायचा असल्यास तो या घटका शिवाय पूर्ण होऊ शकणार नाही. यामुळे स्थानिक इतिहासाला इतिहास लेखनात विशेष असे महत्व प्राप्त झाले आहे. उदा. प्रत्येक गावाच्या नावाची काहींना काही ऐतिहासिक परंपरा असते. त्याच विशेषत्व त्याच नावामुले प्राप्त होते. अशी अनेक उदाहरणे आपल्याला पाव्हयास मिळतील ज्यात काही गावाची नावे, वनस्पती, देवता, मनुष्य, जाती, जमाती यांच्या नावावरून पडलेली आहे. याच बरोबर मनुष्यत्तर प्राणी नामापासून काही गावाची नावे पडली आहे उदा. मांजरेवाडी, कोल्हेवाडी या नावामुळे त्या भागातील प्राणी सृष्टी बोध होत. इतकेच नाही तर निर्जीव सृष्टी पदार्थापासुन सुद्धा गावांना नवे दिली जातात नदी, संगम, घाट, खिंड, डोंगर इत्यादि. उदा. संगमवाडी (दोन नाद्याचा संगम होतो ते ठिकाण) दिवे घाटा जवळील दिवेगाव इत्यादि.

स्थानिक इतिहास लेखन हे एका प्रकारे आपलीच ओळख आपल्याला नव्याने करून देण्याचे साधन आहे असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. आपण ज्या ठिकाणी राहत असतो त्या ठिकाणचे काहीतरी वेगळेपण असते. आणि ते वेगळेपण आपल्याला स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून कळते. स्थानिक इतिहास लेखांना मुळे केवळ त्या ठिकाणची भौगोलिक महत्वच काळात नाही तर त्या ठिकाणी असणाऱ्या व्यक्ति महत्वपूर्ण स्थळे इत्यादि बाबतची अनभिज्ञ माहिती मिळण्याची शक्यता असते. जी आज पर्यंत दुर्लक्षित किंवा त्या घटकाचा परिपूर्ण अभ्यास न केल्याने अंधारात असते. स्थानिक इतिहास लेखनाच्या माध्यमातून आपण लोकांपर्यंत त्या स्थळांचा खरा इतिहास पोहचवण्याचे काम करू शकतो. स्थानिक इतिहास लेखन हे जर तेथील स्थानिक अभ्यासकांनी किंवा जवळ पास परिसरात असणाऱ्या अभ्यासाकाने केले तर ते अधिक प्रभावी ठरू शकते. कारण त्या व्यक्तीचा तेथीक बोली भाषेचा व त्याच्या अर्थाचा, परंपरेचा व चाली रितींचा जवळचा संबध आलेला असतो. त्यामुळे तो इतिहासकार अधिक उत्तमरित्या याची मांडणी करू शकेल.

एकुणच स्थानिक इतिहास हा एका प्रकारे राष्ट्रीय इतिहासाला समृद्ध करण्याचे काम करतो. आपल्या परिसरातील, तालुक्याची वेगळेपण जपण्यास एका प्रकारे प्रोत्साहन देतो त्यामुळे आपल्यालाच आपलीच नव्याने आपल्या सामाजिक, धार्मिक, संस्कृतिक, राजकीय घटकांची ओळख होते.

**संदर्भ**

१. राजा दिक्षित "प्रादेशिक इतिहासाचा वर्तमान संबध", इतिहास शिक्षक पुणे, ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २००४.

२. राजा दिक्षित, "पुणे विद्यापीठाचा इतिहास", पुणे

३. प्रभाकर देव "इतिहासः एक शास्त्र", नांदेड.

४. जास्वंदी बाबुरकर (सपा.) "इतिहासातील नवे प्रवाह", पुणे.

५. https://bharatdiscovery.org

६. www.esakal.com

७. Prhar.in

VOLUME - IX, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# १२. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात मराठी वृत्तपत्रांची भूमिका

**डॉ. प्रगती बी. मारकवार**
सहाय्यक प्राध्यापक, विभाग प्रमुख (इतिहास विभाग), एल.व्ही.एच. कॉलेज, पंचवटी, नाशिक.

## १. प्रस्तावना

स्वातंत्र्यलढयात मराठी वृत्तपत्रांनी महत्त्वाचे कार्य केले असून, भाषिक वृत्तपत्रात मराठी पत्रांचा वाटा निश्चितपणे मोलाचा आहे, यात शंकाच नाही. जनजागृती करणे, जनतेत स्वातंत्र्याची आकांक्षा निर्माण करणे, ब्रिटिश राजवटीला विरोध करून, तिच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी विचारवंतांना आणि सर्वसामान्यांना प्रवृत्त करणे, हे महत्त्वाचे कार्य वृत्तपत्रांनी केलेले आहे. ब्रिटिश राजवटी या देशात स्थिर होण्यासाठी इंग्रज राज्यकर्त्यांनी इंग्रजी शिक्षणाने सरकारी नोकऱ्यांच्या प्रलोभनाने, बुद्धीमान समजल्या जाणाऱ्या वर्गाला प्रथम वश करून घेतले. दुसरा वर्ग होता तो गुलामगिरीचाच, खंत मनात बाळगून स्वातंत्र्याची चळवळ उभारणाऱ्यांचा. या वर्गाने सत्याग्रह केले. मोर्चे काढले, कायदेभंग केला, सशस्त्र लढा दिला, लोकांपर्यंत पोहचण्यासाठी या मंडळींना माध्यमाची गरज पटली आणि वृत्तपत्र सुरू करण्याकडे, ते चालविण्याकडे त्यांचे लक्ष गेले. बाळशास्त्री जांभेकर आणि भाऊ महाजन यांनी मराठीत प्रथम दर्पण नावाने इंग्रजी व मराठी असे संमिश्र स्वरूपातील वृत्तपत्र १८३२ मध्ये सुरू केले. १९८१ मध्ये केसरी आणि त्यानंतर ज्ञानप्रकाश सुरू केलेत. या दोन्ही मराठी वृत्तपत्रांचा विचारवंतांवर पगडा बसण्यास वेळ लागला नाही. लोकांना माहिती पुरवणे आणि त्यांचे लोकशिक्षण करणे एवढेच या पत्राचे मर्यादित हेतू नव्हते. सर्वसामान्य जनतेला राष्ट्राच्या उत्थापनासाठी कार्यप्रवृत्त करणे हाही उद्देश होता. केसरीसारख्या पत्राच्या मागे टिळक व आगरकर हया दोन प्रभावी व्यक्ती होत्या. त्यांनी विशिष्ट विचाराने, ध्यानाने भारावून वृत्तपत्र सुरू केले होते.[१]

## २. भूमिका

एकोणिसावे शतक उजाडले, त्याला सर्वार्थाने चमत्कार युग म्हणता येईल. छापण्याच्या कलेचा शोध वृत्तपत्रांच्या वाढीचा कणा ठरता. आजच्या आणि उद्याच्या वृत्तपत्रात छपाई यंत्रे व अन्य तांत्रिक साधनांची जसजशी वाढ होत गेली, तसतसा वृत्तपत्रीय क्षेत्रात बदल होत गेला, पुढे होत जाणार आहे. पुण्यातल्या ज्ञानप्रकाश या मराठीतल्या पहिल्या दैनिकाने दूरध्वनीचा वापर करून बातम्या देण्याची पद्धत सुरू केली. लो.टिळक यांच्यावरील खटल्याची बातमी दूरध्वनीवरून मुंबईत येत होती आणि ती ऐकण्यासाठी बराच मोठा समुदाय दैनिकांच्या कचेरीसमोर जमत होता अशी आठवण जुनी मंडळी सांगतात. मुद्रणसुलभतेने वृत्तपत्रांचा प्रसार सुलभतेने झाला. इतर सर्व सुधारणांप्रमाणे इंग्रजांकडेच या सुधारणेचेही पितृत्व जाते, हे खरे पण पुढे भारतीयांनी विशेषतः स्वातंत्र्यप्राप्तीसाठी या साधनांचा ज्या तऱ्हेने वापर करून घेतला तो संस्मरणीय इतिहास होय. मराठीतले पहिले वृत्तपत्र दर्पण होय. मुंबईत त्यापूर्वी मुंबापुरी समाचार सुरू झाल्याची माहिती अ.का.प्रियोळकरांनी उजेडात आणली आहे. परंतु साधारणपणे दशकभर तरी सातत्याने चाललेले व सर्वप्रथम निघालेले नियतकालिक म्हणून दर्पणचाच

उल्लेख करणे योग्य होय. त्याचा व त्या पाठोपाठ निघालेल्या वृत्तपत्राचा ज्ञानप्रसार - विद्यादान हाच हेतू होता. त्यावेळच्या वृत्तपत्रांची नावेही याला साजेशीच म्हणजे ज्ञानोदय, ज्ञानप्रसारक, ज्ञानदर्शन, इंदूप्रकाश, ज्ञानसंग्रह, ज्ञानचंद्रोदय, प्रभाकर, ज्ञानाकर, विविध ज्ञानविस्तार अशी आढळतात. ज्ञानोदयाच्या एका अंकात म्हटलेले आहे की, वर्तमानपत्रांनी लोकांचे एकमत होते. राजास लोकांचे बोभाट कळतात आणि लोकास माहितीगिरी होते व झोपेत इकडेच लोक आहेत, ते जागृत होतील.[२]

मराठी वृत्तपत्रांनी दोन आघाडयांवर वैचारिक संघर्ष चालविला होता. एक राजकीय आघाडी आणि दुसरी सामाजिक आघाडी होय. वृत्तपत्रांना ब्रिटिश साम्राज्यशाही विरूद्ध, समाजातील उच्च वर्णीयांविरूद्ध विचार व्यक्त करावे लागत होते. या सर्व सामाजिक आणि राजकीय भिन्न पद्धतीच्या इतिहासाला एकोणिसाव्या शतकाच्या आरंभापासूनच नवे वळण लागले होते. इंग्रजी सत्तेबरोबरच युरोपातील विचारांचाही प्रभावही येथे पडू लागला होता. या सर्व विचारांचे आणि आधुनिक युगाचे प्रतीक म्हणून पहिले मुद्रणयंत्र येथे आले. त्या यंत्राने ज्ञानक्षेत्रात अभिनव किमया घडून आणली. या निमित्ताने विद्याप्रसारासाठी एक क्रांतीकारक साधन समाजाला मिळाले. मुद्रित पुस्तके आणि पोथ्या वाचणारा एक नवा वर्ग वाढू लागला. इंग्रजी विद्या शिकणाराही अल्प का होईना, एक गट तयार झाला. हा वर्ग भोवतालच्या समाजजीवनाकडे नव्या दृष्टीने पाहू लागला. मिळालेले नवे ज्ञान विज्ञान पुढच्याही पिढीलाही मिळावे, अशी त्या वर्गाला उत्कट इच्छा होणे स्वाभाविक होते. आपल्याला प्राप्त होत असलेल्या अशा ज्ञान साधनांचा समाजालाही उपयोग व्हावा या लोकशिक्षणाच्या सद्‌भावनेतूनच वृत्तपत्रांचा जन्म झाला. या सर्व परिवर्तनवादी पदचिन्हे आरंभीच्या काळातील वृत्तपत्रात दिसून येतात. प्रथम लोकशिक्षणाच्या दृष्टी, नंतर सामाजिक सुधारणेचा विचार, त्यातूनच राजकीय जागृतीचे कार्य आणि शेवटी त्या सामाजिक असंतोषाला राजकीय स्वातंत्र्यसंग्रामाचे मिळालेले विराट स्वरूप, अशी स्थूलमानाने वृत्तपत्रांची पुढील वाटचाल दाखविता येईल. शेवटचा स्वातंत्र्ययुद्धाचा टप्पा अधिक विस्ताराने सांगण्याची आवश्यकता असली, तरी आरंभीचे दोन्ही टप्पेही संक्षेपाने का होईना समजून घेणे आवश्यक ठरतात.[३]

"वृत्तपत्रांचा विचार लोकांची भूक वाढवा, नंतर त्याची जोपासना करा आणि अंती त्यांना समृद्धी आणा ......" हेच ब्रीदवाक्य होते.[४]

मराठी वृत्तपत्रांच्या उगमस्थानीच त्यांच्या ध्येयवादी कार्याची स्पष्ट चिन्हे व्यक्त होतात. मराठी वृत्तपत्रांचा इतिहास लिहितांना वा सांगतांना बाळशास्त्री जांभेकरांचा आणि त्यांच्या दर्पण पाक्षिकाच्या पहिल्या अंकात ६ जानेवारी, १८३२ बाळशास्त्री जांभेकरांनी संपादकीयात आपली भूमिका मांडतांना म्हटले होते की, मराठी भूमित ज्ञानाचा प्रसार व्हावयाचा असेल तर येथे छापखाने सुरू झाले पाहिजेत आणि या छापखान्यातून वृत्तपत्रही प्रसिद्ध झाले पाहिजेत.[५]

विलायतेत विद्याचा अधिक अभ्यास व्हावा या उद्देशाने दर्पण काढण्याचा मनोदय १८३२ मध्ये जांभेकरांनी व्यक्त केला होता. मनोरंजन करणे, चालते काळाची वर्तमाने कळविणे आणि योग्यतेस येण्याचे मार्ग दाखविणे या गोष्टींची 'दर्पण' छापणारास मोठी उत्कंठा आहे. असे म्हणून पक्षपात केला जाणार नाही, असे आश्वासन देऊन म्हटले आहे की, दर्पण छापणारांचे लक्ष आहे आणि खरोखरच आपली प्रतिज्ञा त्यांनी प्रत्यक्षात उतरविल्याचेही दिसते. दर्पण सुरू झाल्याच्या वर्षीच

जातीव्यवस्थेचा वाद सुरू झाला होता. दर्पणकारांनी दोन्हीही बाजूंना प्रसिद्धी दिलेली आढळते. जे लेख त्यांनी छापले नाहीत त्याची कारणे, त्यांनी आपल्या वृत्तपत्रात दिली आहेत.[६]

लोकहितवादीची शतपत्रे आणि ख्रिस्ती मिशनऱ्यांनी सुरू केलेले 'ज्ञानोदय' (१८४२) यामधून हिंदू धर्मातील भोळसर समजुतीची जी टर उडवण्यात आली आणि पुढे आधुनिक जीवन मूल्यांची जी उद्बोधक जाणीव निर्माण करण्यात आली. व तिचा महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणेत फार मोठा वाटा आहे. मराठी वृत्तपत्रात स्त्री शिक्षण हा वादाचा विषय रंगत होता पण प्रत्यक्ष कृतीला प्रारंभ केला महात्मा फुले यांच्यासारख्या थोर विचारवंताने. वृत्तपत्रातील विचारसरणी एकीकडे व प्रत्यक्ष कार्य एकीकडे असे विसंगत दृश्य १८७४ नंतर विशेषतः निबंधमाला सुरू झाल्यावर दिसू लागले. पण तत्पूर्वीच्या नियतकालिकांनी नव्या जाणिवा निर्माण करण्याची महत्त्वाची कामगिरी पार पाडली.

### ३. समारोप

मराठी वृत्तपत्र जन्माला आले ते प्रबोधनाच्या हेतूनेच पुढे आले आहे. यात टीका, प्रक्षोभ, निंदानालस्ती, स्तुती अशा विविध गोष्टींना एकेका काळात प्राधान्य मिळाले. पण त्या सर्व अवस्था पार करून खरेखुरे वर्तमानपत्र म्हणजे मुख्यतः कालचे व आजचे वर्तमान कथन करणारे पत्र, असे निर्भेळ स्वरूप त्याला येत आहे. लो.टिळकांच्या काळात आणि नंतरही आग्रही मतपत्र म्हणून त्याचे जे स्वरूप होते ते पूर्णपणे मागे पडले आहे. मराठी वृत्तपत्राचे हे स्वरूप हा बदललेल्या काळाचा परिपाक आहे. एकूण भारतीय वृत्तपत्रसृष्टीत अशा तऱ्हेचा बदल घडून येत आहे. वृत्तपत्रनिर्मितीची तांत्रिक साधने बदलत असल्यानेही नवे स्वरूप अधिकाधिक आकर्षक होत आहे. पण एक गोष्ट निश्चित की, भारतीय भाषांतील वृत्तपत्रात मराठी वृत्तपत्र आघाडीवर राहत आले आहे. याचे एक कारण असे की, बदलत्या परिस्थितीनुरूप ते बदलत गेले. या बदलाचा आणि त्याला कारणीभूत होणाऱ्या परिस्थितीचा मागोवा घेत घेत मराठी वृत्तपत्रांच्या कार्याचा शोध घेण्याचा प्रयत्न या प्रकरणात केलेला आहे.

### संदर्भ सूची

१. गर्गे, स.मा., पूर्वोक्त, पृ.६
२. पाटील अनंतराव, पूर्वोक्त, पृ.१२.
३. पवार सुधाकर (१९८६), 'वृत्तपत्र व्यवसाय : काल आणि आज', मान-सन्मान प्रकाशन, पुणे. पृ.५.
४. गोखले शरदचंद्र, पूर्वोक्त, पृ.८.
५. कर्वे स्वाती सुहास, पूर्वोक्त, पृ.४६.
६. पवार सुधाकर, पूर्वोक्त, पृ.५.

VOLUME - IX, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# १३. ढोर समाजाचा इतिहास : एक चिकित्सक अभ्यास

**डॉ. सौ. वंदना राजेश शिंदे**
सहाय्यक प्राध्यापक, (इतिहास विभाग) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खारेपाटण, ता. कणकवली, जि. सिंधदुर्ग.

**प्रस्तावना**

भारताच्या कानाकोपऱ्याचा एकूणच महाराष्ट्राच्या इतिहासाचा अभ्यास करताना या इतिहासातील वंचित, मागासवर्गीय व अनुसूचित जातीच्या सामाजिक घटकाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. अर्थातच या वंचित मागासवर्गीय समाजाचा इतिहास म्हणजेच समाजव्यवस्थेतील जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था, अस्पृश्यता, गुलामगिरी, बलुतेदारी, वेठबिगारी, स्त्रियांचा दर्जा, अलंकार, मनोरंजन , वेशभूषा, केशभूषा,सण-उत्सव , प्रथा परंपरा, या विविध सामाजिक पैलूंचा इतिहास होय. भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४१ नुसार राष्ट्रपतीच्या आदेशानुसार काही जाती गटांना 'अनुसूचित जाती' म्हटले गेले. वास्ताविक पाहता अनुसूचित जाती अशा नावाचा कोणताही एक जातीगट मुळात अस्तित्वात नव्हता. ब्रिटिश संसदेने भारतीय शासनाविषयक इ.स. १९३५ च्या कायद्यामध्ये अनुसूचित जाती असा फक्त शब्दप्रयोग केला.[१] ज्या जाती सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिकदृष्ट्या मागासलेल्या आहेत त्यांची १९३० मध्ये प्रथम यादी जाहीर केली व १९५७ मध्ये त्यात सुधारणा करून ती यादी पुनर्प्रकाशित झाली. त्यामध्ये जवळपास १५०० जातींना भारतीय घटनेच्या कलम ३४१ नुसार ज्या जाती, वशं अथवा गट किंवा भाग यांचा अनुसूचित जाती म्हणून उल्लेख केला असेल त्या सामाजिक गटांना अनुसूचित जाती असे म्हणतात.[२] भारतीय समाजव्यवस्थेचे अनुसूचित जाती हे महत्त्वाचे अंग आहे त्यामुळे अनुसूचित जातीच्या विकासाशिवाय देशाचा विकास हा अपूर्णच आहे. जातिभेद अस्पृश्यता हा समाजाला लागलेला एक मोठा कलंक आहे. आजपर्यंत अनेक संतांनी , समाजसुधारकांनी, महापुरुषांनी जातीनिर्मूलनासाठी प्रयत्न केले. दुर्दैवाने याच महापुरुषांना त्यांच्या जातीने बहिष्कृत केले किंवा वाळीत टाकले होते.

अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीसाठी मागास समूह हा शब्द त्यांची राजकीय स्थिती, सामाजिक दर्जा, आर्थिक स्थिती याबाबतच्या विकासापासून कोसो मैल दूर असलेले व मानवतेचे हक्क नाकारलेले लोक यांच्यासाठी वापरण्यात आलेला असून भारतीय समाजव्यवस्थेने काही जाती समूहाचे जगणेच मुश्कील केलेले होते. या मागास समूहाला समाजव्यवस्थेत सन्मानाचे जीवन नाकारलेले होते व सामाजिकदृष्ट्या अशा समाजाला पूर्णपणे समाज बहिष्कृत केलेले होते.

एकूणच महाराष्ट्रीयन समाजात अनेक पंथाचे ,धर्माचे लोक वास्तव करतात तसेच आदिवासी भटक्या विमुक्त जमातीचे लोकही राहतात. हिंदू धर्मीयांची संख्या राज्यात जास्त असून त्यामध्ये अनेक जाती पोटजाती आहेत. यातील

काही जातींना वरिष्ठ दर्जा तर काहींना कनिष्ठ दर्जा दिलेला आहे. त्यामध्ये मागास, दलित अनुसूचित जातीचा समावेश होतो. या अनुसूचित जातीमध्ये प्रामुख्याने महार , मांग, ढोर , चांभार जाती संख्येने जास्त आढळतात. त्यानंतर होलार ,खाटीक, होलिया , डोंब, कैकाडी, शेणगी या जातीच्या जनगणनेनुसार राज्यातील अनुसूचित जातीची (नवबौद्धा सह) लोकसंख्या ९२,८२,००० इतकी असून अनुसूचित जातीचे एकूण संख्येशी असलेले प्रमाण १०.२ टक्के इतके आहे.[३] महाराष्ट्रासह भारतातील इतर राज्यातील अनुसूचित जाती मध्ये ज्या जाती संख्येने जास्त आढळतात त्यातील दुसरी महत्त्वाची जात म्हणजे ढोर हीच जात होय. ढोर हा भारतातील अत्यल्पसंख्य समाज आहे. हा समाज प्रामुख्याने महाराष्ट्रासह, कर्नाटक ,तामिळनाडू ,आंध्र प्रदेश ,गुजरात व राजस्थानमध्ये आढळते.कातडी कमाविणा-या ढोर समाजाला वेगवेगळी नावे असली तरी हा समाज मूळचा तसा एक आहे. चर्मकार समाजही या समाजातुन विशिष्ट अशा कौशल्यामुळे वेगळा झाला एवढेच प्रस्तुतच्या शोधनिबंधात ढोर समाजाच्या इतिहासाच्या चिकित्सक अभ्यास करण्यात आलेला आहे.

**संशोधनाची पद्धत**

प्रस्तुतच्या शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धत वापरली आहे. सदरच्या संशोधनात ढोर समाजाची जनगणना अहवाल, काही प्राथमिक व दुय्यम साधने, मासिके ,वर्तमानपत्रे यांचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाची गरज**

आतापर्यंत बराच अभ्यासकांनी व संशोधकांनी अनुसूचित जाती या नात्याने महार ,मातंग,चर्मकार या जातीचा अभ्यास विविध तऱ्हेने केला आहे.पण भारतीय समाजव्यवस्थेच्या जातिव्यवस्थेत ढोर ही सुद्धा अनुसूचित जात समाजात विकसित आहे पण या जातीचा म्हणावा तितका अभ्यास झालेला नाही किंवा म्हणावा तसा या जातीचा कुठेच उलगडा झालेला नाही. अभ्यासकांनी किंवा संशोधकांनी अनुसूचित जाती म्हणत फक्त महार (नवबौध्द) समाजाच अपेक्षित धरला होता की काय असा प्रश्न निर्माण होतो.कारण या निष्कर्षांमध्ये अनुसूचित जातीमधील सर्व राज्यात लोकसंख्येने बऱ्यापैकी असलेल्या समाजाविषयी व त्यांच्या सामाजिक व राजकीय सहभागाविषयी फारशी चर्चा झाल्याचे दिसून येत नाही. हीच परिस्थिती मातंग, चर्मकार व इतर अनुसूचित जातीच्या संदर्भात दिसून येते. आज ढोर समाज बराच पुढारलेला असून महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व देशाचे गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे या समाजातून निर्माण झाले. राजकारणामध्ये त्यांनी आपला ठसा उमटविला.पण तरीही या समाजावर म्हणावा तसा फोकस पडलेला नाहीत याची नोंद घेणे गरजेचे आहे.तसेच या समाजाच्या प्रथा, परंपरा , चालीरीती ,व्यवसाय, त्यांचा सामाजिक, राजकीय प्रभाव याचा अभ्यास होणे गरजेचे असल्याने मी या शोधनिबंधासाठी वरील विषयाची निवड केली.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. ढोर समाजाचा संक्षिप्त इतिहास व हिंदू व्यवस्थेतील त्यांचे स्थान तसेच अनुसूचित जातीमधील एक महत्त्वाची जात म्हणून म्हणून समाजव्यवस्थेतील त्यांची भूमिका समजावून घेणे.

२. ढोर समाजाची ग्रामीण भागातून शहरी भागात होणारे स्थलांतर व त्याची कारणे अभ्यासली आहेत.

३. समाजाचे शैक्षणिक स्थान व शिक्षणाविषयी, आरक्षणाच्या धोरणाविषयी त्यांचा दृष्टिकोन अभ्यासला आहे.

४. ढोर समाजाचे बंद पडत चाललेले पारंपारिक व्यवसाय, त्यातील अडचणी, व्यवसाया समोरील आव्हाने व व्यवसायावर झालेली इतर धर्मियांची आक्रमणे व त्याविषयी ढोर समाजाची भूमिका अभ्यासली आहे.

५. ढोर समाजाचे समाज व्यवस्थेतील स्थान व इतर जाती समूहाचा त्यांच्याविषयी असणारा दृष्टिकोन अभ्यासला आहे.

**१) ढोर या शब्दाची उत्पत्ती व विकास:-** ढोर समाजाची निर्मिती ही ऋग्वेद काळापासून मानावी लागेल. या समाजाच्या उत्पत्तीबद्दल असेही म्हटले जाते की, पाण्याच्या डोहाजवळ वस्ती करून राहणाऱ्या लोकांना डोहोर या नावाने ओळखले जात. मूळ शब्द हा डहर असून त्याचा अर्थ पाणवठे, डोह, तळी या नजीक व्यवसाय करणारे लोक असाही होतो.ढोर समाजाचा कातडी कमाविण्याचा पुरातन व्यवसाय पाहता व त्यासाठी विपुल प्रमाणात पाण्याची असलेली गरज पाहता त्यांचा व्यवसाय हा मुबलक पाणी उपलब्ध असलेल्या ठिकाणी स्थिरावला असे. ढोर या शब्दाबद्दल ही सत्य परिस्थिती लक्षात न घेता हिंदू समाजाने त्यास वैगण्यदर्शक अर्थ लावला.

गुरे डोहामध्ये अपरिहार्यपणे जातात म्हणून त्यांच्यावरून गुरेढोरे हा शब्द प्रचलित झाला जणू काही ढोर म्हणजे जनावरे असा चुकीचा अर्थ प्रचलित झाल्याचे स्पष्ट दिसते किंवा गुरेढोरे यातील ढोर शब्द घेऊन त्यांची टिंगल टवाळी करण्याचा हेतूने ढोर शब्दाचा प्रसार होऊ लागला. आजही ते साक्षात शंकराचे पुत्र म्हणून स्वतःला डोहाळ म्हणून घेताना आढळतात.डोहानिकट किंवा जलाशयानिकट व्यवसाय करणारे ते डोहर तथा ढोर म्हणून ओळखले जात. कातडी कमावणे हा ढोर जातीचा परंपरागत व्यवसाय आहे. पूर्वीपासून ढोर समाजातील लोकांची वस्ती ही गावाबाहेरील जागेत किंवा गावाशेजारी थोड्या अंतरावर नदीच्या किंवा ओढ्याकाठी राहताना दिसते.[४] कालांतराने या समाजाला सर्वजण ढोरांची माणसे संबोधू लागल्याने अर्थात हे हेटाळणी वजा संबोधन ढोर समाजाला नकोसे झाले म्हणूनच पुढे शिकलेल्या व आधुनिक विचारांच्या ढोर समाजातील लोकांना स्वतःला ढोर न म्हणता कक्कया म्हणण्यास सुरुवात केली. या समाजाचे मानवी इतिहासात अत्यंत मोलाचे स्थान आहे या समाजाने पुरातन काळापासून मानवी जीवन, युद्धशास्त्र प्रवास आणि एकूणच अर्थव्यवस्थाही समृद्ध करण्यात मोलाची कामगिरी बजावली आहे. १८ व्या शतकातल्या औद्योगिक क्रांतीपर्यंत या समाजाने आपलं कर्तृत्व गाजवलं . पण भारतीय समाजातल्या वैदिक व्यवस्थेने त्यांच्याबद्दल कृतज्ञ न राहता त्यांनाच ठरविल्याचे स्पष्ट दिसते.

प्रामुख्याने पूर्वीच्या काळी गुरांना सुद्धा ढोर म्हणत त्यावरूनच त्यांना ढोर हे नाव पडलेले असावे असे अनेक जण म्हणतात. या ढोर जातीमध्ये प्रामुख्याने दोन गट आढळतात बुधलेकरी ढोर व कक्कया ढोर या दोन्ही गटांमध्ये परस्पर रोटी व बेटी व्यवहार सहसा होत नाहीत. बुधलेकरी हे नाव बुधल्या म्हणजेच कातड्यापासून वस्तू बनविणारे यावरून पडले आहे.[५] पूर्वीपासून अस्पृश्यतेच्या वेढ्यात अडकलेल्या या समाजाला उच्चवर्णीय समाजाकडून सतत हीन प्रकारची वागणूक मिळत असे.कातडी कमाविण्याचा गलिच्छ व्यवसाय करणाऱ्या या समाजाची गणना सुद्धा चर्मकारांमध्ये केली जाते. चर्मकारांच्या ज्या अनेक पोटजाती होत्या त्यापैकी ढोर ही एक जात होय.

**२) १२ व्या शतकातील महान व्यक्ती संत बसवेश्वर:-** महात्मा बसवेश्वर व संत कक्कया यांचा १२ व्या शतकातील कालखंड मानला जातो.महात्मा बसवेश्वर हे त्या काळातील धर्मसुधारक ,व्यवहारज्ञानी व आत्मज्ञानी महापुरुष होते. त्याकाळात ते कल्याणचा राजा बिज्जलराव यांच्याकडे महामंत्री पदावर काम करीत होते. बसवेश्वरांनी जातीपाती ,धर्म भेदभाव न मानता सर्व मानव एक सारखे आहे या तत्वाचा प्रसार करून शैव धर्माचा प्रचार केला. त्या काळात हरळ्ळैया नावाच्या चांभाराच्या मुलाबरोबर मधुवरसा या ब्राह्मण कन्येचा विवाह झाला . त्यावेळी बसवेश्वरांनी हा विवाह आदर्श असल्याचे जाहीर केले पण सनातनी हिंदूनी हा विवाह ना पसंत केला.बसवेश्वर स्वतः राज दरबारी गेले त्यांनी राजाला स्पष्ट शब्दात सांगितले की, या मुलामुलींचे आईवडील निर्दोष आहे तरी पण त्या राजाने त्याला न जुमानता त्या जोडप्याच्या आई-वडिलांना देहांताची शिक्षा दिली.यामुळे बसवेश्र् वरांनी त्याचा धिक्कार करून राजाचे महामंत्री पद सोडून दिले व निघून गेले आणि शैव पंथीयासाठी आपले जीवन वाहिले.पुढे महात्मा बसवेश्वरांनी लिंगायत पंथाची स्थापना केली. अनेक जातीने या पंथाचा स्वीकार केला त्यापैकी ढोर समाजातील लोकांनी हा पंथ स्वीकारला.यात महात्मा बसवेश्वर यांचे परमशिष्य संत कक्कया हे प्रमुख होते. कक्कया हे जातीने ढोर होते. कक्कया हे महात्मा बसवेश्वर यांची प्रवचने ऐकण्यास सभामंडपामध्ये येत असत.आजचे ढोर समाजातील लोक संत कक्कायाचे वंशज आहेत म्हणून आधुनिक काळातील ढोर समाजातील लोक स्वतःला ढोर म्हणून संबोधतात.[६]

**३) ढोर समाजातील महापुरुष संत कक्काया:-** संत कक्कया महाराज मुळचे कर्नाटकातील होते. ते महात्मा बसवेश्वरांचे परमशिष्य व लढावू वीर होते. त्यांनी ढोर समाजातील लोकांना समाजात प्रतिष्ठा निर्माण करून दिली. त्याकाळात संत कक्कयांनी बसवेश्वरांच्या वीर शैवपंथाची कीर्ती ऐकून ते बसव कल्याण येथे गेले व त्यांनी वीर सर्व पंथ स्वीकारला. या पंथाच्या प्रचारासाठी भरीव कार्य केले. जातीयता संपली पाहिजे, माणसाला माणूस म्हणून जगता आले पाहिजे, कर्मावर वर्ण अमान्य करण्याचे धाडस १२व्या शतकात बसवेश्वरांनी करून दाखविले. या कार्यात क्रांतिवीर म्हणून संत कक्कया यांचे स्थान अद्वितीय आहे. ज्यावेळी बसवेश्वर कुंडल संगमला निघाले तेव्हा बिज्जल राजाच्या सैन्याशी हातात तलवार घेऊन कक्कया लढले आणि त्यातच धारातीर्थ पडले. ही घटना जेथे घडली ते गाव कक्केरी

म्हणून ओळखले जाते त्या ठिकाणी संत कक्काया या महान संताची समाधी आहे.[७] एकूणच संत कक्काया हे ढोर समाजातील समाजसुधारक , परमभक्त असून त्यांचे ढोर हे अनुयायी आहेत.

**४) ढोर समाजाचे मूळ स्थान:-** भारतीय जातीव्यवस्थेमधील अनुसूचित जातीच्या यादीत ढोर, डोहर,कक्कया या नावाने ओळखली जाणारी ही जात लोकसंख्येत मध्यम स्वरूपाची असून मुळतः उत्तर हिंदुस्थान, आंध्रप्रदेश, कर्नाटक, विजापूर बेळगाव जिल्ह्यात तसेच महाराष्ट्रात मराठवाडा ,विदर्भ पश्चिम महाराष्ट्रात थोड्या थोड्या संख्येने विखुरलेली दिसून येते.[८]

**५) ढोर समाजाचा व्यवसाय:-** मृत जनावरांच्या कातड्यावर प्रक्रिया करुन ते टिकाऊ व उपयुक्त बनवणे हा ढोर समाजाचा प्रमुख व्यवसाय आहे. हा व्यवसाय अत्यंत किळसवाणी स्वरूपाचा आहे. यात दुर्गंधीयुक्त कच्चा स्वरूपाच्या कातड्यावर प्रत्यक्ष हाताने सर्व प्रकारचे संस्कार करून ते कातडे रंगविणे आणि रंगविल्यानंतर ते कातडे सुकविलेल्यावर कापडाच्या दुकानातील पैठणीची घडी जशी मुलायम होते तसे ते चामडे मुलायम होते फक्त त्याला बाळदीच्या रंगाचा उग्र वास येतो अत्यंत तलम असे चामडे हा समाज तयार करीत असे. ही महत्त्वाची कला या समाजातील लोकांच्या अंगी दिसून येते. त्यांच्या या कारागिरीला तोड नव्हती तरी हिंदू धर्माने त्यांना अस्पृश्य समजून शेकडो वर्षांपासून हीन प्रकारची वागणूक दिली. ही खेदाची बाब म्हणावी लागेल.

**६) कातडी कमविणे यामागचा इतिहास:-** कातडी कमावणे हा ढोर समाजाचा प्रमुख व्यवसाय असून ते मेलेली जनावरे खाटकांकडून जनावरांची कातडी मिळवून हा व्यवसाय करीत. त्यांचा काकडी कमवण्याचा पुरातन व्यवसाय पाहता व त्यासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची गरज पाहता हा व्यवसाय मुबलक पाणी उपलब्ध असलेल्या ठिकाणी स्थिरावला असे दिसते. खरंतर कातडी कमाविणे हा जगातला पहिला जैवरासायनिक प्रक्रिया उद्योग आहे. जेव्हा मानव दीड लाख वर्षांपूर्वी नग्न अवस्थेत भटके जीवन जगत होता तेव्हा त्याला शिकार केलेल्या प्राण्यांच्या कातड्याची गरज लक्षात आली नाही. नंतर थंडी वाऱ्यापासून संरक्षण करण्यासाठी कातड्याचा वापर होऊ शकतो हे लक्षात आल्यावर त्याने शिकार केलेल्या प्राण्यांची कातडी जपण्यास सुरुवात केली. परंतु वातावरणाच्या प्रभावामुळे ते कातडे फार काळ टिकत नाही हे लक्षात आल्यावर त्याने ते ते कातडे टिकाऊ कसे करता येईल याचा शोध सुरू केला. सुरुवातीची हजारो वर्षे मानव जनावराची चरबी चोळुन कातड्याला मऊ व टिकावू ठेवण्याचा प्रयत्न करीत होता. मोठ्या प्रमाणात शिकार उपलब्ध असल्याने त्याकाळात कातड्याची कमतरता नव्हती. पण जेव्हा शेतीचा शोध लागला आणि मानवी जीवन स्थिर झाले तेव्हा शिकार कमी झाल्याने कातड्याची उपलब्धताही कमी झाली. तेव्हा मात्र त्याने कातडे दीर्घकाळ टिकवून ठेवण्यास सुरुवात केली.पुढे त्याने नैसर्गिक वनस्पतीजन्य पदार्थांचा वापर करून कातडी कमवण्याची कला शोधून काढली. भारतात बाभूळ,खैर,हिरडा या झाडांच्या साली व चुना ,मीठ व तेलांदि रंजक द्रव्ये वापरून कातडी कमवण्याची पद्धती सात हजार वर्षांपूर्वीच शोधण्यात आली. कातडी कमावणे हे कष्टदायक व किचकट काम होते. आज

या उद्योगात अनेक प्रक्रिया यांत्रिकीकरणाने होत असल्या तरी प्राथमिक प्रक्रिया या मानवी श्रमाशिवाय होत नाहीत कारण या जनावरांचे कातडे सोलून काढले की ते वाहून आपल्या उद्योग स्थळापर्यंत नेऊन स्वच्छ करणे हा मोठा खटाटोप होता. तसेच रासायनिक प्रक्रिया करताना येणारा उग्र वास, चुन्याच्या निवळीत प्रक्रिया होताना हातापायावर होणारे परिणाम हे सारे सहन करून हा समाज हा व्यवसाय करीत होता. पूर्वी या व्यवसायात प्रचंड सुबत्ताही होती. समाजात या व्यवसायाला मानसन्मान होता. ऋग्वेदात या व्यवसायाविषयी आदराची माहिती मिळते. पण नंतरच्या काळात या व्यवसायाकडे तुच्छतेने पाहिले जाऊ लागले. कातड्यावर सर्व प्राथमिक प्रक्रिया डोह किंवा जलाशया जवळ केल्या असल्या तरी उर्वरित प्रक्रिया वेशीच्या आत कोणी करू देणे शक्य नव्हते कारण चर्माचा वास प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय जात नाही त्यामुळे त्यांना त्यांच्या वस्तीसह बाहेर ठेवणे भाग पडले असे दिसते. त्याचाच फायदा घेऊन उच्चवर्णीयांनी पुढे या ढोर समाजालाही अस्पृश्य ठरवून टाकले आणि त्यांना अमानुष वागणूक देण्यास सुरुवात केली.[१०] हे सत्य मात्र आपण नाकारू शकत नाही. या कमविलेल्या कातड्यापासून पादत्राणे, घोड्याचे जीन, लगाम बैलाचे वेसन, सैनिकासाठी शिरस्त्राण, हस्तचाबूक ,चामडी चिलखते, ढाली, पाण्याची मोट पखाली ,गृहसजावटीच्या चामड्याच्या वस्तू ,चर्मवाद्य चामड्याचे कंबरपट्टे, बैलांच्या सपात्या चाळाचे पट्टे ,विणलेले चाबूक या वस्तू तयार करीत व उरलेले कातडे चप्पल व इतर वस्तू तयार करण्यासाठी ते चांभाराला देत. पण सध्या काही खेड्यापाड्यात व शहरातही जातीच्या पारंपारिक धंद्याला उतरती कळा लागल्याचे दिसून येते.

**७) चामडी रंगविणे ही ढोर समाजाची कला:-** जनावराची कातडी रंगविणे हा ढोर समाजाचा पारंपरिक व्यवसाय होता. कातडी रंगवणे ही किचकट प्रक्रिया होती. कच्च्या चामड्यांस पक्के करण्यासाठी जवळच पाण्याचा मुबलक साठा असला पाहिजे. चामडे सोडल्यापासून ते पक्के रंगायला साधरण २१ दिवसाचा काळ लागत असे. ते ओले राहण्यासाठी सतत त्यावर पाण्याचा मारा केला जात असे. ज्या ठिकाणी पाण्याचा डोह आहे तेथेच ही प्रक्रिया केली जात असे. कातडी रंगविण्याचे काम बारा महिने चालत असल्याने त्याला पुरेल एवढा मुबलक पाण्याचा साठा जवळ असणे गरजेचे असते म्हणूनच डोहाच्या शेजारी राहणाऱ्या लोकांना ढोर असे म्हटले जाई.[११] कच्चा चामड्यापासून मुलायम चामडे बनवणे या उद्योगास रंगी म्हणत. पूर्वी गावात बोकड कापले की लगेच ढोर समाजातील व्यक्तीला ते कातडे घेऊन जाण्यासाठी निरोप घ्यायचा. अनेक प्रक्रिया करून हे लोक ते कातडे मऊ बनवीत. नंतर एका फळीवर त्या कातड्याला पसरून त्यावर चिकटलेले मांस छिलून काढले जाते चामडे स्वच्छ केले जाते. जे मांस छिलून काढले जाते त्याला चाल म्हणतात. चांगल्या सालीचा वापर चिटकवण्यासाठी केला जातो तर खराब झाली पासून खत तयार केले जाते. तसेच गाय ,बैल, म्हैस, शेळ्या,मेंढ्या वासरांचे कातडे चुना लावून चार प्रकारच्या निरनिराळ्या कुंडीत भिजवायास ठेवले जाते. त्या चुन्याच्या कुंड्याना चुनाडी म्हणतात.कामासाठी बाबळीच्या शेंगा ,हिरडा ,बेहडा या वृक्षांची पाने ,साल यांचा वापर केला

जातो.[१२] प्रामुख्याने ही कामे महिला वर्गाच करीत असे म्हणजेच या व्यवसायात पुरुषा इतकीच महिलांचीही भूमिका मोठी होती.

**८) मोट व पखालीचा वापर:-** प्रामुख्याने पूर्वीच्या काळात ग्रामीण भागात वीज मोठ्या प्रमाणात नव्हती त्यामुळे मोट व पखालीचा वापर मोठ्या प्रमाणात होत होता. मोटेचा वापर शेतकरी शेताला पाणी देण्यासाठी करीत असे. त्यामुळे मोटेला प्रचंड मागणी असे. पखालीचा उपयोग पाणी वाहून नेण्यासाठी होत असे. पखाली तयार करताना अचूकपणा असणे गरजेचे होते कारण पखाल हे पाणी पुरवण्याचे एकमेव साधन होते. एकावेळी एका पखालीतून २०० लिटर पाणी नेता येत असे. त्यामुळे या व्यवसायाला महत्त्वाचे स्थान होते.[१३] पण कालांतराने ग्रामीण भागात वीज पोहोचली व पिण्याच्या पाण्यासाठी नळ योजना सुरू झाली त्यामुळे मोटेऐवजी विद्युत मोटारीचा वापर शेतीसाठी वाढला हो हा त्याचा मोठा फटका ढोर समाजाच्या पारंपरिक व्यवसायाला बसला. विजेचा वापर सुरू झाल्याने त्यांच्या व्यवसायाला उतरती कळा लागली कारखानदारी बंद पडण्यास सुरुवात झाली. कारखानदारी बंद पडल्याने समाजाची दिशाच बदलली अशी खंत अखिल कक्कया ढोर समाजातील बऱ्याच प्रतिष्ठित व्यक्तींनी व्यक्त केली आहे.

**९) ढोर समाजाचा सामाजिक दर्जा व अस्पृश्यता:-** भारतीय समाजरचनेच्या समाजव्यवस्थेमध्ये ढोर समाज स्वतःला महार व मांग यांच्यापेक्षाही श्रेष्ठ समजतो. महार व मांग समाजातील लोकही ढोर समाजाच्या हातचे जेवत नसत. खरंतर ढोर आणि चांभार या दोन्ही जाती चामडी व्यवसायाशी निगडीत आहेत. ढोर लोक कच्च्या चामड्यापासून पक्के चामडे बनवत घाणीचे काम करतात तर चांभार लोक तयार चामड्यापासून चप्पल तयार करण्याचे काम करतात. पण चांभार जातीतील लोकांना उच्चवर्णीयानकडून ढोर लोकांसारखी हीन दर्जाची वागणूक मिळाली नाही. ढोर समाजाचा व्यवसायामुळे गावातील शेतकरी व राजकीय लोक त्यांच्याजवळ जात पण उच्चवर्णीय लोकांपासून ते कायमस्वरूपी दूर राहिलेले दिसून येतात.[१४]

कातडी कमावण्याचे अत्यंत दुर्गंधीयुक्त काम ढोर समाज करीत असल्याने बरेच सवर्ण लोक त्यांच्या घरी सुद्धा जात नसत तसेच कातडी रंगवण्याचे काम करताना ढोर लोकांचे हात , नखे पूर्णपणे लाल रंगाची होत असत.चुन्याच्या पाण्यामध्ये काम करीत असल्याने त्यांना बरेच त्वचारोग होत असत. त्यामुळे त्यांच्या अंगाला उग्र वास येत असे.काही वेळा या लोकांची परिस्थिती चांगली असे पण बऱ्याचदा त्याला हलाखीचे दिवस काढावे लागत असत. बऱ्याचदा या समाजातील मुलांना शाळेत प्रवेश मिळत नसे मिळाला तर इतर विद्यार्थी त्यांना आपल्याजवळ बसवून घेत नसत कारण त्यांच्या अंगाला उग्र वास येत असे. शाळा शिकत ही मुले चामड्यावर पाणी घालण्याचे काम करीत असल्याने त्यांचे लाल रंगाचे पाणी अंगावर पडल्याने कपडेही लालसर होत असत. त्यामुळे त्यांना समाजाकडून अत्यंत हीन दर्जाची वागणूक मिळत असे. [१५] काळानुसार या समाजाने आधुनिकता स्वीकारली आहे त्यामुळे अन्य व्यवसाय व नोकरीकडे या

समाजातील युवा पिढीला वळावे लागले. त्यामुळे एकेकाळी कारखानदार असलेल्या हा समाज नोकरी व अन्न व्यवसाय करण्याशिवाय दुसरा पर्यायच उरला नव्हता यात शंकाच नाही.

**१०) ढोर समाजाच्या पोटजाती :-** ढोर समाजाचा साधारणपणे बुधलेकरी बंदेलखंडी, हिंदुस्तानी कक्कया, कर्नाटकी, खेतरफेडी, लिंगायत आणि मराठा अशा प्रकारचे एकूण आठ पोटभेद आढळतात. [१६] त्यांच्यामध्ये परस्पर रोटी व बेटी व्यवहार होत नाहीत या ८ पोटभेदापैकी लातूरमध्ये मराठी व कर्नाटकी हे २ भेद आढळतात.[१७] त्यापैकी बहुतांशी मराठी भाषिक ढोर आढळतात. साधारणपणे ढोर समाजात ३ महत्वाचे ढोर मानले जातात.१) बुधली ढोर- चामड्याच्या तेलाचे बुधली बनविणाऱ्या ढोरांना बुधली ढोर म्हणतात. २ ) खेटरे ढोर - जे ढोर लोक जुनी खेटर किंवा पादत्राणे दुरुस्ती करून त्यावर उपजीविका करतात खेटरे ढोर म्हणतात. ३) गाववाले ढोर- मूळ गावात राहणारे म्हणून त्यांना गाववाले ढोर म्हणतात.[१८]

**११) ढोर समाजाची लोकसंख्या (शासकीय आकडेवारी):-** सन १९५६ च्या एका शासकीय अहवालानुसार ढोर समाजातील जवळजवळ ६०% लोक त्यांच्या पिढीजात कातडी कमावणे या व्यवसायात व्यस्त होते.२००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील ढोर समाजाची एकूण लोकसंख्या ९०,२२६ एवढी आहे. त्यातील ६३,६०२ लोक शहरी भागात राहतात. तर २०११ च्या जनगणनेनुसार या समाजाची एकूण लोकसंख्या ही१,१६२८७ असून ८३,८६८ लोक शहरी भागात राहतात. सुरुवातीला समाजातील लोकांचा शिक्षणाकडे फारसा कल नव्हता.पण जेव्हा त्यांच्या पारंपरिक व्यवसायाला उतरती कळा लागल्यानंतर त्यांनी शहराची वाट धरली.शिक्षणामुळे आता या समाजातील युवा पिढी शासकीय नोकरी,खाजगी नोकरी, व्यवसायात दिसत आहे. मुलांच्या तुलनेत मुलींचेही शिक्षण नव्हते परंतु१९९० नंतर मुलींनीही शिक्षणामध्ये आघाडी घेतली आहे. पूर्वीपेक्षा या समाजात आता शिक्षणाचे प्रमाण वाढलेले आहे. कारखानदारीत महिलांचा वाटा असे त्यामुळे बालविवाहाचे प्रमाण या समाजात जास्त होते. पण काळ बदलला शिक्षणाकडे ओढा वाढल्यानंतर या समाजातील बालविवाहाची प्रथा संपुष्टात आली आहे. पूर्वी हा समाज प्रामुख्याने ग्रामीण भागात राहात असे.परंतु आता शिक्षण नोकरीच्या निमित्ताने हा समाज शहरी भागात मोठ्या प्रमाणात स्थिरावल्याचे दिसतो.[१९]

१९३१ च्या जनगणनेनुसार (Bombay & Central Provinces & Berar) ढोर व डोहर जातीची लोकसंख्या पुढीलप्रमाणे- ढोर - १८२७७, डोहोर -६६१६ एकूण २४८९३ २००१ च्या जनगणनेनुसार ढोर समाजातील एकूण लोकसंख्या व साक्षरतेचे प्रमाण.

| एकूण लोकसंख्या ढोर/डोहोर / कक्कया | एकूण पुरुष | एकूण महिला |
|---|---|---|
| ९०,२२६ | ४६,१३८ | ४४०८८ |

२००१ च्या जनगणनेनुसार ढोर समाजातील रोजगार संदर्भात सांख्यिकीय माहिती

| एकूण कामगार | दीर्घकालीन कामगार | अल्पकालीन कामगार |
|---|---|---|
| एकूण | २६,४९८ | ४,४३४ |
| पुरुष | १९,५२२, | २,०७८ |
| महिला | ६,९७६, , | २,३५६ |

**निष्कर्ष-** एकूणच जरी ढोर समाज हा संख्येने कमी असला तरी शैक्षणिक ,राजकीय क्षेत्रात या समाजातील लोक उच्च स्थानावर पोहोचलेले दिसून येतात. आज २१ व्या शतकात चामडे कमावीणे व रंगवणे हा व्यवसाय पूर्णपणे ठप्प झाल्याचे दिसते.त्यामुळे हातातील काम सुटल्याने ,बेरोजगारीचे प्रमाण वाढल्याने हा समाज मोठ्या प्रमाणात व्यसनाधीनतेकडे व अंधश्रद्धेकडे झुकलेला दिसतो. परंतु या लोकांमध्ये समाज संघटन मोठ्या प्रमाणात दिसून येते. हा समाज वधू-वर मेळाव्यात एकत्रित येताना दिसतो. एकत्र येऊन समस्या सोडवताना दिसतो. पण शासकीय योजनेचा फायदा घेण्याच्या बाबतीत हे लोक उदासीन असल्याचे दिसून येतात. पण तरीही हा समाज एकता, एक संघटन, मित्रत्वाची भावना टिकवून राहिल्याचे दिसून येते.

**संदर्भ साधन**

१. गर्गे स.मा.-भारतीय समाज विज्ञानकोश खंड २, समाज विज्ञान मंडळ ,शिवाजीनगर ,पुणे जानेवारी१९९१ पृ. क्र. ४७

२. तत्रैव पृ. क्र. ४८

३. २००१ चा जनगणना अहवाल

४. नांदेड गॅझेटियर भाग १ महाराष्ट्र शासन पृ. क्र.२७६

५. The Caste and Tribes of H.E.H.The Nizams Dominions by Syed Suraj Ul Hassan, Publication Jetly1920, page no 171

६. ढोर समाजाचे ज्येष्ठ नागरिक व चामडी उद्योगाचे उद्योगपती एम .आर .पोळ अँड कंपनी कोल्हापूर श्री. मधुकर रामचंद्र पोळ यांची प्रत्यक्ष मुलाखत. दिनांक- २७/०८/२०२०

७. दिव्य मराठी साप्ताहिक २०१७

८. गोविंद मंगेश कालेलकर:-मुंबई इलाख्यातील जाती, वरदा प्रकाशन १९२८, पृ. क्र.७५

९. भारती खरटमल:-गोल्डन रिसर्च थॉट इंटरनॅशनल जर्नल, ढोर समाजाची उत्पत्ती व विकास, ६ ऑक्टोबर २०१४

१०. उपरोक्त, मुलाखत श्री. मधुकर रामचंद्र पोळ

११. डॉ .सत्यवान शिंदे:-चर्मकार, सुगावा प्रकाशन , पुणे ,पृ. क्र.५०,५१.

१२. चामडी उद्योगाचे प्रसिद्ध उद्योगपती श्री.निरंजन कदम यांची प्रत्यक्ष मुलाखत २/१०/२०१८

१३. उपरोक्त, भारतीय खरटमल पृ.क्र.३

१४. उपरोक्त, मुलाखत श्री. मधुकर रामचंद्र पोळ.

१५. डॉ.सतीश खंदारे:- कसाचं पाणी, साहित्य अकादमी पुणे प्रकाशन, पृ.क्र.९७,९८.

१६. Encylopedia of India, Tribes and Caste Vol -6,Cosmo Publication, 2004, By S.M.CHANNA, PAGE NO 194

१७. लातूर गॅझेटियर महाराष्ट्र शासन पृ. क्र.१९४

१८. उपरोक्त डॉ. सत्यवान शिंदे ,पृ.क्र.५५

१९. महाराष्ट्र टाइम्स, औरंगाबाद आवृत्ती,२८ फेब्रुवारी२०१६

२०. महाराष्ट्र शासन, २००१ जनगणनेनुसार

२१. महाराष्ट्र शासन, २००१ जनगणनेनुसार

VOLUME - IX, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# १४. रत्नाप्पाण्णा कुंभार यांचे शैक्षणिक कार्य

**Dr. Madhuri Rajaram Khot**
Jayawant Mahavidyalay, Ichalkaranji.

**प्रस्तावना**

आधुनिक भारताच्या इतिहासात 'भारतीय स्वातंत्र्य चळवळ' ही घटना अत्यंत महत्वपुर्ण घटना असून १९४७ साली इंग्रजापासून भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानतंर भारताची राजकीय शैक्षणिक आर्थिक,सामाजिक व सांस्कृतिक विकासाच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. म. गांधीजीच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या व्यापक चळवळीत त्यांच्या पासून प्रेरणा घेवून अनेकांनी आपले आयुष्य देशासाठी खर्च केले. स्वातंत्र्योत्तर काळातही त्यांनी भारताच्या सर्वागीण विकासाच्या दृष्टिने जोरदार प्रयत्न सुरू झाले. परिणामी भारताची जडणघडण होण्याच्या दृष्टिने निश्चित दिशा प्राप्त झाली. यासाठी अनेक नेत्यांचे कर्तृत्व सिध्द झाले. त्यापैकीच एक खंबीर उदात्त थोर देशभक्त, कृषी औदयोगिक क्रांतीचे प्रणेते, शिक्षणतज्ञ म्हणून ओळखले जाणारे नेतृत्व म्हणजे रत्नापाण्णा कुंभार होत. त्यांचे शैक्षणिक कार्य पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार यांचे शैक्षणिक कार्य**

स्वातंत्र्यपूर्व काळात जसे स्वांतत्र्यलढयात भाग घेणे हे ऐतिहासिकदृष्टया महत्त्वाचे होते. तसेच स्वांतत्र्योत्तर काळातही भारताच्या सर्वागीण प्रगतीच्या दृष्टिने विविध प्रकारच्या संस्था निर्माण करणे व त्या कार्यक्षमपणे चालविणे या गोष्टींना महत्व प्राप्तझाले. देशाच्या विकासाच्या दृष्टिने प्रामाणिकपणे कार्य करणारा कार्यकर्ता देशाचे शक्तीस्थान बनले. भारताच्या विविध भागात निस्पृह व खबिंरपणे कार्य करणारे कार्यकर्ते निर्माण झाले. या कार्यकर्त्यांनी भारताचा विकास करणे हे उद्दिष्ठ समोर ठेवून आपआपल्या क्षेत्रात सामाजिक,शैक्षणिक,सांस्कृतिक,आर्थिक प्रगतीसाठी कार्य सुरू केले. अशा सर्वच क्षेत्रात रत्नाप्पाण्णा कुभांर यांनी आपले खूप मोठे योगदान दिले.

**रत्नाप्पाण्णा यांचे स्वातंत्र्यपूर्व काळातील कार्य**

स्वातंत्र्यपूर्व काळात रत्नाप्पाण्णा यांनी म.गांधीजीच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या स्वातंत्र्यचळवळीत सहभाग घेवून आपले असामान्य कर्तृत्व सिध्द करून जनसामान्यात आपले आदराचे स्थान निर्माण केले. १९२६ मध्ये मॅट्रिक व १९३३ मध्ये त्याने बी.ए. पहिले वर्ष पूर्ण केले. वकिलीचा अभ्यास करत असतानाच देशातील स्वातंत्र्यलढयाला उग्रस्वरूप प्राप्त झाले. कोल्हापूर संस्थानातील प्रजेवर संस्थांनी सरकार व ब्रिटिश सरकार यांची दडपशाही वाढत होती. रत्नाप्पाण्णांच्या मनात विद्रोहाची भावना निर्माण झाली. त्यामुळे वकीलाचे शिक्षण अर्धवट सोडून त्यांनी स्वातंत्र्यलढयात सहभाग घेतला.

ऑगस्ट १९४२ च्या छोडो भारत आंदलनात मुबंईच्या आझाद मैदानावर आपल्या सहकार्यासमवेत हजर राहून म.गांधीजीची भेट घेतली. म.गांधीजींनी छोडो भारताची घोषणा केली. मेळाव्यात घडणाऱ्या बारीक

सारीक गोष्टीवर इग्रंज पोलिसांचे लक्ष होते. त्याच रोजी म. गांधीजी व इतर प्रमुख कार्यकर्त्यांना अटक झाली. बाकीचे सर्व कार्यकर्ते स्वातंत्र्य मिळवण्याच्या ध्येयाने प्रेरित होवून आपआपल्या कार्यक्षेत्रात गेले. त्यात रत्नाप्पाण्णांचाही समावेश होता. त्यांनी आपल्या कुशल व अचूक निर्णयाव्दारे आपले कर्तृत्व दाखवले. [१]

या कार्यामुळे त्यांची भारतीय नेत्यातील एक प्रमुख नेता म्हणून गणना होवू लागली. त्याचा त्यांना भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही चांगला फायदा झाला व कोल्हापूरच्या एका मोठया कॉंग्रेस पक्षाचा कार्यकर्ता म्हणून महाराष्ट्रात उदयास आले. फार मोठे संघटक म्हणून त्यांची ओळख होवू लागली. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संस्थानांच्या विलीनीकरणातही त्यांचा फार मोठा वाटा आहे. १९४८ मध्ये कोल्हापूर संस्थान भारतात विलीन झाले. त्यानतंर कोल्हापूरचा प्रतिनिधी म्हणून भारतीय कॉंग्रेस नेत्यांनी आण्णांना पार्लमेंटवर घेतले. तेथूनच त्यांच्या राजकीय,सामाजिक व शैक्षणिक कार्यास खऱ्या अर्थाने सुरूवात झाली.[२]

**स्वातंत्र्योत्तर काळातील शैक्षणिक कार्य**

स्वातंत्र्योत्तर काळात रत्नाप्पाण्णांनी ग्रामीण विकासासाठी शेती,सरकार,शिक्षण या क्षेत्रात स्वत:ला झोकून देवून काम केले. त्यांसाठी त्यांनी कोल्हापूर जिल्हयाचा आराखडा तयार केला. एवढेच नव्हे तर समाज शिक्षणाचे ते अध्वर्यु ठरले.[३] स्वातंत्र्योत्तर भारतात शिक्षणातून नव्या निष्ठा, नव्या वाटा, नव्या आशा आकांक्षा, नव्या आस्था आपण निर्माण करत आहोत काय अशा प्रश्न त्यांना पडला होता. शिक्षणातून माणसातला 'नवा माणूस' रत्नाप्पाण्णानां हवा होता. त्यादृष्टिने त्यांनी शैक्षणिक कार्य हाती घेतले.

**सहकार चळवळ व शिक्षण**

स्वांतत्र्योत्तर काळात सहकारातून समाजपरिवर्तन व्हावे या विचाराने प्रेरित होवून त्यांनी सहकार चळवळीचा स्विकार केला आणि ग्रामीण भागाचा कायापालट करण्याचे कार्य हाती घेतले. अनेक सहकारी संस्थांची निर्मिती करून 'सहकारातून समृध्दीकडे' हे तत्व त्यांनी प्रत्यक्षात आणले. सहकारी संस्थानी आपल्या पंचक्रोशीचा सर्वागिंन विकास केला पाहिजे असे त्यांचे मत होते. या संदर्भात ते म्हणतात' प्रत्येक साखर कारखान्याने आपल्या परिसरातील गावाचा आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतीक विकास साधून संपूर्णपणे कायापालट घडवून आणला पाहिजे. साखर कारखाना हा शिक्षणाचे व संस्कृतीचे केंद्र बनला पाहिजे. साखर कारखान्याचे कार्य समाजाच्या जडणघडणीचे आहे. प्रत्येक साखर कारखाना आदर्श समाजाचा शिल्पकार म्हणून पूढे यावा.[४]

स्वातंत्र्यलढयात ज्या समर्पित भावनेने असीम त्यागाने व निष्ठेने त्यांनी स्वत:ला झोकून दिले. त्यांनी निष्ठेने व निष्कलंक चारित्र्याने व कर्तृत्वाने स्वातंत्र्यानंतर नवसमाज निर्मितीसाठी सहकार चळवळीचे नेतृत्व केले. कोल्हापूर व कोल्हापूर ही त्यांची कर्मभूमी होती. कोल्हापूर जिल्हात सहकारी चळवळीत ते आघाडीवर राहिले. त्यांच्या सहकारी कार्यक्षेत्रात पंचगंगा सहकारी साखर कारखान्याची निर्मिती व संचलन हे मध्यवर्ती शक्तीकेंद्र असून या साखर कारखान्याच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास करण्याचा प्रयत्न केला.[५] त्यासर्वच कार्याचा मुख्य उद्‌देश राष्ट्रहित हा होता.

**१. शिक्षणाबाबतचे विचार**

रत्नाप्पाण्णाचे शैक्षणिक कार्य त्यांच्या अन्य क्षेत्राइतकेच उल्लेखनीय व महत्वाचे आहे. स्वातंत्र्यासाठी भूमीगत होवून कार्य करण्याऱ्या आण्णांनी मिळालेल्या स्वराज्याचे सुराज्य निर्माण करण्यासाठी व ग्रामीण विकासासाठी सहकार्याचा मार्ग स्विकारला आणि आपल्या आचारविचार विषयक क ृतीतून लोकांमध्ये तो रूजविला सुसंस्कारीत समाज निर्माण केल्याशिवाय विकास साधणे म्हणजे केवळ वरवरची मलमपट्टी ठरेल या विचारातून शिक्षणसुधारणा करण्यावर त्यांनी भर दिला.'नही संस्कार,नही सहकार' हा त्यांचा शिक्षणाबद्दलाचा मंत्र होता.[६]

ग्रामीण जीवनाच्या विकासासाठी शिक्षणाला अनन्यसाधारण महत्व आहे. त्यासाठी 'गाव तेथे शाळा', 'गाव तेथे ग्रंथालय' व 'गाव तेथे मैदान' असलेच पाहिजे अशी त्यांची धारणा होती. प्रत्येक माणसाला वाचता आले पाहिजे, वाचलेले समजले पाहिजे. प्रत्येक खेडेगावातील अज्ञानाचे माळ फोडून नंदनवन निर्माण केले पाहिजे असे विचार त्यांनी २४ सप्टें १९७३ रोजी व्याख्यानातून स्पष्ट केले.

'माणसाने माणसांशी माणसाप्रमाणे वागावे' हे त्यांच्या भाषणातील धृपद होते. अशी माणूसकी निर्माण करण्याची प्रक्रीया अंत्यंत निकोपणाची व स्वाभाविक असली पाहिजे असे त्यांचे मत होते. माणूसकी असलेला माणूस राष्ट्रहिताची जोपासना समर्थपणे करेल असा त्यांचा विश्वास होता[७]

**२. राष्ट्रीय शिक्षणाचे महत्व**

राष्ट्रीय शिक्षणावाचून सर्व व्यर्थ आहे असा विचार म. गांधीजीनी सर्वाच्या मनावर बिंबविला होता. तो वारसा रत्नाप्पाण्णांनी पुढे चालविण्यासाठी फार मोठे कष्ट घेतले. शिक्षणातून आपली राष्ट्रीय भावना बळावत गेली पाहिजे. व राष्ट्रीय ऐक्याच्या धाग्याने सर्वाची मने बांधली पाहिजेत तरच आपण स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी देशाच्या विकासाचे जे मनोरथ बाळगले होते ते सिध्दीस जातील असे त्यांचे मत होते. त्यांनी विचार मांडले व कृतीतही आणले. पंचगंगा परिसरातील शंभर गावच्या शैक्षणिक,सांस्कृतिक व सामाजिक विकासाचे कार्य त्यांनी केले

**३. विविध शिक्षण संस्थाची उभारणी —**

१. कॉन्सिल ऑफ एज्युकेशन — १७ फेब्रुवारी १९५१
२. नाईट कॉलेज ऑ कॉमर्स — जुन १९७४
३. कॉलेज ऑफ कॉमर्स,कोल्हापूर — १९५७
४. शहाजी कायदा विद्यालय — १९५१
५. माध्यमीक शाळा सांगाव, जि. कोल्हापूर — १९६०
६. विद्यार्थी वसतीगृह, कोल्हापूर — १९७८
७. गुरूदेव गोरोबा स्मारक समिती
अध्यक्षच्या माध्यमातून हायस्कुल प्राथमिक शाळा —१९६९
व शिशू विहाराची स्थापना केली. (नवाकाळ १ ऑगस्ट १९९५)

**सदंर्भ**

१. कुलकर्णी आ.बा. — नवरत्न ७७ स्मरणिका, संपादक— हिंदूराव वाझे,१९८६

२. चौगुले रंगराव — उपरोक्त

३. कुभांर प्रकाश— चरित्र ग्रंथमाला, स्वातंत्र्यसेनानी क्रांतीवीरदेशभक्त डॉ. रत्नाप्पाण्णा कुंभार प्रकाशक— श्रमिक प्रतिष्ठान कोल्हापूर सप्टें २०१४

४. शिंदे अरूण—

५. वाझे प.हि. — उपरोक्त

६. पायगुडे प्रकाश — आमचा प्रतिनिधी, सप्टे १९९३ संपादकिय,संपादक प्रकाश पायगुडे

७. भगत रा.तू. — हे कुंभ अमृताचे, प्रकाशक — बाबा पाटील १२ जून

८. कित्ता पृ.१०

VOLUME - IX, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# १५. सहकारी संस्थांचा संस्थापक : देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार

**प्रा. डॉ. पाटील संगीता संपत**
आर्टस कॉमर्स आणि सायन्स कॉलेज पलुस.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताची कृषी–औद्योगिक विकासाच्या दृष्टीने वाटचाल सुरू झाली. केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी सहकाराच्या माध्यमातून विकास करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी अनेक सहकारी साखर कारखाने, सुतगिरण्या, बॅका, दुग्धसंस्था, वस्तुभांडारे यासारखे अनेक सहकारी उद्योगधंदे सुरू करून एक सहकारी चळवळच सुरू केली. या धोरणामुळे प्रामुख्याने ग्रामीण भागातील सर्वसामान्यांचे जीवनमान सुधारण्यास मदत झाली. सहकाराच्या माध्यमातून आपला विकास साध्य करण्यासाठी संपुर्ण भारताच्या ग्रामीण भागातील लोकांनी हातभार लावून आपापल्या भागाचा विकास घडवून आणला. महाराष्ट्रही त्याला अपवाद नव्हता. याउलट सहकार चळवळ महाराष्ट्रात मोठ्या जोमाने सुरू होवून ती रूजली. त्यासाठी अनेक नेत्यांचे अथक व अविश्रांत परिश्रम कारणीभूत ठरले. त्यापैकीच महाराष्ट्राला लाभलेले एक उत्तुंग व्यक्तिमत्व म्हणजे देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार हे होत. त्यांनी उत्कट देशप्रेमाने भारावून स्वातंत्र्यपूर्व काळातही व स्वातंत्र्यानंतरही आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा निर्माण करून आपले नाव अजरामर केले. 'सहकार संस्थाचा संस्थापक' म्हणुन त्यांच्या कार्याचा ऐतिहासिक मागोवा पुढीलप्रमाणे घेण्याचा प्रयत्न करीत आहे.

कट्टर गांधीवादी पं.नेहरू वल्लभभाई पटेल, लालबहाद्दुर शास्त्री यांचे निस्सीम भक्त, सर्व वरिष्ठ नेत्यांचे चाहते, आपल्या कार्यामुळे लहानपणापासुन थोरांपर्यंत आदराचे स्थान निर्माण केलेले, हाडाचे समाजसेवक, स्वातंत्र्यवीर, आदर्श शासनकर्ते आणि सहकार चळवळीचे अर्ध्वयू असलेले रत्नाप्पाण्णा कुंभार यांचे सहकार क्षेत्रातील कार्य अतुलनीय आहे. संपुर्ण महाराष्ट्र त्यांना देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार म्हणुन ओळखतो. त्यांच्या कार्याचे महत्वाचे दोन कालखंड पडतात. एक स्वातंत्र्यपूर्व कालखंड व दुसरा स्वातंत्र्योत्तर कालखंड. या दोन्ही कालखंडात त्यांनी कार्य केले.

**पुर्ववृत्तांत**

कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील निमशिरगाव या खेड्यात 15 सप्टेंबर 1909 इ.रोजी जन्म झालेल्या रत्नाप्पांण्णांनी आपले प्रारंभीचे प्राथमिक शिक्षण आपल्या गावात म्हणजे निमशिरगांव येथे घेतले. माध्यमिक शिक्षण हातकणंगले येथे घेतले. मुळातच कुशाग्र बौध्दिक क्षमता व शिक्षणाची आवड असलेल्या रत्नाप्पाण्णांना त्यांच्या वडिलांनी पुढील शिक्षणासाठी कोल्हापूरला पाठविले. राजाराम महाविद्यालयात त्यांनी बी.ए. चे शिक्षण पुर्ण केले. तेथे त्यांना वसतीगृहात प्रवेश मिळाला. जिद्द व कष्टाळू वृत्ती यामुळे तेथे त्यांना कोल्हापूर दरबारची शिष्यवृत्ती मिळू लागली.मिळणाऱ्या शिष्यवृत्तीची जाणीव ठेवून त्यांनी मन लावून अभ्यास केला. एखादी संघटना व चळवळ निर्माण होत असेल तर उपजत नेतृत्व गुण असलेली व्यक्ती नेतृत्व करायला पुढे सरसावते, तेच आण्णांच्या बाबतीत घडले. विद्यार्थी दशेतच सामाजिक व राजकीय नेत्यांशी त्यांचा संबंध आल्यामुळे विद्यार्थी आंदोलनाचे नेतृत्वाचा पाया

घातला. 1930 सविनय कायदेभंग चळवळीत स्वदेशीचा पुरस्कार, परदेशी मालाची होळी अशा कार्यक्रमात विद्यार्थ्यांना समाविष्ठ करून घेवून भारतीय स्वातंत्र्य यूध्दात पहिले पाऊल टाकले. एल्.एल्.बी. च्या पहिल्या वर्षात 1933 मध्ये प्रवेश घेतला. पण कोल्हापूरचे भाई माधवराव बागल या राष्ट्रीय चळवळीतील कार्यकर्त्यांशी त्यांचा संबंध आल्यानंतरच त्यांनी आपले शिक्षण अर्धवट सोडून स्वातंत्र्य लढ्यात व सामाजिक चळवळीत भाग घेतला. तो वसा त्यांनी त्यांच्या आयुष्याचा शेवटच्या क्षणापर्यंत अविरतपणे पाळला. प्रजापरिषद चळवळ, चलेजाव आंदोलन, भूमिगत चळवळीत त्यांनी सक्रीय सहभाग घेतला. त्यावेळी म.गांधीजींनी सर्व भारतीयांना इंग्रजांविरूध्द तीव्र लढा देण्याचे आवाहन केले. दक्षिण मुंबई राज्याचे प्रमुख केंद्र म्हणून कोल्हापूर होते. त्यात म.गांधींजींचे अनुयायी म्हणून रत्नाप्पाण्णा अग्रेसर होते.[1] ब्रिटीश यंत्रणा उखडून टाकण्यासाठी तुरूंगात अडकुन न बसता भूमिगत होऊन केलेल्या त्याच्या कार्याला तोड नाही. त्यांना पकडण्यासाठी ब्रिटीशांनी जंगजंग पछाडले, याबरोबरच त्यांना पकडून देणाऱ्यास हजारो रूपयांचे बक्षीस जाहीर केले. पण ब्रिटीशांना यश आले नाही.[2] यावेळी त्यांचे नेतृत्व ताऊन सुलाखून निघाले.

**स्वातंत्र्योत्तर कालखंडातील कार्य**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वतंत्र भारतापुढे अनेक आर्थिक, सामाजिक ,प्रादेषिक प्रश्न निर्माण झाले. या नेत्यांपुढे फार मोठे आव्हान होते. त्या आव्हानांना यशस्वीपणे ते सामोरे गेले. त्यापैकी संस्थानांच्या विलीनीकरणाचा प्रश्न भारतापुढे आवासून उभा राहिला. भारताच्या संघराज्यात संस्थानांचे विलीनीकरण व्हावे यासाठी रत्नाप्पाण्णांनी जो लढा दिला व यशस्वी केला, त्याबद्दल त्यांना दक्षिणेचे वल्लभभाई अशी पदवी मिळाली.

**राजकीय कार्य**

त्यांच्या असामान्य कर्तृत्वामुळे देशपातळीवरील नेत्यांनी त्यांच्या कार्याची दखल घेऊन पहिल्या पार्लमेंटचे सदस्यत्व त्यांना मिळाले. या दरम्यान देशाची घटना तयार करण्यासाठी घटना समिती नेमली गेली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकराकडुन तयार झालेल्या घटनेच्या पहिल्या प्रतीवर त्यांची स्वाक्षरी करण्याचा बहुमान पार्लमेंटचे सदस्य या नात्याने त्यांना मिळाला.[3] यावरून त्यांचे देषासाठी असलेले कार्य किती मोठे होते हे लक्षात येते.

**शैक्षणिक कार्य**

कृषी औद्योगिक क्रांतीचे प्रणेते म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रत्नाप्पाण्णांनी कृषी, शेती व सहकार क्षेत्रात कार्य केले. बालकापासून वृध्दांपर्यंत ते स्वातंत्र्यसैनिकापासून ग्रामीण जनतेच्या हिताकडे लक्ष दिले. बालशिक्षणाच्या हिताकडे विशेष लक्ष पुरविले. 'आधी पाया मग कळस' असे ते बालशिक्षणाबाबत म्हणत. बालवाडी शिक्षणाची फार मोठी गरज त्यांनी दाखवून दिली. समाजाच्या विकासाच्या दृष्टीने त्यांनी विधायक व रचनात्मक आखणी केली व या कार्यात ते सतत मग्न राहिले.महाविद्यालयीन, उच्च माध्यमिक,माध्यमिक,प्राथमिक,बालवाडी,वसतीगृहे,वाचनालये यांची निर्मिती केली.

**सहकार चळवळीचे अग्रदूत**

सहकार चळवळीचे अग्रदूत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रत्नाप्पाण्णा कुंभार यांनी अनेक सहकारी संस्थांची स्थापना केली. त्याबरोबरच इतरही अनेक सहकारी संस्थांचे ते पदाधिकारी व मार्गदर्शक होते. या प्रत्येक ठिकाणी त्यांनी आपल्या कार्य कर्तृत्वाचा ठसा उमटविला.

कोणतीही संस्था स्थापन करण्यापुर्वी तिच्या उभारणीचे चित्र त्यांच्या डोक्यात असे त्याचा सखोल अभ्यास व सर्वांगीण माहिती गोळा करून ते प्रत्यक्ष कामकाजास सुरूवात करत. पध्दतशीर, शिस्तबध्द, काटकसरी व जनताभिमुख धोरणाचा ते अवलंब करत. संस्था चालविणारी माणसे त्यांनी निर्माण केली. त्यांनी विणलेले कार्यकर्त्यांचे जाळे राज्यभर पसरलेले आहे. शेतकरी कामगार यांचे जीवन सुखी व्हावे म्हणून त्यांनी अनेक योजना राबविल्या व सहकारी संस्थांची त्यांनी निर्मीती केली[४]. त्यापैकी श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना गंगानगर जि.कोल्हापूर, दि पिपल्स को.ऑप. बॅक लि., इचलकरंजी, जि.कोल्हापूर, कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सहकारी सुतगिरणी, रत्नाप्पाण्णा कुंभार नगर व कोल्हापूर जनता सेंट्रल को. ऑप.कंझुमर स्टोअर लि. कोल्हापूर या सहकारी संस्थांचा ऐतिहासिक मागोवा पुढीप्रमाणे सांगता येईल.

स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या आर्थिक जडणघडणीचे ऐतिहासिक पर्व सुरू झाले. स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य लढ्यात भाग घेणे महत्वाचे होते. तसेच स्वातंत्र्योत्तर काळात देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी कृषी औद्योगिक विकास साध्य करणे व त्यासाठी निर्माण झालेल्या संस्था पुर्ण कार्यक्षमतेने चालविणे या गोष्टींना महत्व प्राप्त झाले. सहकाराच्या माध्यमातून अनेक संस्थांची निर्मीती रत्नाप्पाण्णा कुंभार यांनी करून सामाजिक, सांस्कृतिक, औद्योगिक, शैक्षणिक व आर्थिक विकास करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे ते कृषी औद्योगिक क्रांतीचे प्रणेते म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात ओळखले गेले. त्यांच्या कार्याचा यासाठी गौरव करून सन्मान करण्यात आला.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर रत्नाप्पाण्णांनी स्वतःला पुर्णपणे विधायक कार्यात वाहून घेतले. सहकाराच्या माध्यमातून कृषी औद्योगिक क्रांती यशस्वी करण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

**श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना –गंगानगर इचलकरंजी**

1953 मध्ये पंचगंगा सहकारी साखर कारखान्याची मुहूर्तमेढ रोवली. हा कारखाना कोल्हापूर जिल्ह्याच्या विकासाचा गंगोत्री ठरला.

शेती आणि ग्रामोद्योग विकास हा मुलमंत्र स्विकारून रत्नाप्पाण्णांनी साखर कारखान्याद्वारे हरितक्रांती घडविली. सहकारी संस्थामधुन होणाऱ्या नफ्याचा आर्थिक वाटा सर्व स्तरावरील जनतेला मिळावा म्हणून त्यांनी कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील 102 गावात शिक्षणसंस्था, तालीमसंस्था, बालवाड्या, हरिजन तक्के, क्रीडांगणे, महिला मंडळ, समाज मंदीरे, वाचनालये यासारख्या संस्थांना लाभ मिळावा म्हणून काही भरीव योजना आखल्या. आणि त्या कार्यान्वित केल्या. परिणामी या गावातील सामान्य माणसांचा व गरीब शेतकऱ्यांच्या जीवनाचा कायापालट झाला[५].

श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना म्हणजे रत्नाप्पाण्णांच्या कार्यकर्तृत्वातून उभारलेले एक विकासाचे स्थान आहे. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी होत असलेले कार्य गौरवास्पद आहे. रत्नाप्पाण्णांनी कृषी औद्योगिक योजना सत्यात उतरविण्यासाठी नियोजनबध्द विकास करताना त्याचा चांगला परिणाम व्हावा यासाठी देशाचे नियोजन शेतीप्रधान, ग्रामाभिमूख व श्रमप्रधान होणे आवश्यक आहे. देशातील 80 जनता ग्रामीण भाग हा देशाचा कणा असून शेती व्यवसाय वाढला तर देशाची प्रगती होईल हे ध्येय समोर ठेऊन रत्नाप्पाणांनी आपली वाटचाल सुरू केली.

**स्थापना व विकास**

सहकाराच्या माध्यमातून शेती विकासाच्या योजना ठरवून कोल्हापूर जिल्ह्यात हातकणंगले तालुक्यातील कबनुरच्या फोंड्या माळावर श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना उभारला गेला. 27 ऑक्टोबर 1954 पासुन शेअर

विक्रीस सुरूवात केली. अत्यंत खडतर पण जोमाने कारखाना उभारणीसाठी भांडवल जमा केले. सहकारी तत्वावर उभा राहणाऱ्या या कारखान्यासाठी ग्रामीण भागातील सामान्य शेतकरी असावा हे ध्येय होते. यासाठी अथक परिश्रमातून ते काम पूर्ण केले. लवकरच शासनाकडून इंडस्ट्रीयल लायसन्स मिळवून घेतले. या कारखान्याचा गळीत हंगाम 1 नोव्हेंबर 1959 रोजी सुरू झाला.

ऊस उत्पादन वाढावे, शेतकरी, कामगार, ग्रामीण जनता याचे जीवनमान उंचावे यासाठी कारखान्यामार्फत अनेक योजना राबविण्यात आल्या. त्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1. उपसा जलसिंचन–प्रांरभीच्या काळात काही मोजकेच शेतकरी ऊसपीक घेत होते. सामान्य शेतकऱ्यांची इच्छा असुनही यापासुन त्यांना वंचित रहावे लागे. यावर उपाय म्हणून आण्णांनी उपसा जलसिंचन योजना सुरू केली. याचा आदर्श घेऊन महाराष्ट्रातील इतर कारखान्यांनी ही योजना सुरू केली. म्हणून उपसा जलसिंचन योजनेचे शिल्पकार म्हणून रत्नाप्पाण्णा ओळखले गेले. कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील 102 गावात उपसा जलसिंचन योजना सुरू केली. सामान्य शेतकऱ्यांना याचा चांगलाच फायदा होऊनसामान्य शेतकऱ्यांची शेती ओलिताखाली येऊन तो ऊसपीक घेऊ लागला. परिणामी कारखान्याकडे ऊसाचा ओघ वाढला.
2. ऊस विकास योजना–कारखान्याच्या ऊस उत्पादक सभासदांना उत्पादन वाढीसाठी व संवर्धनासाठी चांगले मार्गदर्शन व्हावे व सवलतींचा लाभ घेता यावा यासाठी ऊस विकास योजना विभाग सुरू केला. या माध्यमातून अनुदान व सबसिडी ऊसाचे बियाणे, हिरवळीचे खत, पीकसंरक्षण, तुषार ठिबक योजना, शेती अवजारे व खते याबाबत शेतकऱ्यांचे प्रबोधन करण्यात आले. याचे अनुकरणही अनेक कारखान्यांनी केले.
3. 20 कलमी योजना–1975 मध्ये इंदिरा गांधी यांनी 20 कलमी योजना जनसामान्यांच्या कल्याणासाठी सुरू केला. ती यापूर्वीच रत्नाप्पाण्णांनी सुरू करून औद्योगिक क्रांतीबरोबरच लोकशाही समाजवादी समाजरचना यशस्वी करण्याचा प्रयत्न केला होता.

   या कारखान्याने आर्थिक प्रगतीबरोबरच सर्वसामान्यांसाठी सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक विकासासाठी भरीव कामगिरी केली. यासाठी 1995 अखेर कारखान्याने जवळजवळ 8 कोटीपेक्षा जास्त खर्च केला.
4. कामगार योजना–या कारखान्यातील कामगार हा एक जबाबदार घटक मानुन त्याच्यासाठी नियोजनबध्द कार्यक्रम आखले. त्याच्यासाठी सोईसुविधा निर्माण केल्या.
5. ऊस उत्पादक–ऊस उत्पादकांनाही ऊसाचा उच्चांक दर देण्यात हा कारखाना अग्रेसर होता.[6] पंचगंगा सहकारी साखर कारखान्यामुळे याविभागातील षेतकरी ,कामगार व सर्वसामान्य लोकांचा विकास होण्यास फार मोठी मदत झाली.तसेच आर्थिक,सामाजिक,षैक्षणिक बदल जाणवू लागला.

2. दि पीपल्स को.ऑपरेटिव्ह बॅक लि., इचलकरंजी जि.कोल्हापूर–इचलकरंजी शहरातील तसेच या उद्योगाचे अनुषंगाने सामान्य व गरीब लोकांचे छोट्या मोठ्या उद्योगास अर्थसहाय्य करून ते वाढीस लावण्याच्या हेतूने रत्नाप्पाणांच्या नेतृत्वातून या बॅकेची उभारणी करण्यात आली.

**स्थापना व विकास**

21 डिसेंबर 1962 रोजी या बॅकेची स्थापना इचलकरंजी, जि.कोल्हापूर येथे करण्यात आली. लवकर या बॅकेच्या शाखा काढण्यात आल्या. श्री पंचगंगा सहकारी साखर कारखान्याचे ऊस उत्पादक सभासद, बिगर सभासद, कारखान्याचा कामगार वर्ग व त्या अनुषंगाने गरजू लोकांना विविध आर्थिक समस्या सोडविण्यासह या बॅकेच्या माध्यमातून चांगले साधन उपलब्ध झाले. या बॅकेकडून इचलकरंजीत यंत्रमागधारक, कारखानदार, लहान व्यापारी, सामान्य कारागीर यांच्या व्यवसायाच्या दृष्टीने गरजेनुसार आर्थिक पुरवठा केला जाऊ लागला. आणि बॅकेचे काम गतीमान झाले. कालांतराने या बॅकेचे कार्यक्षेत्र  इचलकरंजीपुरते मर्यादित न ठेवता व्यापक करण्यात आले. महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ व खादी कमिशन यांनी मंगलोरी कौले तयार करण्याऱ्या कारखान्याचा मसुदा तयार केला. बॅकेने याचा अभ्यास करून संबंधित दूर्बल घटकांसाठी शेअर्स खरेदी करणेसाठी बॅकेचे अर्थसहाय्य केले. त्यामुळे एक मोठा उद्योग मिळून जिल्ह्यात मंगलोरी कौले तयार करण्याचा कारखाना उभारणीसाठी या बॅकेचे योगदान मिळाले.

या बॅकेच्या उभारणीत व प्रगतीत रत्नाप्पाण्णांचे नेतृत्व सलगपणे व सातत्याने लाभले. त्यांचे मार्गदर्शन बॅकेला अखंडपणे मिळाले. [7]

**3. कोल्हापुर जनता सेंट्रल को ऑप. कंझुमर स्टोअर लि. कोल्हापूर.**

ग्राहकांना जीवनावष्यक वस्तुंचे भेसळविरहीत व योग्य वितरण वाजवी दरात व्हावे आणि उत्पादक व ग्राहक यांच्यातील दरी कमी व्हावी यासाठी रत्नाप्पाण्णा कुंभार यांनी कोल्हापुर जनता सेंट्रल को ऑप. कंझुमर स्टोअर लि. कोल्हापूर या संस्थेची स्थापना दि.24 जाने. 1963 रोजी केली.या संस्थेने षहराच्या निरनिराळया भागात स्वस्थ धान्य दुकाने, रास्त कापड, साखर,सिमेंट आणि अत्यंत आणीबाणीच्या वेळी षासनास वितरण व्यवस्थेत मदत करण्याचे उदात्त धोरण राबविले होते.

ग्राहकाच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी असा कोणताही कायदा नव्हता.ग्राहकाना सर्व जीवनावष्यक वस्तू एका ठिकाणी रास्त दरात मिळाव्या यासाठी 7 सप्टेबर 1980 मध्ये रूईकर कॉलनी येथे या संस्थेच्या वतीने जनताबझारची स्थापना करण्यात आली.तत्कालीन सहकार मंत्री एस्.एन्.देसाई यांच्या हस्ते यांचे उद्घाट्नझाले. सुटसुटीत बिलाची पध्दत,योग्य वजनाचा आणि योग्य किंमतीचा दर्जेदार व दैनंदिन गरजेच्या वस्तू स्वंयसेवा पध्दतीने विक्रीची सोय ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात आली.

7 सप्टेबर 1981 रोजी वरूणतीर्थ येथे व राजारामपुरी येथे 15 सप्टेबर 1995 जनता बझारच्या षाखा स्थापन करण्यात आल्या. कॅास्मेटिक,इलेक्ट्रिक,औषधे, भांडी,रॉकेल,अन्नधान्य व विविध वस्तुंची येथे विक्री होऊ लागली.

ग्राहकांची उत्तम सेवा व्हावी आणि षहराच्या आसपासच्या खेडेगावातील लोकाना याचा लाभ व्हावा यासाठी हे कार्य या संस्थेने केले.या संस्थेच्या उभारणीत व विकासात रत्नाप्पाण्णा कुंभार यांचे योगदान खूप मोठे आहे.[8]

**4. कोल्हापूर जिल्हा ष्येतकरी विणकरी सहकारी सुत गिरणी लि. रत्नाप्पाण्णा कुंमारनगर इचलकरंजी.**

रत्नाप्पाण्णा कुंभार यांच्या पुढाकाराने 1969 मध्ये कोल्हापूर जिल्हा ष्येतकरी विणकरी सहकारी सुत गिरणी लि.इचलकरंजी या सहकारी संस्थेची स्थापना करण्यात आली. इचलकरंजी ष्हराच्या परिसरात जयसिंगपूर ,कुरूंदवाड,हुपरी,रेंदाळ,वडगाव ही गावे कापसाच्या उत्पादनासाठी प्रसिध्द होती.कापुस पिंजून त्याचे सुत काढून

हातमागावर विणून त्याचे कापड तयार करणे हा येथील लोकांचा मुख्य व्यवसाय होता.षहरी विणकऱ्यांमध्येसहकारी संघ नसलेल्या कापुस पिकविणाऱ्या षेतकरी व विणकरी यांना अनेक अडचणी येत होत्या.त्यातुनच या संस्थेची निर्मिती झाली.

षेतीबरोबर उद्योगधंदे नफ्यात चालावा यासाठी उपसाजलसिंचन योजनामार्फतपाणी पुरवठ्याच्या सोई उपलब्ध करून देण्यात आल्या.श्री पंचगंगा सहकारी साखर कारखान्याच्या वतीनही काही सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.एकच पीक पुन्हा पुन्हा जमीनीत घेतल्यामुळे जमीनीचा कस कमी होतो तो होऊ नये यासाठी कापसाचे उत्पादन घेण्यास प्रोत्साहन देण्यात आले साखर कारखान्याचा एक अविभाज्य घटक म्हणून या सुत गिरणीची उभारणी करण्यात आली.

सामान्य लोकांसाठी सामान्य लोकांनी निर्माण केलेली भारतातील ही पहिलीच गिरणी षेतकरी व विणकरी यांच्या मालकीची होती.[9]

5. विविध सहकारी संस्थाचा पदभार–सहकारी संस्थांच्या उभारणीमध्ये दे. रत्नाप्पाण्णा कुंभार व्यासंग व अनुभव फार मोठा होता.एखादी सहकारी संस्था स्थापन करण्यापुर्वी त्यांचे मार्गदर्षन घेण्यासाठी महाराष्ट्रातुन अनेकजण त्यांच्याकडे येत असत.

अनेक सहकारी संस्थांच्या विविध पदांची जबाबदारी सांभाळत त्याचा लाभ त्या त्या सहकारी संस्थेला घेता आला.

1. श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि., गंगानगर, इचलकरंजी चेअरमन
2. कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सहकारी सूतगिरणी लि., रत्नाप्पाण्णा कुंभार नगर, इचलकरंजी – संस्थापक व डायरेक्टर
3. पीपल्स को.ऑप. बॅक लि., इचलकरंजी – संस्थापक व डायरेक्टर
4. डेक्कन शूगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन पूणे – माजी अध्यक्ष
5. शिरोळ तालुक्यातील सहकारी तंबाखू खरेदी–विक्री संघ लि., जयसिंगपूर – डायरेक्टर
6. कोल्हापूर जनता सेंट्रल को.ऑप. कंझुमर्स लि., कोल्हापूर – संस्थापक डायरेक्टर
7. इचलकरंजी सेंट्रल को.ऑप. कंझुमर्स स्टोअर्स लि., कोल्हापूर – संस्थापक व डायरेक्टर
8. कोल्हापूर डिस्ट्रीक्ट खादी ॲण्ड व्हिलेज लि., कोल्हापूर – संस्थापक व डायरेक्टर
9. महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन लि., मुंबई – माजी अध्यक्ष
10. नॅशनल फेडरेशन को.ऑप. शुगर फॅक्टरीज दिल्ली – माजी डायरेक्टर
11. कोल्हापूर ॲल्युमिना इंडस्ट्रीज प्रा.लि– चेअरमन
12. भारतीय साखर उद्योग निर्यात महामंडळाच्या मुंबई रिजनल कमिटीचे सदस्य[10]

**समारोप**

रत्नाप्पाण्णा हे सहकारी क्षेत्रातील एक महत्वाचे व्यक्तिमत्व होते. त्यांच्या विचारांचे व कार्याचे राज्यातील सहकार चळवळीला बळकट अधिष्ठान व अनेक पिढ्यांना मार्गदर्शक ठरावे असेच आहे. असे रत्नाप्पाण्णा कुंभार हे एक स्वयंभू नेते, जन्मजात राष्ट्रीय बाण्याचे विधायक कार्यकर्ते व कुशल संघटक होते. खंबीर शासनकर्ते अव्वल

दर्जाचे लोकसेवक होते. देशसेवा व लोकसेवा हे त्यांचे ब्रीद होते. मंत्रीमंडळात त्यांना गौरवाचे स्थान मिळाले. मंत्रीमंडळास व शासनास शोभा आणणारे कार्य त्यांनी केले. संपुर्ण जिल्ह्यात एक चेतना निर्माण केली. सर्व विकास योजना मुर्त स्वरूपात आणल्या. लोकसंग्रहाची एक देणगीच त्यांना मिळाली. आपल्या या नेत्यांवर जनतेचे अपार प्रेम होते. अशा या थोर नेत्याचे महानिर्वाण 23 डिसेंबर 1998 रोजी झाले.

आपल्या सहकारी चळवळीच्या यशस्वीतेबद्दल रत्नाप्पाण्णा कुंभार म्हणतात की, ''सहकाराचे व्रत अंगिकारल्यापासुन मी कुणाचाही तिरस्कार केला नाही. व्यक्तीच्या नेतृत्वापेक्षा सामुहिक नेतृत्व अधिक चांगले असले पाहिजे. कारण समाजवादाकडे जाणारी लोकशाही बळकट करण्याचे कार्य सहकारी चळवळीद्वारेच होऊ शकेल. जिथे कोणत्याही प्रकारची पिळवणूक होत नाही. तो समाजवाद हा समाजवाद सहकारातून साध्य होईल. सहकारी पध्दती ही समाजवाद आणि भांडवलशाही मधील व्यवस्था आहे. सहकारी अर्थव्यवस्थेमध्ये पिळवणुक नसते आणि व्यक्तिगत स्वातंत्र्यास तडे जात नाहीत हे खरे आहे.''

**संदर्भसुची**

1. पायगुडे प्रकाश :— आपला प्रतिनिधी 1993, संपा. प्रकाश पायगुडे प्रतिनिधी प्रकाशन, पुणे सप्टे. 1993 पृ. 18.
2. कित्ता पृ.21.
3. कित्ता पृ.21.
4. वाले एम.आर.— एक बाणेदार जीवन, साप्ताहिक, अमरज्योत, संपादक एम.आर.उलंगे, 1976 दे.भ. रत्नाप्पाण्णा कुंभार गौरव विशेषांक पृ.9.
5. गारगोटे कुंभार — पंचगंगेचा सुपूत्र आ. प्रतिनिधी सप्टे. 1993, संपा. प्रकाश पायगुडे, प्रतिनिधी प्रकाशन, पुणे पृ.42.
6. मोरे बी.बी.— युगारंभ 25 सप्टे. 1995, रत्नाप्पाण्णा कुंभार, विशेषांक पृ.31.
7. दानोळे बी.एम. — क्रीडा सहकार रत्न, रत्नाप्पाण्णांच्या 76 व्या वाढदिवसानिमित्त, सप्टे. 1985 पृ. 34.
8. बुवा एन्.बी.—जन.मॅनेजर,कोल्हापूर सेंट्रल को.ऑप.कंझुमर स्टो. लि.दे.भ. रत्नाप्पाण्णा कुंभार कला व क्रीडा ट्रस्ट कोल्हापूर ,कला व क्रीडा रत्न पृ.37.
9. होन्नायक के. बी.—कथा एका मानवाची,दे. रत्नाप्पाण्णा कुंभार यांचे जीवनचरीत्र पृ.52,53.

१०. दिव्यध्वनी — दे.भ.पद्मश्री डॉ.रत्नाप्पाण्णा कुंभार, विशेषांक — 93 पृ.33.

VOLUME - IX, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# १६. नव्या पिढीची प्रेरणा : श्रीमती शांताबाई यादव

**डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
इतिहास विभागप्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज.

**प्रस्तावना**

विज्ञानाच्या प्रगतीरूपी लाटेवर स्वार होवून वाटचाल करणाऱ्या नव्या पिढीची, जुन्या पिढीतील संस्कारात वाढलेली शांताबाई यादव प्रेरणा कशी होवू शकते, असा प्रश्न पडत असला तरी, वास्तवात शांताबाई यादव या खऱ्या अर्थाने नव्या पिढीची प्रेरण आहेत. स्त्री ही दुय्यम स्वरूपाची असून ती एक उपभोग्य वस्तु आहे. असा पुरूषप्रधान संस्कृतीमधील समज शांताबाईनी मात्र स्वकर्तृत्वातून खोटा करून दाखविला आहे. पराक्रमाचा उज्ज्वल वारसा लाभलेल्या आणि ऐतिहासीक सामानगडाच्या पायथ्याशी वसलेल्या गडहिंग्लज तालुक्यातील मौजे हासूरसासगिरी येथील शांताबाई यादव यांनी पतीच्या मृत्युनंतर नाभिकाचा व्यवसाय सुरू करून समाजाला एक आदर्श घालून दिला. पारंपारिक समाजाच रूपांतर पुरोगामी समाजात करू पहाणाऱ्या समाज सुधारणा चळवळी मध्ये शांताबाईचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणारे आहे. अठराविश्व दारिद्रय असणाऱ्या कुटुंबातील शांताबाईने हातात वस्तारा घेवून उचललेल क्रांतीकारक पाऊल आणि तिचा जीवन जगण्याचा जिद्दी प्रवास नव्या पिढीला माहित व्हावा, म्हणून या शोधनिबंधामध्ये नव्या पिढीला प्रेरणा देणाऱ्या शांताबाई यादव यांच्या कार्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**शांताबाई यादव यांचा जीवन परिचय**

शांताबाई यादव यांचा जन्म भुदरगड तालुक्यातील आरळगुंडी गावात नाभिक व्यवसाय करणाऱ्या शिंदे घराण्यात १९५० रोजी झाला. शिक्षणाचा कोणताही लवलेश नसणाऱ्या शांताबाईचा विवाह वयाच्या ११ व्या वर्षी म्हणजेच १९६१ रोजी आजरा तालुक्यातील आरदाळ या गावातील नाभिक व्यवसाय करणाऱ्या श्रीपती गणपती यादव यांचेशी झाला. कालांतराने हे कुटुंब गडहिंग्लज तालुक्यातील हासूरवाडीला व त्यानंतर हासूरसासगिरीला स्थलांतरीत झाले. तेथेच त्यांच्या पतीच्या नाभिक व्यवसायावर कुटुंबाचा उदरनिर्वाह चालू होता. जास्त अपत्ये असल्याने कुटुंब चालवताना नाकीनऊ येत, असल्याने वाडिलांनी त्यांचा विवाह वयाच्या ११ व्या वर्षीच केला होता. पण पुढे शांताबाईलासुध्दा सहा अपत्ये झाली पैकी ४ जिवंत असून त्या सर्व मुली आहेत. चार मुलींसह संसाराचा गाडा हाकत असताना शांताबाईचीं मोठी घालमेल होत होती.

**शांताबाई यादव यांचे प्रेरणादायी कार्य**

५० वर्षापूर्वी अत्यंत गरिबीतील संसाराचा गाडा ओढत आसताना शांताबाईच्या जीवनात आलेल सर्वात मोठे संकट किंवा दुःख म्हणजे त्यांच्या पतीचे झालेले आकस्मिक निधन होय. शेवटच्या मुलीला आई—बाप म्हणजे काय? हे कळायच्या आधिच कुटुंबकर्त्याच निधन झाल. पतीच शव पुरण्या इतका सुध्दा जमिनीचा तुकडा नसणाऱ्या शांताबाईच्या समोर अनेक प्रश्न उभे राहिले. एक तर नाती उरली नव्हती,

आणि उरली आसली तरी ती जवळची वाटत नव्हती. आकाश कोसळलेल्या शांताबाईना काय कराव हेच सुचेना. पण अशाही अवस्थेत कुटुंबाची जबाबदारी अंगावर आलेल्या शांताबाईनी परिस्थितीला शरण न जाता तिच्यावर मात करण्याच ठरवल आणि हातात वाटी –वस्तारा होवून पतीचाच नाभिक व्यवसाय करण्याच धाडसी निर्णयही घेतला.

दाढी – कटिंगसाठी पुरूष मंडळी शांताबाईकडे जात नाहीत हे लक्षात येताच गावातील भला माणूस सभापती श्री.कडूकर यांनी स्वत: शांताबाईच्या हाताने दाढी–कटींग करून शांताबाईला तर बळ दिलेच पण पुरूष मंडळींनाही प्रोत्साहन दिले. एका बाजूला संसार आणि दुसऱ्या बाजूला व्यवसाय असा, शांताबाईचा जीवन जगण्याचा नवा संघर्ष सुरू झाला. मिळेल त्यांची धुनी–भांडी करून, गावोगावी जावून झाडाखाली पोत टाकून दाडी–कटींग करणे, म्हशी भादरणे आणि आपल्या लहान मुलींना मोठ करण हाच त्यांचा दिनक्रम होता. ५० पैसे दाढीला व एक रूपया कटिंगला घेणाऱ्या शांताबाईनी समाजाला चांगली सेवा देतानाच त्याचा मोबदला ही पैसा, धान्य, व वस्तु या स्वरूपात घेतला.

जीवनाच्या खडतर मार्गावरून चालत असताना त्यांना विविध कठिण प्रसंगांना सामोरे जावे लागले. जसे की स्त्रीला उपयोग्य वस्तु मानणाऱ्या पुरूषप्रधान समाजाने त्यांच्या व मुलींच्या चारित्र्याचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न केला पण शांताबाईनी मात्र दुर्गेच रूप धारण करून स्त्रीत्वाचा स्वाभिमान जपत स्त्रीचारित्र्याला कधी कलंक लागु दिला नाही. चार मुलींना मोठे करत असताना झालेल्या कुंचबने पैक्षा त्यांची लंग्न करताना झालेली कुंचबना आधिक वेदना देणारी होती, आसही त्या सांगतात. पतीच्या निधनानंतर सामजिक रूढी–परंपरांची बधने झुगारून देणाऱ्या शांताबाई आज ७० व्या वर्षीही स्वभिमानाची लढाई लढत आहेत. १९८७ पासून संजय गांधी निराधार योजनेतून मिळणारी आर्थिक मदत ही २००३ पासून बंद झाल्यामुळे त्यांना उर्वरीत आयुष्यातील अंधार जाणवत आहे. मुलाखतीच्या माध्यमातून त्यांना बोलतं करत आसताना एका डोळयातून ओघळणारे आश्रु आपल्याच जिद्दी व क्रांतीकारक जीवन कहाणीच्या आनंदाची साक्ष देतात. तर दुसऱ्या डोळयातून ओघळणारे आश्रू तब्येत साथ देत नसल्याने परिस्थितीशी हातबल झाल्याच्या दुख:ची साक्ष देतात.

**शांताबाईना मिळालेले पुरस्कार**

शांताबाई यादव यांनी गेल्या ५० वर्षात केलेल्या महान कार्याचा दखला देवून देशभरातील विविध संस्था व संघटनांनी विविध पुरस्कार देवून त्यांचा सन्मान केला आहे. आज त्यांच्या छोटयाशा घरात पुरस्कार ठेवायलाही जागा नाही एवढे पुरस्कार त्यांच्या कर्तृत्वाने खेचून आणले आहेत. यामध्ये आदर्श माता पुरस्कारा पासून ते समाजरत्न पुरस्कारापर्यंत आणि शिदोरी प्रेरणा पुरस्कारा पासून ते शिवगौरव पुरस्कारापर्यंत अशा असंख्य पुरस्कारांचा समावेश होतो. आज ही त्यांच्या घरातील पुरस्कारांवर नजर टाकत असताना त्यांच्या कर्तृत्वाचा अभिमान मनात दाटून येतो.

**शांताबाईचा नव्या पिढीला संदेश**

कोणत्याना –कोणत्या निमित्ताने नव्या पिढीचा त्यांच्याशी संपर्क येत असताना त्या नव्या पिढीला आवर्जुन महत्त्वाचा संदेश देतात. परिस्थितीन कधीही खचून न जाता स्वत:च्या पायावर उभ रहा, चारित्र्याला जपा हे सांगतानच त्या मुलींचे चारित्र्य हे काचेच्या भांडयासारखे असत, याची ही त्या आठवण करून देतात. आई वडिलांच्या स्वप्नांचा विचार करतानाच त्यांच्या वेदनाही समजून घ्या. निसर्ग नियामानुसार कष्टाच फळ मिळत आसत, हे सांगताना तंत्रज्ञानाच्या मोहरूपी बेडीत न आडकता माणसान माणसांच्या मदतीला नेहमीच धाऊन गेल पाहिजे, हा मानवतेचा संदेशही शांताबाई यादव देतात.

**समारोप**

जीवन जगण्याची धडपड करणाऱ्या, गरिब कुटुंबातील पतीच्या निधना नंतर स्त्री समोर कुटुंब सावरण्याचे आव्हान उभा रहाणं आणि वेळप्रसंगी हातात वस्तरा घेवून पतीचा नाभिक व्यवसाय हिमतीने सुरू करून,त्या स्त्रीने आव्हाणाला सामोरं जाण. हे नव्या पिढीला नवा संदेश देणारे आहे. पतीच्या निधना नंतर स्वावलंबी बाण्याने त्यांनी माहेरचा आधार घेतला नाही उलट माहेर व सासर या दोन्ही कडचे ही संसार उभे केले. आकाश कोसळलेलं असतानाही 'रडायच नाही आता लडायच' या तत्वज्ञानावर विश्वास ठेवून वाटचाल करण्याऱ्या शांताबाईनी परस्थितीपुढे न झुकता परिस्थितीलाच झुकविण्याचा व तिच्यावर विजय मिळविण्याचा इतिहास घडविला आहे. संसाराचा गाडा चालविणारी, नाभिक व्यवसायाचे क्रांतीकारक पाऊल उचणारी, पडेल ते काम स्वाभिमानाने व आनंदाने करणारी, कुणाचीही लाचारी न पत्कारणारी, समाजाच्या मदतीला धावून जाणारी, स्त्री चारित्र्याचा सन्मान करणारी, ४ मुलींना स्वत:च्या पायावर उभी करणारी, नव्या पिढीच्या तोंडावर मायेचा हात फिरवणारी आणि समाजाला मानवेतचा संदेश देणारी 'शांताबाई' आज समाजाचा आदर्श बनली आहे. वेळ प्रसंगी हातात वस्तारा घेवून चक्क पुरूषांच्या दाढया–मिशा करणारी शांताबाई यादव ही खऱ्या अर्थाने नव्या पिढीतील क्रांतीकारक असून तिचे जीवन कार्य समाजला प्रेरणा देत राहील, यात शंका नाही.

**संदर्भसूची**

१. मुलाखत – शांताबाई यादव ,दिनांक १ जानेवारी २०२०
२. मुलाखत –शांताबाईची कन्या ,दिनांक १० जानेवारी २०२०
३. ग्रामपंचायत अहवाल मौजे हासूरसासगिरी
४. दैनिक तरूण भारत, दिनांक २४ ऑगष्ट २००५
५. दैनिक तरूण भारत, दिनांक १७ एप्रिल १९९४
६. दैनिक सकाळ, दिनांक १५ मार्च १९९९
७. दैनिक नवाकाळ दिनांक २८ डिसेंबर २००८
८. शार्ट फिल्म 'बलुत'
९. प्रत्यक्ष भेट व सविस्तर चर्चा

# १७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार

**प्रा. डॉ. लता दिगंबर आंदे**
शंकरराव जगताप आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, वाघोली, ता. कोरेगाव, जि. सातारा.

आधुनिक भारताच्या आणि जगाच्या इतिहासात जे शोषित,पिडित,वंचित व उपेक्षित मानव समुदायाचे प्रेरणास्थान व्यक्तिमत्व म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संपुर्ण आयुष्य अस्पृश्य बांधवासाठी अर्पण केले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अर्थतज्ञ म्हणून ओळखले जाते. डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांनी स्वत:च्या कर्तृत्वाने स्वत:ची प्रगती करून आपल्या असंख्य दलित बांधवांना विकासाचा मार्ग दाखविला. अस्पृश्योध्दार हा त्यांचा जीवन व कार्याचा सर्वात महत्वाचा पैलू होता. सदर शोधनिबंधात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार सविस्तर दिलेले आहेत.

**अल्पपरिचय**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म सोमवार दि.१४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील लष्करी छावणीत महू या गावी झाला. वडिल रामजी सकपाळ आणि आई भिमाबाई यांचे शेवटचे म्हणजे चौदावे अपत्य होय.[१]डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ गाव महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्हयातील खेड तालुक्यात दापोली जवळ पाच मैलावर असलेले 'आंबावडे' नावाचे लहानसे खेडे होय. त्यांचे आजोबा मालोजी या गावचे रहिवाशी होते.[२] डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे बालपण काही दिवस दापोली,पुढे सातारा आणि यानंतर मुंबई या ठिकाणी गेले. लहाणपणीच आई वारल्यामुळे त्यांचा सांभाळ आत्या मीराबाईनी केला.त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सातारा येथे, आणि मुंबई येथे महाविद्यालयीन शिक्षण पुर्ण झाले. उच्च शिक्षण अमेरिकेतील न्युयॉर्कमधील कोलंबिया विद्यापीठ आणि इंग्लंडमधील लंडन येथील 'स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पोलिटिकल सायन्स, लंडन' अशा प्रसिध्द संस्थामध्ये झाले.[३]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर १५जून १९१३ ते १४ जून १९१६ या तीन वर्षाच्या कालावधीसाठी शिष्यवृत्ती घेऊन भीमराव आंबेडकर एस.एस.ॲकोना या बोटीने प्रवास करून दि.२० जुलै १९१३ रोजी अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरात येऊन पोहचले. डॉ. आंबेडकरांनी एम.ए.साठी ॲडमिनेस्ट्रशन ॲण्ड फायनान्स ऑफ दि इस्ट इंडिया कंपनी' हा प्रबंध सादर केला. यानंतर पीएच.डी. पदवी साठी ''नॅशनल डिव्हिडंड ऑफ इंडिया ए हिस्टॉरिकिल ॲण्ड ॲनॉलिटिकल स्टडी' हा विषय घेतला. डॉ. आंबेडकरांनी एका वर्षात १८—१८ तास अभ्यास करून सन १९१६ मध्ये प्रबंध सादर केला.[४] अशा प्रकारे केवळ तीन वर्षात दोन पदव्या मिळविणारे कोलंबिया विद्यापीठातील भीमराव आंबेडकर हे पहिलेच विद्यार्थी आहेत. जगातील २०० हुशार विद्यार्थ्यांच्या यादीत पहिले नाव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आहे. अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाने

''कॉन्स्टिटयूशनल लॉ'' या विषयासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने '' डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन'' केंद्र स्थापन केले आहे.[५]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे थोर अर्थशास्त्रज्ञ होते.त्यांच्या अनेक पदव्या अर्थशास्त्र या विषयातील आहेत. यावरून असे स्पष्ट होते की, अर्थशास्त्र हा त्यांच्या अभ्यासाचा चिंतनाचा, मननाचा मुख्य विषय होता. त्यांनी देशात व परदेशात शिक्षण घेऊन ते उच्च विद्याविभूषित झाले. त्यासाठी त्यांना बडोदा संस्थानचे संस्थानिक सयाजीराव गायकवाड महाराज यांचे आर्थिक सहकार्य लाभले. कोलंबिया अमेरिका विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयाचे शिक्षण घेऊन आल्यानंतर ,मुंबईच्या सिडनेहॅम महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम केले. १९१६ मध्ये त्यांनी कोलंबिया विद्यापीठातून 'ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित व्यवस्थेचा विकास' या विषयावर पीएच.डी. पदवी प्राप्त केली. पुढे त्यांनी प्राचीन भारतीय व्यापार व रूपयाची समस्या (The Problem of the Rupee) हे संशोधनात्मक ग्रंथ लिहिले. या ग्रंथावर त्यांना डी.एससी ही पदवी मिळाली. [६]हे मांडण्याचा हेतू असा की, राजकीय व सामाजिक संस्थांच्या घटकांमधून संसद घटनापरिषद, मुंबई कायदेमंडळ व विविध परिषदांमधून त्यांनी मांडलेले आर्थिक विचार अभ्यासकांना उपयोगी पडलेले आहेत. त्यातूनच त्यांची आर्थिक विचाराची दिशा स्पष्ट होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अर्थकारण हे केवळ माणसांच्या आर्थिक परिस्थितीचे किंवा उन्नतीचे सर्वसामान्य विवेचन नाही तर ते माणसाच्या माणुसकीच्या आणि माणूस जिथे जगतो, जे जगतो, जसे जगतो त्या सर्वांशी निगडित अशा वास्तवतेच्या उत्थानाचे कारण आहे. संपत्ती ही राष्ट्राची भरभराट घडवून आणणारी वस्तू आहे. त्यामुळे अर्थसंग्रह ही राष्ट्र जीवनात मूल्यात्मक ठरते.

संपत्तीचा उपयोग देशातील गरजवंत वंचितांसाठी होतो का? त्या संपत्तीच्या मूल्याचे अधिष्ठाण काय? यावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'राष्ट्रातील संपत्तीचा उपयोग दरिद्री आणि गरीब जनतेस जखडून ठेवण्यासाठी होता कामा नये. तेव्हा गरीब दरिद्री जनतेचे शोषण करून संपत्ती वाढविण्याचा प्रयत्न झालाच तर तो मार्ग आसुरी ठरेल [७] अशा मार्गाने संपत्ती वाढली तर प्रौढी व वर्चस्व मिरविण्याची वृत्ती वाढणार म्हणूनच बाबासाहेब म्हणतात की, सर्वांना समान रितीने स्वातंत्र्य उपभोगता येईल अशी परिस्थिती निर्माण झाली पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतीविकासावर जास्त भर दिला कारण भारतीय अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून आहे. पण शेतजमिनीच्या मालकी हक्कातील विषमता त्यांना पटत नव्हती. हिंदुस्थानमधील शेतकरी दरिद्री आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते, शेती वाटपातील विषमता दूर करून शेतीचे राष्ट्रीयकरण केले पाहिजे व भूमिहिनांना शेतजमिनीचे वाटप केले पाहिजे. खोती पध्दत शेतक—यांना शाप आहे. शेतक—यांचा आर्थिक स्तर उंचावला पाहिजे. [८]शेतक—यांनी हिन दर्जाचा पोषाख केला पाहिजे. त्यांच्या बायकोनेही विशिष्ट पध्दतीने लुगडे नेसले पाहिजे. असा दंडक कोकण प्रदेशात होता. आजही खोती पध्दती अस्तित्वात नसेल पण त्याचे स्वरूप नष्ट झालेले नाही. जेव्हा ही बाब बाबासाहेबांच्या लक्ष्यात आली. त्यावेळी कायदे कौन्सिलात खोतीविषयक बिल आणून खोतीशाहीची नखे काढून टाकण्याचा आणि दात पाडण्याचा प्रयत्न केला. शेतसा—याचा प्रश्न या

विषयावर त्यांनी लेख लिहिला. या प्रश्नावर आंबेडकरांनी आपली भूमिका मांडली. ती अशी सरकारी शेतसा—याचे प्रमाण शेतीच्या उत्पन्नाच्या तुलनेत जबरदस्त आहे. त्यामुळे शेतक—यावर हलाखीची परिस्थिती येते. शेतक—याला उत्पन्न झाले नाही तरी त्याला दरवर्षी शेतसारा भरावाच लागतो. अल्पभूधारकांना भांडवल, बियाणे, खते,यंत्रे यांचे वाटप केले जावे. शेतीचे तुकडेजोड करून सामुहिक शेतीचा प्रयोग केला जावा. शेती व उद्योग या दोघांचाही विकास झाला पाहिजे. असे आंबेडकराचे मत होते. सामुदायिक शेतीला पाणी, जनावरे, बी, अवजारे,खते यासाठी अर्थसाहाय्य करणे ही शासनाची जबाबदारी आहे.शेतीचे समान वाटप केले तरच समाजाचे कल्याण साधले जाईल.

जातीव्यवस्थेचा अर्थव्यवस्थेवर कसा विपरित परिणाम होतो.हे स्पष्ट केले. ते असेजातीव्यवस्थेमुळे प्रत्येक व्यक्तीला आपल्या जातीचाच व्यवसाय करणे भाग पडते. त्यामुळे त्याची आर्थिक प्रगती होत नाही. म्हणजेच जाती व्यवस्थेमुळेच भांडवल पुरवठा, उपभोग,चलन पुरवठा यावर परिणाम होतो.[६]यामुळे जाती व्यवस्था नष्ट करून प्रत्येकाने आपल्या आवडीनुसार व कौशल्यानुसार कोणताही व्यवसाय करून आपला आर्थिक विकास करावा, असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. शेतामध्ये काम करणा—या श्रमिकालाही किमान वेतन दिले पाहिजे. असा त्यांनी विचार मांडला. भारतातील श्रमिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी अनेक कल्याणकारी योजना राबविल्या पाहिजे.त्यांच्या मते जातीव्यवस्था ही आर्थिक विकासातील महत्वाचा अडथळा आहे. जातीव्यवस्थेमुळे आर्थिक विषमता वाढते. आर्थिक विषमता कमी करून समतेवर आधारीत राज्याचा समाजवाद अंमलात आणला पाहिजे असा विचार डॉ. आंबेडकरांनी मांडला. त्यामुळे जनतेचे कल्याण होईल. असा स्वतंत्र आर्थिक विचार मांडला. त्यांच्या आर्थिक विचारामागे आपल्या असंख्य अशा दलित बांधवांच्या आर्थिक विकासाचा हेतू होता.

**निष्कर्ष**

स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुत्व यावर आधारलेली समाजव्यवस्था व अर्थव्यवस्था निर्माण करणे हे त्यांचे ध्येय होते. आर्थिक शोषनाचा मार्ग नेहमीच सामाजिक शोषणाला पुरक ठरतो. म्हणूनच डॉ.आंबेडकरांना शोषण मुक्त समाज अपेक्षित होता. त्यांनी नियोजनबध्द अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. त्यांना मिश्र अर्थव्यवस्था अभिप्रेत होती. शेती क्षेत्रातील अतिरिक्त श्रमिक कमी करून ते इतर व्यवसायात वळवावेत. शेतीचे यांत्रिकीकरण करावे.सहकारी शेती पध्दतीचा अवलंब करावा. जातिविरहित समाज, राखीव जागांची तरतूद, स्त्री दास्यमुक्ती अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला पाहिजे, असे डॉ. आंबेडकरांनी मत मांडले. डॉ. बाबासाहेब अर्थशास्त्रावर चर्चा करण्यात रमत नाहीत तर अर्थशास्त्र आणि मानवी जीवन यांची सांगड कशी घालता येईल याचाच त्यांनी प्रयत्न केला. दुर्बल घटकांच्या प्रगतीचा विचार करतांना अनेक अर्थसाधनांचा त्यांनी जाणीवपूर्वक विचार केलेला दिसतो. आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी राजकीय हक्क असावे लागतात. आणि ते मिळविण्यासाठी प्रयत्न करावे लागतील अशी त्यांची दृढ धारणा होती. अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार मौलिक होते. हे यातून स्पष्ट होते.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अर्थशास्त्र या विषयाचे सखोल ज्ञान होते. हे त्यांच्या विचारातून स्पष्ट होते.

**संदर्भ ग्रंथ**

१. प्राचार्य गवळी टी. ए., प्रा. हिवराळे सुखराम गवळी, डॉ. पी. ए. प्रा.गव्हाणे सुधीर (संपादक), डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ

२. गायकवाड, डॉ. ज्ञानराज काशीनाथ, महामानव डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, जून २००६

३. किर धनंजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, एप्रिल १९९६

४. प्रा.डॉ.अनिल सिंगारे 'महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास' अरूणा प्रकाशन लातूर,जुलै २०१२,पृ.३२

५. लोकसत्ता दि.३ एप्रिल २०१०, पृ.५

६. पानतावणे गंगाधर, पत्रकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अभिजित प्रकाशन, पृ.२२७

७. बहिष्कृत भारत, अस्पृश्यान्नतीचा आर्थिक पाया, २३ डिसेंबर १९२७

८. पानतावणे गंगाधर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक लेख, प्रतिमा प्रकाशन, पृ.१२३

९. गिलबिले एच. एफ., डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार, प्रबोधन प्रकाशन ज्योती, जून २०१६, पृ.३९

VOLUME - IX, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# १८. बोरगाव तालुका वाळवे येथील अस्पृश्यांची शेतकरी परिषद

**डॉ. चंपाताई श्रीरंग बोधले**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख, मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय बोरगाव, ता. वाळवा, जि. सांगली.

**बोरगाव तालुका वाळवे अस्पृश्यांची शेतकरी परिषद**

पेशवाईच्या काळात महाराष्ट्रातील शेतकरी मोठा सुखी होता असे नाही. परंतू ब्रिटीशांच्या राजवटीत शेतक—यांचे शोषण कायद्याचा आधार देवून पध्दतशीरपणे करण्यात आले शेतक—यांना लुटण्याच्या नवीन शेतसारा पध्दती स्विकारल्या. शेतामध्ये चांगले पीक आलेले नसताना सुध्दा शेतसारा देण्याची सक्ती शेतक—यांवरच असे त्यासाठी शेतक—याला सावकाराकडून कर्ज काढणे भाग पडत असे. शेतकरी वर्गाची हालखीची स्थिती सुधारावी यासाठी विठ्ठल रामजी शिंदे यानी १९२६ ते १९३२ या कालखंडात शेतक—यांच्या सभा भरवून सभेमध्ये जनजागृती करण्याचे महत्वपूर्ण काम त्यांनी केले. शेतक—यांची स्थिती किती हालखीची असते याचे त्यानी लहानपणी प्रत्यक्ष अनुभव घेतला होता. अस्पृश्यांची शेतकरी परिषद घेवून महर्षी शिंदे यानी परिवर्तनाचे मोलाचे काम केले. अस्पृश्यांची शेतकरी परिषदड१९२६, पूणे ,मुंबई इलाखा शेतकरी परिषद १९२८ पूणेञ, वाळवे तालुका शेतकरी परिषद १९३१, बोरगावञ, संस्थानी शेतकरी परिषद १९३२ तेरदाळञ, चांदवड तालुका परिषद १९३२ वडणेरञ या परिषदामध्ये महर्षी शिंदे त्यानी शेतक—यांच्या सामाजिक, आर्थिक सुधारणा करण्याचे प्रयत्न केला.

शेतकरी वर्गात मोठया प्रमाणात जागृती होवू लागली यांचे चिन्ह म्हणजे वेगवेगळया जिल्हयात काही तालूकयात शेतकरी परिषदांचे आयोजन होवू लागले. आण्णासाहेब शिंदे यांची शेतक—यां बद्दल असणारी आस्था, शेतक—यांच्या समस्या बद्दलची त्यांची समज व शेतक—याची स्थिती सुधारण्यासाठी आण्णासाहेब शिंदे तळमळीने ते सुचवत असलेल्या उपाययोजना यामुळे शेतक—याच्या परिषदाचे अध्यक्षस्थान भूषविण्यासाठी व मार्गदर्शन करण्यासाठी निमंत्रण येवू लागली. दक्षिण साताराडसांगलीञ जिल्हयातील बोरगाव येथे वाळवे तालुका शेतकरी परिषद ६जून १९३१ रोजी झाली बोरगाव येथिल परिषदेचे स्वागतध्यक्ष माधवराव बागल डकोल्हापूरञ हे होते. हया परिषदेसाठी शेजारच्या तीस—चाळीस खेडयातून सहा— सात हजारापर्यंतचा समुदाय जमलेला होता. बोरगावातील आत्माराम पाटील, सदाशिव आळतेकर, बापूसाहेब देशमुख, साताराचे सोमण वकील इत्यादी अधिवेशनासाठी जमलेली होती. बोरगावात सजावट केलेली होती. संपूर्ण गाव गुढया तोरणांनी शृगारलेले होते आण्णासाहेब शिंदे व गोंविदराव सासने, सदाशिव आळतेकर हयांच्या बरोबर गावात उतरल्या बरोबर माधवराव बागल व आत्मारामबापू पाटील यानी त्याना हार घालून स्वागत केले ठिकाण ठिकाणी सुवासिनीनी आरती ओवाळली.

**विठ्ठल रामजी शिंदे अध्यक्ष**

अध्यक्ष पदावरुन विठ्ठल रामजी शिंदे यांनी दिड तास प्रभावी असे भाषण केले आपल्या भाषणात त्यानी खरा शेतकरी कोण याची व्याख्या केली. व त्यांचा खरा शत्रू कोण याचेही सविस्तर पणे उत्तर दिले. शेतक—याच्या उन्नतीचा खरा मार्ग कोणता याचे अत्यंत तळमळीने विवेचन केले. शेतकरी कोण हे सांगताना म्हणाले. माश्रया मते शेतकरी म्हणजे तोच की जो आपल्या कुंटूबाच्या आश्रीतांच्या पोषणाला, शिक्षणाला आणि सुखसोयीना आवश्यक तितकीच आणि आपल्या आप्तांच्या व अश्रीतांकडून वाहवेल इतकीच जमीन बाळगतो. आणि आपण ती स्वत: किंवा आपल्या आप्त व आश्रीतांच्या श्रमाने योग्य रितीने खरोखर कसतो असे न करता इतर जे. जे म्हणून जमीन धारण करतात किंवा तिच्यावर हक्क सांगतात ते ते सर्व केवळ भांडवलदार, आणि म्हणून ते ख—या अर्थाने शेती करणारे शेतकरी नसून त्या शेतक—यांचे अगदी शत्रू नसले तरी त्यांचे दावेदार आणि प्रतिस्पर्धी असे समजण्यास हरकत नाही. हयांना दावेदार का म्हणावयाचे तर त्या जमीनीवर मूलाबाळासह राबणारा एक शेतकरी आणि दूसरा लोण्याचा गोळा सबंध गिळून उरलेलेल्या ताकासाठी हेवेदावे करणारा असतो,हा भांडवलदार शेतक्र्यांच्या छातीवर कायमचा बसलेला असतो म्हणून तो कोणत्याही जातीचा, धर्माचा,स्वकीय अथवा परकीय असोत शासन असो संस्थानिक असो इनामदार, खोत असो हे सारे शेतक—यांचे दावेदार आहेत असे महर्षी शिंदे यांनी आपल्या भाषणात सांगितले. शेतक—यांचे हाल कसे होतात हे भाषणातून सांगितले. शेतक—याच्या दारिद्रियाचे, तसेच महार, मांग या जातीच्या लोकाचे हाल कसे होतात हे सांगितले करबंदीचा उपाय हा अखेरचा निर्वाणीचा उपाय असतो हे सांगून त्यांनी पहिली निकडीची गोष्ट म्हणून तालूका निहाय कामकरी संघ निर्माण झाले पाहिजेत आणि या जोडसंघाचे सहकार्य सतत एकमेकाला असले पाहिजे असे स्पष्ट सांगितले. दक्षिण सातारा सांगली जिल्हयातील शेतकरी वर्षातील सहा महीने शेती आणि सहामहिने मजूरी किंवा गोदीतील काम करतो. शेतकरी आणि कामकरी जोड संघाच्या सहाकार्यामूळेच बहूजन समाजाच्या पाठकुळीवर बसून पून्हा त्यांचेच रक्त शोषण करणा—या भांडवलशाहीला आळा घालू शकेल असे सांगितले. खेडयातील शेतकरी आणि शहरातील कामगार हितसंबधाच्या दृष्टिने एकच होत असे त्याना वाटते खेडयामधला शेतकरी मुंबईला अथवा शहारात जाऊन कामगार बनत असतो. हया कामगाराला मूळ आधार खेडयातील शेतीचा असतो. काही जण शहरातून परत येवून आधिक शेती विकत घेवून ती करण्याचे स्वप्न बघत असतात आणि शेतकरी झाला तरी तो श्रमजीवी कामगारच असतो. या शेतक—याच्या तोंडचा घास काढून घेणारा जमीनदार हा ही भांडवलदार व शहरातील गिरणी कामगाराची पिळवणूक करणारा गिरणी मालक हाही भांडवलदार म्हणून शेतकरी आणि कामगार यांचा समान शत्रू हा भांडवलदार असतो व त्यांचे हितसंबध एकच असतात

आण्णसाहेब शिंदे यांनी शेतक—यांना संघटन करा असे आपल्या भाषणातून सांगितले शहारातील कामगारांच्या संघटनेशी खांदयाला खांदा लावून सहकार्य करण्याचा उपदेश करतात. महर्षी शिंदे यांचे शेतकारी व कामगार यांचे शेतकरी व कामगार एकजूट झाली तर ते प्रचंड ताकद निर्माण करु शकतील व कोणत्याही सरकारच्या नाकाला वेसन घालू शकतील असे महर्षी शिंदे याना वाटत होते. भांडवलशाही नष्ट

करून जर श्रमजीवीचे राज्य निर्माण करावयाचे असेल तर भारतासारख्या देशात शेतकरी आणि कामगार हयांच्या संघटनेची जुट असणे आवश्यक आहे हे त्यांचे म्हणणे अगदी रहत होते. यांचा पडताळा नंतरच्या काळात १९३१ मध्ये महाराष्ट्र शेतकरी कामगार पक्ष नावाने एक पक्ष आस्तित्वात आला. आण्णासाहेब शिंदे यांनी शेतकरी परिषदामधील भाषणातून शेतकरी व कामगार एकजुटी होण्यावर जोर दिला होता. शेतकरी हा राष्ट्राचा एक विशिष्ट अर्थाने सर्वांचा पोशिंदा आहे. तरीही इतर अल्पसंख्याक व सबळ वर्गा इतके वजन आजवर कोणत्याच पार्लमेंटवर पडले नाही म्हणून राजकारण हा दुय्यम उद्देश ठेवून शेतक—याने स्वत:चे आर्थिक स्वातंत्र्य फार महत्वाचे जपले पाहिजे ''शेतक—यानो तुम्ही नेहमी काबाडकष्ट करणारी नांगरे म्हणूनच काळ न दवडता आपला एक हात अर्थउत्पादनात गुंतवणूक दूसरा हात त्या उत्पन्न केलेल्या अर्थाची विल्हेवारी कशी चालली आहे हे पाहून या अर्थगाडयांच्या बैलाची शिंगदोरी खेचण्याकरिता नेहमी मोकळा ठेवणे जरूर आहे.''

महर्षी शिंदे स्वातंत्र्यकाळातील भावी चित्रही डोळयांसमोर आणतात. देशात स्वराज्य झाले, जमिनीची तात्विक मालकी राष्ट्राला मिळाली आणि कसण्यासाठी जमीनधारणेचा हक्क श्रमजीवी कुणब्याकडे आला की, कुणब्यांनी आपसात अथवा जमीन कसणा—या शेतक—यांशी आपली जूट केली पाहिजे. शेतकरी श्रीमंत झाला की तोच जमीनदार बनतो. मग तो इतर गरीब शेतक—यांशी फटकून वागतो आणि इतर श्रीमंत सत्ताधा—यांच्या पंगतीत जाऊन बसतो. म्हणून कुणब्यांची अथवा जमीन कसणा—या शेतक—यांची एकजूट असणे शिंदे यांना महत्वाचे वाटले व शेतक—यांच्या पुढे त्यांनी हा विचार सातत्याने तळमळीने मांडला.

**सारांश**

या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी संपूर्ण बोरगाव सहभागी होता. हे गाव परिर्वतनाला आपलेसे करून जातीभेद विसरून वाटचाल करणारे गाव असल्याचे दिसून येते. सामाजिक परिर्वतनाचा धडा १९३० ते ३२ च्या दरम्यान घडून आला. आंतरजातीय विवाहाचे रोपण बोरगावात घडले. जैन—मराठा, मराठा—ब्राम्हण, असे विवाह घडून आले. म. गांधीच्या स्वांतत्र्य चळवळी बरोबरच समाज परिवर्तनाचा परिणाम ही बोरगावने स्विकारला होता. डॉ. बाबासाहेब आंबडेकरांचे विचारधन आणि तत्वज्ञान बोरगावमध्ये रूजले होते.शेतकरी वर्गाची हालखीची स्थिती सुधारावी यासाठी विठ्ठल रामजी शिंदे यानी १९२६ ते १९३२ या कालखंडात शेतक—यांच्या सभा भरवून सभेमध्ये जनजागृती करण्याचे महत्वपूर्ण काम विठ्ठल रामजी शिंदे यानी केले.

**संदर्भ**

१. मराठी रियासत खंड ४— गो. स.सरदेसाई पृ—१९५

२. विठ्ठल रामजी शिंदे जीवन व कार्य—गो.मा.पवार,लोकवाड्मःय, मुंबई पृ ८१—८८२८४—३७—८ पृ क्र ४५७,

३. उपरोक्त पृ— ४५८

४. ज्य.कृ.टोपे,म.गो.रानडे:व्यक्ती कर्तृत्व आणि कार्य रोहन प्रकाशन पुणे

५. शिंदे,लेख संग्रह —वाळवे तालुका शेतकरी परीषद बोरगाव पृ— २९१

# १९. चांदी व्यवसायातील कारागीर स्त्रिया : विशेष संदर्भ हुपरी

**डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग, चंद्राबाई-शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी, जि. कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ संलग्नीत.

भारतीय समाजाचे वैशिष्टय म्हणजे जातीवर आधारित त्याचप्रमाणे लिंगावर आधारित केला जाणारा भेदभाव ! स्त्री आणि पुरुष हा नैसर्गिक भेद असला तरी आपल्या समाजात तो विविध क्षमतांचा पाया समजला गेला आणि यातूनच सुरुवातीपासून स्त्रियांना दुय्यम स्थान दिले गेले. पुरुष बलवान व सर्व बाबतीत सक्षम आणि स्त्रिया नाजूक, अक्षम हे ठरविणाऱ्यासमाजाने समाजातील कोणत्या गोष्टी स्त्रियांनी करायच्या याचेही मापदंड घालून दिले. यामुळे अनेक कामांपासून तिला बाजूला ठेवले गेले किंवा केवळ दुय्यम सहाय्यकाची भूमिका तिच्या वाटयाला आली. घर – चूल –मूल ही चौकट ओलांडण्यासाठी तिला प्रचंड संघर्ष करावा लागला. शिक्षण घेण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागले. हा भेदभाव फक्त कामातच नाही तर वेतनात सुद्धा होता. समाजसुधारकांच्या अथक प्रयत्नांमुळे आधुनिक काळात स्त्रियांचे सक्षमीकरण किंवा सबलीकरण ही संकल्पना लोकप्रिय झाली. सर्व प्रकारच्या कामांमध्ये स्त्रियांना संधी, आवश्यक प्रशिक्षण, समान वेतन हे काही प्रमाणात का होईना मान्य केल जात आहे. आता स्त्रिया देखील याचा फायदा घेत स्वत:ला सिद्ध करताहेत. हुपरीतील चांदी कारागीर स्त्रियांनी स्वत:ला सिद्ध केले आहे. हुपरी सारख्या छोटया गावात विकसित झालेल्या चांदीचे दागिने तयार करण्याच्या व्यवसायाने संपूर्ण देशात खूप प्रसिद्धी मिळविली. शंभर वर्ष पूर्ण करणाऱ्या या व्यवसायात स्त्रियांचाही सहभाग महत्वपूर्ण आहे. आज या व्यवसायातील अवघड कामे लिलया पूर्ण करणाऱ्या स्त्रिया या व्यवसायाचा आधारवड ठरत आहेत. अशा कारागीर स्त्रियांचा कार्याचा आढावा हा सदर शोधनिबंधात घेतला आहे.

**हुपरीतील चांदी व्यवसायाची सुरुवात**

संस्थानकाळात कोल्हापूर शहरात सुवर्ण आणि रौप्य व्यवसायाचा विकास झाला. त्याचबरोबर संस्थानात इतर ठिकाणीही झाला त्यापैकीच एक गाव होते हुपरी. शेती हा या गावचा पारंपारिक व्यवसाय होता. शिवाय १८८० च्या आसपास या परिसरात पन्नास हातमाग चालत होते. काळाच्या ओघात हा व्यवसाय कमी होत गेला. विसाव्या शतकाची सुरुवातया गावासाठी खूप महत्त्वाची ठरली. याच काळात येथे चांदी व्यवसायाचा पाया घातला गेला आणि हुपरीचे रूपच पालटून गेले.[१]

हुपरीत सरकारी चावडीत वसुलीसाठी सोनार लोक होते.या परिसरातील लोकांना हे दागिने बनवून देत. यापैकी श्री. कृष्णाजी रामचंद्र पोतदार (सोनार)यांनी १९०४ मध्ये हुपरीत प्रथम चांदी कामाचे दुकान सुरु केले आणि येथे चांदी व्यवसायाचा पाया घातला गेला. श्री. कृष्णाजी पोतदार यांनी आपल्या मुलांबरोबरच गावातील

इतर तरुणांना ही कला शिकविली.त्यांनीही हा व्यवसाय करायला सुरुवात केली व चांदी व्यवसाय वाढत गेला.[२]

श्री. कृष्णाची पोतदार यांच्या मृत्यूनंतर त्यांचा वारसा त्यांची मुले वामनराव व आनंदराव यांनी पुढे चालविला. हुपरीतीलचांदी कारखान्याची संख्याही वाढत गेली. विशेषत: दुसऱ्या महायुद्धानंतर हा व्यवसाय अधिक तेजीत आला. १९२२ मध्ये सुमारे पंचवीस चांदी कारखाने होते. १९४० नंतर ही संख्या शंभरवर गेली. तर १९४५ मध्ये सुमारे सव्वाशे चांदी कारखाने आणि त्यातून काम करणारे एक हजारपेक्षा अधिक कारागीर असे चित्र होते. महिन्याला साधारणपणे दोन लाख रुपयांची उलाढाल येथे होत असे.[३]

**दागिने तयार करण्याच्या प्रक्रिया**

कच्या चांदीपासून दागिने तयार करताना अनेक प्रक्रिया केल्या जातात. उदा.कच्च्या चांदीपासून आटणी काढणे, त्याच्या पातळ पट्या तयार करणे, मशीनच्या सहाय्याने त्यापासून वेगवेगळे डिझाईनतयार करणे, पैंजणासाठी लागणारे फासेतयार करणे, कड्या आणि फासे एकत्र जोडून चेन तयार करणे (भरणी), डिझाईन आणि फासे सलफ्यूरिक ॲसिडमध्ये स्वच्छ करूनते एकसंघ भरणे, भरणीमध्ये डिझाईनचे वेगवेगळे डाक ठेवून खार (नवसागर) ठेवून ते चिकटविणे(वरावणे) इ. जवळपास तीस वेगवेगळ्या प्रक्रिया आणि हाताळणी केल्यानंतर चांदीचे सुबक पैंजण तयार होते. हे हुपरीचे वैशिष्टय आहे.[४]

**चांदी व्यवसायातील स्त्रियांचा सहभाग व कामाचे स्वरूप**

दागिने घडवताना विविध प्रकारच्या कामांसाठीकुशल, निमकुशल कारागिरांची आवश्यकता असते. त्यांच्याकडून विविध टप्प्यातील कामे पूर्ण करून चांदीपासून सुबक दागिन्यांची निर्मिती होते. यामध्ये बरीचशी कामे स्त्रियांकडून पूर्वीपासूनच केली जातात. १९५२ मध्ये साधारणपणे ५०० स्त्रिया व्यवसायात होत्या. व्यवसायात जशी गती आली तशी ही संख्यावाढत गेली. चांदी व्यवसायाशी निगडित सुरुवातीच्या काळात माट्याभरणे यासारखी प्राथमिक स्वरूपाची कामे स्त्रियांकडे दिली जात. बाकी कौशल्याची कामे पुरुषांकडून पार पाडली जात. संसाराचा गाडा सांभाळत स्त्रिया दुपारच्या फावल्या वेळात काम करत. यासाठी विशेष अशी शिक्षण प्रशिक्षणाची गरज नसे. एकमेकींचे पाहून किंवा आईचे पाहून मुलीही काम शिकत. हुपरीतल्या मुली लग्न होऊन जात. गरजेप्रमाणे तिथेही हे काम त्या सवडीनुसार करत.[५]

अलिकडच्या काळातकौशल्याची इतरकामेही स्त्रियाकरु लागल्या आहेत.विशेषत: साखळी—डिझाईन यांचे स्टोव्हच्या सहाय्याने जोडकाम करणे, मिनाकाम करणे,सूत काढणे, मशीनच्या सहाय्याने फासे तयार करणे, दागिन्यांचे तासकाम करणे अशी नाजूक तुलनेने किचकट कामेही स्त्रियांकडून होऊ लागली आहेत. छुमछुम भरणी, तडे लावणे, माट्या भरणे, वाळे— तोडे लावणे, रूपाली — गजश्री भरणी, चटई पैंजण बांधणे, जोड पोगसणे, घागरी बांधणे, टिक्का लावणे, झाळकाम करणे, सेलम चेन — खुशबूपट्टी बांधकाम, कास्टिंग, नाकीवाली भरणी,ॲंटिक मणी जोडकाम, पॉलिश, पास्टा तयार करणे, आटणीकाम, पॉवर प्रेस चालविणे, मिना वर्क भरणे, दागिने पॅकिंगची कामे इ. वेगवेगळ्या प्रकारची कामे स्त्रिया करतात.ही कामे स्त्रियांना घरी दिली जातात. स्वत:च्या सवडीनुसार ही कामे स्त्रिया पूर्ण करतात.[६]

पूर्वी हाताच्या सहाय्याने केल्या जाणाऱ्या अनेक प्रक्रिया या आज मशीनच्या सहाय्याने केल्या जात आहेत. अशा मशीनवर काम करण्यासाठी कौशल्याची आणि प्रशिक्षणाची गरज असते. काही चुकले तर दागिना तुटण्याची भीती असते. हुपरीतील अनेक स्त्रियाही कामे आज सहजपणे करत आहेत. किचकट आणि अवघड कामे करण्याची त्यांनी आपली क्षमता सिद्ध केली आहे.[७]

याशिवाय पती फिरतीला गेल्यानंतर त्याची पत्नी चांदी कारखान्यातील विविध व्यवहार पाहते मात्र एखादा कारखाना पूर्णपणे स्त्रियांकडून चालविला गेलेला दिसत नाही.मजुरीचे दर हेकामाच्या स्वरूपावर अवलंबून आहेत.सर्वात नाजूक काम म्हणजे जे वरावणे.या कामासाठी पंच्याण्णव ते एकशे पाच रुपये दिले जात. असे काम काही स्त्रिया एक दिवसात पूर्ण करतात. २०१५ मध्ये हा दर एकशे ऐंशी ते दोनशे रुपये इतका झाला. यातून साधारणपणे त्या स्त्रीस दररोज दीडशे रुपये इतकी मजुरी मिळते.[८]

**चांदी व्यवसायाचा स्त्रियांमुळे झालेला प्रसार**

चांदीचे दागिने बनवण्याच्या प्रक्रियेतील अनेक गोष्टी आज अनेक स्त्रिया, तरुण मुली अगदी सहजपणे करत आहेत. हुपरीतून लग्न होऊन सासरी गेलेल्या अनेक मुलींनी त्यांच्या गावात हा व्यवसाय सुरू केला आहे आणि त्या यशस्वीपणे सांभाळत आहेत. हुपरीतील चांदी व्यवसायाशी असलेली त्यांची नाळ तुटलेली नाही. आजमितीलारणदिवेवाडी, रेंदाळ, इंगळी, यळगुड, रांगोळी, पट्टणकोडोली, तळंदगे, तळंदगे फाटा सीमावर्ती कर्नाटकातील मांगुर, बारवाडइ.गावातूनही हा व्यवसाय चालतो. यामुळे अनेक धडी उत्पादकस्त्रियांच्या मदतीने आपला व्यवसाय यशस्वीपणे पुढे नेत आहेत. हुपरीच्या अर्थचक्राला चालना देण्याचे काम स्त्रियांनी केले आहे.[९]

**केर धुण्याचे काम करणाऱ्या स्त्रिया**

हुपरीतल्या कचऱ्यातही चांदी मिळते. धडी उत्पादक, आटणीवाले, तासकाम करणारे अशा अनेकांच्या कामाच्या ठिकाणी काम करताना चांदीचे छोटे छोटे तुकडे पडतात. ते गोळा करून पुन्हा वापरणे त्यांना शक्य नसते. त्यासाठी ते दुकानातील दररोजचा पडणारा कचरा गोळा करून ठेवतात आणि केरधुणी करणाऱ्या लोकांना ते विकतात.कचऱ्यातून चांदी बाजूला करून त्यावर गुजराण करणाराही एक वर्ग हुपरीत आहे. या कामाला केरधुणीचे काम असे म्हटले जाते. विशेषत: शेती नाही किंवा उत्पन्नासाठी इतर कोणताही व्यवसाय नाही अशा वर्गाकडून पूर्वीपासून काम केले जाते आणि त्यामुळे तोच त्यांचा पारंपरिक व्यवसाय बनला आहे[१०]

यात चांदी दुकानात, चांदी कारखान्यात किंवा आटणी जेथे काढली जाते अशा ठिकाणचा कचरा आणून, तो पाण्यात धुऊन त्यातून चांदी वेगळी काढली जाते. या कचऱ्यात चांदीबरोबरच इतर अशुद्ध गोष्टीही मोठयाप्रमाणात असतात. असा कचरा मोठया घमेल्यात घेऊन तो पाण्यामध्ये धुतला जातो. तरंगणारे पदार्थ बाहेर काढले जातात. असे सात ते आठ वेळा केल्यानंतर तळात उरणारा गाळ त्यातून दिसणारे चांदीचे कण, तुकडे बाजूला करून मुशीमध्ये घालून खार, सोडा यासारखी केमिकल्स वापरून तो विशिष्ट तापमानाला तापवून त्यांची आटणी काढली जाते. त्यातून चांदीचा पाटला (शुद्ध स्वरुपातील चांदी) तयार केला जातो. त्याची विक्री करून त्यातून त्यांची गुजराण चालते. या सर्व प्रक्रिया पैकी कचरा विकत आणून घरच्या

स्त्रियांकडे सुपूर्त करण्याचे कार्य पुरुष करतात. बाकी त्यातील पुढील सर्व प्रक्रिया स्त्रियांकडूनच पूर्ण केल्या जातात. अगदी आटणी काढण्याचे किचकट काम सुद्धा स्त्रियाच करतात. अगदी वयाची साठी उलटलेल्या या अशिक्षित महिलाही हे काम घरबसल्या करताना दिसतात. हे काम करताना त्या महिलांचा संपर्क कचरा, घाण पाणी यांच्याशी सातत्याने येतो. त्या घर कामाव्यतिरिक्तचा वेळ यातच घालवतात. मात्र एवढे सगळे करूनयेणारे उत्पन्न तसे तुटपुंजे असते.[११]

एकूण आढावा घेता विविध प्रकारचे काम करणाऱ्या स्त्रियांचे उत्पन्न त्या दिवसभरात किती काम करतात यावर अवलंबून असते. स्त्रियांना घरची सगळी कामे करूनच या कामाकडे लक्ष द्यावे लागते. पुरुष कारागीर सकाळी आठ ते नऊ वाजता कामाला बसले की दुपारी एक ते दोन वाजेपर्यंत त्यांचे काम पूर्ण होते कारण घरातील कामे त्यांना करावी लागत नाहीत. स्त्रियांना मात्र सर्व स्वयंपाक, धुणे भांडी इ. घरकाम आटोपूनच चांदी काम करावे लागते. प्रत्येक स्त्रीचा काम करण्याचा वेग वेगवेगळा असतो. त्यावर मिळणारे उत्पन्न अवलंबून असते.[१२]

या कामाचा स्त्रियांना होणारा फायदा म्हणजे कोणत्याही वयोगटातील स्त्रिया घर सांभाळून हे करू शकतात. त्यासाठी बाहेरगावी जाण्याची गरज नसते परंतु कायम स्वरूपाचे उत्पन्न मिळण्याची शाश्वती यामध्ये नाही. मंदीच्या काळात काम मिळत नाही. त्यामुळे उत्पन्नही तुलनेने कमी असते.

**समारोप**

एखादा व्यवसाय भरभराटीस येण्यामागे तो व्यवसाय करणारा व्यावसायिक, कामगार किंवा कारागीर यांची मेहेनत कारणीभूत असते. हुपरीतील चांदी व्यवसायाचेही बाबतीत हेच म्हणावे लागेल. येथील व्यावसायिक त्याचप्रमाणे कारागीरांनी मेहेनतीने हा व्यवसाय विकसित केला. यामध्ये कारागीर स्त्रियांचेही योगदान महत्वपूर्ण राहिले आहे. सुरुवातीच्या टप्यात केवळ माटया भरणारी स्त्री ते मशीनच्या सहाय्याने माटया तयार करणारी, विविध सुटे भाग तयार करण्याचे किचकट काम करणारी स्त्री एवढी मोठी मजल हुपरीतील कारागीर स्त्रियांनी मारली आहे. अकुशल कारागीर ते कुशल कारागीर असा टप्पा त्यांनी पूर्ण केला आहे. त्यांच्यातील पूर्ण क्षमतेचा वापर करून घेणे काळाची गरज आहे. त्यासाठीचे आवश्यक प्रशिक्षण, कामाचा योग्य मोबदला, समाजाकडून आणि शासनाकडून पाठबळ देणे, या स्त्रियांच्या समस्या सोडविणे आवश्यक आहे. यामुळे जागतिक पातळीवरील स्पर्धेतही टिकून राहण्याची क्षमता या व्यवसायात निर्माण होऊ शकते.

**संदर्भ**

१. बॉम्बे प्रेसिडेन्सी गॅझेटियर : कोल्हापूर जिल्हा खंड२४,१८८६पान नं.२९८; साप्ताहिकसत्यवादी कोल्हापूर आवृत्ती, दिनांक २०/६/१९४५, लेख : नमुनेदार गाव हुपरी

२. पाटील आप्पासाहेब (संपा.), महाराष्ट्राची कलानगरी हुपरी, राजवंती मासिक कोल्हापूर, ३०/१०/१९६६ पान नं. ६

३. कित्ता; मासिक किर्लोस्कर (दिवाळी विशेषांक), लेख: महाराष्ट्र भूमीचे मौल्यवान लेणे हुपरी, नोव्हेंबर १९५१ पान नं. १२

४. चांदी कारखानदार (उद्योजक) असोसिएशन हुपरी, वार्षिक अहवाल, वर्ष २०१८—१९; मुलाखत—सतीश भोजे (चांदी उद्योजक), हुपरी २०/९/२०२०
५. पाटील आप्पासाहेब (संपा.)उपरोक्त
६. मुलाखत—सौ. गिरीजा मंगेश पाटील (चांदी कारागीर), मांगूर,११/९/२०२०
७. मुलाखत—सौ. रूपाली राजेंद्र चौगुले(चांदी कारागीर), हुपरी ११/९/२०२०
८. मुलाखत—सुरेश बल्लाळे ( धडी उत्पादक ), हुपरी, ११/९/२०२०
९. साप्ताहिक लोकप्रभा दिवाळी विशेषांक २०१४, लेख:चांदीचा गाव पान नं.२५—२९
१०. मुलाखत—सौ. सुमन धोंडिराम भंडारे (केरधूणी करणाऱ्या),हुपरी,१२/९/२०२०
११. मुलाखत—सौ. भारती मारुती धोंगडे ( केरधूणी करणाऱ्या), हुपरी १२/९/२०२०
१२. मुलाखत—सौ. ज्योती दीपक माळी (चांदी कारागीर),पट्टणकोडोली,२०/९/२०२०

VOLUME - IX, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# २०. भारतीय राष्ट्रवादाचे व राष्ट्रीय एकात्मतेचे जनक : लोकमान्य टिळक

**डॉ. लोखंडे चारुशिला उत्तम**
इतिहास विभाग प्रमुख, शशिकला, ग्लोबल कॉलेज ऑफ आर्टस् अॅण्ड कॉमर्स डोंबिवली (पूर्व)

**प्रस्तावाना**

१७ व्या शतकात ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून ब्रिटिश भारतात व्यापारी म्हणून आले आणि राज्यकर्ते बनले. भारतीय जनतेमधील अज्ञान, जातीभेद, धर्मभेद, वंषभेद व गरिबी इ. फायदा घेऊन ब्रिटिशांनी "फोडा आणि झोडा" या नितीचा अवलंब करुन भारतीय जनतेवर अन्याय, अत्याचार केला. ब्रिटिशांच्या या जाचक सत्तेला विरोध करण्यासाठी भारतीय जनतेमध्ये असंतोषाची भावना निर्माण करण्याचे प्रभावी कार्य सर्वप्रथम लोकमान्य टिळकांनी केले. त्यामुळे सर व्हेलेंटाईन चिरोल यांनी "भारतीय असंतोशाचे जनक" या शब्दांत त्यांचे वर्णन केले. १९ व्या २० व्या शतकात भारतीय लोकांना अभिमान वाटावा असे अनेक थोर पुरुष व स्त्रीया होउन गेल्या. समाजकारण, राजकारण, अर्थकारण, धर्मकारण संशोधन, शिक्षण, लेखन, व्यवस्थापन, मनोरंजन, विज्ञान आणि क्रिडा इ. सर्वच क्षेत्रात स्व:ताचा ठसा उमटविणाऱ्या व्यक्तींनी स्वताचे स्थान निर्माण केले. परंतु असे असते तरीही दोनशे वर्षाच्या कालावधीत होउन गेलेल्या व्यक्तिमत्वात लोकमान्य टिळकांचे जीवनकार्य अतिशय प्रभावी होते.

भारतीय स्वातंत्र्य ची चळवळ अधिक प्रखर बनविण्याचे कार्य लो. टिळकांनी केले. त्यामुळे भारतीय लोकांनी त्यांना आदराने "लोकमान्य" ही पदवी बहाल केली. ब्रिटिश पारतंत्राची समस्या दुर करुन भारताला सार्वभौम राज्याच्या दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी, भारतीय स्वातत्र्य लढयाच्या इतिहासामध्ये अनेक थोर राष्ट्र पुरुषांनी महत्वपूर्ण योगदान दिले. त्यात लोकमान्य टिळकांचा उल्लेख महत्वाचा ठरतो.

**अ : स्वदेशी व राष्ट्राभिमान**

न्याय आणि उदार तत्वांच्या पायावर नवसमाजाची उभारणी करुन सर्वांना समतेचे बंधुत्वाचे व स्वातंत्र्य चे हक्क प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न, तसेच राष्ट्रावर गुलामगिरीचे संकट ओढविले असता त्यांच्यात स्वाभिमान, स्वातत्र्यच्छा इ. प्रवृत्ती चेतवून जनतेत स्वदेशाभिमान व राष्ट्राभिमान जागृत करुन, जनतेचा स्वातंत्र्याचा मंत्र देऊन स्वराज्यासाठी लढावयास प्रखर प्ररेणा देत असतो आणि ती व्यक्ती म्हणजे लोकमान्य टिळक होय. तीनशे वर्षात राष्ट्रावर गुलामगिरीचे संकट आले असताना जनतेला स्वातंत्र्याचा आणि स्वराज्याचा मंत्र देणारे व त्यांच्या सिध्दिीकरिता सज्ज करणारे दोन महापुरुष होउन गेले. पाहिले छत्रपती शिवाजी महाराज आणि दुसरे लोकमान्य टिळक असे धनंजय कीर यांचे मत आहे. लोकमान्य टिळकांची विद्‌वता अफाट स्मरणशक्ती, स्वार्थत्याग, कुशाग्र बुध्दीमत्ता, महान पांडित्य, स्वातत्र्यासाठी अथक परिश्रम, अव्वल दर्जाची पत्रकारिता इ. गुणांमुळे मनस्वी लोकप्रियता लाभली.

**ब. सुधारणावादी धोरण**

लोकमान्य टिळकांच्या सुधारणावादी धोरणात १९०८ पासून बदल होऊन त्यांनी साम्राज्यशाहीच्या मिमांसेस सुरुवात केली. १६ डिसेंबर १९०८ च्या एका लेखात त्यांनी मांडलेल्या विचारांवरुन ब्रिटिश व्यवस्थेवरचा त्यांचा विश्वास उठल्याचे स्पष्ट होते. ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या, दडपशाही व पिळवणुकीच्या धोरणाचा प्रतिकारच केला पाहिजे अशी त्यांची मानसिकता बनली होती.

ब्रिटनमध्ये उदामतवाद व हिंदुस्थानात दडपशाही आणि निर्घृण पिळवणूक हेच ब्रिटिशांच्या साम्राज्यशाहीचे राजकारण असून त्याकरिता कॉंग्रेसद्वारे राष्ट्रीय ऐक्य निर्माण करणे, जनतेच्या नि:शस्त्रप्रतिकाराकरिता उठाव करणे, जुलमी कायदयाचा प्रतिकार करणे व स्वराज्याचे देशव्यापी आंदोलन उभारणे असे लोकमान्य टिळकांचे मत होते.

**क. ईस्ट इंडिया कंपनीचे धोरण**

ईस्ट इंडिया कंपनीचे सुरवातीपासूनचे धोरण जास्तीत जास्त लाभ प्राप्त करणे हे होते. ईस्ट इंडिया कपंनीच्या समाप्तीनंतर सुध्दा ब्रिटिश सरकारने कंपनी धोरणात फारसा फरक केला नाही. उलट भारतीय उद्योगधंद्यावर जाचक कर आकारल्यामुळे देशी उद्योगधंदे नष्ट होऊन कुशल कारागीर बेकार झाले, परिमाणी जनतेचा जीवनस्तर दिवसेंदिवस घसरु लागला व भारत केवळ कच्चा माल तयार करण्याचे केंद्र बनले. शेतीबाबतही ब्रिटिशांचे धोरण कायम अनास्थेचे राहीले. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अत्यंत हालाखिची होती. भारतीय जनतेच्या तात्कालीन आर्थिक परिस्थितीचे वर्णन असे केले की “भारतीय जनता दरिद्रि आहे आणि ज्याप्रमाणात त्यांचा राहणीमानाचा स्तर खालावत आहे असे उदाहरण पाश्चात्य जगात कोठेही आढळणार नाही” इंग्रजांनी भारताचे जे अर्थिक शोषण चालविले त्यासंबंधी दादाभाई नौरोजींनी इंग्रजांना आधुनिक कसायाची उपमा दिली.

**ड. राष्ट्रीय सभेची स्थापना**

ब्रिटिशांचे वर्चस्व नष्ट करुन स्वराज्याची स्थापना करण्याच्या उद्‌देषाने १८८५ मध्ये राष्ट्रीय सभेची स्थापना करण्यात आली. सुरवातीला सर्वांनी एकत्र येऊन अर्ज विनंत्या करुन स्वातंत्र मिळविण्याचा प्रयत्न केला. पण त्यास अपयश आले. राष्ट्रीय सभेत मवाळ आणि जहाल असे दोन गट पडले, त्यामध्ये :-

- **मवाळ गटामध्ये :** दादाभाई नौरोजी, न्या. रानडे, गोपाळकृष्ण गोखले, फिरोजशहा मेहता इ. नेत्यांचा समावेश होता. त्यांनी अर्ज, विनंती सारख्या सनदशीर माध्यमातून स्वातंत्र्याची इच्छा प्रकट केली होती. परंतु जहालगटाने विरोध केला व स्वदेशी, बहिष्कार राष्ट्रीय शिक्षण, उत्सव इ. मार्गाचा अवलंब केला.
- **जहालवादी गटामध्ये :** लोकमान्य टिळक, बिपिनचंद्र पाल, लाला लजपतराय इ. चा समावेश होता. मवाळवादी मार्गाने आपल्याला कधीही स्वातंत्र्य मिळणार नाही, स्वातंत्र्यासाठी क्रांती हाच एकमेव मार्ग आहे असे जहालवाद्यांचे मत होते.

लोकमान्य टिळक राष्ट्रीय चळवळीतील जहालवादी प्रवाहाचे एक आधारस्तंभ होते. त्यामुळेच त्याना प्रखर राष्ट्रवादी या नावानेही ओळखले जाते. लोकमान्य टिळकांनी ब्रिटिश साम्राज्यशाही स्वराज्य, स्वदेशी बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, हिंदु-मुस्लीम ऐक्य, धर्म व सामाजिक सुधाराच्या दृष्टीने जो विचार मांडला, त्याचे अंतिम ध्येय "स्वराज्य" हेच होते.

**लोकमान्य टिळकांचे हिंदुस्थानाच्या जडणघडणीतील स्थान**

लोकमान्य टिळकांचे हिंदुस्थानच्या जडणघडणीतील स्थान अद्वितीय म्हणावे लागेल. आणि या संदर्भात रा.ना.शिखरे म्हणतात,"जर्मनीला ब्रिस्मार्कने, इटलीला काव्हुरने, रशियाला लेनिनले जसे राष्ट्र म्हणून घडविले तसे इंग्रजी राज्यातील हिंदुस्थानाला लोकमान्य टिळकांनी निर्माण केले."

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्या प्राप्त झाले आणि स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करणाऱ्या स्वातंत्र्या सैनिकांचे राष्ट्रभक्त शुरविरांचे भारतीय मातृभूमीला परकियांच्या गुलामगिरीच्या शृखंलेतून मुक्त करण्याचे एक स्वप्न साकारले. स्वातंत्र्योत्तर वाटचालीत लोकशाही ही भारताने अंगिकारलेल्या आपल्या धोरणांमध्ये वेळोवेळी केलेले बदल आणि बदलत्या जागतिक परिस्थितीच्या संदर्भात स्वीकारलेले उदारमतवादी धोरण पाहता प्रवास राष्ट्रीयत्वाकडून वैश्विकतेकडे होत आहे. यामुळे आपली संस्कृती, सार्वभौमत्व याचे अस्तित्व धोक्यात आल्याचे बोलले जाते. तसेच आर्थिक उदारीकरणामुळे प्रखर राष्ट्रवादाची भावना क्षीण, (दुर्बल) होत चालली आहे असे बोलेले जाते, परकिय भांडवलाचा ओघ वाढत जाउन आपण आधी आर्थिक गुलाम होऊन त्याचे पर्यवसन राजकिय गुलामगिरीत होईल अशीही टिका केली जाते.याच पार्श्वभूमीवर समाजाला राष्ट्र म्हणून घडविणाऱ्या व्यक्तिच्या कार्याचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

**संशोधनाचे महत्व**

भारतीय स्वातंत्र्या लढयाच्या वाटचालीत १९०५ ते १९२० या कालखंडाने लोकमान्य टिळकांनी जहाल राष्ट्रवादाचा पुरस्कार करुन भारतीय समाजजीवन जागृत व संघटीत करण्यासाठी जे प्रयत्न केले ते उल्लेखनिय आहे. लोकमान्य टिळकांनी स्वराज्य प्राप्तीसाठी सांगितलेले मार्ग टिळकोत्तर कालखंडातही अनुसरले गेले, त्या मागील टिळक विचारांची प्रेरणा समजून घेणे भारतीय स्वातंत्र्या लढयाच्या आकलनाच्या संदर्भात महत्वाचे ठरते. लोकमान्य टिळकांनी राबविलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या, जसे(गणेशोत्सव) चा स्वीकार आज देश विदेशात झाला आहे. त्यांनी जागरुक जनतेला संघटित करण्यासाठी उत्सवांचा उपयोग करुन स्वराज्य प्राप्तीचे ध्येय शक्य असल्याचे मत मांडले. म्हणूनच स्वराज्याअंतर्गत या सांस्कृतिक उत्सवांचा उपयोग भारतीय समकालीन राष्ट्रीय समस्यांच्या संदर्भात जनप्रबोधनासाठी केला.

तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणत मुल्य शिक्षणाचा झालेला अंतर्भाव आणि त्या संदर्भात लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रीय शिक्षणाचे असलेले महत्व नवभांडवलशाहीवादी किंवा नवसाम्राज्यवादी आर्थिक धोरणाच्या संदर्भात लोकमान्य टिळकांच्या स्वराज्याचा विचार अभ्यासणे महत्वाचे ठरते.

**समारोप**

लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांच्या आर्थिक व राजकिय विचारांचा विचार केल्यावर असे दिसून येते की, ते एक थोर राष्ट्रभक्त, निर्भिड पत्रकार, निष्णांत कायदेपंडीत, नामवंत विद्वान, गणितज्ञ, सस्कृतज्ञ राष्ट्रीय चळवळीतील जहाल मतवादी प्रवाहाचे एक आधारस्तंभ, थोर अभ्यासक, भारतीय असंतोषाचे जनक, स्वराज्याची मागणी करणारे एक लोकोत्तर सर्वश्रेष्ठ नेता म्हणूनही त्यांचा लौकिक होता.स्वातंत्र्याचा लढा जनसामान्यांपर्यंत नेणे आणि राष्ट्रवादाची विचारप्रणाली उभी करणे ही लोकमान्य टिळाकांच्या राजकिय चिंतनाची महत्वाची उदिष्टये होती.

लोकमान्य टिळकांनी इंग्रजांचे राज्य नष्ट करण्यासाठी व स्वराज्याची प्राप्ती करण्यासाठी जे प्रयत्न केले त्यामुळे जनतेच्या मनामध्ये त्यांचे स्थान महत्वाचे होते. लोकमान्य टिळकांच्या आर्थिक विचारांत साम्राज्यवाद म्हणजे गुलामगिरी होय हा सिध्दांत महत्वाचा, असून "जो दुसऱ्यांच्या स्वातंत्र्यांचे अपहरण करतो तो स्व:ताचे स्वातंत्र्या गमावून बसतो." असे लोकमान्य टिळकांचे मत होते.

लोकमान्य टिळकांचा चलनासंबंधीचा विचार जागतिक पातळीवर काही प्रमाणात का होईना प्रत्यक्ष व्यवहारात उतरला आहे. त्यांच्या मते हळूहळू जगातील सर्वच राष्ट्रांनी, एक चलनाचा वापर केल्यास जागतिक व्यापार सुव्यवस्थित होऊन मुक्त अर्थव्यवस्था, जागतिक बाजारपेठ, जागतिकीकरण, विश्वराज्यव्यवस्था अस्तित्वात येण्यास मदत होईल.

ब्रिटीश सत्तेसंबंधी विचार मांडत असतांना लोकमान्य टिळकांनी ब्रिटिश सत्तेकडून भारतीयांना कोणते फायदे झाले आणि काणते तोटे या दोन्ही बाजूंनी सविस्तर वर्णन केले आहे. म्हणूनच कायदेशीर, सनदशीर मार्गाने आपल्याला स्वराज्य मिळेल, यावर सुरुवातीला विश्वास होता पण ब्रिटिश सत्तेचा अन्याय, अत्याचार, शोषण, पिळवणूक वाढली व लोकमान्य टिळकांनी ब्रिटिश सत्तेला विरोध करुन सनदशीर मार्गाने स्वराज्याची प्राप्ती करता येणार नाही याची जाणिव लोकमान्य टिळकांना झाल्यामुळे त्यांनी जहाल मार्ग स्विकारला.

**निष्कर्ष**

१. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांच्या राजकीय कार्याचा विचार केल्यास आपणांस असे म्हणता येईल की, त्यांनी केवळ प्रादेशिक पातळीवरच नाही तर राष्ट्रीय पातळीवरही देशाचे प्रमुख नेतृत्व केले आहे.

२. लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाला धाडसाची, धैर्याची आणि त्यागाची धार होती, विद्वतेचे तेज होते.

३. राष्ट्राच्या गुलामगिरीचे पाश तोडतांना तुरुंगवास भोगणे हे अपरिहार्य असून, भारतीय तरुणांच्या मनावर फाळणी विरुध्द चळवळ थांबवू नका, सर्व देश तुमच्या पाठीशी आहे. अशी गर्जना करुन वंगभंगाचे लोण सर्व हिंदुस्थानात पसरविले. तसेच बहिष्काराची चळवळ ही संपूर्ण हिंदुस्थानात पसरवून लोकमान्य टिळक "आखिल भारतीय नेत झाले."

४. लोकमान्य टिळकांनी भाषा, संस्कृती, धर्म इ. घटकांच्या माध्यमातून जनतेमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण केली.

५. स्वदेशी व बहिष्कार चळवळीतून जनतेमध्ये एकात्मता निर्माण केली. कारण ब्रिटिश व्यवस्थेवरील आपला राग व्यक्त करण्याच्या क्रांतीकारकांच्या हिंसात्मक विरोधी कृतीपेक्षा स्वदेशीचा वापर ही मोहीम श्रेष्ठदर्जाची होती.

६. टिळक कालीन राजकारणात बहिष्काराच्या साधनाचे किंवा मार्गाचे स्थान मोठे होते.

७. टिळकांनी व्यवस्थेविरुध्द रोष व्यक्त करण्यासाठी व्यक्तिऐवजी वस्तुची निवड केली. हे त्यांच्या राजकारणाचे वेगळेपण म्हणावे लागेल.

८. राजकारण हा टिळकांच्या व्यक्तिमत्वाचा मुख्य पैलू होता.

९. राष्ट्राच्या पायातील पारतंत्र्याच्या शृंखला तोडण्यासाठीचा लढा त्यांनी तीस वर्षे लढविला व एका मोठया साम्राज्यशाहीशी टक्कर दिली.

**संदर्भ**

१. डॉ. वा.भा.पाटील, "प्राचीन व आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत", प्रशांत पब्लिकेशन, जळगाव २००९, पृ.क्र. २६४.

२. वि.ष. गोखले, "लोकोत्तर लोकमान्य टिळक", अनघा प्रकाशन, ठाणे (पूर्व) २००७ पृ.क्र. १३३ (त.प.)

३. तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा)"लो. टिळक लेखनसंग्रह साहित्य अकादमी", नवी दिल्ली १९६९, पृ.क्र.४५.

४. धनंजय कीर,"लोकमान्य टिळक आणि राजर्शी शाहू महाराज एक मुल्यमापन", श्री. गजानन बुक डेपो, मुंबई पुणे १९७८, पृ.क्र. ०९.

५. डॉ. भा.ल.भोळे, "आधुनिक भारतीय राजकीय विचार", पिंपळपूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर २००३, पृ.क्र.२८०, २८१ (त.प.).

VOLUME - IX, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# २१. अष्टपैलू व्यक्तीमत्व लोकमान्य बाळगंगाधर टिळक

**प्रा. डॉ. सौ. मंजिरी म. कुलकर्णी**
सहयोगी प्राध्यापक, कन्या महाविद्यालय, मिरज.

**पूर्ववृत्तांत**

२३ जुलै१८५६ रोजी रत्नागिरी जिल्हयातील चिखलगाव येथे बाळगंगाधर टिळक यांचा जन्म झाला. वडीलांचे नांव गंगाधर,आईचे नांव पार्वतीबाई. चिखलगावच्या खोतीचे काम यांच्या घराण्याकडे होते. तसेच टिळकांचे चुलत पणजोबा धोंडोपंत पानिपतच्या लढाईवर गेले होते. तेथून परत येताना ते मृत्युमुखी पडले. अशाप्रकारे पेशव्यांच्या राज्याशी त्यांचे घराणे निगडीत होते.

विद्यार्थीदशेत असताना बाळ उर्फ केशवनी जोर बैठका, कुस्ती, पोहणे, बोटींग अशा व्यायामाने 'वज्रदेह' शरीर कमावले. त्यांचे पुणे येथे महाविद्यालयीन शिक्षण 'डेक्कन कॉलेज' येथे झाले. पुढे ते एल.एल. बी. झाले. त्यांचा विवाह सत्यभामाबाईशी झाला. त्यांचे चिरंजीवाचे नांव श्रीधर होते.

**१. संस्था, संस्थापक —**देशहिताकरिता काहीतरीकृती करण्याची इच्छा असलेले काही तरुण योगायोगाने एकत्र आले. त्यात लोकमान्य टिळक, आगरकर यांचा समावेश होता.[१] व त्यांनी १ जानेवारी १८८० रोजी 'न्यु इंग्लिश स्कुल' सुरु केले. तसेच फर्ग्युसन महाविद्यालय डेक्कन एज्युकेशन सोसायटीची १८८४ साली स्थापना केली. ब्रिटीशांनी भारतीयांचे मोठया प्रमाणावर शोषण करण्यास सुरवात केली होती. त्यास प्रत्युत्तर म्हणून लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय शिक्षण, स्वराज्य, बहिष्कार, स्वदेशी याचा पुरस्कार केला.[२] यातून युवकांना नवी प्रेरणा शक्ती दिली.

**२. शिवजयंती, गणेशोत्सवास सुरुवात —** स्वभाषेची अभिवृध्दी, स्वराष्ट्राच्या इतिहासाचा स्वकीय दृष्टीने अभ्यास व मनन स्वधर्म श्रध्दा इ. गोष्टी जशा राष्ट्राच्या उत्कर्षास कारणीभूत होतात. तसेच श्री शिवजयंती उत्सव होय. जनमाणसांची नस ओळखून लोकमान्य टिळकांनी छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव सुरु केला. तसेच ब्रिटिशांच्या भेदनीतीला आव्हान देण्यासाठी १८९३ साली गणेशोत्सव सुरु केला.[३] लोकमान्य टिळकांना धर्माविषयी आस्था होती. सर्व जाती धर्माचे लोक समाज एकत्र येण्यासाठी सर्वांना मूर्तीपर्यंत जाणेसाठी हा सार्वजनिक गणेशोत्सव सुरु केला. यातून लोकमान्य टिळकांनी लोकसंग्रह जाणिवेची अभूतपूर्व देणगी या माध्यमातून दिली. यातून राष्ट्रीय चैतन्य लोकमान्य टिळकांनी निर्माण केले. समाजाची एकत्र ताकद ब्रिटिशांना दिसावी हा त्यामागचा त्यांचा उद्देश होता.

**३. शिक्षणविषयक विचार —**लोकमान्य टिळकांनी शिक्षणावर ३१ अग्रलेख लिहिले. तसेच गुरुपगुरुंच्या विद्याभ्यासाचा व सदवर्तनाचा परिणाम शिष्याच्या मनावर होण्यास गुरुजी विद्याव्यसनी असून छात्रवासी वर्गाशी प्रेमभावाने वागणारे असले पाहिजेत[४] असे लोकमान्यांना वाटत असे.

मुंबई युनिव्हर्सिटी स्थापून ४० वर्षे झाली पण तेव्हापासून आत्तापर्यंत ४० वर्षात या संस्थेतून एकही जगप्रसिध्द विद्वान निघू नये हे आश्चर्य नव्हे काय ? परंतु जपानमध्ये मात्र तीस वर्षाचे आत याहून भिन्न स्थिती झालेली आमच्या नजरेस येत आहे. ष्युनिव्हर्सिटया म्हणजे कनिष्ठ प्रतिच्या सरकारी नोकऱ्यांकरिता लागणारे उमेदवार तयार करण्याच्या टांकसाळी किंवा हमालखाने होत आहेतष्[५]असे शब्दांनी नाही तरी कृतीने तरी सरकार स्पष्ट दर्शवत आहे असे त्यांनी अग्रलेखात म्हटले आहे.

इंग्रजी शिक्षण एकांगी आहे व ते फक्त सरकारी नोकरीस लागणारे अवश्य गुण एत्तददेशीय लोकांच्या अंगात आणण्याकरिता योजिलेले आहे. या शिक्षणक्रमांत तयार झालेल्या लोकांस धर्म, नीती, शास्त्रीय शोध, धंदे, शिक्षण वगैरे राष्ट्रांच्या उत्कर्षास अवश्य लागणाऱ्या ज्ञानाची व कलांची माहिती तसेच इत्यादी व्यंगे लोकांच्या हळूहळू नजरेस येऊ लागली व नोकरी मिळण्याचे प्रमाण उत्तरोत्तर कमी होत गेल्यामुळे इंग्रजी शिकलेल्या ज्ञानाचा अपूर्तेपणा व कच्चेपणा अधिकाधिक उघडकीस येऊ लागला.[६] असेही त्यांनी अग्रलेखात म्हटले आहे.

लोकमान्य टिळकांना विद्यार्थ्यांना टवबंजपवदंस ज्तंपदपदहमिळावे असे वाटत होते. त्यांचे विचार आजही या परिस्थितीत लागू होतात.

लोकमान्य टिळक हाडाचे शिक्षक होते. ते गणित शिकवत. लो.टिळक आपल्या मुलांना शिक्षणासाठी दबाब आणत नाहीत तर मॅट्रीकनंतर काय करायचं तुमचं तुम्ही ठरवा म्हणजे आजच्या काळात आत्मनिर्भरतेचे धडे ते त्याकाळी देतात. तसेच श्रमप्रतिष्ठेचे तत्व ते सांगतात व निवडलेल्या क्षेत्रामध्ये उत्तमाचा ध्यास घ्या व अनिष्ठ सोडा[७] असे त्यांचे मत होते.

**४. सहकार चळवळीचा पाया —** लोकमान्य टिळकांनी सहकार चळवळीचा पाया घातला. पुणे येथे पहिला चिमणी कारखाना काढला. पैसा फंड काच कारखाना तळेगांव दाभाडे येथे देशाच्या उन्नतीसाठी केला. एक एक पैसा गोळा केल्यास लक्षावधी रुपयांची रक्कम हां हां म्हणता उभी होईल व त्यातून लहान मोठे असे उद्योगधंदे चालवून देशाला भरभराटीच्या मार्गाला लावता येईल असा विचार अंताजी दामोदर काळे यांनी मांडला. तो लो.टिळकांना भावला व त्यांनी काळे यांना उत्तेजन दिले. हीच काचशाळा अनेक काच कारखान्यांची जननी ठरली व त्याचठिकाणी राष्ट्रीय शिक्षण व धंदे शिक्षण देणारी शाळा सुरु झाली.[८] तसेच लोकमान्ययांनी शेअर बाजारमध्ये गुंतवणूक करण्यास लोकांना प्रवृत्त केले.

**५. केसरी व मराठा वृत्तपत्रास सुरुवात —**'वृत्तपत्र' हे लोकशिक्षणाचे माध्यम असून झोपी गेलेल्या समाजाला जागे करण्याचे काम या वृत्तपत्रांनी केले. त्यात 'केसरी' व 'मराठा' या वृत्तपत्रांनी स्वातंत्र्य चळवळीत महत्वपूर्ण काम केले. ही वृत्तपत्रे सुरु करण्यासाठी लो.टिळकांनी स्वत: छपाईचे मशीन डोक्यावरुन वाहून नेले.[९] स्वराज्य, स्वदेशी बहिष्कार राष्ट्रीय शिक्षण स्वभाषा व स्वधर्म याचा त्यांनी आपल्या अग्रलेख लेखनातून केलेला उदघोष हा लोकांना विचार करायला, प्रवृत्त करणारा होता. १८८१ ते १९२० या काळात लोकमान्यांनी केसरीचे संपादक पद भूषविले. ५१३ अग्रलेख लिहिले. राजकीय व सामाजिक विषयावर भाष्य त्यांनी केले.

'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय' या त्यांच्या अग्रलेखामुळे त्यांना कारावासाची शिक्षा झाली.

**६. कामगारांचे नेते —** कामगारांची व शेतमजूरांची बाजू मांडणारे अनेक लेख लोकमान्य टिळकांनी प्रसिध्द केले. इंग्लंडमध्ये असताना अनेक कामगार सभातून भाषणे केली. अशा एका सभेचे अध्यक्षस्थान जॉर्ज बर्नार्ड शॉ यांनी भूषविले होते. इंग्लंडमधून परतल्यावर टिळकांचे स्वागत करणारे एक मानपत्र मुंबईच्या कापड गिरणी कामगारांनी २८ नोव्हेंबर १९१९ रोजी अर्पण केले.[१०] कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांना लोकमान्य टिळकांबद्दल आदर होता. कार्ल मार्क्स व त्यांचे वर्गसंघर्षाचे तत्वज्ञान याची भारतीयांना प्रथम ओळख करुन देणारे लो.टिळकच होते.लो.टिळक कामगार वर्गात प्रिय होते.१९०८ साली लोकमान्य टिळकांना सहा वर्षाच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. त्यावेळी मुंबईतील गिरणी कामगारांनी उस्फुर्तपणे संप पुकारला होता

**७. खगोलशास्त्रविषयक विचार —**लोकमान्य टिळकांचा खगोलशास्त्राचा अभ्यास होता. त्यांनी पंचांगामध्ये सुधारणा केल्या. खगोलशास्त्राचा उपयोग करुन त्यांनी वेदांचा कालखंड ठरविण्याचा प्रयत्न केला. खगोलशास्त्राच्या अभ्यासाच्या जोरावर ओरायन नावाचा शोधनिबंध लिहिला. त्यांनी तो १८९२ मध्ये लंडनमधील एका सभेत वाचला. तो पुढे पुस्तकरुपाने प्रसिध्द झाला. त्यात त्यांनी अनेक पाश्चात्य व भारतीय संशोधकांचे संदर्भ दिले आहेत.[११]

**८. अर्थविषयक विचार —** अर्थशास्त्राशी संबंधित एकही मुद्दा असानाही की ज्यांस टिळकांनी स्पर्श केला नाही.चलन, उद्योग, अर्थकारण स्वदेश रोजगारभिमुखता शेती अशा अनेक विषयावर लोकमान्य टिळकांनी चिंतन केले. टिळकांच्या मनात दादाभाई नौरोजींनी अर्थविषयक जाणिव निर्माण केली. शेतकऱ्यांच्या विपन्नावस्था यावर ते विचार मांडतात.[१२]त्या काळात कच्चा माल कापूस परदेशीनिर्यात याविषयी त्यांनी आपले विचार मांडले. सुत व विणकाम यावर लेख लिहिले. औद्योगिक पारतंत्र्यावरही ते आपले विचार मांडतात, हिंदुस्तानचे दारिद्रियाची अवस्था 'राजाकालस्य कारणम' आहे ते खरे आहे असे त्यांना वाटते. ब्रिटीशांचे आव्हान आर्थिक आव्हान आहे असे त्यांना वाटे. तसेच १८११ मध्ये 'मराठा' मध्ये ते लिहीतात आपण भांडवलदार बनले पाहिजे. भांडवलदारावरही अखेर श्रमजीवी मात करतो[१३] असे लोकमान्य टिळकांचे मत होते.

लोकमान्य टिळकांनी साखर उद्योगाला वाव आहे हे ओळखले होते. शेतकरी फक्त स्वदेशी चळवळीशी जोडता त्याची भरभराट होईल असे त्यांना वाटे.

**९. लोकमान्य टिळकांची ग्रंथ संपदा**

१. **गीता रहस्य—** हा ग्रंथ त्यांनी लिहिला. यांत त्यांनी भगवदगीतेतील कर्मयोगाची समीक्षामांडली आहे.

२. **The Arctic Home in the Vedas—**आर्क्टिक हे आर्यांचे मूळ वस्तीस्थान आहे असे त्यांना वाटते.

३. **टिळकपंचांग पध्दती —**ही पंचांग पध्दती कोकण, पश्चिम महाराष्ट्रामध्ये वापरली जाते.वेदांचा काळ व वेदांग जोतिष.

४. The Hindu Philosophy of Life Ethics & Religion १८८७ प्रकाशित.

**योग्यता**

'लोकमान्य टिळकसंपादक','शिक्षक' होते.'आधुनिक भारताचे शिल्पकार होते'. ते 'लोकशाहीवादी होते'. ''बहुजन समाजावर एवढे वजन असणारा कोणी नेता झाला नाही'' असे महात्मा गांधी म्हणत. लोकमान्य टिळक ब्रिटीश समाजालाहादरा देणारा नेता होता. त्यांचे लालालजपतराय व बिपीनचंद पालयांच्याशी घनिष्ठ संबंध होते म्हणूनच त्यांना लाल, बाल, पाल असे म्हणत. त्यांनी ॲनी बेझंटबरोबर होमरुल चळवळीची स्थापना केली. तसेच त्यांना अग्रलेख लेखनाचे व्याकरणकार या नावाने त्यांना ओळखले जाते. लोकमान्य टिळकांना''ब्रिटीश''भारतीय' असंतोषाचे जनक'' म्हणत.

**तळटीपा**

१. सदानंद मोरे, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक गंधर्ववेद प्रकाशन २०००, पृ.२४
२. संपादक राम शेवाळकर, लोकमान्य टिळकांचे निबंध नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, १९९०पृ.क्र.२७६
३. सदानंद मोरे जोशी, उ.नि.पृ.क्र.७५
४. संपादक लक्ष्मणशास्त्री जोशी, लोकमान्य टिळकलेखसंग्रह प्रथमावृत्ती, १९६९, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, २००९,पृ.३२८
५. संपादक लक्ष्मण शास्त्री जोशी, लोकमान्य टिळक लेखसंग्रह प्रथमावृत्ती, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, पृ.३३२
६. संपादक लक्ष्मण शास्त्री जोशी, लोकमान्य टिळक लेखसंग्रह प्रथमावृत्ती, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, पृ.३२९
७. संपादक गिरीश कुबेर, लोकसत्ता विशेषांक, एकमेव लोकमान्य, लोकमान्य टिळक स्मृती शताब्दी, १ ऑगस्ट २०२०, पृ.५७
८. संपादक डॉ. दिपक ज. टिळक, केसरी शतकोत्तरी गौप्य महोत्सव विशेषांक, २००६, पृ.७३
९. केसरी व उ. नि., पृ.९६
१०. डॉ. जे.व्ही. नाईक, कार्ल मार्क्स समाजवाद व लोकमान्य टिळक, लोकसत्ता विशेषांक, पृ.९३
११. जयंत नारळीकर, लोकमान्य टिळक व वेदांची कालखंड, पृ.१२
१२. गिरीश कुबेर, लोकमान्यांचा दुर्लक्षित विचार, पृ.क्र.३१,३२
१३. य.दि.फडके,विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंडा दुसरा, के.सागर, १९१४ ते १९२०, प्रकाशन, नोव्हेंबर २०१५, पृ.१६३

# २२. मानव मुक्तीचा शिलेदार - अणाभाऊ साठे

**डॉ. श्री. निळकंठ रामचंद्र व्यापारी**
ता. मुरबाड, जि. ठाणे.

अण्णाभाऊंचे खरे नाव तुकाराम त्यांच्या वडिलांचे नाव भाऊराव सिद्धोजी साठे. लहान भावंडे तुकारामला अण्णा म्हणत. नंतर त्यांच्या नावापुढे वडिलांचे नाव लागले आणि ते अण्णाभाऊ या नावाने ओळखले जाऊ लागले. लहानपणी अण्णा दिवसभर रानात हिंडत. मित्रांसमवेत पाखर मारत हिंडणे हा त्यांचा आवडता छंद. वडील भाऊराव मुंबईत माळी काम करून गावाकडे असणाऱ्या कुटुंबाला चरितार्थ चालवत. मुंबईत राहत असल्यामुळे शिक्षणाचे महत्त्व त्यांना समजले होते. त्यामुळे आपल्या मुलांनी शिकावे असे त्यांना वाटे. गावाकडे आल्यावर एके दिवशी त्यांनी अण्णाला शाळेत घातले. त्यावेळी त्यांचे वय थोडे जास्तच होते. शाळेत गेल्यावर दुसऱ्याच दिवशी गुरूजी त्यांच्यावर संतापले ते म्हणाले, “काल पासून ही चारच अक्षरे तू गिरवतो आहेस तरी तुला ती नीट लिहिता येत नाहीत. त्यावर अण्णांनी त्यांना आपण कालच शाळेत आलो असल्याचे आणि मन लावून शिकणार असल्याचे सांगितले. पण गुरूजींनी त्याला मारायचे ठरवले होते. घोडयाएवढा झाला आहेस आणि अक्षर काढता येत नाही असे म्हणत मास्तरांनी अण्णांची उजव्या हाताची बोटे सुटेपर्यंत मारले. दुसऱ्या दिवशी अण्णांनी वर्गात येऊन गुरूजींच्या अंगावर मोठा धोंडा टाकला. त्यामुळे गुरूजी कोलमडले आणि विद्यार्थ्यांना सांगू लागले, पकडा त्या तुक्याला. पण तोपर्यंत अण्णा घरी पोहोचले होते. पंतांनी अण्णा आणि त्यांच्या वडिलांना बोलवून घेतले. बरोबर अण्णांचे मामा फकिरा हे देखील आले होते. पंतांनी अण्णांची सुजलेली बोटे पाहिली. ते म्हणाले, “गुरूजी तुम्हांला मुल आहेत की नाही? गरीबांच्या पोराला एवढे मारले जर तुम्ही गावातील दुसऱ्या कोणत्या पोराला एवढे मारले असतं तर तुम्हाला गावातून पळून जावे लागले असते.” गुरूजी त्यावर काही बोलले नाहीत. तेव्हा फकिरा त्यांना म्हणाले, “गुरूजी इंग्रजांनी आम्हांला गुन्हेगार ठरवलं म्हणून तुम्ही ठरवू नका. पोराला नीट शिकवा. नायतर भलतंच व्हईल.” पंत म्हणाल, “गुरूजी संत ज्ञानेश्वराने रेडयामुखी वेद म्हणवला असे सांगितले जाते. तो रेडा प्रतिकात्मक होता. अज्ञानी अशिक्षित समाजाला ज्ञान देण्याचे कार्य ज्ञानेश्वरांनी केले. तेव्हा तुम्ही आता ती भूमिका स्वीकारा. गरीबांच्या मुलांना दूर लोटू नका. उदया शिकून ह्या तुक्याचा तुकाराम होईल आणि विमानातून इंग्लंड, अमेरिकेला जाईल.तो शिकला पाहिजे.”

अण्णांचा जन्म सांगली जिल्हयातील वाटेगाव येथे १ ऑगस्ट १९२०रोजी गरीब घरी झाला. वर्चस्व आणि श्रेष्ठत्वाच्या कल्पनेतून हिंदू धर्माने काही जातींना गावाच्या बाहेर ठेवलं होते. अशाच वस्तीतील एका छपरात अण्णांचा जन्म झाला. परिसरात कुठेही दरोडा पडला किंवा चोरी झाली की, पोलिस लगेच या वस्तीत येऊन लोकांची धरपकड करायचे. अशा वेळी घरातील पुरूष—बायका दिवस दिवस डोंगरात जाऊन लपायचे

खालच्या जातीतील म्हणून गावात कुणाला शिवायचे नाही, हे अण्णांनी लहानपणीच अनुभवले. अगदी वर्गातही त्याकाळी प्रत्येक जातीची मुले वेगवेगळी बसत. त्यामुळे अण्णांनी एक दिवस वडिलांना विचारले, "तुमच्या म्हमईत जातीची शिवाशिव आहे. का?" वडील म्हणाले, "व्हय. चहाच्या हॉटेल मालकांनी फुटक्या कपबशी बाहेर ठेवल्या आहेत. त्यातच आपल्या जातीची माणसं भाहेर बसून च्या पेत्यात. तसं बघाय गेल तर आमाला कोनीच वळखत न्हाय, पन हयो जुना रिवाज हाय म्हणून आमी आपल भाहेर बसून पेतो. उगीच कोनाची खटखट नको म्हणून. इंग्रज सायेबाकडं ही शिवाशिव नसती. मी त्येंच्याकडं माळीकाम करायला गेलो म्हंजी ते मला तेंच्याच कपात च्या देत्यात. तेंच्याकडे एकच मानसाची जात. आमची मानसं नस्ती आडगी. म्हणूनच इंग्रज आमच्यावर राज्य करत्यानी. अन् आमी एका देशाच असून आमी एकमेकाला शिवून घेत न्हाय"

"मुंबई नगरी ग बडी बाका
जशी रावणाची दुसरी लंका
वाजतो ग डंका—डंका चहूमूलकी
राहयाला गुलाबाचे फूल की"

पुढे गावात राहून जगणे अवघड झाल्यामुळे भाऊराव सर्व कुटुंब घेऊन मुंबईला गेले. पुण्यापर्यंतचा प्रवास सगळया कुटुंबाने चालत केला. एकेका गावात ३—४ दिवस राहत त्यांच्या हा प्रवास चालू होता. मग पुढे खंडाळयाचा कोळशाचा कंत्राटदार कल्याणचा कंत्राटदार यांच्याकडे कष्टाची कामे करत सगळे जण रेल्वेने मुंबईला पोहोचले. मुंबईत भायखळयाला एका चाळीत ते राहू लागले. त्या ठिकाणी अण्णाा एका कपडे विकणाऱ्या फेरीवाल्याकडे काम करू लागले. त्याची कपडयाची पेटी डोक्यावर घेऊन अण्णा त्याच्यामागे चालत असत. एकदा त्यांची भेट ज्ञानदेव नावाच्या नातलगाशी झाली. ते उत्तम कलावंत होते. अण्णांनी त्यांच्याशी जवळीक वाढवली आणि ते त्यांचय वरळीच्या घरी जाऊ लागले. तिथे ते ज्ञानदेवच्या तोंडून रामायण, हरिविजय, पांडवप्रताप हे ग्रंथ ऐकत. फक्त ऐकून त्यांनी हे ग्रंथ तोंडपाठ केले. पुढे आपोआप अक्षर ओळख झाली. या एक वर्षात त्यांनी कोणतेही काम केले नाही. फक्त एकच ध्येय ठेवले शिकण्याचे. नंतर ते माटुंग्यातील एका झोपडीत राहायला आले. गिरणीत काम करू लागले. तिथेच त्याचा कामगार चळवळीशी संबंध आला. सभा, मिरवणुका अशा कार्यक्रमात ते भाग घेऊ लागले. ऐतिहासिक पोवाडे म्हणू लागले. त्यांच्या खणखणीत आवाजाला लोकांकडूनही दादही तशीच मिळे. ते जे पाहत ते लगेच आत्मसात करण्याची अनोखी क्षमता त्यांच्यात होती. त्यामुळे ते बासरी वाजवायला शिकले. एक दिवस त्यांनी बुलबुल तरंग नावाचे वाद्य आणले आणि त्याचा त्यांना नादच लागला. हे वाद्य ते उत्तम तऱ्हेने वाजवू लागले. ते भजन—गाणी म्हणू लागले. त्यासाठी त्यांनी पेटी आणली आणि ती कशी वाजवायची हे ते काही दिवसातच शिकले. तबला, सारंगी व ढोलकी अशी सर्वच वाद्ये ते वाजवत असत. गिरणीचा संप झाला. ते ६ महिने चालला आणि गिरणी बंद पडली. ते वाटेगावला परत आले. तेव्हा महात्मा गांधींनी ब्रिटिशांना 'चले जाव' चा आदेश दिला होता. वाटेगाव परिसरात ब्रिटिशांच्या विरोधातील कारवायांमध्ये ते सहभागी झाले होते. त्यामुळे पोलिस

त्यांच्यामागे लागले. तेव्हा ते मुंबईला परतले. एव्हाना मुंबईतील लाखो गिरणी कामगारांमध्ये अण्णाभाऊ हे दलित समाजातील नवे शाहीर म्हणून प्रसिद्ध झाले होते. कामगार चळवळीतून स्वाभाविकपणे ते कम्युनिस्ट पक्षाचे काम करू लागले. कामगारांचे हलाखीचे जगणे, दलित समाजावर होणारे अत्याचार, अन्याय हे सगळे त्यांनी जवळून पाहिले होते. अनुभवले होते. या अनुभवांवर आधारित त्यांनी विपुल प्रमाणात लेखन केले. त्यांच्या ७ कादंबऱ्यांवर चित्रपटही निघाले. त्यातील फकीरा आणि वारणेचा वाघ हे चित्रपट विशेष गाजले. अनेक कथा, लोकनाटये व नाटके लिहिली. त्यांची पुस्तके जगभरातील २७ भाषांमध्ये अनुवादित झाली आहेत. देव—देवतांचे प्रस्थ माजवल्यामुळे हे देव—दलितांच्या मानगुटीवर येऊन बसले. हा समाज अंधश्रद्धेत अडकला, असे ते सांगत. ज्यांनी हेतुरस्पर देव, पुराणे वेद यांचे महत्त्व वाढवून स्वत:ची पिढयानपिढया पोळी भाजून घेतली, अशा प्रवृत्तीवर अण्णांनी त्यांच्या शाहिरीतून लेखणीतून घणाघाती प्रहार केले. कलापथकाच्या माध्यमातून समाजात जागृती करणयचे काम त्यांनी शेवटपर्यंत केलं. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत डफावर थाप देत त्यांनी महाराष्ट्र पिंजून काढला. अशा या महान व्यक्तिमत्वाचे १८ जुलै १९६९ रोजी निधन झाले.

“हिंदवी राज्य स्थापून
मोठया हिमतीनं शूर शिवाजीनं
राज्याभिषेक समारंभ खास
केला यथाविधी रायगड किल्ल्यास
ऐक शिवशाहीचा इतिहास”

**संदर्भ साधने**

१. साठे अण्णा भाऊ, फकीरा, सुरेश एजन्सी, पुणे, १९५९.
२. साठे अण्णा भाऊ, स्वप्नसुंदरी, अक्षय्य प्रकाशन, पुणे.
३. साठे अण्णा भाऊ, चित्रा, अक्षय्य प्रकाशन पुणे, १९४५.
४. साठे अण्णा भाऊ, वैर, अक्षय्य प्रकाशन, पुणे.
५. साठे अण्णा भाऊ, वारणेचा वाघ, अक्षय्य प्रकाशन, पुणे.

VOLUME - IX, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# २३. समाजसेविका - हिराबाई भापकर

**प्रा. डॉ. उज्वला विजय नलावडे**
असी. प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख, सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा.

**प्रस्तावना**

२० व्या शतकाच्या मध्यास अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय चळवळीत सदैव अग्रभागी असलेले दांपत्य म्हणजे सौ. हिराबाई व बापूसाहेब भापकर हे होत. शेतकरी कामगारांचा नेता म्हणून बापुसाहेब भापकरांचे कार्य अवघ्या महाराष्ट्राला माहित आहे. त्यांच्या सुविद्य पत्नी सौ हिराबाई भापकरांनीही पतीच्या बरोबरीने अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात कार्य करून आपल्या कर्तत्वाचा ठसा उमटविला. हिराबाईनी बापूसाहेबांच्या कार्याला अभुतपूर्व अशी साथ दिली. त्यांच्या कार्यात त्या कृतीशील समरस झाल्या असे असले तरी त्या स्वतंत्र व्यक्तीमत्वाच्या, तडफदार अशा समाजसेविका होत्या. स्वतंत्र भारतातील लोकल बोर्डाच्या पहिल्या महिला अध्यक्ष तसेच दुष्काळ निवारण समितीच्याही पहिल्या महिला अध्यक्षा म्हणून त्या ओळखल्या जातात. आपला संसार उत्तमरित्या सांभाळून समाजकारणात आपल्या कर्त बगारीचा ठसा उमटविणाऱ्या सौ हिराबाई भापकरांच्या कार्यकतृत्वाचा मागोवा घेण्याचा प्रयत्न प्रस्तूत शोधनिबंधात केला आहे.

पूर्ववृत्तांत

कोल्हापूरचे सत्यशोधक चळवळीचे नेते ॲड.भास्करराव जाधव यांचे कनिष्ठ बंधू गोविंदराव यांची हिराबाई थोरली मुलगी होय. हिराबाईचा जन्म १६ नोव्हेंबर १९०७रोजी कोल्हापूर येथे झाला. त्यांच्या आईचे नाव राधाबाई असे होते.हिराबाईचे वडील गोविंदराव उर्फ बापूसाहेब जाधव हे सुरूवातीला कोर्टात मुन्सफ होते. नंतर ते जज्ज झाले.या दांपत्यास सात मुली व एक मुलगा अशी आठ आपत्ये होती. गोविंदरावांनी आपल्या सर्व मुलांना शिक्षण दिले. हिराबाईचे शिक्षण कोल्हापूर, पुणे, मुंबई येथे झाले.[१]

**वैवाहिक जीवन**

अहमदनगर जिल्हयातील भापकरवाडी येथील प्रभाकर उर्फ बापूसाहेब भापकर या गरीब कुटूबांतील परंतु हुशार वकीली व्यवसाय करणाऱ्या तरूणाशी १९३० मध्ये हिराबाईचा विवाह झाला. सन १९२४ पासूनच ते दोघे परस्परांना ओळखत होते. बापूसाहेब फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत असताना १९२४ मध्ये काही कामानिमित्त त्यावेळचे शिक्षणमंत्री ॲड भास्करराव जाधव यांना भेटण्यासाठी गेले होते त्यावेळी हिराबाई आपल्या चुलत्याकडे होत्या. त्यावेळी दोघांची पहिली भेट झाली. पुढे १९२५ मध्ये हिराबाई पुण्यात फर्ग्युसन कॉलेजात शिकत असताना मराठा विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने दोघांची पुन्हा भेट झाली.[२] दरम्यान कोल्हापूरकर जाधवांना हा कुशाग्र बुद्धीचा, एम.ए.एल.एल.बी.झालेला, शिक्षणप्रसाराचे काम करणारा कर्तबागर मुलगा हिराबाईसाठी पसंत पडला होता. पुण्यातील ट्रेनिंग कॉलेजचे प्राचार्य एस.आर.तावडे यांच्या घरी मकरसंक्रांती निमित्त जाधवराव मंडळी आली होती तेथे बापूसाहेबही आले होते तेथेच दोघांची पसंती झाली.[३]

पुढिलकाळात रीतसर बोलणी होवून पुणे येथे ट्रेनिंग कॉलेजमध्ये दि.१३/५/१९३० रोजी सत्यशोधक पद्धतीने लग्न पार पडले. हे लग्न ब्राम्हणेत्तर पुरोहित आप्पासाहेब गायकवाड यांनी लावले.[४] जाधव कुटूबींय पूर्णपणे सत्यशोधक विचारांची होती तर बापूसाहेबांवरही या विचारांचा प्रभाव असल्यामुळे सत्यशोधक पद्धतीने विवाह संपन्न झाला अशा पद्धतीचे लग्न हे त्याकाळी एक क्रांतीकारी पाऊल समजले जात होते.

हिराबाई लग्नाच्या वेळी २३ वर्षाच्या होत्या. अतिशय कुशाग्र बुद्धिच्या, तडफदार, समजंस व मनमिळावू स्वभावाच्या हिराबाई अल्पावधीत सासरच्या नातलगामध्येही प्रिय झाल्या. सासरे कोडांजी यांचा सांभाळ तर त्यांनी लहान मुलासारखा केला.[५] पुढिल काळात त्यांनी बापूसाहेबांना संसारात आणि समाजकारणात ४०५० वर्षे उत्तम प्रकारे साथ दिली. लोकल बोर्डाच्या अध्यक्षा १९४६१९४९

जिल्हा लोकल बोर्डाच्या इतिहासात भारतातील पहिल्या स्त्री लोकल बोर्ड अध्यक्षा म्हणून सौ हिराबाई ओळखल्या जातात. त्यावेळचे जि. लोकल बोर्ड म्हणजे आजची जिल्हा परिषद होय.

जिल्हा लोकल बोर्डावर १९४६ साली कॉंग्रेस पक्षाचे ५० उमेदवार निवडून आले होते. त्यावेळी बापूसाहेब भापकर, दत्ता देशमुख कॉंग्रेस पक्षाचे आमदार होते. लोकबोर्डाचे अध्यक्ष कोणाला करावयाचे यावरून कॉंग्रेस अंतर्गत दोन गटात वाद सुरू झाला प्रस्थापित गटाकडून बाळासाहेब भारदेंचे नाव सुचविले गेले तर दुसऱ्या शेतकरी कामगार डाव्या आघाडीच्या गटाकडून हिराबाई भापकरांचे नाव सुचविले गेले शेवटी मतदान झाले. भारदेंना फक्त १०१५ तर हिराबाईना ३५४० मते पडली व त्या जिल्हा लोकल बोर्डाच्या अध्यक्षा झाल्या.[६]

१९४६१९४९ या आपल्या अध्यक्षपदाच्या काळात हिराबाईनी हे पद शोभेचे म्हणून वापरले नाही. याकाळात नगर जिल्हयात दुष्काळ पडला होता. दुष्काळाच्या या कठीण काळात हिराबाईनी गावोगाव फिरून परिस्थितीची पहाणी केली. खेडयापाडयात विविध सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा केला जनावरासाठी कॅंप सुरू केले. लोकलबोर्डाचे अधिकार मर्यादीत असून सुद्धा आपल्या पदाचा वापर करून तसेच जागृत लोकमत तयार करून त्याचे दडपण सरकारी अधिकाऱ्यावर आणून त्यांनी रस्ते, माणसांचे व जनावरांचे दवाखाने, विहिरी इ. सेवा जनतेला उपलब्ध करून दिल्या.[७]

राहूरी शहर महापुराने वेढले गेले. तेव्हा राहूरी उठविण्याची चर्चा होत असताना हिराबाईनी मुळा धरण बांधण्याची कल्पना मांडली. तसेच बेलापूर गावात प्लेगची साथ सुरू झाली असताना या संकटाचा मुकाबला करण्यासाठी त्या स्वतः तत्परतेने झटल्याच शिवाय सरकारी अधिकाऱ्यांना दाटावून त्यानांही कार्यप्रवण केले. कामाच्या निमित्ताने खेडोपाडी फिरतानां हिराबाई ग्रामीण लोकात चटकन एकरूप होत असत.[८]

हिराबाईच्यां या कार्याविषयी कॉ.भास्करराव जाधव लिहितात “हिराबाई अधिकाऱ्यांना आदेश देवून कार्यप्रवण करीत, दक्षतेने पाहणी करीत व काम पुरे करून घेत असत”.

जिल्हा लोकल बोर्डाच्या अध्यक्ष असताना सौ. हिराबाईनी दलित समाजसेवक काकासाहेब बर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी धोंडो केशव कर्वे, गुरूवर्य बाबूरावजी जगताप यांच्या संयुक्त सत्कारसमारंभाचे आयोजन दि. १७ मार्च १९४९

रोजी केले होते. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या या चारही दिग्गजांना मानपत्र देवून सन्मानित करण्यात आले. त्याद्वारे त्यांच्या कार्याविषयी हिराबाईना वाटणारा आदर व अस्था त्यांनी दाखवून दिली.

**अहमनगर नगरपालिकेतील कार्य**

हिराबाईचे पती बापूसाहेब भापकर यांनी अहमदनगर नगरपालिकेत ४० वर्षे सेवाभावी कार्य केले. सौ.हिराबाईनीही नगरपालिकेत जवळजवळ १२ वर्षे काम केले. दि. ११/०५/१९५२ रोजी झालेल्या नगरपालिकेच्या निवडणूकीत पतीबरोबरच सौ. हिराबाई ही स्त्रीयासाठी राखीव जागेवरून निवडून आल्या. या काळात जिल्हयात दुष्काळी परिस्थिती होती. अशावेळी दुष्काळी फंड उभारून त्याचे गोरगरीब, मजूर व महिला यांना वाटप करण्याच्या कार्यात सौ. हिराबाईही बापूसाहेबाबरोबर सहभागी झाल्या. त्यांनी स्त्रीयांना तसेच दुष्काळी मजूरांना कापड वाटप केले.[९]

नगरपालिकेतील आपल्या कार्यकाळात पाणीपुरवठा, दुष्काळी कामे, नगरपालिकेतील नोकरांचे, कामगाराचे प्रश्न सोडवण्यात त्यांनी महत्वाची भूमिका बजावली.

**शैक्षणिक क्षेत्रातील कार्य**

हिराबाई भापकरांनी शैक्षणिक क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान दिले. अहमदनगर जिल्हा साक्षरता प्रसारक मंडळ, रयत शिक्षण संस्था, राष्ट्रीय पाठशाळा, अहमदनगर जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाज, जिजामाता कन्या निवास, नवभारत छात्र निवास इ. संस्थाच्या माध्यमातून त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात भरीव कार्य केले.

**अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज**

राजर्षी शाहू महाराजांनी १९१४ मध्ये अहमदनगर येथे करवीर छत्रपती चौथे शिवाजी महाराज मराठा बोर्डीग हाऊसची स्थापना केली. त्यातूनच पुढे 'अहमदनगर जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाज' या संस्थेची १९१८ मध्ये स्थापना झाली. तीव्र बुद्धिमता असूनही अनेक गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित व्हावे लागे. अशा बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसाठी जिल्हयातील शिक्षणप्रेमी मराठा समाजातील मंडळींनी एकत्रित येवून संस्थेची स्थापना केली होती. बापूसाहेब भापकरांचा विद्यार्थी दशेपासूनच मराठा बोर्डीगशी जवळून संबंध आला.

पुढे बापूसाहेब व हिराबाई भापकर हे दांपत्य या संस्थेच्या कार्यात सहभागी झाले. या संस्थेच्या उभारणीत बापूसाहेबांनी शाळा, कॉलेज्स काढणे, वसतिगृह, आश्रमशाळा काढणे, इमारती उभारणे, ग्रामीण भागात शिक्षणप्रसार करणे, अशा सर्व प्रकारचे पायाभूत असे कार्य केले. त्यात हिराबाईनीही त्यांना साथ दिली.

१९४७ मध्ये 'अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज' या संस्थेच्या अध्यक्षपदी हिराबाईची नियुक्ती करण्यात आली. याच काळात हिराबाई जिल्हा लोकल बोर्डाच्याही अध्यक्षा होत्या. लोकल बोर्डाच्या माध्यमातून त्यांनी संस्थेस मदत केली. संस्थेच्या अध्यक्षा या नात्याने त्याचे मार्गदर्शन संस्थेच्या विकासाला सहाय्यभूतच ठरले.[१०] आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत हिराबाईनी संस्थेमध्ये विविधपदावर कार्य केले. १९४७ ते १९५३ या काळात त्या अध्यक्षा होत्या. त्यानंतर १९५३ ते १९६१ या काळात त्या संस्थेच्या उपाध्याक्षा होत्या. पुढील काळातही संस्थेच्या खजिनदार, सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले.

**कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शिक्षणकार्याचा गौरव व निधी अर्पण समारंभ (१९५९)**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. भाऊराव पाटील यांनी ५० वर्षे केलेल्या शिक्षणप्रसार कार्याचा गौरव करण्याचे नगर जिल्हयातील मंडळीनी ठरविले. त्याप्रमाणे नगर जिल्हा सत्कारसमिती स्थापन करण्यात आली. या सत्कारसमितीचे अध्यक्षपद अहमदनगर जिल्हा म.वि.प्र.समाजाच्या उपाध्यक्षा हिराबाई भापकर याच्यांकडे देण्यात आले. या कार्यक्रमाचा निधी जमा करण्यासाठी हिरबाई भापकर, डॉ. रानडे, बाळासाहेब पाटील, बापूसाहेब भापकर, आठरे वकील, कडू वकील, इ. मंडळीनी जिल्हाभर दौऱ्याचे आयोजन केले व अल्पावधीत एक लाखाचा निधी जमा केला.

जिल्हयातील लोकल बोर्ड, ग्रामपंचायती, सहकारी सोसायटया व विविध संस्था याच्या वतीने कर्मवीरांना मानपत्र व थैली अर्पण करण्याचा समारंभ दि. ६/५/१९५९ रोजी संस्थेच्या आवारात साजरा झाला.या समारंभाचे अध्यक्ष म्हणून चिंतामणराव देशमुख (अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग) तसेच प्रमुख पाहुणे म्हणून अर्थतज्ञ धनंजयराव गाडगीळ, सेनापती बापट, स्वामी सहजानंद, बाबुराव जेधे, तात्यासाहेब कार्ले, रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बापूराव नलावडे, इ. मान्यवर आणि जिल्हयातून २० हजार शिक्षणप्रेमी मंडळी उपस्थित होती. परंतु दुर्देवाने कर्मवीरांची प्रकृती बिघडल्यामुळे ते समारंभास उपस्थित राहू शकले नाहीत भाऊराव पाटील त्यावेळी पुण्यात ससून रूग्णालयात होते. कार्यक्रमानंतर पुण्याला ससून हॉस्पीटलमध्ये जावून हिराबाईच्या हस्ते कर्मवीरांना मानपत्र व १ लाख रूपयाचा गौरवनिधी अर्पण करण्यात आला. यानंतर दोनच दिवसात ९ मे १९५९ ला कर्मवीराचे दुःखद निधन झाले.[११]

**दलित समाजासाठी केलेले कार्य**

हिराबाई भापकरांचे दलित समाजाच्या उद्धारासाठी केलेले कार्यही महत्वाचे आहे. हिराबाईना दलित समाजाबद्दल कळवळा होता. समाजातील सर्व घटकात शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे या उद्देशाने बापूसाहेब भापकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी नगर जिल्हा साक्षरता प्रसारक मंडळ स्थापन केले. त्या साक्षरता मंडळाच्या हिराबाई अनेक वर्षे अध्यक्षा होत्या.[१२] या मंडळाच्या जिल्हयात १ हजारापेक्षा जास्त शाळा होत्या. जेथे जाण्यासाठी नीट सोय नाही अशा ठिकाणी मंडळाने शाळा काढल्या होत्या. दलित समाजाच्या विकासासाठी त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशानेच या शाळा सुरू करण्यात आल्या होत्या. या शिवाय सौ. हिराबाई दलित सेवा संघाच्या आणि संत गाडगे बाबा आश्रमाच्या पहिल्यापासून सभासद होत्या. दलित समाजाच्या विकासासाठी हिराबाईनी दिलेले योगदान लक्षात घेवूनच १९७७ मध्ये महाराष्ट्र सरकारने त्यांना 'दलितमित्र' पुरस्कार देवून त्यांचा सन्मान केला.[१३]

**मूल्यमापन**

एक सामान्य स्त्री घर साभांळून जिद्दीने जनसेवेचे किती मोठे कार्य करू शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे हिराबाई भापकर या होत. भारतामध्ये जिल्हा लोकल बोर्डाच्या इतिहासातील पहिल्या महिला अध्यक्षा होण्याचा मान हिराबाईनां मिळाला. या काळात त्यांनी जिल्हयाचा कारभार अतिशय उत्कृष्ट पद्धतीने केला. हिराबाई भापकरांच्या काळात जिल्हयाच्या लोकल बोर्डा च्या कारभाराची चर्चा सर्व राज्यात होत असे असे उद्‌गार माजी कृषीमंत्री शरद पवार यांनी काढले होते.

राहुरीला महापुराने वेढले असता त्यांनी मुळा धरण बांधण्याचा सुचविलेला उपाय त्यांच्या कुशाग्र बुद्धिमत्तेचा आणि त्याच्यां दृष्टेपणाचा निदर्शक आहे.

शैक्षणिक क्षेत्रातही त्यांनी भरीव असे कार्य केले अहमदनगर जि.म.वि.प्रसारक समाजाच्या विश्वस्त, अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजिनदार, सदस्य अशा विविध पदावर त्यांनी कार्य केले. जिल्हा साक्षरता प्रसारक मंडळाच्या त्या पहिल्या अध्यक्षा होता.

७ मुलांची आई असलेल्या हिराबाईनी आपला घरप्रपंच सांभाळून, मुलांची शिक्षण, त्याच्यांवरील संस्कार याकडेही लक्ष पुरवत, अहमदनगर जिल्हयाच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात दिलेले योगदान पाहिले म्हणजे आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. मरावे परी किर्तीरूपी उरावे या म्हणीप्रमाणे हिराबाई आज आपल्यात नसल्यातरी त्यांचे कार्य सदैव मार्गदर्शक ठरेल यात शंकाच नाही.

**संदर्भ**

१. भांगे सु.श्री., आदर्श माता व थोर समाजसेविका सौ हिराबाई भापकर, प्रकाशक जगताप स.अ., जगताप कार्ले प्रकाशन, पुणे, पान नं. ६
२. भापकर प्रभाकर कोंडाजी, हिराप्रभाची काहणी, प्रकाशक शिंदे सुमन, सुगम साहित्य प्रकासन, अहमदनगर पान. नं.७७
३. कित्ता. पान नं. ७१
४. भांगे सु.श्री. आदर्शमाता व थोर समाजसेविका सौ. हिराबाई भापकर, उपरोक्त, पान नं. ३
५. कित्ता, पान नं. ९
६. देशमुख दत्ता, मी दत्तूचा दत्ता झालो त्याची गोष्ट, प्रकाशक तांबोळी ग.रा. पान.नं. २३
७. भापकर रंगनाथ, क्रांतीगाथा, गणराज प्रकाशन, २०१४, अहमदनगर पान नं. ६६
८. आठरे पाटील, विलासराव (संपा) अ.जि.म.वि.प्र.समाज अमृतमहोत्सवी वर्ष १९१४, 'झेप' विशेषांक, प्रकाशक माधवराव मुळे, पान नं. ३८
९. दै.समाचार, १ फेब्रुवारी १९५३, अंक १५४
१०. अहमदनगर जिल्हा म.वि.प्र. समाज षडवार्षिक अहवाल दि. १/७/४७ ते ३१/३/५३, पान नं. ४
११. औटी विद्याधर, भि.ना.दहातोंडे, धिरडे, शेतरकीकामगार नेता बापूसाहेब भापकर, प्रकाशक प्राचार्य न्यू लॉ.कॉलेज, २०१२, पान नं. १७
१२. भापकर रंगनाथ, उपरोक्त पान नं. १०८
१३. कित्ता, पान नं. १२८

# २४. आधुनिक महाराष्ट्राच्या शैक्षणिक जडणघडणीतील मा.यशवंतराव चव्हाण यांचे योगदान

**प्रा. राजेंद्र गायकवाड**
इतिहास विभागप्रमुख, विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय, टेंभूर्णी, ता. माढा, जि. सोलापूर.

महाराष्ट्र राज्याच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक जडणघडणीमध्ये विविध मान्यवरांनी आपले योगदान दिले आहे. भारत मातेला ब्रिटिशांच्या पारतंत्र्यातून मुक्त करण्याठी अनेक नररत्नांनी आपापल्यापरीने योगदान दिले. स्वातंत्र्यानंतर भारताने नव्या युगामध्ये प्रवेश केला. भारतासमोर असंख्य प्रकारची आव्हाने होती. आव्हाने पेलनाऱ्या बाहूंचीही भारताकडे कमी नव्हती. स्वातंत्र्योत्तर चैतन्यपूर्ण वाटेवरुन प्रवास करताना योग्य वाटाडयांची आवश्यकता होती. प्रांतोप्रांती विकासाची प्रक्रिया आकार घेवू लागली. सध्याचा महाराष्ट्र व गुजरात या द्विभाषिक राज्याची जबाबदारी यशवंतराव चव्हाण यांच्याकडे आली. बाल्यावस्थेपासून अतिशय संघर्षपूर्णरित्या जडणघडण झालेला, स्वातंत्र्यासाठी तुरुंगवास भोगलेलया एका स्वातंत्र्यवीराला महाराष्ट्राचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. महाराष्ट्र हा सुरुवातीपासूनच पुरोगामी विचारांचा पाठीराखा असलेले राज्य होते. त्यात यशवंतरावांसारखा पुरोगामी नेता महाराष्ट्राला लाभला. तात्कालीन भारतामधील सर्वात सरस, प्रभावी, परिपूर्ण, अष्टपैलू, उत्तुंग व्यक्तिमत्वाचा नेता म्हणून लोक यशवंतरावांना ओळखत होते. राजकारण, अर्थकारण, समाजकारण, सहकार, शिक्षण, साहित्य, कला, विज्ञान इ. विविध क्षेत्रातील त्यांची हातोटी वाखाणण्याजोगी होती. आधुनिक महाराष्ट्र राज्याच्या उभारणीत व जडणघडणीत त्यांचा मोलाचा वाटा होता. एक दृष्टा नेता, उत्तम वक्ता, सहज लेखक, कलारसिक, विचारवंत, उत्तम प्रशासक इ. विविध गुणवैशिष्टयांनी यशवंतरावांचे व्यक्तिमत्व बहरले. राजकारणात असताना राज्याच्या आणि केंद्राच्या विविध खात्यांचा कारभार त्यांनी सर्वोत्तमरित्या पेलला. द्विभाषिक राज्याचा मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री, केंद्रात संरक्षण, गृह, अर्थ, परराष्ट्र खात्याचे मंत्री शिवाय ८ व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष, भारताचे उपपंतप्रधान अशा सर्वोच्च पदावरती यशवंतरावांनी कार्य केले.

फुले, शाहूंच्या महाराष्ट्रात शिक्षणाचे महात्म्य कोण्या त्रयस्थाने सांगण्याची आवश्यकता नव्हती. फुल्यांनी शिक्षणाद्वारे वंचितांना शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करुन दिली. राजर्षींनी शाळा, वसतिगृहे स्थापन करून शिक्षण बहूजनांच्या दारी नेले. फुले, शाहूंच्या विचारांचा, कृतीचा प्रभाव यशवंतरावांवर पडला. शिक्षणाशिवाय बहूजनांना तरणोपाय नाही. शिक्षणाच्या साहयानेच समाज आपली प्रगती करू शकेल असे त्यांना वाटे. मुख्यमंत्री कारकीर्दीमध्ये यशवंतरावांनी घेतलेल्या अनेक महत्त्वपूर्ण निर्णयामुळे महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलला. प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण इ. क्षेत्राकडे पाहण्याचा नवा दृष्टीकोन यशवंतरावांनी विकसित केला. एकवढेच नव्हे तर आजच्या महाराष्ट्रातील अनेक नामांकित शिक्षण संस्थांच्या

शैक्षणिक विकासात यशवंतरावांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. शिक्षणाची आवश्यकता स्पष्ट करताना ते म्हणतात की, ‘‘शिक्षणही सामाजिक गरज असली तरी ते आर्थिक विकासाचे एक मुलभूत साधन आहे. व्यक्तीला शिक्षणाची जोड दिल्याशिवाय समाजात नवीन सामर्थ्य निर्माण होणार नाही.’’[१] शिक्षणाची व्याख्या करताना ते म्हणतात की, ‘‘ शिक्षित व्यक्तीला स्वत:च्याभोवती घडणाऱ्या गोष्टी आणि जगामध्ये घडणाऱ्या इतर गोष्टी यांची ज्यामुळे संगती लावता येते त्यांचा योग्य अर्थ लावता येतो. त्याला ‘शिक्षण’ असे म्हणतात. ’’[२] शिक्षणाची अशी साधी, सोपी, सरळ व्याख्या त्यांनी केली. ही व्याख्या शिक्षणाच्या मुलभूत अर्थाकडे घेवून जाणारी ठरते. स्वत:चा, समाजाचा आणि पर्यायाने देशाचा विकास करावयाचा असेल तर शिक्षणाची कास धरणे गरजेचे आहे असे ते म्हणतात. शिक्षणाची दैनंदिन जीवनाशी व शिक्षण घेणाऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीशी सांगड घालण्याचे आवाहन यशवंतराव पेलतात. यातून त्यांचा शिक्षण विषयक दूरदृष्टीकोन नजरेस पडतो. यशवतंराव केवळ बोलघेवडे नेते नव्हते, त्यांनी आपल्या मुख्यमंत्री पदाच्या कारकीर्दीत राज्याच्या एकूण खर्चाच्या १/५ इतक्या रकमेची तरतूद शिक्षण कार्यासाठी केली.[३] यशवंतरावांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेताना खालील बाबींचा विचार करणे आवश्यक ठरते.

**१. इ.बी.सी. सवलत सुरु केली**

घरातील गरीबीमुळे कित्येक होतकरू मुलांना आपले शिक्षण पूर्ण करता येत नसे. यशवंतरावांनी लहानपणी शिक्षण घेण्यासाठी दारिद्र्याचे चटके सहन केले होते. नादारी मिळण्यासाठी प्रतिष्ठितांकडून मिळालेली अपमानास्पद वागणूकीची जाणीव मनी ठेवून त्यांनी गरीब परिस्थितीतील विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षणाची योजना सुरू करण्याचा निर्णय घेतला.[४]घटनेतील मार्गदर्शक तत्वानुसार समाजातील मागासलेलया लोकांच्या आर्थिक, शैक्षणिक हिताकडे सरकारने हातभार लावला पहिजे. यासाठी जात हा निकष न लावता आर्थिक स्थिती महत्त्वाची मानली पाहिजे. हया तत्वानूसार यशवंतरावांनी आपल्या कारकीर्दीत ज्या कुटुंबाचे एकूण आर्थिक उत्पन्न अत्यल्प आहे अशा कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी शिक्षणाची क्रांतीकारी अशी ई. बी.सी. योजना सुरू केली. १९५८ साली वार्षिक ९०० रू. उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या पाल्यांना फी माफी देण्यात आली. १९६० साली ही मर्यादा १२०० रू. , १९७५ साली १८०० रूपयांवरून २४०० रूपयांपर्यंत मर्यादा वाढविण्यात आली. वेळोवेळी कुटुंबांची उत्पन्ना क्षमता लक्षात घेवून तिच्यात बदल करण्यात आले. सध्या २४ मे २०१२ रोजीच्या शासन निर्णयानुसार ही मर्यादा १५००० वरून एक लाख एवढी वाढविण्यात आली आहे.[५] यशवंतरावांच्या या निर्णयामुळे लाखो अल्प उत्पन्न कुटुंबातील मुले मोफत शिक्षण घेवून शकली. ग्रामीण महाराष्ट्रातील तळागाळातील बहूजन समाज शिक्षण घेवू शकला. महाराष्ट्रभर शैक्षणिक संकुले उभी राहिली. याचे संपूर्ण श्रेय यशवंतरावांना आहे. अखंड भारतवर्षात असा धाडसी निर्णय घेणारे यशवंतराव पहिले मुख्यमंत्री तर महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले.

**२. आदिवासी मुलांसाठी आश्रमशाळा सुरू केल्या**

पिढयान पिढया समाजापासून बहिस्थ राहिलेल्या भौतिक सुविधांच्या अभावी रानटी आदिवासी जीवन जगणाऱ्या वंचित घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी यशवंतरावांनी मुख्यमंत्री असताना

आदिवासी मुलांसाठी आश्रमशाळांची स्थापन करून त्यांच्या शैक्षणिक उन्नतीचा मार्ग मोकळा करून दिला. यामुळेच अनुसुचित जाती जनजातीमधील मुलांचे शिक्षणाचे प्रमाण वाढत राहिले. याचे श्रेय यशवंतरावांना जाते.

**३. सैनिक शाळेची स्थापना**

शिक्षणाने मन, मेंदू, मनगट बळकट व्हावे असा यशवंतरावांचा ध्यास होता. शिक्षण सर्वथा सशक्त असावे, शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रभक्तीची शिकवण दिली जावी, देशसेवेची गोडी लागावी हा यशवंतरावांचा मानस होता. शिक्षणाला सामर्थ्याची जोड असावी या भूमिकेतून यशवंतरावांनी २३ जून १९६१ रोजी देशातील पहिली 'सैनिकी स्कूल' ची स्थापना केली. या शाळेमध्ये माजी सैनिकांच्या मुलांना १० जागा राखीव ठेवल्या. या स्कूलच्या धर्तीवर राज्यात अनेक सैनिक स्कूल उभे झाले.[६] या स्कूल मध्ये शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी एन.डी.ए. साठी निवडले जातात. सैन्यात अधिकारी बनून देशसेवा करतात. मुलांना सैन्यदलाची गोडी लावण्याच्या हेतूने उभारलेलया या स्कूलमधून कित्येक तरूण देशासाठी आपले सर्वस्व अर्पण करताना दिसतात. या स्कूलचा आदर्श घेवून राज्यातील जिल्हयाजिल्हयामध्ये सैन्य स्कूल स्थापन होवून उत्तम प्रकारे कार्यरत आहेत. यातून यशवंतरावांचा दूरदृष्टीकोण दिसून येतो.

**४. मराठवाडा व शिवाजी विद्यापीठची स्थापना**

प्राथमिक, माध्यमिक शिक्षणासोबतच उच्च शिक्षणही झपाटयाने प्रसारित व्हावे यासाठी यशवंतराव आग्रही होते. मुंबई, पुण्याच्या धरतीवर महाराष्ट्राच्या इतर प्रदेशातील मुलांना उच्च शिक्षणाची द्वारे खुली व्हावीत यासाठी यशवंतरावांनी नवीन विद्यापीठांच्या स्थापनेवर भर दिला. निजामाच्या राजवटीवेळी मराठवाडयातील मुलांना उच्च शिक्षणासाठी हैद्राबादला जावे लागत होते. मराठवाडयातील मुलांमधील गुणवत्तेला वाव मिळावा, त्यांच्या शिक्षणाची हेळसांड होवू नये, या उदात्त हेतूने यशवंतरावांनी २३ ऑगस्ट १९५८ साली तात्कालीन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते 'मराठवाडा विद्यापीठाची' स्थापना केली. यावेळी केलेल्या भाषणात यशवंतराव म्हटले होते की, ''उच्च शिक्षणाची दार आज तुमच्यासाठी उघडी झाली आहेत. या संधीचा लाभ दलित, वंचित, उपेक्षित वर्गांनी घ्यावा. आपला विकास करून घ्यावा. शासन तुम्हाला कमी पडू देणार नाही अशी मी तुम्हाला ग्वाही देतो.''[७] यशवंतरावांनी मराठवाडा विद्यापीठाच्या स्थापनेवेळी मराठवाडयातील संपूर्ण समूहाला शैक्षणिक उत्थानाचा मार्ग तर दाखवला, शिवाय आपण त्यांच्या प्रगतीसाठी वचनबध्द आहोत याचेही आश्वासन देवून आजवरच्या प्रगतीची हमीच दिली.

मराठवाडयाप्रमाणेच दक्षिण महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या चार जिल्हयातील उच्च शिक्षणाची व्यवस्था व्हावी यासाठी कोल्हापूर या ठिकाणी १८ नोव्हेंबर १९६२ रोजी शिवाजी विद्यापीठाची स्थापना तात्कालीन राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांच्या हस्ते केली.[८] या विद्यापीठांतून शिक्षण घेतलेले लाखो विद्यार्थी देशाच्या प्रशासन, संशोधन, अध्यापनामध्ये कार्यरत आहेत. अलीकडे २००४ रोजी कोल्हापूर विद्यापीठापासून विभक्त होवून सोलापूर जिल्हयासाठी स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना झाली. यामुळे शिवाजी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र तीन जिल्हयापूरते मर्यादित झाले आहे.यशवंतरावांच्या उच्च शिक्षणाविषयीच्या

तळमळीने महाराष्ट्राची जडणघडण झाली. संशोधन, प्रशासन, साहित्य, कला, विज्ञान इ.विविध क्षेत्रात अनेक तरूण चमकू लागले.

**५.शासकीय इंजिनियरिंग कॉलेज, कृषी विद्यापीठाची स्थापना**

नवस्वतंत्र भारत देशाला कृषी, विज्ञान, तंत्रज्ञान यामध्ये प्रगतीपथावर नेण्यासाठी नवनवीन संशोधनावर भर दिला पाहिजे याची पुरती जाण यशवंतरावांना होती. महाराष्ट्राला देशात अग्रेसर ठेवण्यासाठी, तरूणांना तंत्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी १९६० साली कराड, औरंगाबाद याठिकाणी शासकीय अभियांत्रिकी कॉलेजची सुरूवात केली. नागपूरचे शासकीय अभियांत्रिकी कॉलेज भारत सरकार पुरस्कृत कॉलेजमध्ये रुपांतरित केले. महागडया अभियांत्रिकी शिक्षणाला शासकीय छताखाली आणून यशवंतरावांनी कुशल मनुष्यबळ तर निर्माण केलेच, शिवाय महाराष्ट्रातील असंख्य होतकरू, गरीब, गरजू मुलांच्या तंत्रशिक्षणाची व्यवस्था केली. हया शासकीय कॉलेजची प्रगती आजची महत्त्वपूर्णरित्या आहे.

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे भारतातील शेती सातत्याने संकटात सापडत असते. वाढत्या लोकसंख्येमुळे अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी सातत्याने नवनवीन संशोधन, तंत्रज्ञानाची शेतीला गरज आहे. यशवंतरावांनी या बाबी ध्यानात घेवून राहूरी येथे कृषी विद्यापीठाची स्थापना केली. शेती, शेतीपूरक व्यवसाय यांचे अद्ययावत ज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी यशवंतरावांनी ही व्यवस्था केली. यानंतरच्या काळात अकोला, परभणी, दापोली येथे विद्यापीठांची स्थापना झाली.

**६. रयत शिक्षण संस्थेला सहकार्य**

शिक्षणाची गंगा तहानलेलया बहूजनांच्या घशापर्यंत आणण्याचे महदकार्य कर्मवीर भाऊराव पाटील यांनी 'रयत शिक्षण संस्थेच्या' माध्यमातून केले. कर्मवीरांनी केलेल्याकार्यामुळेच दीन–दलित, वंचित घटकांना शिक्षणाची द्वारे खुली झाली. या संस्थेचा पसारा संपूर्ण महाराष्ट्रभर पसरवण्यात कर्मवीरांनी आपली हयात घालवली. या ज्ञानतपस्वीने आपलया तपस्येतून उभ्या महाराष्ट्राच्या शैक्षणिक जडणघडणीमध्ये सिंहाचा वाटा उचलला. फुले, शाहूंच्या विचारांची शिदोरी घेवून कर्मवीर काय किंवा यशवंतराव काय आपापल्या मार्गाने महाराष्ट्राच्या विकासात गुंतले होते. रयत शिक्षण संस्थेची धोरणे व सरकारी धोरणे यातून बऱ्याचदा यशवंतरावांना कर्मवीरांची बोलणी खावी लागत. कर्मवीरांची स्वावलंबनाची शिकवण तर यशवंतरावांची ई.बी. सी. ची क्रांतीकारी योजना या परस्पर भिन्न होत्या. अशा अनेक बाबतीत कर्मवीर आणि यशवंतराव यांच्यात विरोधाभास होता. तरीही दोहोंचीही ध्येये मात्र एकच होती. संभाजी बाबा थोरात यांच्या एका घरगुती कार्यक्रमात दोन्ही शिक्षणतपस्वी एकत्र जमले होते. यावेळी कर्मवीरांनी यशवंतरावांना रयत शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारण्याचे अभिवचन मागितले. यशवतरावांनीही कर्मवीरांची इच्छा तात्काळ पूर्ण करीत आपली तयारी दर्शवली. यशवंतरावांचे शैक्षणिक कार्य आण्णा नाकारणारे नव्हते म्हणूनच त्यांनी यशवंतरावांवरती इतकी मोठी जबाबदारी सोपवली.यशवंतराव अध्यक्षपद स्वीकारलेवेळी लिहितात की, 'मला मुख्यमंत्री झाल्यापेक्षा रयत शिक्षण संस्थेचा अध्यक्ष झाल्याचा अति आनंद झाला.' कर्मवीरांना दिलेल्या अभिवचनानूसार यशवंतराव आपल्या मृत्यूपर्यंत २५ नोव्हेंबर १९८४ पर्यंत तहहयात शिक्षण संस्थेचे अध्यक्ष

होते.[९] रयत शिक्षण संस्थेने केलेल्या शैक्षणिक प्रसाराच्या कार्यामुळेच महाराष्ट्र घडला, बहूजन स्वाभीमानाने ताठ उभे राहिले. अशा संस्थेचे पालकत्व स्विकारून यशवंतरावांनी आपली शिक्षणाप्रतीची निष्ठा व्यक्त केली. यशवंतरावांनी रयत प्रमाणे अनेक संस्थांना शैक्षणिक विकासामध्ये सहकार्य केले. यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर मामासाहेब जगदाळे या ज्ञानतपस्वींच्या संस्थांचाही समावेश होतो.

**निष्कर्ष**

ग्रामीण भागात जन्मलेल्या, वाढलेल्या यशवंतरावांना शिक्षणाचे बळ समजले होते. शिक्षणाशिवाय बहूजनांना तरणोपाय नाही. फुले सांगतात त्याप्रमाणे बहूजनांची प्रगती शिक्षणाअभावी रखडली. अज्ञान, दारिद्रय, अंधश्रध्दा, दैवभोळेपणा, अविज्ञानवादी वृत्ती, मागासलेपणा यासारख्या वैगुण्याने बहूजन त्रस्त झाले. या अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे. याची पुरती जाण यशवंतरावांनाही होती. म्हणूनच त्यांनी प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षण, प्रौढ शिक्षण, आदिवासी आश्रमशाळा, तंत्र शिक्षण, कृषी शिक्षणाला महत्त्व दिले. महाराष्ट्राचे मागासलेपण घालूवन पुरोगामी महाराष्ट्राच्या रचनेसाठी यशवंतरावांनी उचललेली पावले अचूक ठरली. आज महाराष्ट्र कृषी, उद्योग, विज्ञान,शिक्षण, साहित्य, चित्रपट इ. विविध क्षेत्रात केलेल्या प्रगतीमागे यशवंतरावांचे शैक्षणिक धोरण महत्त्वाचे ठरते. शिक्षणाने माणूस नूसता शहाणा होत नाही तर पर्यायाने समाज व राष्ट्राची प्रगती होते. शिक्षण ही काळाची गरज आहे असा दृष्टा विचार यशवंतरावांमुळेच महाराष्ट्रात रूजला व त्याला आजची विकासरूपी फळे लागून महाराष्ट्र प्रगतीपथावर वाटचाल करू लागला.

**संदर्भ**

१. नलावडे प्रमोद (संपा.), लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचनालय, मुंबई, मार्च २०१२, पृ. ७३.
२. चव्हाण यशवंतराव, सहयाद्रीचे वारे, मा.व.ज.म., मुंबई, १९८८, पृ. ष्ट्रा १४०.
३. जोशी रामभाऊ, यशवंतराव एक इतिहास, प्रतिमास प्रकाशन, परभणी, २०१०, पृ. ३२०.
४. जोशी, तत्रैव, पृ. २४.
५. परिपत्रक, महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक इ.बी.सी. २०११/प्र. क्र.७४/म.शि.२ मंत्रालय
६. विस्तार भवन, मुंबई, दि. २५ मे २०१२.
७. माने डी.ए., शिल्पकार यशवंतराव चव्हाण, नयन प्रकाशन, विसापूर, १९८७,पृ. ३४.
८. पाथ्रीकर विजय,थोरले साहेब, कैलाश प्रकाशन, औरंगाबाद, २०१०, पृ. २१६,२१७.
९. पाटील रा.तु., यशवंतराव चव्हाण एक वादग्रस्त पण कर्तबगार मुत्सद्दी,संभाजीराव पाटील तडसर, सांगली, १९८७,पृ. ४७.
१०. थोरात संभाजीबाबा, यशवंतराव चव्हाण झुंजार नेतृत्वाचा शोध आणि बोध, आगाशिव प्रकाशन, कराड, १९८८, पृ.
११. ९४,१०४,१०५

VOLUME - IX, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# २५. महात्मा गांधी आणि खादी : एक विचार

**सागर भानुदास जाधव**
संशोधक विद्यार्थी, स.गा.म. महाविद्यालय, कराड.

**प्रस्तावना**

क्रांतीकडे पाहण्याचा गांधीवादी दृष्टिकोन हा अन्य दृष्टिकोनापेक्षा वेगळा होता. हा जुलमी सत्तेच्या अनेक पैलूंना एकाच वेळा स्पर्श करण्याचा प्रयत्न करत होता. ब–याच वेळा या कृती आणि अभिव्यक्ती यांचा इच्छित परिणाम त्यांच्या स्वरूपापेक्षा आधिक असे. हिसात्मक तितकी आपली कल्पकता आणि सृजनशीलता योजून स्वतः ला व्यक्त करण्याच्या संधींचे भांडारच खुले असते. गांधीनी घाईघाईत धोरणे आखली नव्हती तर ती अतिशय विचारपूर्वक आखली होती. उपाययोजिलेले प्रत्येक प्रतीक आणि कृती ही अहिंसेच्या गाभ्याशी सहमत असावी तसेच माणसामाणसातील दुवा ओळखून त्यास पुष्टी देणा–या योजनेसही पोषक असावी, याबाबत ते आग्रही होते.

भारतात त्या काळी वस्त्र हे व्यक्तीची विशिष्ट जात धर्म, आणि समुदायातील ओळख दर्शविणारे साधन होते. तसेच ते त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि संस्कृतीचा एक हिस्सा होते. एका विशिष्ट प्रकारचे कपडे घालण्याची सांगड नेहमी विशिष्ट प्रकारच्या प्रसंगाशी घातली जाते. कपडयांकडे बघण्याचा गांधीचा स्वतः चा दृष्टिकोन 33 वर्षाच्या कालावधीत म्हणजे ते 1888 मध्ये इंग्लंडला गेले तेव्हापासून ते 1929 मध्ये त्यांनी लंगोट नेसावयास सुरूवात करेपर्यंत खूपच उत्क्रांत झाला. सुरूवातीस त्यांनी त्याकाळच्या सामाजिक चालीरीतीशी आणि शिष्टाचारांशी जुळवून घेण्यात अत्यंत काटेकोरपणा दाखवला. इग्लंडमध्ये आणि दक्षिण आफ्रिकेत असताना त्यांनी त्यांच्या दिसण्याविषयी आणि कपडयांविषयी एकच ध्यास घेतला होता. इंग्लंडला असताना ते अन्य भारतीय विदयार्थ्यापेक्षा आधिक पाश्चिमात्य होते. आणि नवीन येणा–या प्रत्येक विदयार्थ्यास ते इंग्लिश पोशाखाच्या खर्चात तडजोड न करता अन्यत्र बचत कशी करावी याविषयी सल्ला देत. पोशाख हे अमौखिक संप्रेषणाचे एक प्रभावी माध्यम ठरू शकते. जाणतेपणी किंवा अजाणता सामाजिक रिवाज पाळण्यासाठी किंवा त्यांना आव्हान देण्यासाठी आपण पोशाख घालत असतो. पोशाखाचा क्रांतीचे एक साधन म्हणून वापर करणे ही एक ऐतिहासिक घटना असून जगभरात तिची कैकदा पुनरावृत्ती झाली आहे. अमेरिकेत 1950 आणि 1960 च्या सुरूवातीस देशाचे प्रतिनिधित्व करत असलेल्या मुल्यांविरूध तिथल्या हिप्पींनी वेगळया प्रकारच्या पोशाख करून विद्रोह केला. त्यांची गबाळया पोशाखाची निवड ही प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात होती.

गांधीजीच्या कल्पनेतील भारताचे खादी हे प्रतिक होते. ज्या भारतात रोजची रोजीरोटी कमावण्याकरता शारीरिक श्रम करणे हाच मार्ग होता. भारतातील गिरणीत तयार झालेला वस्त्राचे सरंक्षण करणे हे गांधीच्या राष्ट्रवादाचे उद्दिष्ट नव्हते. तर आधुनिक संस्कृतीहून वेगळया स्वावलंबी आयुष्याचे निदर्शक असलेल्या हातमाग उदयोगास पाठींबा देणे हे त्याचे उद्दिष्ट होते. खादी ही त्याच्या कौशल्य केंद्री समाजाचे उदाहरण होती. सर्वामध्ये एकीची भावना वाढीस लागावी म्हणून खादीची निर्मिती करण्यात गांधी यशस्वी ठरते. परंतु सामाजिक स्तरांचे प्रतीक

म्हणून खादीच्या गुणवत्तेतील तफावत घालवण्यात ते तितकेसे यशस्वी ठरले नाहीत. तथापि खादी राष्ट्रीय कल्पनेचा एक हिस्सा झाली आणि समाजाचा आवाज उठवणारा प्रतिकाराचा एक प्रकल्प बनली. खादीचा वापर महिलांनीही केला यातून त्या आवाजाची सर्व समावेशकताही दिसून येते. गरीब महिलांनी तसेच स्वराज्यास पाठिंबा म्हणून सर्वसंगपरित्याग केलेल्या महिलांनी देखील खादिची पांढरी वस्त्रे धारणे केल्याने त्यांना राजकीय मान्यता मिळाली आणि त्या राष्ट्राची नैतिक शक्ती बनल्या. या नैतिक अधिकारामुळे त्यांना राष्ट्रीय चळवळीत पुरूष प्रवृत्तीची भीती न बाळगता पूर्णपणे सोडून देण्याची सुरक्षितता लाभली.

**स्वदेशी चळवळ**

7 एप्रिल 1919 ला. मुंबई येथे स्वदेशी व्रताची प्रतिज्ञा घेण्यासाठी सभा बोलविण्यात आली. यामध्ये फक्त हिंदुस्तानातील कापसापासून बनविलेले सुती कापड. रेशीम व लोकरी कपडा वापरण्याची व परकीय कापड वापरावर बहिष्कार टाकण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली अशा प्रकारे स्वदेशी चळवळीला सुरूवात झाली.[1]

**स्वदेशी चळवळ आणि खादी**

हिंद–स्वराज्य या पुस्तकामध्ये गांधीजी लिहितात की भारतातील वाढत्या दारिद्र्यावर चरखा किंवा हातभाग हा एकमेव रामबाण उपाय आहे. परंतु त्यावेळी चरखा किंवा हातमाग पाहिल्याचे त्यांना आठवत नाही. 1915 साली जेव्हा दक्षिण आफ्रिकेतून भारतामध्ये परत आले तेव्हा त्यांनी चरखा प्रत्यक्ष पाहीला. नव्हता. त्यावेळी भारतात आल्यानंतर त्यांनी साबरमती येथे सत्याग्रह आश्रम स्थापन केला. त्यावेळी त्या ठिकाणी काही हातभाग आणले. त्यावेळी त्यांना एक अडचण आली त्यांना हातमागावरचे कारागीर मिळत नव्हते. मागावर विणकाम सुरू करण्यापूर्वी त्यांना विणकामात निपून आता कुणीतरी शिक्षक हवा होता. त्यांना एक शिक्षक मिळाला पण तो त्यांना सर्वकाही शिकवू शकला नाही. त्यांच्यामध्ये असणारे मगनलाल गांधी यांनी स्वपरीक्षणानेच विणकामाची कला आत्मसात केली. आणि त्यानंतर त्यांनी एका मागून ऐक विणकर तयार केले. त्यांनी स्वतः बनविलेले कापड स्वतः च वापरण्याचे उददिष्ट डोळयासमोर ठेवले होते. यामुळे त्याचा विणकरांशी प्रत्यक्ष संबंध आला. त्यांचे जीवन कसे चालते ते किती उत्पादन करतात त्यांना सुताचा पुरवठा घेण्याच्या बाबतीत काय अडचणी येतात. ते फसवणूकीला कसे बळी पडतात. आणि शेवटी ते कसे कर्जबाजारी होतात. हे त्यांना जणवले. त्यांनी ज्या विणकरांना कापड बनविण्यास सांगितले त्या विनकरांचे सर्व कापड आश्रमाने विकत घेतले पाहिजे अशी अट करण्यात आली. यामुळे त्यांच्या संपर्कात असणा–या विणकरांच्या व्यवस्थापनाच्या पध्दती व त्यांच्या अडचणी या काहीशा प्रमाणात नाहीशा झाल्या.

नंतरच्या काळात स्वतः चे कापड बनविण्यासाठी स्वतः सुत कातले पाहिजे म्हणजे सुतासाठी दुस–यावर अवलंबून राहावे लागणार नाही ही गोष्ट स्पष्ट झाली. परंतु चरखा व सुत कताई करणारा कारागीर मिळत नव्हता. त्याच्याकडे कुकडी भरण्याचे चरखे होते. परंतु त्यांचा वापर कसा करायचा यांची त्यांना माहिती नव्हती.[2]

**चरखा**

सन 1917 साली गुजराथी बंधुनी गांधीजींना भडोच शिक्षण परिषदेत नेले. तेथे त्यांना साहसी स्वभावच्या विधवा गंगाबेनभेटल्या. त्यांची हिम्मत व ग्रहण शक्ती चांगली होती. बडोदा संस्थानातील विजापुर मधे गंगाबेन यांना चरखा सापडला तेथे पुष्कळ कुटूंबापाशी चरखे होते. जर कोणी पेळू पुरविले तर ते लोक सुत कातण्यास तयार होते.

गंगाबेन यानी पेळू पुरवण्याचे मान्य केले, आश्रमात व विजापुरात बणणारी खादी जाड आणि 30 इंच पन्हयाची होती. गंगाबेन यांनी 45 इंच पन्हाची धोतर काढून दाखविण्याची कामगिरी केली.[3]

**खादी संबंधी कापडगिरणी मालक व गांधीजी यांचा दृष्टीकोन**

खादी चळवळीचा अगदी प्रारंभीपासून या चळवळीवर गिरणी मालक टिकाकरीत असत त्या वेळाच्या एका गिरणी मालकाचे आणि गांधीजीचे संभाषण झाले त्यांच्या म्हणण्यानुसार या चळवळीचा उद्योगपतीच्या कारखान्यावर प्रतिकूल परिणाम होत होता. त्यांनी गांधीजीना उत्पादनात वाढ करून स्वतः या व्यवसायात शिरण्याचा सल्ला देण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी गांधीजींनी मी चरख्याचे पुनरूज्जिवन करण्याच्या कामात गुंतलो आहे. असे वास्तविक उत्तर दिले. स्वदेशीच्या हया स्वरूपामुळे भारतातील गरीब स्त्रियांना कामधंदा मिळते. व देशाच्या कापड उत्पादनात भर पडेल असे उत्तर दिले.

गांधीजींची स्वदेशीतच आपले स्वराज्य आहे. असे म्हणत असताना निग्रो लोकांचे एक उदाहरण दिले. सुरूवातीला निग्रो लोक स्वतः ला लागणारे अन्न व वस्त्र स्वतः शिकार करून मिळवित असत ज्यावेळी ते लोक स्वतः ला सुधारलेले म्हणू लागले त्यावेळी त्यांना अन्न वस्त्रासाठी दुस–यावर अवलंबून राहावे लागले. त्यामुळे त्यांचे स्वराज्य गेले आपल्या या दोन मुख्य गरजाकरिता दुस–यावर अवलंबून राहणा–या प्रत्येक राष्ट्राची हीच दशा झालेली दिसते.

हातमागावर निघणारे कापड गिरण्या मधून निघणा–या कापडापेक्षा आधिक होते. हात कताई व हात विणाई जर सर्वत्र सुरू झाली. तर देश लवकरच स्वयंपूर्ण होईल असे गांधीजींचे मत होते.[3]

**खादीचे अर्थव्यवस्थेतील स्थान**

गांधीजींची अशी प्रबळ धारणा होती की जी गरीबी भारतीय जनतेमध्ये दिसते. ती स्वदेशीची तत्व अंगीकारल्यानंतर निश्चितच दूर होईल. भारतीय स्वतंत्र लढयामध्ये परदेशी सत्तेचे उच्चाटन करावयाचे असेल तर स्वदेशी तंत्राचा अवलंब समाजाने करायला हवा असे गांधीजींना वाटे. त्यांच्या मते ग्रामीण सौर मंडलातला खादी हा तळपता सूर्य होता. त्यांनतर ब–याचशा कापडगिरण्यांनी खादीचा पुरस्कार केला. स्वदेशीच्या अर्थकारणामध्ये उत्पादनाचे देवाण घेवाण ही बाजार पेठेच्यामध्ये असणा–या गळे कापू स्पर्धेविना होत असे यामुळे अर्थव्यवस्थेमध्ये उत्पादक, विक्रेते आणि ग्राहक यांच्या मध्ये सलोख्याचे नाते संबंध प्रस्थापित झाले.[5]

**निष्कर्ष**

खादी या भारतीय मुळ कापडाला महात्मा गांधीनी स्वातंत्र्यलढयाचे साधन बणविले. ब्रिटिश सत्ता ही मूलतः अर्थव्यवस्था व व्यापारी मुल्यांवर तग धरून उभी होती आणि स्वदेशीच्या चळवळीमुळे त्या अर्थव्यवस्थेला खिळ बसली. त्याचबरोबर गावा–गावामध्ये चरखे व हातमागांची उभारणी करूण ग्रामिण भागातील लोकांना रोजगार निर्माण करून दिला. याच दृष्टीकोनातून स्वयंपूर्ण खेडी ही संकल्पना अस्तित्वात आली आणि याच स्वयंपूर्ण खेडयांमधून सशक्त राष्ट्राची स्वप्ने गांधीजींनी राखविली.परंतु आधुनिकीकरण व यांत्रिकीकरणामुळे खादी संस्कृती मागे पडू लागली. पुढे स्वतंत्र भारतामध्ये खादीचे महत्त्व कमी होवून परदेशी कापडाची व त्या धाटणीच्या कपडयांची मागणी वाढली. परंतु सदयस्थितीला थोडे चित्र पालटताना दिसत आहे. तरूणांच्या नव संस्कृतीमध्ये खादीला मानाचे स्थान मिळू लागले आहे परंतु संस्कृती आणि आधुनिकतेमध्ये समतोल राखताना खुप अडचणी निर्माण होताना दिसत आहेत. या दोन्ही

गोष्टी आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाच्या ओळखीला आकार देत आहेत खादी राष्ट्रीय संस्कृतीची ओळख असण्या बरोबरच सद्यस्थितीला धर्म, वर्ग, गट व प्रांत यांच्याबरोबर जोडली गेली आहे. तसेच ग्रामीण कुटिरूद्योगांमधूनही खादी उदयोगाचे स्थान कमी झालेले आहे. म्हणून ग्रामीण अर्थव्यवस्था, खेडयांचे स्वावलंबण बेकारी व गरिबीसारख्या प्रश्नांवर मात करण्यासाठी खादी उदयोगाला चालणा मिळणे गरजेचे आहे.

**संदर्भ सूची**

1. देव शंकरराव – गांधीजींचे बृहद आत्मचरित्र – सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला – 29 मार्च 1970 – पृ. क. 316
2. कित्ता, पृ. क. 319, 320
3. पटवर्धन सिताराम पुरूषोत्तम (अनुवादक) – सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा – नवजिवन मुद्रणालय, अहमदाबाद – नोव्हेंबर 2018 – पृ. क. 483
4. देव शंकरराव – उपरोक्त – पृ. क. 321 ते 324
५. mkgandhi.org/articles/understanding-gandhis-vision-of-swadeshi.html

# २६. भारतीय राष्ट्रवादाचा उदय आणि लोकमान्य टिळक यांचे महाराष्ट्रातील कार्य

**डॉ. सुवर्णा प्रकाश पाटील**
इतिहास विभाग प्रमुख, मिरज महाविद्यालय, मिरज, ता. मिरज, जि. सांगली.

**प्रस्तावना**

मानव हा समाजप्रिय प्राणी आहे. या समाजातील परस्परातील अनेकविध वस्तुनिष्ठ संबंध व त्यातून तयार झालेली आत्मनिष्ठ सामूहिक जाणीव यांच्या गुंफण्याने जो समाज होतो. त्याला राष्ट्र म्हणतात. आणि अस्तित्वात असलेल्या किंवा येण्याची क्षमता असणा-या राष्ट्राची स्वायतता, ऐक्य आणि अस्मिता यांच्या संपादनाकरिता किंवा ते टिकविण्याकरिता जी तात्विक चळवळ असते तिला राष्ट्रवाद म्हणतात [1] - ॲन्थनी स्मिथ

**भारतीय राष्ट्रवाद**

इंग्रज भारतात येण्यापूर्वी भारत हा एक देश कधीच नव्हता. 'तुम्ही एक राष्ट्रवादी नाही आणि ते व्हायला शेकडो वर्षे जातील हे इंग्रजांनी तुम्हाला शिकविले आहे', असे गांधी म्हणत.[2] पण भारतात इंग्रज येण्यापूर्वी भारतात राजकीय एक्य नसले तरी सांस्कृतिक दृष्ट्या ते एक राष्ट्र होते. इंग्रज भारतात आल्यानंतर त्यांच्या जुलमी राजवटी विरूध्द समाजातील पाश्चात्य शिक्षण घेतलेला भारतातील विविध प्रांतातील विविध धर्मातील सुशिक्षित वर्ग एकत्र येऊ लागला. त्यांनी आपापल्या प्रांतात वेगवेगळ्या संस्था उभ्या केल्या व आपले कार्य सुरू केले. त्यातूनच जनतेच्या मनात एकतेची भावना निर्माण होत गेली, यासाठी ब्राह्मो समाज, आर्य समाज, थिऑसॉफिक सोसायटी, रामकृष्ण मिशन, सत्यशोधक समाज याचे कार्य महत्त्वाचे आहे. तर राजाराम मोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद यांनी देशपातळीवर तर महाराष्ट्रातील महात्मा फुले, लोकहितवादी, रानडे, आगरकर यांनी जे कार्य केले ते अनुक्रमे भारताच्या व महाराष्ट्रातील जनतेच्या मनात राष्ट्रवादाची भावना जागृत होण्यास मदत झाली. याशिवाय ब्रिटीशांचे जुलमी धोरण, त्यांनी केलेल्या भौतिक सुधारणा, भारतीय वृत्तपत्रे, शिक्षण प्रसार, अशा अनेक कारणांनी भारतात राष्ट्रवादाचा उदय होऊ शकला.

भारतातील प्रत्येक व्यक्तीला आपण एक आहोत, तसेच त्यांना आपल्या देशाबद्दल वाटणारे प्रेम, निष्ठा म्हणजेच भारतीय राष्ट्रवाद होय. भारतात १९ व्या शतकातच लोक राष्ट्रवादाने प्रेरित होऊन आपआपसातील मतभेत

मतभेत विसरून एकत्रित व संघटित होऊ लागले होते. याचाच परिपाक म्हणजे मुंबईमध्ये भारतीय राष्ट्रीय सभेची १८८५ मध्ये झालेली स्थापना होय.

**महाराष्ट्रातील समाज यामध्ये राष्ट्रवादाची भावना**

भारतात सर्वत्र जशी राष्ट्रवादी भावना मूळधरू लागली होती तशी महाराष्ट्रतही या भावनेचा उदय होत होता. महाराष्ट्रात राष्ट्रवाद उदयाला येण्यास सुध्दा राष्ट्रीय स्तरावरीलच कारणे कारणीभूत होती. उदा. पाश्चात्य शिक्षण, ब्रिटीशांची एकछत्री राजवट, त्यांचा अन्यायी जुलमी कारभार इ. याचकाळात महाराष्ट्रात अनेक समाज सुधारकांचा उदय झाला. त्यामध्ये क्रांतीबा जोतिराव फुले, न्या. रानडे, गो. ग. आगरकर, सावित्रिबाई फुले इ. समावेश होतो. या सर्वांनी समाजातील अनिष्ठ चालीरिती, अंधश्रध्दा, कर्मकांडावर हल्ले केले. स्त्री सुधारणा, जातीभेद निर्मूलन यासाठी कार्य केले. यातूनच महाराष्ट्रात राष्ट्रवादी चळवळ जोमाने वाढू लागली.

**लोकमान्य टिळकांचा अल्पपरिचय**

लोकमान्य टिळकांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील चिखली या गावी झाला.[3] बी. ए. व एल. एल. बी. परिक्षा उतीर्ण झाले. शिक्षण घेत असतानाच पुणे येथे त्यांचा गो. ग. आगरकरांशी त्यांचा परिचय झाला. त्यातूनच ते राष्ट्रसेवेच्या उद्देशाने प्रेरित होऊन देश पारतंत्र्यातून सोडविण्यासाठी राष्ट्रोध्दाराच्या कार्यास जोडले गेले.[4]

**लोकमान्य टिळकांचे राष्ट्रवादाबाबत विचार**

राष्ट्रवाद हा टिळकांच्या विचारांचा गाभा होता. टिळक हे प्रखर राष्ट्रवादी होते. राष्ट्रभक्ती हा विचारांचा केंद्र बिंदू होता. आपल्या प्राचीन संस्कृती बद्दल त्यांना अभिमान होता. इतिहास, धर्म, परंपरा, संस्कृती, तत्वज्ञान इ. घटकांना त्यांनी राष्ट्रवादी भावनेतून पाहिले. म्हणून त्यांचा राष्ट्रवाद हा सांस्कृतिक राष्ट्रवाद म्हणून ओळखला जातो.[5]

त्यांचे विचार त्यांच्या 'केसरी'व मराठा'या वृत्तपत्रातून तसेच त्यांनी लिहिलेल्या ग्रंथातून दिसून येतात. दी ओरीयन १८९३, दी आर्क्टिक होम इन दी वेदाज १९०३, दी वेदिक क्रानॉलॉजी, गीता रहस्य इ. ग्रंथातून दिसून येतात.[6]

राष्ट्रीयत्वा बाबत टिळक म्हणत होते, ती एक मानसिक भावना आहे. धर्म, जात, भाषा, प्रांत यांना भेदून राष्ट्राबद्दल प्रेम व्यक्त करणे म्हणजे राष्ट्रवाद होय. त्यांच्या मते प्राचीन संस्कृती, स्वदेश व स्वधर्म राष्ट्रवादाचा पाया भक्कम करतात. ते धर्माला राष्ट्रवादाचा आधार मानतात. त्यामुळे सण, उत्सव एकत्रित अथवा सार्वजनिकरित्या साजरे केले तर समाज एकत्र येईल व त्यांच्यात ऐक्य निर्माण होईल असे त्यांना वाटत होते. यातून राष्ट्रवादी भावना चेतवली जाईल व त्याचा वापर ब्रिटीशांविरूध्द करता येईल. त्यांनी हिंदू धर्माच्या व्यापकतेचा राष्ट्रीयत्वासाठी उपयोग केला टिळकांनी हिंदू राष्ट्रवादाला प्रोत्साहन दिल्यामुळे त्यांच्यावर संकुचित राष्ट्रवादाचा आरोप केला जातो. कारण तो हिंदू मुस्लीम दरी निर्माण करणारा होता. लोकांना एकत्र आणण्यासाठी त्यांना आर्थिक राष्ट्वादाचा आधार घेता आला असता.[7]

**लोकमान्य टिळकांचे महाराष्ट्रातील योगदान**

जहाल राष्ट्रवादाने प्रेरित होऊन लोकमान्य टिळकांनी कार्य केले. राष्ट्रकार्याला निःस्वार्थपणे वाहून घेणा-या धडाडीच्या तरूणांची पिढी तयार व्हावी म्हणून टिळकांनी पुण्यात आखाडे सुरू केले.[8] पुण्यामध्ये गणेशोत्सव व शिवजयंती सुरू केली. त्यांनी याबाबतचे आपले विचार 'केसरी व मराठा' या वृत्तपत्रातून मांडले. म्हणजेच त्यांनी स्वतःच्या विचारासाठी स्वतःची वृत्तपत्रे काढली. सन १८७५ ते १८९५ या काळात भारतात निरनिराळ्या राज्यामध्ये सांस्कृतिक विचारांना क्रांतीचे स्वरूप लाभले या सर्व चळवळीमुळे राष्ट्रीयवृत्तीचे जहाल राजकारणात रूपांतर झाले. आशा राजकारणाचा प्रारंभ महाराष्ट्रात झाला व त्याचे श्रेय लोकमान्य टिळकांकडे जाते.[9]

**लोकशिक्षणासाठी वृत्तपत्र**

सामान्य जनतेमध्ये देशप्रेम वाढावे, ज्ञानवृध्दी व्हावी यासाठी टिळकांनी सन १८८१ मध्ये केसरी व मराठी ही साप्ताहिके सुरू केली. मराठी हे इंग्रजीतून तर केसरी हे मराठीतून प्रसारित होत होते. राजकारण, समाजकारण, अर्थकारण इ. ज्ञान देणारे, देशातील घडामोडीची समीक्षा करणारे, ब्रिटीशांच्या राजवटीचे वाभाडे काढणारे लेख यामध्ये असत. सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय ? हा अग्रलेख अतिशय गाजला.[10]

**महाराष्ट्रातील दुष्काळ**

सन १८९५ साली पश्चिम महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला तेव्हा ब्रिटीशांनीच दुष्काळा संदर्भात केलेले नियमांचे योग्य पालन न केल्याचे निदर्शनास आणून दिले. तसेच रयतेला त्यांच्या अधिकारांची माहिती देणे. ब्रिटश सरकारविरूध्द जनतेला संघर्षासाठी तयार करण्यासाठी महाराष्ट्रभर कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन दौरे काढले.[11]

**पुण्यातील प्लेगची साथ**

सन १८९६ ते ९८ दरम्यान पुण्यात प्लेग व दुष्काळाची साथ चालू होती. तेव्हा स्वयंसेवकांची पथके उभारली जनतेला मदत केली. गो-या सोजिरांच्या छळापेक्षा प्लेग परवडला असे विधानही त्यांनी केले. प्लेग प्रकरणातूनच रँड चा खून झाला याचे टिळकांनी आपल्या वृत्तपत्रातून समर्थन केले. त्यातून त्यांना ६ महिने तुरूंगवास झाला. तेव्हा त्यांनी माफी मागण्या ऐवजी तुरूंगवास भोगला.[12]

**शैक्षणिक कार्य**

लो. टिळकांनी शिक्षण विषयक आपली मते वृत्तपत्रातून मांडली आहेत. शिक्षणातूनच तरूणांचे प्रबोधन होईल, राष्ट्रवादी दृष्टीकोण जागृत होईल. म्हणून त्यांची पुणे येथे १८८० मध्ये न्यू इंग्लिश स्कूल, १८८४ मध्ये डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि १८८५ मध्ये फर्ग्युसन कॉलेज सुरू केले तेथे संस्कृत व गणितचे अध्यापनही केले 'ते आमचे गुरूच नव्हेत' आणि खरे विद्यापीठ कोणते. अशा लेखांमधून त्यांनी राष्ट्रीय शिक्षणाबद्दल आपले विचार मांडले.[13]

**शिवजयंती व गणेश उत्सव**

महात्मा फुले यांनी प्रथम १८७९ मध्ये शिवजयंती साजरी केली आणि शिवचरित्र हेच तरूणांचे खरे प्रेरणा स्त्रोत आहे सर्वांच्या लक्षात आले म्हणून राष्ट्रकार्याला निःस्वार्थपणे वाहून घेणा-या तरूणांची पिढी तयार करून त्यांच्यात राष्ट्रवाद निर्माण करून एक्य निर्माण करण्याच्या हेतून शिवजयंती व सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. येथूनच पुण्यात क्रांतीकारक चळवळ सुरू झाली व सर्वत्र पसरली. या सार्वजनिक उत्सवामुळे जनतेत राष्ट्रवादीची भावना जागृत झाली.

**टिळकांचा चतुःसूत्री कार्यक्रम**

टिळकांनी आपली चळवळ चतुःसुत्री कार्यक्रमावर आधारित केली होती. ही चळवळ देशव्यापी केली. पण याची सुरूवात महाराष्ट्रात झाली. ही चतुःसुत्री म्हणजेच राष्ट्रवादाचा कृती कार्यक्रम होता. यामधील स्वराज्य हे महत्वाचे सुत्र होते. त्यांच्या मते स्वराज्य हे साधन नव्हते तर ते ध्येय होते. स्वराज्या शिवाय व्यक्ती स्वधर्माचे आचरण करू शकत नाही. व्यक्तीचा कोणताच विकास होत नाही. स्वराज्य हा नैसर्गिक अधिकार आहे म्हणून अकोला येथील शिवजयंती कार्यक्रमात त्यांनी १९०८ मध्ये "स्वराज हा माझा जन्म सिध्द अधिकार आहे आणि तो मी मिळवणारच" ही घोषणा केली होती. परकीय वस्तूचा त्याग करणे म्हणजे बहिष्कार. ही चळवळ त्यांनी १८९४ पासूनच चालू केली होती. १८९६ मध्येच न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी परदेशी कापडाची होळी केली होती. या बहिष्कारामुळे सशक्त क्रांती पेक्षा ही आर्थिक फटका ब्रिटनला बसला. परकीय मालावर बहिष्कार म्हणजेच स्वदेशीचा स्विकार होय. इंग्रजांनी भारतीय लघुउद्योग बंद केले होते. त्यावर स्वदेशी ही चळवळच भारतीय तरूणांसाठी फारच चांगली परिणाम करणारी ठरली. हे करायचे असेल तर तरूणांपर्यंत शिक्षण पोहचले पाहिजे म्हणून त्यांनी राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार केला. राष्ट्रीय शिक्षण देणा-या संस्थांना त्यांनी आर्थिक मदतही दिली. सन १९०६ मध्ये त्यांनी महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळास २० हजार रूपये देणगी दिली.[14] टिळकांच्या या चतुःसुत्रीमुळे इंग्रजांचे धाबे दणाणले पण महाराष्ट्रीयन जनतेमध्ये प्रखर राष्ट्रवाद निर्माण झाला हे अत्यंत महत्वाचे आहे.

**टिळक व महाराष्ट्रातील त्यांचे सहकारी**

टिळकांनी स्वतः कधी शस्त्राचा वापर केला नाही पण शस्त्रधारी देशभक्तांच्या संपर्कात होते. त्यांना उत्तेजन देत. दादासाहेब खोपर्डे, वासुकाका जोशी, शिवरामपंत परांजपे, कृष्णाजीपंत खाडीलकर, गंगाधर देशपांडे, वामनराव जोशी, अच्युतराव कोल्हटकर इ.

**मद्यपान निषेध चळवळ**

लो. टिळकांनी राष्ट्रीय चळवळीमध्ये नैतिक दृष्टीकोनातून मद्यपान बंदीला खूप महत्व दिले. ब्रिटीश अधिकारी मद्यपान करीत त्यांचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती भारतीयामध्ये वाढत होती. टिळकांनी केसरी व मराठा या वृत्तपत्रातून प्रबोधनात्मक लेख लिहीले. भारतातील युरोपियनांना मद्यपान गरजेचे असले तरी भारतीयांनी अंधानुकरण करू नये. राज्यकर्त्यांनी व्यसनाला संरक्षण देऊ नये असे टिळकांचे मत होते.[15]

**होमरूल चळवळ**

होमरूल चळवळ ही टिळकांच्या जीवनातील अखेरची राष्ट्रव्यापी चळवळ होती. सन १९१६ मध्ये मुंबई प्रांतात 'होमरूल लीग'चा स्थापना केली. आपल्या देशाचा राज्यकारभार आपण प्राप्त करून घेणे म्हणजे होमरूल होय. या चळवळीला मुंबई व मद्रास प्रांतात मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळाला.[16]

**निष्कर्ष**

भारताच्या राष्ट्रीय चळवळीतील एक खंदे कार्यकर्ते व जहाल विचारसरणीचे प्रमुख नेते म्हणून फार मोठे कार्य केले. त्यांनीच भारतात आणि महाराष्ट्रातही लढाऊ राष्ट्रवादाच्या नवीन पर्वाचा प्रारंभ केला. म्हणूनच सर व्हेलेंटाईन चिरोल या इंग्रजाने'इंडियन अनरेस्ट'या ग्रंथात 'हिंदी असंतोषाचे जनक' असा टिळकांचा उल्लेख केला आहे तो सार्थ वाटतो.

**संदर्भ व तळटीपा**

1. डॉ. देशमुख सुधाकर, राष्ट्र आणि राष्ट्रवाद, संकल्पना आणि विकास, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, सन २००९, पृ. क्र. ९२.
2. गांधीजी, हिंद स्वराज्य - परंधाम प्रकाशन पवनार १९०२ (२००५) पृ. क्र. ३०.
3. गुप्ता विश्वप्रकाश, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, व्यक्ति और विचार, राधा पब्लिकेशन, नई दिल्ली, २००६, पृ. क्र. ८२.
4. डॉ. सावळे दिपा, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद, २०१३, पृ. क्र. १८५.
5. प्रा. न्हिवेकर सुहास, भारतीय राजकीय विचार, विद्या सुरभि प्रकाशन, कोल्हापूर, २००८, पृ. क्र. ७२.
6. डॉ. पाटील वा. भा, प्राचीन व आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लीकेशन, जळगाव, २००९, पृ. क्र. २६५.
7. प्रा. न्हिवेकर सुहास, उपरोक्त, पृ. क्र. ७४, ७५.
8. डॉ. वैद्य, कोठेकर, आधुनिक भारताचा इतिहास, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०००, पृ. क्र. ४१६.
9. प्रा. कोडोलीकर, महाराष्ट्राचे शिल्पकार लोकमान्य टिळक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, २०१३, पृ. क्र. ४१.
10. डॉ. साबळे दिपा - उपरोक्त पृ. क्र. १८६.
11. डॉ. वैद्य, कोठेकर, उपरोक्त, पृ. क्र. ११६.
12. डॉ. साबळे उपरोक्त पृ. क्र. १८६.
13. कित्ता पृ. क्र. १८६.
14. कठारे अनिल, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद, २०१२, पृ. क्र. ३६४.
15. प्रा. कोडोलीकर, उपरोक्त, पृ. क्र. ८३.
16. डॉ. साबळे दिपा, उपरोक्त पृ. क्र. १९२-९४.

# २७. भारतीय राष्ट्रवादाच्या उदयातील लोकमान्य टिळकांचे योगदान

**राहसे दिनेश टेट्या**
मु. मांडवी खुर्द पोस्ट मांडवी बुद्रुक, ता. अक्राणी, जि. नंदुरबार.

**प्रस्तावना**

**'स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' अशी सिंहगर्जना करून लोकमान्य टिळकांनी स्वराज्याची जाणीव हिंदुस्थानातील जनतेला करून दिली. स्वातंत्र्यपूर्व भारताच्या राजकारणात आत्यंतिक महत्वाची भूमिका बजावत असतांनाही भारतीयांचे वैदिक तत्वज्ञान, ग्रंथ, वृत्तपत्रे कॉंग्रेसच्या व्यासपीठांवरील भाषणे आणि व्याख्याने यांच्या माध्यमातून राजकीय व समाजजागृती निर्माण करण्याचे फार मोठे योगदान लोकमान्य टिळकांचे होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळ चालू असतांना या चळवळीला प्रेरणा व दिशा देण्याचे काम त्यांनी याच्या माध्यामातून केले. वृत्तपत्रे तर त्यांचे 'तिसरा डोळाच' होते. या वृत्तपत्रातून ते ब्रिटिश सरकारवर सडकून टीका करत असत. भारतीय संस्कृतीच्या अभ्यास करत असताना पाश्चात्य विद्वानांनी त्यांच्याच संस्कृतीचे गोडवे घायीले, तसेस भारतीय 'वैदिक संस्कृतीला' कमी लेखले. टिळकांनी त्यांच्या ग्रंथाच्या आधारे पुराव्यासहित आपल्या देशाची संस्कृती व तत्वज्ञान कसे श्रेष्ठ आहे हे पटवून दिले. त्यांच्या या ग्रंथांमुळे स्वातंत्र्यपूर्व काळात फार मोठी लोकजागृती घडून आली राष्ट्रीय ऐक्याची भावना निर्माण झाली आणि आजही होत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात तर ब्रिटिश सरकारच्या अन्याय व अत्याचांवर टीका करण्याच ते मागेपुढे पाहत नसत. त्यांच्या या प्रखर राष्ट्रवादाच्या विचारांमुळे व्हॅलेंटाईन चिरोल,यांनी लोकमान्य टिळकांना 'भारतीय असंतोषाचे जनक' असे म्हटले आहे. टिळकांचे ग्रंथ व वृतपत्रे ही एक राष्ट्रवादच होती.**

**टिळकांचा 'केसरी**

**इ.स.१८८० मध्ये 'केसरी' हे मराठी साप्ताहिक व 'मराठा' हे इंग्रजी साप्ताहिक सुरू झाले.न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना करणारी मंडळीच या वृत्तपत्रांच्या संपादक मंडळात होती.प्रारंभीच्या काळात टिळक धर्मशास्त्र व कायदा या विषयावर लेख लिहीत. इ.स.१८८२ च्या प्रारंभी 'केसरी' चा खप इ.स.१८०० प्रती होता तर इ.स.१८९२ मध्ये तो १३००० प्रती ऐवढा होता.१८८८ पासून ते 'केसरीचे' चे संपादक म्हणून नियमितपणे लिखाण करू लागले. हळूहळू 'केसरी' लोकपत्र बनले. टिळकांनी लोकांवरील अन्याय,**

**राज्यकर्त्यांचे जुलमी कायदे व कृत्ये ही सतत केसरीत मांडून लोकमत अनुकूल करवून घेतले.ब्रिटीशांचे आर्थिक धोरण,जहालांची चतु:-सूत्री व सामाजिक प्रश्नांवर 'केसरीत' लिखाण केले.**

**१८९६ च्या दुष्काळात टिळकांनी लोकांना 'दुष्काळ निवारण कायद्याची' माहिती करून दिली व त्याद्वारे स्वत: च्या सरकारी मदतीवरील हक्क बजावण्यासाठी त्यांनी जनतेला 'केसरितून' आवाहन केले की, "निव्वळ भीती व संकोष या पायी राणीने देऊ केलेली मदत नाकारून उपासमारीचे बळी होणे यात कुठले शहाणपण? सरकारी कर भरण्यास तुमच्याकडे पुरेसा पैसा असेल तर जरूर कर भरा ;परंतु नसेल तर दुय्यम सरकारी अधिकाऱ्यांच्या संभाव्य रोषाला भिऊन तुम्ही घरदार विकून पैसा उभारणार की काय ?ऐन मृत्युच्या जबड्यातदेखील थोडेसे धीट होता येणार नाही काय?" टिळकांनी त्या निमित्ताने सुशिक्षित तरुणांना शेतकऱ्यांच्या प्रश्नात लक्ष घालायला लावले,शेतकऱ्यांना आपल्या हक्कांसाठी शासनाशी लढा देण्यास उद्युक्त केले व 'फेमिन रिलीफ कोड' च्या प्रती शेतकऱ्यांना वाटल्या.यातून जनतेतेचे नेते म्हणवून घेणाऱ्यांनी आणि सुशिक्षितांनी संकटाच्या काळात सर्व शक्तिनिशी रयतेच्या सहाय्यासाठी धावून जाणे हे त्यांचे कर्तव्य आहे हे टिळकांनी दाखवून दिले.**

**ओरायन,आर्क्टिक होम आणि टिळकांची भूमिका**

**स्वातंत्रपूर्व भारताच्या खदखदणाऱ्या राजकरणात आत्यंतिक महत्वाची भूमिका बजावत असतानाही लोकमान्य टिळक वेळात वेळ काढून 'द ओरायन' तंसच 'द आर्क्टिक होम इन वेदाज' या ग्रंथासाठी संशोधन करत होते.**

**या संशोधनाच्या आधारे लोकमान्य टिळकांनी प्राचीन वैदिक साहित्यांतील खगोलीय उल्लेखांच्या आधारे वेदांचा काल व आर्यांचे मूळ वर्षास्थान यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. टिळकांनी आपल्या** the orien **आणि** the Arctic Home in the Vedas **या दोन अद्वितीय ग्रंथांद्वारे आपले संशोधन,आपले विचार जगासमोर मांडले व सर्वत्र त्याचे जोरदार स्वागत झाले १८९३ साली** orient **प्रसिध्द झाल्यानंतर,ज्योन हाप किन्स युनिवर्सिटी, बाल्टिमोर येथील प्राच्य विद्येचे प्राध्यापक मारिस ब्लूमफिल्ड यांनी फेब्रु. १८९४ मध्ये दिलेल्या व्याख्यानात म्हटले की,** 'A literary event of even greater importance has happened within tae last two or three months – an event which is certain to stir the world of science and culture' **हे पुस्तक म्हणजे** ' unquestionably the literary sensation of the year'**आहे असे गौरवाद्वारे त्यांनी काढले. या ग्रंथांमुळेच जहाल राजकारणाच्या पलीकडील प्रज्ञावंत टिळकांचे स्तिमित करणारे दर्शन जगाला झाले.म्यक्समुल्लरसारख्या वृषितुल्ल्य विद्वानांची व टिळकांची जवळीक निर्माण झाली. वेदवाङ्मय हे मानवाच्या इतिहासातील सर्वात प्राचीन वाङ्मय आहे आणि मानवाच्या विशेषत: आर्यवंशाचा अभ्यास करण्यास वेदांइतके दुसरे महत्वाचे असे काहीच नाही. १८८२ साली केब्रिज विदद्यापीठात 'भारपासून**

**इंग्लंडने काय शिकावे?या विषयावरती प्रा. माक्समुल्लर यांनी व्याखानमाला गुंफली. आपल्या भाषणात संस्कृत साहित्यचे महत्व विशद करतांना ते म्हणतात, 'प्राचीन आर्यवंशाचा व त्यांच्या चालीरितींची व संस्कृतीचा परिचय आपल्याला आर्यजनांच्या पूर्वीच्या अवस्थेत दर्शन होते. मानवांच्या उत्क्रांतीचा विचार करताना आर्यसंस्कृतीचा अभ्यास करणे अपरिहार्य आहे. परंतु वेदांसारखे अतिशय अभिजात वाङ्मय निर्माण करणाऱ्या आर्याबद्दलचा काही महत्वाच्या प्रश्नांचा निर्णय झालेला आही. त्यापैकी महत्वाचे प्रश्न १)आर्यांचे मूळ वसतिस्थान कुठले? २) वेदांचा नीश्चित काळ कोणता? ३)आर्य बाहेरून भारतात आले की,भारतातून इतरत्र गेले? या प्रश्नांचा विचार खगोलशास्त्र, पुरातत्वशास्त्र, भाषाशास्त्र,मानववंशशास्त्र, भूगर्भशास्त्र वैगेरे शास्त्राच्या आधारे करणे आवश्यक आहे. मानवी उत्क्रांती होत असताना अनेक स्थित्यंतरे झाली, हवामान बदल, पाण्याची उपलब्धता, इतर नैसर्गिक आपती व मानवी टोळ्यांतील आपापसातील आक्रमणे यातून मानवाचे निरनिराळे गट सतत स्थलांतर करत होते,त्यामुळे त्यांचा संस्कृतीचे आदानप्रदान होत होते. शब्दांच्या देवाणघेवाणीमुळे भाषांमुळे वैविध्य येत होते. काही नवीन भाषा उदयाला येत होत्या, तर काही भाषा मृत होत होत्या. या सर्वाचा विचार करता आर्यसंबधीच्या समस्येची उकल करण्यासाठी अत्यंत पध्दशीरपणे, काटेकोरपणे उपलब्ध पुराव्यांची छाननी करून, विविध शास्त्राचा सहाय्याने तर्कशुध्द निष्कर्ष मांडणे आवश्यक आहे.**

**टिळकांचेही लक्ष या गहन प्रश्नांकडे गेले आणि त्यांनी चिकित्सकपणे वैदिक साहित्याचे संशोधन केले. त्या संशोधनाची फलश्रुती म्हणजेच टिळकांचे हे अपूर्व ग्रंथ ! भगवतगीतेचे परिशीलन करत असताना विभूति योगांतील 'मासना मार्गशीर्षऽहं,ॠतुना कुसुमार:' या श्लोकाने त्यांचे लक्ष वेधून घेतले.या वचनामध्ये विशेष अर्थ दडलेला आहे असे त्यांना वाटले अन त्या अनुरोधाने वेदकाळचा निर्णय करण्याचे ठरवले. इजिप्तची संस्कृती सर्वात प्राचीन आहे, असे पाश्चात्य विददवान मानत होते. परंतु आर्य संस्कृती मात्र इ.स.पूर्व २४०० पेक्षा जास्त जुनी नाही असे त्यांचे मत होते. टिळकांनी आपल्या संशोधनानद्वारे हेच सिध्द करण्याचा प्रयत्न केला की, आर्यसंस्कृती अतिप्राचीन आहे व वेदातील विशेषता: वृग्वेदातील आर्याच्या धार्मिक चालीरीती ख्रिस्तपूर्व ४००० वर्षापूर्वीच्या आहेत. टिळकांनी वैदिक वाङ्मयातील सुक्ते व पुराणकथा यांचा पुरावा म्हणून वापर करून नव्याने अर्थ लावला. वैदिक आर्यांच्या चिलीरीती व पुराणकथा यांचा इराण व ग्रीकच्या चालीरीती आणि पुराणकथा आश्चर्यकारक साम्य असल्याचे दाखवून दिले. भाषाशाशास्त्रीय पध्दतीचा उपयोग करून वेदांचा काल ठरवू पाहण्याऱ्या विद्वान मंडळीत एकवाक्यता दिसत नव्हती. म्हणूनच टिळकांनी खगोलशास्त्राचा सहाय्याने वेदांचा काल ठरण्याचा प्रयत्न केला. अर्थातच या पध्दतीवरही टीका झाली. परंतु वैदिक वाङ्मयातील खगोलीय उल्लेख शोधून त्याचा योग्य तो अर्थ लावण्याऐवजी, नक्षत्रांची संकल्पना चीनकडून हिंदूंनी घेतली की हिंदूकडून चीनने घेतली, वेदकालीन**

**कालचक्र  हे पाच की सहा वर्षांचे होते,अशा प्रश्नाच्या चर्चेतच घुटमळत राहिले. त्यामुळे योग्य तो कालनिर्णय करता आला नाही, असे टिळकांचे मत होते. त्यांचा मते पूनर्वसू नक्षत्राची देवता अदिती होती व आर्यांचे नववर्ष व पंचांग पुनर्वसू नक्षत्रातून सुरू होत असल्याचे स्पष्ट उल्लेख ऐतरीय व तैतरीय ब्राम्हण तसेच वाजसेनीय संहितेत आहेत, हे त्यांनी दाखवून दिले.  वेद वाङ्मयनिर्मितीचा हा काळ असून त्यांनी त्यांच 'अदिती काल'  असे नाव दिले आहे. मृगशीर्ष(आग्रहायण किंवा ओरायन )नक्षत्र वसंत ऋतूच्या प्रारंभी उगवत असताना आर्यलोक यज्ञप्रारंभ करीत असल्याचे उल्लेख वेदांत आहे हे त्यांनी निर्देशित केले. वेदांतील काही आख्यायिका म्हणजे प्रजापती दुहितृगमन ,श्वानकथा, वृषाकपी सूक्त इ. त्यांच्या मते,प्रजापती हा आर्यांचा मुळपुरुष आसवा. त्याचेच प्रतीक म्हणून आजही उपनयनसंस्कार केला जातो व बटूचा वेश प्रजातीप्रमाणे (दंड व मेखला )असा असतो. हाच संस्कार पारशी लोकांमध्ये 'नवज्योत' या नावाने प्रसिध्द आहे. हे पुरावे व अयनचलनांच्या सूक्ष्म गणितादवारे लोकमान्यांनी ऋग्वेदाचा काल इ.स. पू. ४००० वर्ष असावा, असा सिध्दांत मांडला. सर्वसामान्य भारतीयांची व दुरभिमानी पोथीपंडितांची अशी समजूत होती की, संस्कृत या गीर्वाणभाषेतूनच जगातील सर्व भाषा निर्माण झाल्या आहेत. परंतु, टिळकांनी हे साध्य केले आहे की वेदकाली संस्कृतसारख्याच काही प्रगत भाषा अस्तीत्वात होत्या व अथर्ववेदांत अन्य भाषेतील विशेषतः खालडियन भाषेतील शब्द आहेत तसेच तुलनात्मक भाषाभ्यासानेही लक्षात आलेले आहे की संस्कृत, ग्रीक, लॅटिन वगैरे भाषांमध्ये विलक्षण साम्य आहे. परंतु, संस्कृत ही इंडोयुरोपियन भाषासमूहाची जननी नसून ती ग्रीक, लॅटिन वगैरे भाषांची सहभगिनी आहे, यावरून आपणास असे ढोबळ अनुमान काढता येते की, या सर्व भाषा अतिप्राचीन काळी अस्तित्वात असणाऱ्या भाषेपासून निर्माण झालेल्या असाव्यात व ही प्राचीन भाषा बोलणारे आर्य लोक कुठेतरी केव्हातरी एकत्र राहत असावेत.**

**वेदकाळाचा वेध घेत असतांनाच टिळकांनी आर्यांच्या मूळ वसतिस्थांनाचाही शोध घेतला. यासाठी त्यांनी तत्कालिन भूगर्भशास्त्रीय व पुरातन शास्त्रीय संशोधांनाचाही विचार केला. 'आर्क्टिक होम इन द वेदाज'  या ग्रंथांद्वारे त्यांनी आपले संशोधन सादर केले, म्हणजेच 'गीतारहस्य' प्रमाणे हा ग्रंथही लोकमान्य तुरुंगात असतांना जन्माला असे म्हणण्यास प्रत्यवाय नसावा. त्यांनी आर्यांच्या स्थित्यंतराची पाच कालखंडात विभागणी केली आहे, तो येणेप्रमाणे, इ. स पू. १०००० ते ८००० या कालखंडात आर्यलोक उत्तरध्रुव परदेशात राहत असावे, इ. स. पू. ८००० ते ५००० नवीन वसतिस्थानाच्या शोधत आर्यांचे स्थलांतर, युरोप व आशियाच्या उत्तरेला आर्यांची भटकंती.**

**इ. स. पू. ५००० ते ३०००- 'ओरायन कालखंड**

**आर्यांच्या स्थित्यंतरातील सर्वात महत्वाचा कालखंड होय. या काळी वसंत संपात मृग नक्षत्रात होत असे. वेदांतील बहुतांश सुक्ते/ऋचा याच कालखंडात वैदिक ऋषींनाच स्फुरल्या. परंतु, उत्तरध्रुव  प्रदेशातील**

आपल्या मूळ वसतिस्थानाच्या आठवणी त्यांच्या स्मृतिकोशात साठवलेल्या असल्यामुळे वैदिक साहित्यात त्यांचा उल्लेख याच कालखंडात आपले पंचांग व धार्मिक रिफॉर्म करण्याचा प्रयत्न आर्यांनी केला. इ.स.पू. ३००० ते १४०० 'कृतिका काळ' वसंत संपात कृतिका नक्षत्रात होत असे, 'वेदांग ज्योतिषाची मूळ रचना याच काळातील आहे. इ.स.पू. १४०० ते ५००- 'बुध्दपूर्वकाळ' सूत्र आणि तत्वज्ञानाच्या ( उपनिषदे ) विविध पद्धतींची सुरुवात झाली.

टिळकांच्या व्यासंगाची व अथक परिश्रमाची एक आठवण येथे नमूद करणे अप्रस्तुत ठरणार नाही. टिळकांच्या या संशोधनाच्या व्यासंगी वृत्तीतून लोकजागृती, राष्ट्राभिमान, राष्ट्रीय ऐक्याची भावना निर्माण झाली. टिळकांनी या ग्रंथाद्वारे वैदिक 'आर्यांची संस्कृती' कशी श्रेष्ठ आहे हे स्पष्ट करून दिले आहे.

**'आठवणी' तून शोधलेले 'गीतारहस्य'**

लोकमान्य टिळकांच्या आठवणींचे संग्राहकर्ते सदाशिवराव बापट यांनी आठवणींच्या पहिल्या खंडाची अर्पणपत्रिका अशी लिहिली आहे: सन १८७० ते १९२०,म्हणजे ज्या अर्धशतकाने महाराष्ट्राच्या सार्वजनिक आयुष्याचे नवयुग औरू केले. ज्याने अभिनव कल्पना –दुसऱ्यांच्ये स्थित्यंतर घडवून आणले,ज्यांनी सामाजिक चालीरितींचे मन्वंतर प्रवर्तित केले व ज्याने महाराष्ट्राच्या अर्वाचीन राजकीय इतिहासास जन्म दिला,त्यास कृतज्ञताभावाने हा ग्रंथगुच्छ अर्पण केला आहे.अभूतपूर्व परिवर्तनाने मंडित झालेल्या या अर्धशतकात कमी-अधिक कर्तेपणाने वावरलेल्या व्यक्तींनी सांगितलेल्या आठवणींचे वैशिष्ठ असे होते की,शेकोटीच्या उबेत बसून मारलेल्या गप्पांची अनोपचारिकता सांभाळूनही त्या काळातील महत्वाच्या व गंभीर घडामोडींवर त्या मनोज्ञ व चित्तवेधक प्रकाश टाकतात. या ५० वर्षांतील शेवटच्या २५ वर्षांत लोकमान्य टिळकांचे कर्तृत्व,किर्ति व नेतृत्वकौशल्य यांची महाराष्ट्रातील पुढारलेल्या वर्गावर अमीट छाप पडली. नवसुशिक्षितांच्या पहिल्या दोन-तीन पिढ्यांनी 'आपण स्वातंत्र्याला पात्र आहोत,हे समाजात आमुलाग्र सुधारणा करून सिध्द करावे,' हा मंत्र घोकत काळ कंठला होता. या विचारसरणीतील पेच टिळकांनी नेमका ओळखला. त्यांनी सांगितले की,समाजसुधारनेला अंत नाही आणि तिच्या गतीनेच चालवायचे तर देशस्थिती सुधारण्याचे मनातही आणायला नको ( खापर्डे, खंड ३ ची प्रस्तावना).'

हे लखलखीत सत्य लोकांपुढे मांडून त्यांनी समाजातील सुशिक्षितांना स्वराज्यप्राप्तीची ओढ लावली व त्यासाठी कसे प्रयत्न करावेत याचे उदाहरण घालून दिले. हे उदाहरण घालून देतांना टिळकांना अनेक हालअपेष्टांना तोंड द्यावे लागले. परकी सरकारने त्यांच्यावर राजद्रोहाचा दोनदा खटला भरला व त्यांना तुरुंगात धाडले. पण त्यांना भोगाव्या लागलेल्या या आपत्तीमुळेच त्यांची लोकप्रियता सतत वाढत गेली. 'लोकमान्यांच्या कडक देशभक्तींची शिकवण अंगी पक्की मुरलेला असा पदवीधरांचा प्रचंड समुदाय

**थोड्याच वर्षांत त्यांच्याभोवती दिसू लागला (तेथेच ).'सरकरविरुद्ध अंहिसक मार्गाने चळवळ उभरल्याने ज्यांना अशा कठोर शिक्षांचे बळी व्हावे लागले,त्यांपैकी टिळक हे पहिलेच म्हणावे लागतील. शिक्षा भोगून परत आल्यावरही टिळकांचा पराक्रम व हिंमत यात किंचितही उणीव पडलेली दिसून येत नसे.**

**टिळकांना मिळालेली विलक्षण लोकप्रियता-किंवा खरे तर,भक्त-टिळकांच्या असूयेचा,तर अनुयायांच्या जिज्ञासायुक्त कौतुकाचा विषय झाली होती. लोकमान्यांनी राष्ट्रासाठी भोगलेले हाल,सोसलेले कारावास आणि मोठमोठ्या जबाबदा-या (उदा. ताई महाराजांचा खटला)पार पाडताना स्वतःवर ओढवून घेतलेली संकटे ही निभावून नेण्याचे धैर्य त्यांना कोठून मिळत असेल,याचा अचंबा त्यांना वाटे. टिळकांचे मानसपुत्र जगन्नाथ महाराज यांनी टिळकांना हा प्रश्न स्पष्टपणे विचारला,तेव्हा ते म्हणाले, ''अरे,दुःख म्हणजे काय? 'प्रतिकूल संवेदनोत्पादकम दुःखम' असे म्हणतात. पण ज्याने अभ्यासाने व विवेकाने मुळात निःसंवेदित्वच जेथे प्राप्त करून घेतले आहे(खंड २,पृ. २६०).'टिळकांच्या पत्नी टिळक मंडालेच्या तुरुंगात असताना दिवंगत झाल्या. टिळकांचे अंतरंगस्नेही अण्णासाहेब नेने यांनी त्या संदर्भात हाच प्रश्न('तुम्हाला केवढे दुःख झाले असेल नाही?')विचारला होता.तेव्हा टिळक म्हणाले होते, ''अनुकूल संवेदनेने हर्षातिशय व प्रतिकूल संवेदनेने शोकातिशय असे मला कधीच होत नाही. याचा अर्थ असा नाही की,मी सुखदुःखातीत आहे. पण त्याबरोबर हेही खरे की,गीता व वेदांत यांच्या चिंतनाने विकारांचा क्षय होतो,हा माझा अनुभव आहे(खंड २,पृ.२४७).''**

**वरच्या 'आठवणी' त टिळकांनी मी 'सुखदुःखातीत नाही' असे सुचवले आहे. यावरून असे वाटले की,टिळकांची स्थितप्रज्ञता कधी कधी ढळत असेल काय?खापर्डेंनी याबाबतीत खालील उदाहरण दिले आहे.१९०८ सालच्या खटल्याच्या अखेरीला न्या. दावर यांनी 'तुम्हाला काही सांगावयाचे आहे काय?'असा प्रश्न विचारल्यावर टिळकांनी-''ज्यूरीचा निर्णय विरुध्द असला तरी,मी निरपराध असल्याबद्दल माझे मत कायम आहे वस्तुमात्राच्या भवितव्याचे नियंत्रण करणारी उच्च सामर्थ्ये आहेत. मी मोकळा राहण्यापेक्षा माझ्या कार्याचा उत्कर्ष माझ्या क्लेशांनी व्हावा अशीच कदाचित ईश्वराची इच्छा असावी,'' असे आकाशातून विजेचा लोळ जमिनीवर कोसळावा तसे उत्तर दिले, याचे उदाहरण घेतले आहे. ते म्हणतात , 'न्यायमूर्ती अमुक एक विचारतील असे लोकमान्यांनी अपेक्षिलेले नव्हते की असल्या उत्तराची त्यांनी तयारी करून ठेवावी.पण तो प्रश्न येताच अशा प्रकारचे खणखणीत उत्तर त्यांच्या वाणीतून ताडकन बाहेर आले. याचा अर्थच असा होतो की, मुद्दाम अमुक एका चढणीवर काही वेळपर्यंत आपले मन नेऊन ठेवायची अशी लोकमान्यांची स्थितीच नव्हती .त्यांचे मन नेहमी उंचावरूनच भ्रमत असे (प्रस्तावना ,खंड ३) .'**

**बुध्दिची ही साम्यावस्था अभ्यासाने व वैराग्याने प्राप्त होते,असे गीतेतच म्हटले आहे. लोकमान्यांनी गीतेचा अभ्यास वयाचा १६ व्या वर्षांपासून चालवला होता . त्यांचे वडील शेवटच्या आजाराने**

**बाधित असताना बळवंतराव त्यांना गीता वाचून दाखवीत, असे टिळकांनीच सांगितले आहे (' गीतारहस्य' ची प्रस्तावना). विशेष म्हणजे गीता स्वतंत्रपणे न अभ्यासता महाभारतचाभाग म्हणून ते वाचत असत. भारताचार्य चिंतामणराव वैद्य सांगतात की, समग्र महाभारत त्यांनी तीनदा तरी वाचले असावे ( खंड १, पृ. ६०). टिळकांची गीतेवर निष्ठा होती. ' भांबवण्यासारखा प्रसंग प्राप्त झाला की, तात्काळ लोकमान्यांना कोणत्यातरी गीतावचनाची आठवण येत असे आणि त्या वचनाच्या अर्थाला ते आपले मन असे करकचून बांधीत की त्यास (पक्षी: मनास) हलताच येऊ नये (खापर्डे, खंड ३, प्रस्तावना)**

**गीतरहस्यात टिळकांना समकालीन तत्वचिंतनातील निरनिराळ्या प्रवाहांची दाखल घेऊन आपला 'ज्ञानकर्मसमुच्चया' चा सिद्धांत प्रस्थापित करावयाचा होता .त्यासंबंधी प्रा. लददू यांच्याशी बोलतांना टिळक म्हणाले होते, "गीतेचा अर्थ देशकालवर्तमानांनुसार मुळास धक्का न लावता केला पाहिजे... गीता हे सर्व उपनिषदांचे सार आहे ,म्हणून त्यावर प्रचलित असलेल्या... भाषांकडे फारसे लक्ष न देता मूळ उपनिषदकारांचा हेतू ,गीतेचा हेतू व देशकाल वर्तमानानुरूप भासत असलेली जरूरी या सर्वांचा विचार करूनच गीतेचा अर्थ करणे अत्यंत आवश्यक आहे (खंड ३ , पृ. १२ )"त्यामुळे आपल्या ग्रंथात टिळकांना उपयुक्ततावादावर आधारलेले पाच्यात्य नीतिशास्त्र,शंकाराचार्यांचा कर्मसंन्यासवाद,सांख्यांचा द्वेतवाद व त्यात रामानुजचार्यांनी केलेल्या सुधारणा अशा निरनिराळ्या विचारसारणींच्या परामर्च घेऊन आपला ज्ञानकर्मसमुच्चय विद्वानांच्या सामन्य सुशिक्षितांच्या गळी उतरवावयाचा होता.त्यातही काही कळीचे मुद्दे होते. टिळकांचे म्हणणे होते की ,गीतेत नुसता 'योग' असा उल्लेख असेल तर तो 'कर्मयोग' चा संक्षेप म्हणून घ्यावा; जो ज्ञान प्राप्त करून घेऊन सिध्दावस्थेत पोहोचला, त्यानेही लोकसंग्रहासाठी समाजव्यवहारत भाग घ्यावा;हे करताना त्याला दुष्ट माणसांशी झगडा करावा लागेल तर तोही जशास तसे या न्यायाने केला पाहिजे ,इत्यादि.**

**आपण जे करीत आहोत ते परंपरेच्या विरोधात जाणारे आहे की ,टिळकांना पूर्ण माहीत होते. या सर्व मुद्यांचा त्यांना आपल्या मनाची व आपल्या भोवतीच्या जाणकार मंडळींशी दीर्घकाल काथ्याकूट केला होते.टिळकांनीच 'गीतारहस्य' च्या प्रस्तावनेत म्हटले आहे की , 'ज्या विषयाच्या विचारात आज पुष्कळ वर्ष घालविली व ज्याच्या नित्य सहवासाने व चिंतनाने मनाचे समाधान होऊन आनंद होत गेला,तो विषय हातानिराळा होणार म्हणून वाईट वाटते' खापर्डेंच्या रोजनिशीत ६ जून १९०१ ची नोंद आहे की ,टिळकांच्या मते हा, ॲरिस्टॉटलच्या ग्रंथाप्रमाणेच, नीतिशास्त्रावरील ग्रंथ आहे (खंड ३, पृ . ५८२ ).' 'गीतारहस्य' च्या मुखपृष्ठावर ' द हिंदू फिलॉसोफी ऑफ लाइफ , एथीक्स्स अँड रिलिजन' अशी घोषणा आहे , तिचे मूळ खापर्डेंनी उल्लेखिललेल्या चर्चेत आहे . पुढे शं. वि. फडणीस यांच्याशी 'गीतारहस्य'**

**संबंधाने बोलतांना लोकमान्य म्हणाले, "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे" हे जे मी म्हणतो, ते कार्याकार्यशास्त्रातील आत्मस्वतंत्र्याच्या सिद्धांतातून निष्पन्न होते ( खंड २ पृ. ४८६)."**

**ग्रंथ लिहण्याची निकड टिळकांना कितीही वाटली तरी आपले चिंतन पूर्णत्वाला पोहोचले आहे, असे त्यांना वाटत नव्हते व सवडही मिळत नव्हती. टिळकांना मंडालेच्या तुरुंगात सरकारने पाठवले तेव्हा त्यांना फुरसत मिळाली, पण हाताची संदर्भग्रंथ नव्हते. शेवटी सरकारने त्यांना दरवेळी चार पुस्तके मिळतील अशी व्यवस्था केली व नंतर काही काळाने लागतील तितकी पुस्तके बाळगायला परवानगी दिली. १९१०-११ साली अवघ्या पाच महिन्यात ग्रंथाचा खर्डा त्यांनी लिहून काढला व त्यात सुधारणा करीत अंतिम मजकूर तयार झाला. तरीही जैन तत्वज्ञानाचे ग्रंथ मिळाले नाहीत याची त्यांना हळहळ वाटत होती ( खंड २, पृ. १७ ) सरकारने टिळकांना कागद व शाई – टाक मिळू न दिल्याने पुस्तक पेन्सिलीने वहीत लिहावे लागले ( खंड २, पृ. ३९-४०). लिखाणाच्या चारही वह्या सरकारने तपासणीसाठी स्वतः कडे ठेवल्या होत्या, त्या काही दिवसांनी टिळकांना मिळाल्या .**

**ग्रंथ चित्रशाळा छापखाण्यात छापायला गेला तेव्हा त्याची किंमत काय ठेवावी हा विचार टिळकांच्या जवळच्या माणसांत होऊ लागला. भगवद गीतेसारखा विषय व लोकमान्यांसारखा अत्यंत लोकप्रिय नेता लेखक तेव्हा पुस्तकाला भरभक्कम किंमत ठेवावी म्हणजे बराच निधी गोळा होऊन तो पुढल्या चळवळीला वापरता येईल, असा व्यवहारी विचार मंडळींचा होता. त्यावर टिळकांनी उत्तर दिले, " अगदी सर्वसाधारण प्राप्तीच्या मनुष्यासही गीताग्रंथ वाचावयास मिळावा अशीच इच्छा आहे! वाटल्यास आपण हे माझे 'धार्मिक वेड' आहे , असेही खुशाल म्हणा. मी तर बायबल एडिशनप्रमाणे गीतारहस्य बारीक टायपात व पातळ कागदावर छापून आठ आण्यांत देण्याच्या विचारात आहे. आपण म्हणता बाजारभावाची किंमत ठेवून त्यात मिळेल तो पैसा राजकीय कामाकडे मी लावावा. पण कामाकरिता माला पैसा पाहिजे असून तो लोकांनी-महाराष्ट्राने माला दिला नाही असे कधीही झाले नाही. मी मागण्याचाच अवकाश! महाराष्ट्र जनता कामधेनू आहे; तो कल्पवृक्ष आहे! ( खंड१, पृ. २३३ )." शेवटी 'गीतारहस्य' ची किंमत तीन रुपये ठेवण्यात आली. 'रहस्य' चे लेखन १९११ च्या मार्चमध्ये संपत आले असतानाच टिळकांनी सदर ग्रंथाचा परिचय करून देणारे पत्रक 'मराठा व केसरी' या आपल्या वृतपत्रांतून प्रसिध्द केले होते. त्यामुळे जिज्ञासूंची उत्सुकता तेव्हापासून जागी झाली होती. १९१४ च्या जूनमध्ये टिळक पुण्याला आल्यावर 'रहस्य' विषयीची चर्चा वाढत चालली व लोकांची आतुरता शिगेला पोहोचली. १९१५च्या जूनमध्ये ग्रंथाच्या प्रती बैलगाड्यांतून गायकवाडवाड्याच्या देवडीवर विक्रीसाठी ठेवण्यात आल्या. त्याची जाहिरात आधीपासूनच झाल्यामुळे सकाळपासून वाड्यापुढे लोकांनी रांगा लावल्या. काहींनी वर्गणी काढून तीन रुपये जमवले व ते रांगेत उभे राहिले. टिळकांनी विकणाऱ्यांना ताकीत दिली होती की,**

दर गिर्हाइकाला फक्त एकच प्रत द्यावयाची. साठेबाजी व काळाबाजार टाळण्यासाठी ही दक्षता ! सहा हजार प्रतींची आवृत्ती दोन महिन्यांत खपली व सप्टेंबर १९१५ मध्ये पुनर्मुद्रण करावे लागले.

'गीतारहस्य' बाजारात आल्यावर जी खळबळ माजली ती अभूतपूर्व होती. 'सुमारे आठवडाभर या ग्रंथाची चर्चा पुणे शहरी घरोघरी चालू होती. ज्यांना पहिल्या दिवशी ग्रंथ विकत घेणे जमले, त्यांनी पुस्तक खरेदी केल्याचा अभिमानाने आपल्या कृत्याचा टेंभा मिरवीत इष्टमित्रांच्या घरी मुद्दाम जाऊन त्यांच तो ग्रंथ दाखविण्याचा सोहळा साजरा केला. त्या दिवशी दुपारी पुस्तक विकत घेणाऱ्यांचा घरी ते पाहण्याला लोक जमावे व सुचेल तसे त्याचे कौतुक करावे ... रस्त्यात परिचिंताची गाठ पडल्यास 'गीतारहस्य विकत घेतले का?' असा प्रश्न विचारला जाण्याइतका त्याबद्दल लोकांचा आदर दिसत होता ( 'लोकमान्य' , न. र. फाटक, पृ. ३२० ).' आचार्य अत्रेंनीही लिहले आहे की, त्यावेळच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांत असा रिवाज पडला होता की, 'खाकोटीस गीतरहस्याची प्रत घेऊन रस्त्याने ऐटीत चालत जायचे व कोणी विचारल्यास म्हणायचे, 'काही नाही. लोकमान्यांना दोन शंका विचारलं चाललो आहे! 'असा ग्रंथोत्सव मराठी वागमायच्या वाङ्मयाच्या इतिहासात पहिलाच झाला असेल.

'गीतारहस्य' ज्यांना मिळाले होते, त्यांच्यातही एक उतरंड तयार झाली होती. कोणत्याही समाजात कोणत्या न कोणत्या मानदंडाने अशी उतरंड तयार होतेच. गंगाधरराव देशपांडेसारखा जे टिळकांचे निष्ठावान होते,त्यांच्याकडे छापून झालेले फॉर्म्स छापखान्यातून पोस्टाने परस्पर धाडले फॉर्म मिळाले की ,रात्री गांगधारवाच्या अध्यक्षतेखाली गोविंदराव याळगी,सोमण,पुंडलिकजी अशांची बैठक बरे. पुंडलिकजी वचन करीत व वाचलेल्या प्रत्येक शब्दाची चिकित्सा होई. त्याच्या खालची पायरी म्हणजे ज्यांना लोकमान्यांनी स्वत: सही करून प्रत नजर केली अशा मान्यवरांची . विष्णुशास्त्री बापट, भाऊशास्त्री लेले , अशांसारखी विद्वान माणसे त्यात मोडतात. तिसरी पायरी म्हणजे, ज्यांनी चिकाटीने रांगेत उभे राहून व तीन रुपये खर्च करून 'गीतारहस्य' मिळवले अशांची. पण खरे कौतुक केले पाहिजे ते विंनोबांसारख्या व्यासंगी विद्यार्थ्यांचे, की ज्याने 'गीतारहस्य' चिकित्सकपणे दोनदा आमूलाग्र वाचून आत्मसात केले.

शंकराचार्यांच्या पठडीतील ज्या विद्वानांनी 'गीतारहस्य' वाचले , त्यांचे असे स्पष्ट मत होते की , टिळकांनी त्यांची मते कृष्णाच्या तोंडी घातली आहेत! कादंबरीकार ना. सी. फडके यांचे सीतारामपंत म्हणत की, 'गीतेचे तात्पर्य काढताना टिळकांनी हातचलाखी केली आहे, दांडगाई केली आहे. गीतेच्या आड उभे राहून टिळकांनी हवा तसा निष्कर्ष काढला आहे ('माझे जीवन कादंबरी, ना. सी. फडके, पृ .23).'विष्णुशास्त्री बापटांची बोलतांना म्हणाले, 'पण गीतेतला प्रवृतीमार्गच मला पुढे आणायचा आहे. लोकांना आळशी बनविणारा निवृतीमार्ग हल्ली काहीच कामाच··· नाही आमच्या मताने आचार्यही कर्मयोगीच

**आहेत.'त्यावर विष्णुशास्त्र्यांनी त्यांना परखडपणे सांगितले की, 'पण आपला हा उद्देश गीतेतील ज्ञानपर श्लोकांची सर्वथा उपेक्षा करून कर्मपर श्लोकांच्या व्याख्यानानेही सिध्द झाला असता. पण सर्व गीता कर्मपर लावण्यात वेदान्तशास्त्र,संन्यास उर्फ ज्ञानकर्म,स्वत:आचार्यांचे तत्वज्ञान इ. सर्वांची विनाकारण विरोध करण्याचा प्रसंग आला आहे...आपण आचार्यांना कर्मयोग जरी समजत असला, तरी आपल्याला कधीच कर्मयोगी म्हणवून घेणार नाहीत (खंड,२ पृ. ३९-४० ).'**

**पण तांत्रिक किंवा कठोर टीकांचे थोडेफार ध्वनी उमटले तरी 'गीतरहस्य' त्या वेळच्या तरुण पिढीत अतिशय लोकप्रिय झाले आणि त्यातील शिकवण काही न काही प्रमाणात त्या वेळच्या प्रत्येक सुशिक्षिच्या वर्तनात उतरली,यात शंका नाही. केवळ गीतेचा अभ्यास करण्याचे नव्हे,तर एकूणस प्राचीन तत्वज्ञानाचे आकलन कसे करून घ्यावे याचा आदर्श टिळकांनी 'रहस्य' च्या रूपाने लोकांसमोर ठेवला. गोळीबंद विचार कसा असतो व नेमक्या शब्दांत कसा मांडता येतो,प्राचीन संस्कृती ही केवळ संग्रहालयातील वस्तु नसून तरुण सुक्षितांनी घ्यावीत अशी तत्वे व उदाहरणे कशी निवडावीत,याचे मार्गदर्शन 'रहस्य' तून मिळते. 'गीतरहस्य' चा आणखी एक विशेष म्हणजे पारंपरिक विचार आधुनिकांना समजावा यासाठी त्यांनी निर्माण केलेले नवे शब्द आणि त्या तत्वज्ञानाची केलेली तर्कशुध्द मांडणी. याचा परिणाम असा झाला की ,पाश्चात्य तत्वज्ञान ज्या व्यासपीठावरून भारतीयांनी तपासायचे ते व्यासपीठ तयार झाले .**

**टिळक आणि त्यांचे महान विचार**

1. **प्रगती स्वतंत्रता में निहित है | बिना स्वशासन के न औद्घोगिक विकास संभव है,न ही राष्ट्र के लीए शैक्षिक योजनाओँ की कोई उपयोगिता है ... देश की स्वतंत्रता के लिए प्रयत्न करना सामाजिक सुधारों से अधिक महत्वपूर्ण है.**
2. If God is put up with untouchability,I will not call him god.
3. **हो सकता है ये भगवान की मर्जी हो मै जिस वजह का प्रतिनिधित्व करता हूं उसे मेरे आझाद रहने से ज्यादा मेरे पीडा मे होने से अधिक लाभ मिले |**
4. **धर्म और व्यावहारिक जीवन अलग नही है !संन्यास लेना जीवन का परित्याग करना नही है!असली भावना सिर्फ अपने लिए काम करणे की बजाये देश को अपना परिवार बना मिलजुकर काम करना है!इसके बाद का कदम मानवता की सेवा करना है और अगला कदम ईश्वर की सेवा करना है.**

**संदर्भसूची**


1. **डॉ.गाठाळ एस.एस.** (**सेवानिवृत्त**); **आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास** (**इ.स.१८१८-१९६०**) **कैलाश पब्लिकेशन्स,औरंगपुरा,औरंगाबाद. सुधारित आवृती, जानेवारी २०१९ पृ.क्र. ३११**
2. **डॉ. सातभाई श्रीनिवास** ; **आधुनिक भारताचा इतिहास** (**इ.स.१७६२-१९५०**). **विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपुरा,औरंगाबाद आवृत्ती, २००८ पृ.क्र. २८४**
3. loksatta.com/vishesh-new the-orion-the-arctic-home-in-vedas-and-lokmanya-tilak-161411/ **३०/७** /**२०१३** Time **१२**:**५३** PM
4. **श्री.भावे मा.**; **'आठवणी' तून शोधलेले 'गीतारहस्य'** (**लोकसत्ता,पुणे ०१ /०८/ २०२०**). **पृ.क्र. ६**
5. Mishra Gopal; Achhikhabar.com Bal Gangadhar Tilak Quotes in hindi last updated **२३/०७/२०१८**

# २८. लोकमान्य टिळक आणि ‘केसरी’

**प्रा. डॉ. हमीद उमरअली काझी**
असोसिएट प्रोफेसर व इतिहास विभाग प्रमुख, विश्वासराव रणसिंग महाविद्यालय, कळंब-वालचंदनगर, ता. इंदापूर, जि. पुणे.

**प्रस्तावना**

धनंजय कीर यांनी महापुरूषांचे दोन प्रकार पाडले आहेत.पहिल्या प्रकारचा महापुरूष हा राष्ट्रावर गुलामगिरीचे संकट आले असता त्यांच्यात स्वाभिमान, राष्ट्राभिमान, व स्वातंत्र्याची इच्छा जागृत करीत असतो. आणि जनतेला स्वातंत्र्यासाठी लढायला प्रवृत्त करत असतो. दूसऱ्या प्रकारचा महापुरूष हा समाजातील जुन्या चालिरिती, जुनी समाजरचना बदलून न्याय व उदार तत्वांच्या पायावर नवसमाजाची उभारणी करून सर्वांना स्वातंत्र्य, समता व बंधुताचे हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न करीत असतो. लोकमान्य टिळक हे पहिल्या प्रकारचे महापुरूष होते.[१]

कोणताही पुरूष हा महापुरूष म्हणून जन्माला येत नाही. मनुष्य आपल्या दोंषावर जसजसा विजय मिळवत जातो तसतसे त्याच्या अंगी समाजाला उपयुक्त असणारे गुण विकसीत होत रहातात. सन १८८० ते १८९१ मधील टिळकांपेक्षा १८९७ सालचे टिळक अधिक उज्वल झाले. सन १८९८ ते १९०८ चे टिळक भव्य लोकोत्तर पुरूष झाले. सन १९०८ ते १९२० मध्ये टिळक महापुरूष झाले.[२]स्वराज्य हे लोकमान्य टिळकांचे ध्येय होते. ते साध्य करण्यासाठी कोणत्याही मार्गाचा अवलंब करावा लागला तरी चालेल असे त्यांना वाटत होते, म्हणजेच ‘साधनानाम् अनेकता’ हे त्यांचे सुत्र होते.स्वराज्य मिळविण्याच्या कामी जनतेच्या पाठिंब्याची आवश्यकता होती. समाजातील सर्व स्तरातील जास्तीत जास्त लोकांचा पाठींबा मिळविण्याचा त्यांचा प्रयत्न होता. सर्वसामान्यांवर असणारा धर्माचा प्रभाव ते ओळखून होते. जुन्या चालीरितींना हा समाज सहजासहजी सोडण्यास तयार होणार नाही याची जाणीव लोकमान्य टिळकांना होती. त्यासाठी लोकमान्य टिळकांनी त्यांना दुखावले नाही उलट जुन्याचालीरितींवर हल्ले चढविणाऱ्या समाजसुधारकांवर हल्ले चढविले. त्यासाठीच त्यांनी सामाजिक सुधारणांच्याऐवजी राजकीय सुधारणांना अग्रक्रम दिला. राजकीय सुधारणा झाल्या की सामाजिक सुधारणा आपोआपच होतील असे त्यांचे मत होते.क्रांतीकारी हे देशभक्त आहेत याचीही जाणीव लोकमान्य टिळकांना होती. त्यामुळे त्यांनी त्यांनाही विरोध केला नाही. जनजागृतीचे महत्वाचे साधन म्हणून त्यांनी वर्तमानपत्राचे माध्यम हाताशी धरले.त्यातून ‘केसरी’ व ‘मराठा’ही दोन वर्तमानपत्रे त्यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या सहकार्याने सुरू केली.

**‘केसरी’ आणि ‘मराठा’ च्या निर्मितीची पार्श्वभूमी**

लोकमान्य टिळक, विष्णुशास्त्री चिपळूणकर,आगरकर यांनी पुण्यात सन १८८० मध्ये न्यु इंग्लिश स्कुल ची स्थापना केली. पुढे त्यांना माधवराव नामजोशी, वासुदेवशास्त्री खरे, वामनराव आपटे येऊन मिळाले. यावळी पुण्यात ज्ञानप्रकाश, किरण, शिवाजी या नावाचे छापखाने व त्याच नांवाची शिवाय ज्ञानचक्षू यासारखी

वर्तमानपत्रे चालु होती. आपणही वर्तमानपत्र सुरू करावे असा विचार न्यु इंग्लिश स्कुल च्या चालकांच्या मनात आला. विष्णुशास्त्री चिपळूणकर गेल्या सहा वर्षापासून निबंधमाला हे मासीक चालवित होते. नामजोशी हे संपादक म्हणून प्रसिध्द होते. आगरकरांना लहानपणापासून लिहिण्याचा छंद होता. लोकमान्य टिळकांना मांडी मोडून बसून हातात लेखणी घेवून लिहिण्याची विशेष हौस नव्हती. त्यामुळे छापखाना व वर्तमानपत्रे या कल्पनेचा मूळ उगम लोकमान्य टिळकांच्या मनात न होता तो विष्णुशास्त्री चिपळूणकर, माधवराव नामजोशी यांच्या मनात झाला टिळकांनी त्याला मागाहून संमती दिली.[३] अशाच आशयाचे मत प्रा.न.र.फाटक यांनीही व्यक्त केले आहे. टिळकांना लिहिण्याची हौस मुळातच कमी होती. त्यात मराठीमध्ये लेखन करण्याची हौस तर सुरूवातीस अजिबात नव्हती.[४]

स्वराज्य मिळविणे हे लोकमान्य टिळकांचे मुख्य उद्दिष्ट होते.ते साध्य करण्यासाठी त्यांना जनतेच्या सहकार्याची,पाठिंब्याची  आवश्यकता होती. लोकमान्य टिळक व त्यांच्या सहकाऱ्यांनी एक इंग्रजी व एक मराठी वर्तमानपत्र सुरू करण्याचे ठरविले. यासंबधीचा विचार विनिमय वामनराव आपटे यांच्या घरी झाला. चिपळूणकरांनी इंग्रजी वर्तमानपत्राला 'मराठा' तर मराठी वर्तमानपत्राला 'विक्रम' हे नांव सुचविले. 'मराठा' हे नांव सर्वांना पसंत पडले पण'विक्रम' या नांवाबाबत एकमत होत नव्हते. लोकमान्य टिळकांनी 'केसरी' हे नांव सुचविले ते सर्वांना पसंत पडले. 'केसरी' म्हणजे सिंह. वनराज. ज्या वनराजाचे नांव या पत्राने धारण केले त्या वनराजाप्रमाणेच प्रत्येक गोष्टीत या पत्राने निर्भयतेने,भारदस्तपणा आणि ऐट या गोष्टी व्यक्त केल्या आहेत. 'मराठा' चा पहिला अंक दि.२ जानेवारी १८८१ रोजी व 'केसरी' चा पहिला अंक दि.४ जानेवारी १८८१ रोजी निघाला.'केसरी' च्या पहिल्या अंकाच्या अग्रलेखाकडे पाहिले तर या वर्तमानपत्राच्या ध्येयधोरणाची कल्पना येते.[५]पण ही वर्तमानपत्रे दूसऱ्याच्या छापखान्यात छापणे योग्य नव्हते त्यासाठी स्वत:चाच छापखाना असणे आवश्यक होते.त्यासाठी भांडवलाची आवश्यकता होती. माधवराव नामजोशी यांचे वर्तमानपत्र ज्या 'किरण' या छापखान्यात निघत असे तो केशव बल्लाळ साठे यांच्याकडे गहाण होता.त्यांनी हे सर्व साहित्य आप्पासाहेब मांडे यांच्या 'शिवाजी' छापखान्यात आणून ठेवले होते.नामजोशी यांनी हे साहित्य विकत घ्यावे असे सुचविले. त्यानुसार साठे यांच्याशी बोलणी सुरू केली गेली.साठे यांचे २४०० रूपयांचे कर्ज देणे आवश्यक होते.साठे यांनाही आपल्याकडे गहाण असलेल्या या छापखान्याच्या सामानाचे बोझे वाटत होते.त्यामुळे त्यांनी ते हप्त्याने देण्याचे कबुल केले.व्यवहार होताच ही बातमी बाहेर फुटण्याच्या आत हे सर्व साहित्य ताब्यात घेणे आवश्यक आहे असे वाटल्यावरून त्यांनी ते रातोरात मोरोबा दादा यांच्या वाड्यात हलविले.त्यामुळेच लोकमान्य टिळक 'मी या आर्यभूषण छापखान्याच्या पेट्या खांद्यावरून नेल्या आहेत' असे म्हणत.'आर्यभूषण' या छापखान्याचे डिक्लरेशन 'आर्यभूषण' या नांवाने गणेश मोरेश्वर सोहोनी यांच्याकडून करविण्यात आले.त्यांचीच छापखान्याचे व्यवस्थापक म्हणून नेमणूक करण्यात आली.या छापखान्याला पहिलेच काम विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या निबंधमालेचे मिळाले.त्यांच्या निबंधमालेचा ६६ वा अंक या छापखान्यात छापला गेला.या अंकात 'केसरी'चे उद्देशपत्रक प्रसिध्द करण्यात आले. या उद्देशपत्रकावर विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, वामनराव आपटे,गोपाळ गणेश आगरकर, माधवराव नामजोशी,डॉ.गणेश कृष्ण गर्दे या सहाजणांच्या सह्या होत्या.यापैकी

डॉ. गर्दे हे केसरीच्या मालकीच्या भागीदारीत नव्हते.छापखान्याचे व्यवस्थापक गणेश मोरेश्वर सोहोनी यांना भागीदारीत घेण्यात आले.[६]पुढे सन १८९१ मध्येछापखान्याची मालकी सोहोनी यांच्या जागी व्यवस्थापक म्हणून आलेले हरी नारायण गोखले व वासुदेव बाळकृष्ण केळकर ('मराठा'चे संपादक,न्यु इंग्लिश स्कुलमधील शिक्षक व फर्ग्यसन कॉलेजमधील इंग्रजीचे प्राध्यापक) यांच्याकडे तर'केसरी' व 'मराठा' या दोन्ही वर्तमानपत्राची मालकीलोकमान्य टिळकांकडे आली ती शेवटपर्यंत त्यांच्याकडे राहिली.

**लोकमान्य टिळकांनी 'केसरी'द्वारे केलेली जनजागृती**

वर्तमानपत्रांनी जनतेच्या कोतवालाची व वकिलाची भूमिका पार पाडली पाहिजे असे लोकमान्य टिळकांना वाटत होते.सरकारविरूध्द लिहिले तर सरकारची नाराजी ओढावेल म्हणून सरकारविरूध्द लिखाण करायचे नाही असा विचार आपण करणार नाही.सरकारी अधिकारी व सरकार विषयी निपक्षपातीपणे व भिडभाड न ठेवता लिहिण्याचा आपला उद्देश केसरीकारांनीपहिल्याच अंकात स्पष्ट केला होता.वर्तमानपत्राचा उपयोग काय? हे सांगताना या अग्रलेखात केसरीकार लिहितात,'रस्त्यावर रात्री दिवे लागलेले असल्याने व पोलिस गस्त घालत असल्याने जो उपयोग होते,तोच उपयोग वर्तमानपत्रकर्त्याची लेखणी सतत चालू असल्याने होत असतो'.[७]आपल्या वर्तमानपत्राला 'केसरी' हे नांव देण्यामागे लोकमान्य टिळकांचा उद्देश काय होता? हे 'केसरी' च्या पहिल्या पानावरील श्लोकातून दिसून येतो.

**स्थितीं नो रे दध्याः क्षणमपि मदांधेक्षणसरेव गजश्रेणीनाथ त्वमिह जटिलायां वनभूवि।**
**असौ कुंभिभ्रांत्या खरनखरविद्रावितमहा—गुरूग्रावग्रामः स्वपिति गिरिगर्भे हरिपतिः।।**

वरील श्लोक मदोन्मत हत्तीला उद्देशुन आहेत.या घनघोर जंगलामध्ये तु थांबु नकोस.या पर्वतावरील गुहेत जंगलचा राजा सिंह झोपलेला आहे.ज्याने हत्तीसमान मोठमोठ्या शिळांना आपल्या नखांनी फोडून काढले आहे.पंडित जगन्नाथ यांचा हा श्लोक लोकमान्य टिळकांच्या भावना व्यक्त करतो. मदोन्मत हत्ती म्हणजे ब्रिटीश सरकार.घनघोर अरण्य म्हणजे भारत.भारतीय जनता म्हणजे सिंह. लोकमान्य टिळकांना ब्रिटीश राज्यकर्त्यांना सूचित करायचे होते की सावधान! जर तुम्ही मदाने उन्मत्त झाला तर या देशाची प्रजा झोपेतून उठेल.'केसरी' द्वारे या झोपलेल्या सिंहाला म्हणजेच भारतीय जनतेला जागृत करण्याचा लोकमान्य टिळकांचा हेतु होता.[८]'केसरी—मराठा'यांचा उद्देश शाळेबाहेरील जनतेला शिक्षण देण्याचा होता असे न्यू इंग्लिश स्कूलच्या चालकांनी आपल्या अहवालात स्पष्ट म्हटले होते.[९]

'केसरी—मराठा' या वर्तमानपत्रांनी वृत्तपत्रांच्या सृष्टीत क्रांती करून सोडली तसेच टिळकांच्या चळवळीमुळे 'केसरी'हे त्यांचे मुखपत्र बनले असे प्रा.न.र.फाटक म्हणतात. कारण त्यावेळी वर्तमानपत्रे खूप होती.पण कोणीतरी चालक व कोणीतरी पगारी संपादक अशी स्थिती होती. अशा संपादकाच्या लेखणीत स्वतंत्र विचार दिसत नव्हते. देशातील परिस्थितीचा विचार करून ते कोणताही आडपडदा न ठेवता तसेच सरकारची व लोकमताची भीती न बाळगता रोखठोकपणे लिहिण्याचा प्रकार लो. टिळकांनी 'केसरी—मराठा' हातात घेतल्यानंतर चालू ठेवला.[१०] सरकार असो की स्वजन असो, लोकमान्य टिळकांनी त्यांच्याविरूध्द टिका करताना कोणताही फरक केला नाही. राजकिय व सामाजिक वादाविषयी लिहिताना लोकमान्य टिळकांची शैली

नेहमी चढाईची होती. त्यांच्या भाषेत नाजुकपणा व मुलायमपणा नव्हता.आपल्या विचारांचे माध्यम म्हणून त्यांनी शब्दांचा वापर केला. पण शब्दांवर त्यांचे नियंत्रण होते. शब्दांच्या आहारी ते कधी गेले नाहित. त्यांना जे काही सांगायचे ते त्यांनी स्पष्ट शब्दात सांगीतले. त्यांची भाषा कल्पनाविलासात दंग होणारी नव्हती, तर लोकांना समजून सांगणारी होती. त्यामुळे लोकमान्य टिळकांचा आणि वाचकांचागोंधळ उडत नव्हता.[११] लोकमान्य टिळकांच्या अग्रलेखात रटाळपणा कधी आला नाही. त्यांच्या वृत्तपत्रीय लेखन सामर्थ्याला दोन कारणे होती.एक म्हणजे त्यांचा लोकांच्या जीवनाशी सतत संबंध असे. त्यामुळे त्यांना लोकांचे दु:ख,त्यांच्या अडीअडचणी नेमक्या समजत आणि त्या ते सरळ व रोखठोकपणे मांडत. त्यामुळे त्यांचे लेखन कधी पोकळ होत नसे. दूसरे कारण म्हणजे त्यांचे चतुरस्त्र वाचन होय.विविध विषयावरील अद्ययावत पुस्तके वाचण्यासाठी त्यांची सतत धडपड चालू असे.टिळकांच्या असामान्य बुध्दीचा संचार ज्ञानाच्या विविध क्षेत्रात अप्रतिहत चाललेला असे. त्यामुळे त्यांच्या लेखांना तोचतोचपणा व शिळेपणा कधी आलेला दिसत नाही.[१२] आशयघनता हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्टय होते. त्यांनी पाल्हाळ लेखन केले नाही. पण विषय समजण्यासाठी आवश्यक ती माहिती देवून आपण मांडत असलेलाविचार लोकांच्या मनावर ठसेल अशा पध्दतीची मांडणी ते करीत. लोकमान्य टिळकांनी शब्द हे विचार व्यक्त करण्याचे साधन म्हणून वापरले. शब्दांचे नेमके सामर्थ्य ओळखून टिळक त्यांचा वापर करीत. त्यांच्या अग्रलेखांचे मथळे लक्षवेधक आहेत. 'नवी विटी नवे राज्य', 'पुनश्च रहि ओम', 'चतकोर भाकरीची गुलामगिरी', 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?', 'आमचे उद्योगधंदे कसे ठार झाले?', 'उजाडले पण सूर्य कोठे आहे?', हे असे अनेक मथळे अत्यंत अर्थपूर्ण व मोजक्या शब्दात अग्रलेखाच्या आशयाची कल्पना देणारी आहेत.[१३]

वर्तमानपत्रातील लेखन हे तत्कालिन प्रश्नांवर केलेले असल्याने ते अल्पावधीतच कालबाह्य ठरत असते पणलोकमान्य टिळकांच्या बाबतीत तसे घडत नाही.ॲडिसन या ब्रिटिश लेखकाने म्हटले आहे'जे वृत्तपत्रीय लेखन टिकते ते साहित्य होय आणि जे साहित्य टिकत नाही ते केवळ वृत्तपत्रीय लेखन होय'. लोकमान्य टिळकांचे केसरीतील लेख आजही वाचावासे वाटतात याचा अर्थ त्यांचे वृत्तपत्रीय लेखन हे साहित्य होते. 'केसरी'मध्ये ते जेव्हा अग्रलेख लिहित तेव्हा ते आधी प्रश्नाचे स्वरूप समजावून सांगत आणि नंतर आपले मत मांडत. तत्कालिन प्रश्नांवर लेखन करताना दीर्घकाळ महत्वाचा ठरेल असा विचार ते मांडत तसेच चिरंतन सत्याची व शाश्वत मूल्यांची जाणीव वाचकांना करून देत.[१४]

आपल्या घरात चोर शिरले आणि त्यांना घराबाहेर काढण्यास आपल्या मनगटात जोर नसेल तर त्यांना खुशाल जाळून मारावे असे टिळकांनी एका भाषणात म्हटले होते. ते केसरीत प्रसिध्द झाले होते.[१५]लोकमान्य टिळकांची अशी भाषा सरकारला पसंत पडणे शक्यच नव्हते. दि.२७ जुन १८९७ रोजी पुण्याचे कलेक्टर लॅब यांनी पुण्यात बोलताना या गोष्टीचा उल्लेख केला होता. लोकमान्य टिळकांवर बेबंदशाही पसरविण्याचा आरोप करून त्यांनी जनतेला असले रखररखते निखारे विझविण्याचे आवाहन केले.[१६] रॅंडची हत्यालोकमान्य टिळकांच्या लेखामुळे झाली असे त्यांना सुचवायचे होते. माझे लेख खुनास उत्तेजन देणारे आहे असे वाटत असेल तर भारतीय दंड विधानाप्रमाणे खटला भरण्याचे आवाहन त्यांनी सरकारला केले.पण निरपराध लोकांना

विनाकारण धमकी देवून त्यांच्यावर आग पाखण्याचे कारण नाही असे स्पष्टपणे सांगुन'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' असा उलट प्रश्न सरकारला विचारला.[१७]

राज्य कितीही चांगले असले तरी चोऱ्या, दरोडे, खुनासारखे प्रकार घडणारच आणि तसा एखादा प्रकार घडला तर त्याची चौकशीही कायद्यानुसार झाली पाहिजे.ज्या राज्याला असा बंदोबस्त ठेवता येत नाही ते राज्य करण्यास नालायक आहेत.खुन झाला की आण पलटण व जाळ सारा गांव,असा प्रकार करणे योग्य नाही असा सल्लाही ते सरकारला देत व राज्य करणे म्हणजे सुड उगवणे नव्हे असे समजावीत.[१८]सन १९०७ च्या सुरत अधिवेशनानंतर पुण्याला परतल्यानंतर एक दैनिक सुरू करण्याचा लोकमान्य टिळकांचा विचार होता.आपल्या नव्या पक्षाच्या प्रचारासाठी त्याचा उपयोग करण्याचा त्यांचा विचार होता.त्यानुसार फेब्रुवारी १९०८ मध्ये त्यांनी 'नॅशनल पब्लिशिंग कंपनी' स्थापन केली.या नव्या प्रकाशन कंपनीच्या वतीने 'राष्ट्रमत' या नांवाचे पत्र प्रकाशित केले.पण त्याचा पहिला अंक पहाण्यास टिळक नव्हते.सरकारने त्यांना अटक केली होती. 'राष्ट्रमत'च्या पहिल्या अंकात त्यांच्याच अटकेची बातमी होती.सरकारने या पत्राकडून जामीन मागण्याचा सपाटा सुरू केला.शेवटी आर्थिक संकटात सापडल्याने हे पत्र बंद पडले.[१९]

दि.३० एप्रिल १९०८ रोजी न्यायाधिश किंग्जफोर्ड वर खुनी हल्ला झाला.ब्रिटीश वर्तमानपत्राांनी त्यासाठी जहाल पक्षाला जबाबदार धरले.नव्या पक्षाच्या पुढाऱ्यांनी ब्रिटिशांविरूध्द द्वेष पसरविला तसेच घातपाती कृत्ये करण्यास प्रोत्साहन दिले.त्यामुळे काही उत्साही तरूणांची डोकी ठिकाणावर राहिली नाही असा आरोप केला.[२०]लोकमान्य टिळकांना हे आरोप सहन झाले नाहीत.त्यांनी या सर्व कृत्यांसाठी सरकारला जबाबदार धरले.आणि खुदिराम बोस यांच्या कृत्याचे समर्थन केले.ज्या कोणी हा प्रकार केला ते चोर किंवा बदमाश नाहीत तर अधिकारी वर्गाच्या अनियंत्रित सत्तेमुळे संतप्त झालेले युवक आहेत.मानवाच्या सहनशिलतेला काही मर्यादा आहेत.याचा विचार करून राज्यकर्त्यांनी आपली अनियंत्रित सत्ता राबविली पाहिजे.असा सल्ला सरकारला देवून राज्यपध्दतीत लोकमताचा आदर केला पाहिजे या राज्यकर्त्यांच्या कर्तव्याची जाणीव ही लोकमान्य टिळकांनी करून दिली.[२१]

बॉम्ब का टाकले जातात? याचे उत्तर देतानालोकमान्य टिळकांनी त्याचा संबंध स्वराज्याशी जोडला. दडपशाही करून बॉम्बगोळे नाहीसे होणार नाहीत.तर स्वराज्याचे हक्क दिल्यास ते आपोआप नाहिसे होतील. त्यामुळे दडपशाहीचे उपाय टिकत नाहीत याची जाणीव लोकमान्य टिळकांनी सरकारला कोरीमधून सरकारला करून दिली होती.[२२]

लोकमान्य टिळकांनी 'केसरी'च्या माध्यमातून जनतेला जागृत केले.विविध विषयांवर सतत लेखन करूनजनतेला सतत जागृत ठेवले.आपल्या देशाची हालाखीची स्थिती त्या स्थितीसाठी जबाबदार असणाऱ्यांवर टिकेची झोड उठविली.'लोकांत स्वाभिमान,निष्काम लोकसेवा,स्वावलंबन इत्यादि गुण'वाढीस लागण्यासाठी लेखणी झिजवली.[२३]

लोकमान्य टिळकांवरील राजद्रोहाचे खटले :—लोकमान्य टिळकांवर एकुण तीन वेळा राजद्रोहाचे खटले दाखल करण्यात आले.पहिला खटला सन १८९७ साली,दूसरा खटला सन १९०८ साली व तिसरा सन

१९१६ साली.त्यापैकी पहिले दोन खटले हे लोकमान्य टिळकांनी 'केसरी'मध्ये लिहिलेल्या लेखासंबधी होते.त्या दोन्ही खटल्यात त्यांना शिक्षा झाली.तिसरा खटला त्यांच्या भाषणासंबधी होत.त्या खटल्यात ते निर्दोष सुटले. आपल्या घरात चोर शिरले आणि त्यांना घराबाहेर काढण्यास आपल्या मनगटात जोर नसेल तर त्यांना खुशाल जाळून मारावे असे लो.टिळकांनी दि.१२ जुन १८९७ च्या पुण्यातील एका भाषणात म्हटले होते.या भाषणाचा मजकुर व 'शिवाजीचे उद्गार' ही कविता दि.१५ जुन च्या 'केसरी'मध्ये छापून आली होती.त्यावर सरकारने आक्षेप घेतला होता.या खटल्यात त्यांना सहा वर्षाची शिक्षा झाली.दि.१२ मे १९०८ रोजी लोकमान्य टिळकांनी 'केसरी'त 'देशाचे दुदैव' आणि दि. ९ जुन रोजी'केसरी'त लिहिलेल्या 'हे उपाय टिकाऊ नाहीत'या अग्रलेखातील मजकुरावर आक्षेप घेवून सरकारने त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला.त्यात त्यांना सहा वर्षाची शिक्षा झाली.मे १९१६ मध्ये बेळगाव व अहमदनगर येथे 'होमरूल'वर लोकमान्य टिळकांनी जी व्याख्याने दिली होती.त्या व्याख्यानातील आशय आक्षेपार्ह वाटल्याने त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला गेला.त्यात लो.टिळक निर्दोष सुटले.

'यंग इंडिया'ती लेखांतील विधानावर आक्षेप घेवून सरकारने म.गांधीजींवर सन १९२२ मध्ये राजद्रोहाचा खटला भरला.या खटल्यात त्यांना सहा वर्षाची शिक्षा झाली.निकाल देताना न्या.ब्रूम फिल्ड यांनी याच कलमाखाली लो.टिळकांना पूर्वी ६ वर्षाची शिक्षा झाली असल्याचा उल्लेख केला.निकालानंतर गांधीजी न्यायमूर्तींना म्हणाले,'लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या खटल्याचे स्मरण करून देवून आपण माझा सन्मान केला आहे.त्यांच्याशी माझी तुलना होणे हे मी माझे मोठे भाग्य अभिमानास्पद गौरव समजतो'[२४]गांधीजींसारख्या महात्म्याच्या तोंडून निघालेल्याया उद्गारावरून  लोकमान्य टिळकांची महानता दिसून येते

**समारोप**

गोवर्धन पारीख लोकमान्य टिळकांना 'भारतीय राष्ट्रवादाचे शिल्पकार' मानतात.लोकमान्य टिळकांनी सोप्या शब्दात स्वराज्याचा संदेश लोकांना दिला.सर्वसामान्य जनतेच्या मनात देशप्रेमाची ज्योत पेटविली.राष्ट्रवाद ही एक तात्विक विचारधारा राहू न देता 'स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे व तो मी मिळविणारच' अशी सिंहगर्जना करून देशाच्या कानाकोपऱ्यात पराक्रम जागृत केला.त्यामुळेच प्रा.गोवर्धन पारीख यांनी त्यांना 'भारतीय राष्ट्रवादाचे शिल्पकार'असे म्हटले आहे. लोकमान्य टिळकांनी भारताला केवळ राष्ट्रवादच शिकविला नाही तर राष्ट्रवादाचे अधिष्ठान लोकसत्ता असली पाहिजे ही शिकवणही त्यांनी सतत दिली.असे ग.प्र.प्रधान म्हणात.[२५]ब्रिटीशांची संस्कृति ही जगात सर्वश्रेष्ठ असून त्यांची बरोबरी इतर कोणीही करू शकणार नाही. ब्रिटीशांच्या आगमनामुळेच आपली प्रगती होईल असे नेमस्त समजल्या जाणाऱ्या नेत्यांना वाटत होते.हे सर्व नेते उच्चविद्याविभूषित होते.इंग्रजी शिक्षण घेतलेले होते. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर सतत ब्रिटीश संस्कृतिचा चांगुलपणा व सर्वश्रेष्ठपणा बिंबला गेला होता.त्यामुळे अनेकांना भारतावरील ब्रिटीश राज्य म्हणजे ईश्वरी वरदान वाटत होते.या न्युनगंडातून,पराभूत मन:स्थितीतून देशाला बाहेर काढण्याचा प्रयत्न लो.टिळकांनी केला. आणि देशात राष्ट्रवादाचा पाया घातला.राष्ट्रीय चळवळ लाकाभिमुख केली म्हणून गोवर्धन पारीख लोकमान्य टिळकांना 'भारतीय राष्ट्रवादाचे शिल्पकार' मानतात.[२६]

'टिळकांसारखा दक्ष,धाडसी आणि प्रभावी संपादक भारतात झालाच नाही.ते भारतीय वृत्तपत्रसृष्टीतील नेपोलियनच होते.एक हजार तलवारीपेक्षा चार बंडखोर वृत्तपत्राची शक्ती प्रबळ ठरते असे नेपालियनने म्हटले होते. लोकमान्य टिळकांच्याबाबतीत ते सत्य ठरते.टिळकांची भाषा घणाघाती,ओघवती,ओजस्वी व मर्मभेदक होती'.अशा शब्दामध्ये धनंजय कीर यांनी त्यांचा गौरव केला आहे.[२७]याच ग्रंथात पुढे धनंजय कीर म्हणतात—'टिळकांनी मराठी वृत्तपत्रीय भाषेला परिणामकारकता व शैलीदारपणा आणला.मराठी भाषेत नवीन शब्द रूढ केले.मराठी भाषेला तत्वज्ञानाची परिभाषा दिली.टिळकांच्या वाणीचा व लेखणीचा इतका प्रभाव पडला की टिळक काय म्हणतात? हे कळण्यासाठी अनेक परभाषिक मराठी भाषा शिकले.पुणे हे राजकारणाचे प्रमुख केंद्र बनले.'[२८]अशाच आशयाचे मत ना.सी.फडके यांनी व्यक्त केले आहे.'टिळकांच्या 'केसरी'नेच मराठी भाषा जोरदार,शुध्द व भारदस्त केली'.[२९]

लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांना श्रध्दांजली वाहताना म.गांधीजी दि.८ ऑगष्ट १९२० च्या 'नवजीवन' मधील लेखात लिहितात,—" लोकमान्य ही एक वेगळीच श्रेणी होती.लोकांनी टिळक महाराजांना दिलेली ही पदवी कोणत्याही राजाने दिलेल्या पदवीपेक्षा हजार पटीने मौल्यवान आहे हे देशाने सिध्द केले आहे.त्यांना अखेरचा निरोप देण्यासाठी सगळी मुंबई लोटली होती....... लोकमान्यांच्या भारताविषयीच्या प्रेमाला मर्यादाच नव्हती आणि म्हणूनच लोकांचे त्यांच्याविषयीचे प्रेमही तितकेच अमर्याद होते.त्यांनी स्वराज्याच्या मंत्राचा जेवढा सातत्याने जप केला तेवढा कोणीच केला नाही."[३०]भारतमंत्री लॉर्ड मॉन्टेग्यु यांनी त्यांना'महापुरूष',लेनिनने त्यांना'महान लोकनेता',चिरोलने त्यांना 'भारतीय असंतोषाचे जनक',म.गांधीजींनी त्यांना 'आधुनिक भारताचे निर्माते'म्हटले आहे.धनंजय कीर त्यांना'भारतीय स्वांतत्र्याचे जनक'मानतात.सरकारला दहशत वाटेल अशा रितीने सरकारशी झुंज लढत ठेवण्यात,त्यात जास्तीत जास्त लोकांना सामिल करून घेण्यात टिळकांइतका महान पुढारी त्या काळात दूसऱ्या कोणत्याही प्रांतात नव्हता' असे धनंजय कीर म्हणतात[३१]

**निष्कर्ष**

१. लोकमान्य टिळकांनीसामाजिक सुधारणांच्या ऐवजी राजकीय सुधारणांना अग्रक्रम दिला.

२. लोकमान्य टिळकांनीजनतेत स्वाभिमान, राष्ट्राभिमान,व स्वातंच्याची इच्छा जागृत केली.

३. स्वराज्य मिळविणे हे लोकमान्य टिळकांचे ध्येय होते. ते साध्य करण्यासाठी त्यांनी स्वदेशी,बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या साधनांचा अवलंब केला.

४. लोकमान्य टिळकांनी'केसरी' चा उपयोगजनजागृतीसाठी केला.

५. सन १८८१ मध्येजनजागृतीसाठी सुरू केलेल्या 'केसरी' व 'मराठा' या दोन्ही वर्तमानपत्राची मालकीसन १८९१ मध्येलोकमान्य टिळकांकडे आली ती शेवटपर्यंत त्यांच्याकडे राहिली.

६. वर्तमानपत्रांनी जनतेच्या कोतवालाची व वकिलाची भूमिका पार पाडली पाहिजे असे लोकमान्य टिळकांना वाटत होते.

७. लोकमान्य टिळकांनी जे काही सांगायचे ते स्पष्ट शब्दात सांगीतले.

८. लोकमान्य टिळकांनीलिहिलेल्याअग्रलेखांचे मथळे लक्षवेधक होते.

९. लोकमान्य टिळकांचे वृत्तपत्रीय लेखन हे साहित्य या प्रकारात मोडणारे होते.

१०. लोकमान्य टिळकांवर राजद्रोहाचे तीन खटले दाखल झाले.त्यापैकी पहिले दोन खटले हे त्यांनी 'केसरी'मध्ये लिहिलेल्या लेखासंबधी होते.त्या दोन्ही खटल्यात त्यांना शिक्षा झाली.

११. लोकमान्य टिळकांनी सोप्या शब्दात स्वराज्याचा संदेश लोकांना दिला व सर्वसामान्य जनतेच्या मनात देशप्रेमाची ज्योत पेटविली.

१२. लोकमान्य टिळक हे 'भारतीय राष्ट्रवादाचे शिल्पकार'होते.

१३. 'स्वराज्य हा प्रत्येकाचा जन्मसिध्द हक्क आहे व तो मिळविण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला पाहिजे' अशी घोषणा करून लोकमान्य टिळकांनी सर्वसामान्य जनतेला त्यांच्या गुलामगिरीची जाणीव करून दिली.

१४. भारतामध्ये ब्रिटिश राज्यकर्त्याविरूध्द असंतोष निर्माण करण्याचे कार्य लोकमान्य टिळकांनी केले.

**संदर्भ**

१. कीर धनंजय, लोकमान्य टिळक व राजश्री शाहू महाराज, एक मुल्यमापन, श्री गजानन बुक डेपो, मुंबई, १९७८, पान १

२. कित्ता,पान ५३

३. केळकर न.चि.,लोकमान्य टिळक चरित्र,खंड १,पान १३५

४. फाटक न.र.,अर्वाचीन महाराष्ट्रातील सहा थोर पुरूष,चौफेर प्रकाशन,मुंबईचौथी आवृत्ती,१९८८,पान ९५

५. ताम्हणकर द.वि.अनु.खेर भा.द.लोकमान्य टिळक दर्शन,केसरी प्रकाशन,पुणे,१९५६,पान ३६

६. केळकर न.चि.,उपरोक्त,पान १३७

७. केसरी,४ जानेवारी १८८१

८. इंद्रविद्यावाचस्पती,लोकमान्य टिळक और उनका युग,(पाने फाटली आहेत) पान २२

९. फाटक न.र.,उपरोक्त,पान ९५

१०. फाटक न.र.,उपरोक्त,पान ९९

११. तळवळकर गोविंद,बाळ गंगाधर टिळक,मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस,१९८०,पान ९०

१२. प्रधान ग.प्र., लोकमान्य टिळक व्यक्ति आणि कार्य,केसरी प्रकाशन,१९७१,पान ३९

१३. कित्ता,पान ४०

१४. कित्ता,पान ३५

१५. केसरी,१५ जुन १८९७

१६. ताम्हणकर द.वि.उपरोक्त,पान ७१

१७. केसरी,६ जुलै १८९७

१८. केसरी,१३ जुलै १८९७

१९. ताम्हणकर द.वि.उपरोक्त,पान १९२

२०. स्टेटस्मन,कलकत्ता,दि.५ मे १९०८

२१. केसरी दि.१२ मे १९०८

२२. केसरी दि.९ जुन १९०८

२३. भोळे डॉ.भास्कर लक्ष्मण,आधुनिक भारतातील राजकीय विचारवंत,पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स,नागपूर, पान २४३

२४. ताटके अरविंद,महात्मा गांधी,सरिता प्रकाशन,पुणे,१९९४,पान ३८७

२५. प्रधान ग.प्र., उपरोक्त,पान ६४

२६. भोळे डॉ.भास्कर लक्ष्मण,उपरोक्त,पान २७३

२७. कीर धनंजय,उपरोक्त,पान ८

२८. उपरोक्त,पान ४७

२९. फडके ना.सी,लोकमान्य टिळक,भारत बुक डेपो,धारवाड,१९६५, पान ९३

३०. संकलन व संपादन यु.एस.मोहनराव,अनु.प्रकाश देशपांडे केजकर, श्रध्दांजली आणि शब्दचित्रे गांधीजी,नॅशनल बुक ट्रस्ट,इंडिया,तिसरी आवृत्ती,२०१२,पान १२२

३१. कीर धनंजय,उपरोक्त,पान ५४

VOLUME - IX, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# २९. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास

**डॉ. मधुकर विठोबा जाधव**
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी, ता. चंदगड, जि. कोल्हापूर.

दबलेल्या समाजाचा आवाज बुलंद करणारे व आयुष्यभर लोकांसाठीच दिलेल्या योग्यदानामुळे मराठी साहित्य विश्वात अजरामर झालेले साहित्यिक म्हणून अण्णा भाऊ साठे यांना ओळखले जाते. स्वातंत्र्य, समता, बंधुत्वावर आधारलेला वर्ग,वर्ण, जातीविरहित समाज त्यांना हवा होता. त्यासाठी त्यांनी लेखणी हाती घेतली व साहित्य क्षेत्रामध्ये ते सर्वश्रेष्ठ बनले. साहित्य हेच अण्णा भाऊंचे सर्वस्व होते. साहित्यिक, लोकशाहीर, साहित्यरत्न या विविध नावांनी अण्णा भाऊ साठे यांना ओळखले जाते. पोवाडा,शाहीरी वाङःमयातून व अग्निदिव्य कादबरीच्या माध्यमातुन अण्णा भाऊ साठे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा गैरवशाली इतिहास समाजासमोर मांढला आहे.

अत्यंत सामान्य कुटुंबात अण्णा भाऊ साठे यांचा जन्म एका मातंग कुटुंबात १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्हयातील वाळवा तालुक्यातील वाटेगांव येथे झाला. आईचे नाव बाळुबाई तर वडिलांचे नाव भाऊ साठे असे होते. घरची परिस्थिती कमालीची गरिबीची होती. कायमच्या अस्थिर व अंधकारमय जगण्याचा त्यांना कंटाळा आला होता. पोट भरण्यासाठी नोकरीच्या शोधात ते मुंबईत गेले. मुंबईमध्ये मिळेलते काम करून ते गावाकडे पैसे पाढवित असत. क्रांतिसिंह नाना पाटील यांचे रेठरे गावच्या यात्रेत भाषण ऐकून अण्णा भाऊ साठे यांना स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्याची प्रेरणा मिळाली.

मुंबईला ते वयाच्या सोळाव्या वर्षी गेले व त्यानंतर त्यांनी शिक्षणाचा श्रीगणेशा केला. त्यांनी फक्त वाचण्या लिहिण्यापुरतेच शिक्षण पूर्ण केले. नोकरी शोधत असतांनाच ते खया अर्थाने साहित्याकडे वळाले. त्यांनी साहित्याच्या मध्यमातुन समाजातील समस्या,घटना व घडामोडीवरती साहित्य लिहिता येते हे त्यांनी दाखवून दिले. अण्णा भाऊंच्या साहित्यामध्ये कथा लेखन,कादंबरी,नाटक,पोवाडे लेखन,ललित लेखन,पटकथा लेखन आदि. दिसुन येते.

साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांनी अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत चिरागनगरसारख्या झोपडपटटीत राहुन दर्जेदार आणि विपुल लिखान केलेले आहे. भारतीय समाजाला अण्णा भाऊ साठे यांचे लिखाण खुप उपयुक्त आहे. अण्णा भाऊ साठे साहित्य केवळ मराठीच नव्हेतर जागतिक साहित्याचा अनमोल ठेवा आहे.

दलित लेखकांचे अग्रदूत असणाया अण्णा भाऊ साठे यांना साहित्य विश्वामध्ये खुप वरचे स्थान आहे. अण्णाभाऊ साठे दलित समाजाचे पहिले लेखक आहेत त्यामुळे त्यांचा लौकीक मोठा आहे. अमरशेख यांच्या बरोबर त्यांनीअनेक वर्षे शाहिरी केली आहे. त्यांच्यावर साम्यवादाचा प्रभाव होता. भटक्यासमाजाचे प्रश्न त्यांनी अत्यंत आत्मीयतेने त्यांच्या कथा, कादबयांमध्ये मांडले आहेत. दारिद्रय, भूक यांचे अगदी मनाच्या तळापासुन त्यांनी प्रभावी चित्रण केले आहे. अण्णा भाऊ साठे हे सामजिक समरसता

जोपासाणारे साहित्यीक होते. सहित्य हे समाजपरिवर्तनाचे श्रेष्ठ माध्यम आहे असे ते म्हणत. भारतीय समाजमध्ये समता, मानवता, न्याय व आर्थिक समतोल निर्माण करण्याच्या उददेशाने त्यांनी आदर्शवादी, लढाऊ, शौर्य दाखविणारे लिखान केले आहे.

अण्णा भाऊ साठे यांना लाभलेल्या एकोणपन्नास वर्षाच्या हयातीपैकी लेखनासाठी वापरलेल्या पंधरा एक वर्षाच्या काळात चाळीसभर कादबया शंभरसव्वाशे पर्यत कथा बांधल्या ही त्यांची मराठी समाजासाठी दिलेली खुप मोठी देणगी आहे. अण्णा भाऊ साठे यांची साहित्यसंपदा खुप मोठी आहे त्यांनी ३०कादबंया, १९ कथासंग्रह, ११ वगनाटये, १५ पोवाडे, त्यामध्ये १० पोवाडे उपलब्ध आहेत. असे विविध अंगी महत्वपूर्ण लिखान केले आहे.

अण्णा भाऊ साठे व अमर शेख लोकनाटय तमाशा मंडळाची स्थापना केली. व त्याचे संपूर्ण महाराष्ट्रात प्रयोग झाले. अमर शेखव अण्णा भाऊ साठेयांनी शाहीरी परंपरेला बळ दिले. अमर शेख यांनी समाजवादी 'छत्रपती शिवाजी महाराज'या पोवाडयातुन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्याची व कार्याची ओळख करून देऊन मराठी माणसाचा अभिमान व स्वाभीमान जागा केला. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे भाषांतर रशियन, जर्मन, चिनी, इंग्रजी, आदि. पाश्चिमात्य भाषांतुन झाले आहे. मानवता व विज्ञाननिष्ठा हे त्यांच्या साहित्याची महत्वाची अंगे होती.

इ. सन. १९६२ मध्ये अण्णा भाऊ साठे यांनी मॉस्को आकाशवाणी केंद्रावरून सातासमुद्रापलीकडे रशिया मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या वरील पोवाडा सर्व रशियन जनतेला ऐकविला. जगाला छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य व पराक्रम सांगणारे अण्णाभाऊ साठे खया अर्थाने शिवशाहीर शोभतात. रशियातील प्रवासात त्यांचे मन प्रत्येक बाबतीत भारतीयांची तुलना करी. 'माझा रशियाचा प्रवास' हे छोटेखानी प्रवासवर्णन त्यांनी लिहिले.

अण्णा भाऊ साठे यांची 'अग्निदिव्य' ही कादंबरी छत्रपतींच्या शौर्याचे गुणगान गाणारी नायकप्रधान कलाकृती आहे. स्वराज्याचे सरसेनापती प्रतापराव गुजर यांच्या जीवनावरील शौर्याचे व बलिदानाचे चित्रण करणारी ही कादंबरी आहे. अण्णा भाऊ साठे यांनी ऐतिहासिक विषय घेऊन लिहिलेली कादंबरी सरसेनापती प्रतापराव गुजर यांच्या जीवन प्रसंगावर उभी राहिलेली ही कादबंरी होय. प्रतापराव गुजर यांच्या व्यक्तिमत्त्वावर, त्यांच्या जीवनातील महत्वाच्या प्रसंगावर या कादंबरीतुन प्रकाश पडतो. अण्णा भाऊ साठे यांनी ऐतिहासिक योध्दा प्रतापराव गुजर यांची स्वराज्यातील कर्तबगारी आपल्या तडफदार शैलीव्दारे रेखाटली आहे. स्वाभिमानी, धाडसी, मानी, करारी हे त्यांचे गुण अगदी चपखलपणे रेखाटले आहेत.

अण्णा भाऊ साठे यांनी महाराष्ट्रातील सामाजिक समतेची चळवळ पुढे नेण्यासाठी खुप मोठे योग्यदान दिले अहे. त्यांच्या कथा, कविता, कादबया, शाहिरी वाङःमय, लोकनाटय, वैचरिक लेख हे अतिशय महत्वाचे असे लिखाण आहे. अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या लिखाणातुन श्रमीक मागसवर्गीय व सामान्य माणसाला केंद्रस्थानी मानून लिखान केले आहे. ज्या समाजाने दलित, दरिद्री व बहुजन मानले त्या श्रमिकांना जीवनमूल्ये असतात. व ती जीवनमूल्ये जपण्यासाठी ते प्राणपणाने लढतात. त्यांचे कार्य जणू पेटत्या ज्वालासारखे धगधगत राहिले. अण्णा भाऊ साठे आयुष्यभर नैतिक मुल्याची विचारधारा घेऊन जगले.

अण्णा भाऊ साठे यांनी **'अग्निदिव्य'** या कादंबरीतुन सरसेनपती प्रताप गुजर यांच्या जीवनातील महत्वाचे प्रसंग उभे केले आहेत. या कांदबरीसाठी अण्णा भाऊ साठे यांनी खुप कष्ट घेतले आहे. अण्णा भाऊ साठे यांनी जवळजवळ ४ ते ५ वर्षे माहिती मिळवून ही कादंबरी लिहिली आहे. अण्णा भाऊ साठे या कादबरीच्या माध्यमातुन समाज चित्रण रेखाटले आहे ते असे की

ऐककाळी आमचा महाराष्ट्र बेवारसी होता नि त्याच्या मनगटात समशीर उचलण्याची शक्ती नव्हती तेव्हा मोगलशाही नि आदिलशाही या देशाला आपलं कुराण समजत होते. टोळधाडीप्रमाणे या देशात घूसून लुटालुट करीत होते. आपले वैबद्या वढवित होते. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांनी या देशाला नवे बळ दिले. समाजामध्ये नवे चैतन्य पेरले. त्यामुळे भारत देशात वीरांचे पीक भरभरून आले. नरवीर तानाजी,धाडसी नेताजी, येसाजी कंक, बाजी प्रभू देशपांडे असे रणगजी निर्माण झाले. छत्रपतींचा हुकूम होताच मोगलांची आक्रमणे नेस्तनाबूत करू लागले. गडागडावर,तटातटावर मराठी तलवारी तळपू लागल्या. आणि मराठे शाहीर नवे पोवाडे गाऊ लागले.

अण्णा भाऊ साठे'अग्निदिव्य'या कादबंरीत छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य व गुणगान गाताना म्हणतात,

**'मेघापरी हाक देत आले छत्रपती शिवाजी महाराज |**
**मग उठे तानाजी**
**बहिर्जी नि येसाजी | हंबीरराव आणि बाजी**
**मालुसरेआणि सूर्याजी |**
**दोन मावळे मर्द रणमाजी ||ध्रु||**
**घोडयाची टाप वाजली |अन धूळ उडू लागली |**
**किल्ल्यांन धाप टाकली |बुरूजानं**
**बाहू उभारली |**
**त्या भयाण जाळीखाली |तलवार**
**तळपू लागली . ||ध्रु||**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या हाकेने अवघा महाराष्ट्र देश खडबडून उठला होता. त्याला नवा जोम आला होता. मराठी जनता पाठी घेऊन छत्रपती शिवाजी महाराज मराठी स्वराज्य लढवित आणि वाढवित होते.

**'अग्निदिव्य'** या कादंबरीमध्ये प्रतापराव गुजर, आदिलशाही दरबार,रायगडावरील खलबत, आदिलशाही हेर, महाराजांचा आशीर्वाद,महाराष्ट्राला यशवंतकर, हैबतीचे क्रूर कारस्थान, चंद्रीपे हरण, बहेलोलखानाची तयारी,रायगडाची बाट, महाराजांचा हुकूम,उंबराणीची लढाई, महाराज मजवर रागावले, बहलोलखान उलटला, नेसरीचे रण आदि. प्रसंगांचे चित्रण केले आहे. प्रतापराव गुजर यांच्या नेसरी खिंडीतील लढाईचे वर्णन अग्निदिव्य कादबरीमध्ये पुढील प्रमाणे आले आहे. छत्रपतींच्या शिवधनुष्यावरून सात बाण सुटले होते. प्रतापराव धावत होते. मराठयांचे धैर्य धावत होते.

'महाराष्ट्राची परंपरा' या पोवाडयात ते म्हणतात औरंगजेब नमविला दिलेरखान दमविला शाहिस्तेखान शासिला वीर मर्दा चा पोवाडा वीर मर्दाने वीर मर्दासमोर गावा असे जे म्हटले जाते ते शिवशाहीर अण्णाभाऊ साठे यांना तंतोतंत लागू पडते. गोवमुक्ती संग्राम, हैद्राबादमुक्ती संग्राम आणि मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रासाठी अण्णा भाऊ साठे यांनी एका हातात लेखणी घेऊन आणि एक पाय रणमैदानात तर दुसरा पाय तुरूंगात अशा पध्दतीने आपली वाणीआणि लेखणी महाराष्ट्रासाठी झिंजवलेली आहे. अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या लेखनी व वाणीने महाराष्ट्रातील जनतेच्या मनावर अधिराज्य केले. महाराष्ट्रातील मराठी

माणसाला स्वाभीमानी व वीरपुरूषंची परंपरा सांगून त्यांच्या शौर्याची गाथा सर्व सामान्यांपर्यत पोहचविण्याचे महान कार्य अण्णा भाऊ साठे यांनी केले. अण्णा भाऊ साठे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची पताका सातासमुद्रापर नेली. आपल्या लिखानाने व शाहिरी वाङःमयाने करोडे लोकांच्या मनावर अधिराज्य केले. म्हणून अण्णा भाऊ साठे खया अर्थाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे पाईक ठरतात.

**संदर्भ ग्रंथ**

१. कुंभार राजेंद्र, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङःमय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०१७.

२. गुरव बाबूराव, अण्णा भाऊ साठे ,समाजविचार आणि साहित्य विवेचन.

३. साठे विठठल, अण्णा भाऊ साठेंच्या कथा, सामाजिक आविष्कार.

४. भोसले एस एस,[संक] प्रतिनिधीक कथा,मुंबई, १९९४.

५. मोरे गिरीष, परिवर्तनाचा जागार, कोल्हापूर, १९९९.

६. जवळगेकर शिवाजीराव, अण्णा भाऊ साठे एक वादळवेल.

७. दैनिक तरूण भारत, दि.१ ऑगस्ट २०२०.

८. अर्जुन डांगळे [संपा],लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङःमय, मुंबई, १९९८.

९. आचार्य अत्रे, संयुक्त महाराष्ट्राच्या लढयातील शाहीरांचे योगदान, पुणे, २०१०.

१०. कुलकर्णी सुहास, [संपा] यांनी घडवल सहस्त्रक, पुणे, २००३, पृष्ठ ३१०.